# मला दिसलेली अमेरिका

अरविंद साने






अरविंद केशव साने,
१०१/१०२, पद्मप्रभा हाईटस्,
गणेशनगर, नटराज सोसायटी जवळ,
पुणे, ४११०५२
टेलीफोन : ०२० २५४४ ७०७६
ईमेल : bhausane@yahoo.com


जन्म १४ नोव्हेंबर १९४०

बालपण पुणे येथील मध्यवस्तीत गणपती चौक, लक्ष्मी रोड, येथे गेले. नूतन मराठी शाळे नंतर बृहन् महाराष्ट्र कॉमर्स कॉलेज, येथून बी.कॉम्. व लॉ कॉलेज, पुणे येथून लॉ ची पदवी घेतली. याच दिवसात बी.ए. पण केले. १९६१ ते २००० अशी सलग चाळीस वर्षे बँक ऑफ बरोडा मध्ये विविध पदावर व वेगवेगळ्या ठिकाणी नोकरी केली. बँकेच्या नोकरीत असताना सी.ए.आय्.आय्.बी. परीक्षा दिली. बँकेतर्फे चार वर्षे १९८३ ते १९८७ युगांडा येथे व नंतर थोड्या दिवसांसाठी मॉरीशस व सेशल्स या देशाच्या बँकेत कामाची संधी मिळाली. युगांडाच्या बँकेच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर वर एक डायरेक्टर व बोर्डाचा सेक्रेटरी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. युगांडाहून परत आल्यानंतर पुणे कँप सारख्या प्रतिष्ठित शाखेची जबाबदारी सांभाळली. नोव्हेंबर १९९१ ते नोव्हेंबर १९९५ नाशिक विभागाचा रिजनल मॅनेजर म्हणून यशस्वी काम केले. शेवटची पाच वर्षे इन्स्पेक्शन व काही दिवस प्लॉनींग विभाग प्रमुख म्हणून काम केल्यानंतर २००० च्या नोव्हेंबर मध्ये बँकेच्या नोकरीतून निवृत्त.

शालेय जीवनापासुनच नाटकाचे वेड. शाळेच्या व कॉलेजच्या प्रत्येक वर्षाच्या संमेलनात नाटकात कामे केली. ज्युनियरच्या वर्षात कॉलेजच्या सांस्कृतिक विभागाचा व संमेलनाचा सेक्रेटरी म्हणून काम केले. बँकेची नोकरी करीत असतानाच हा छंद जोपासण्यासाठी १९५७ ते १९६५ दरम्यान पुण्याच्या प्रोग्रसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन मधुन पहाटेची चाहूल, जगन्नाथाचा रथ, तु वेडा कुंभार, प्रेमा तुझा रंग कसा, पवनाकाठचा धोंडी, खून पहावा करून, राजमुकुट, सत्तावनचा सेनानी, शारदा, गावगुंड, कोरीव लेणी व काही एकांकीकामधुन रंगमंचावर तसेच रंगमंचामागे कामे केली. त्यापैकी चार वर्षे संस्थेचा व्यवस्थापक म्हणून काम केले. त्याच काळात अरूण जोगळेकर व सई परांजपे यांच्या बरोबर चिल्ड्रन्स थिएटरचे काम पाहिले.

१९६५ ते १९७० दरम्यान महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेतर्फे क्षण झाला वैरी, राजा नावाचा गुलाम, ही चौकट वाटोळी, चक्र, अडीच घरे वजीराला, मधल्या भींती या नाटकातून महत्वाच्या भुमिका केल्या. १९८९ मध्ये युगांडाहून परत आल्यावर नांदी संस्थेतर्फे प्रेमाच्या गावा जावे व प्रेमा तुझा रंग कसा या दोन नाटकातुन भूमिका केल्या. २०१४ साली बॉस्टन, यु एस् ए येथिल वास्तव्यात नाटयप्रवेशांचा गजरा हा तीन तासांचा कार्यक्रम गुंफला, काही भाग दिग्दर्शन केले व स्वतः नटसम्राट मधील शेवटचा भाग सादर केला.

युगांडाच्या वास्तव्यात संगीताची खूप आवड निर्माण झाली. संगीत ऐकण्यात दिवसातील बराच वेळ घालवितो. गेल्या वीस पंचवीस वर्षात सर्व प्रकारचे संगीताचा खजिना जमा केला आहे. लोकांनी त्याचा आस्वाद घ्यावा अशी धडपड चालू असते.

२००१ ते २०१० मधील बराच काळ सचिन (मोठा मुलगा) याच्या बरोबर बंगलोर येथे वास्तव्य झाले व २०१३ पासून आता फोलसम्, कॅलीफोर्निया आणि बॉस्टन, मॅसाच्युसेटस् येथे स्थलांतर केले आहे. वर्षातील काही महिने पुण्याला येतो.

या पुस्तकाचे ई वितरण ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े होत आहे.

ई साहित्य ची सर्व पुस्तके दर्जेदार, सहज उपलब्ध असतात आणि अधिकृतपणे विनामूल्य असतात.

या ई पुस्तकांच्या विनामूल्य वितरणाचे अधिकार ई साहित्य प्रतिष्ठानकडे असतात आणि हे अधिकार ई साहित्यतर्फ़े आपल्या वाचकांना दिले जातात. हे पुस्तक भारतात व जगात जास्तीत जास्त मराठी साक्षरांपर्यंत पोहोचावे हा उद्देश आहे.

मात्र या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे वा अंशतः मुद्रणाचे, नाट्य वा चित्रपट रुपांतराचे, किंवा इतर कोणत्याही रुपात आणण्याचे सर्व अधिकार लेखकाकडेच असून त्याचे उल्लंघन करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई साहित्य प्रतिष्ठान

# ई साहित्य प्रतिष्ठान

इंग्लंडची लोकसंख्या सहा कोटी आहे. आणि महाराष्ट्राची बारा कोटी. इंग्लीश वाचकांची संख्या आहे शंभर कोटी. आणि मराठी वाचक? कुठे आहोत आपण. माझा मराठाची बोलु कवतुके... अमृतातेही पैजा जिंके.... माउलींनी दाखवलेलं स्वप्न पूर्ण करू तरच आम्ही शिवबाचे मावळे.

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाही. तुमच्या मोबाईलवर आता हजार मराठी ई पुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा. हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

सप्रेम भेट

रेखा व अरविंद  कडून

# मला दिसलेली अमेरिका

अरविंद केशव साने

# मला दिसलेली अमेरिका

## अरविंद केशव साने

अरविंद केशव साने
१०१/१०२, पद्मप्रभा हाईटस्
गणेशनगर, पुणे ४११०५२.
टेलिफोन : ०२० २५४४ ७०७६
ई मेल : bhausane@yahoo.com

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

प्रथम आवृत्ती

अक्षरजुळणी :
दत्तात्रेय एंटरप्रायझेस,
शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

मुखपृष्ठ : प्रतिक काटे

मूल्य : खाजगी वितरणासाठी फक्त

# अर्पण पत्रिका

ज्यांनी मला अमेरिकेचे दर्शन घडविले

त्या माझ्या

सचिन व मोनिका

आणि श्रीनिवास व स्वाती यांना

# अनुक्रमणिका


१. लिहिण्यास कारण की, ....... १

२. व्यवस्थापन आखणी व योजना ५

३. हवामान अंदाज आणि वाहतूक परिस्थिती ६

४. गृहरचना व शहररचना ७

५. अमेरिकन वाहतूक व रस्ते ११

६. जनतेचा मित्र आणि शिस्तपालक पोलीस १७

७. शिस्तपालन हा अमेरिकेच्या मातीचाच गुण २०

८. अमेरिकेची चकचकीत स्वच्छता २३

९. अमेरिकेतील ग्राहक राज २६

१०. अमेरिकेतील सुरक्षा व्यवस्था व दक्षता ३५

११. अमेरिकेतील नोकरीची कार्यपद्धती ३७

१२. अमेरिकेतील शिक्षणपद्धती व विद्यार्थी ४३

१३. अमेरिकेतील अपंग ५१

१४. अमेरिकेची पर्यटन व्यवस्था ५३

१५. अमेरिकेचे सण, उत्सव आणि सुट्ट्या ६१

१६. ब्रुकलीन ब्रीज ८६

१७. भारत - अमेरिका मनन ९३

१८. अमेरिकेतील मनाला खटकणाऱ्या काही गोष्टी ९६

१९. माझी अमेरिका - श्री. आर.के.नारायण ह्यांच्या लेखाचा अनुवाद ९९

२०. एका यशस्वी देशी अधिकाऱ्याची भारत भेट १०७

२१. अमेरिका न परतीची वाट - क्ष + १ अवस्था ११४

२२. माझे अमेरिकेत स्थलांतर - एक तडजोड १२०

२३. अमेरिकेतील वैद्यकीय उपचार व सुविधा,...... १२७

२४. पंधरा वर्षांनंतरची अमेरिका व मी १३८

## प्रकरण पहिले

# लिहिण्यास कारण की, . . . . .

आजपर्यंत अमेरिकेत जाऊन आलेल्या अनेकांनी अमेरिका व तिथल्या अनेक पर्यटन स्थळांविषयी लिहिले आहे. त्यात पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत आणि उत्तरेपासून दक्षिण टोकापर्यंत कित्येक स्थळांची माहिती व प्रवासवर्णने प्रसिद्ध झाली आहेत. ते लिहिताना अमेरिकेच्या भव्यदिव्य गोष्टींनी दिपून जाऊन, भारावून जाऊन, अमेरिका किती सुंदर व पुढारलेली आहे व आपला भारत किती मागासलेला व दरिद्री आहे असाच सूर बऱ्याच जणांचा आढळतो. इतरांप्रमाणे मलाही अमेरिकेचे आकर्षण जरूर होते. गेल्या पाच वर्षांत पाच वेळा व दरवेळी प्रदीर्घ काळाच्या माझ्या ट्रिप्स झाल्या. त्या पाचही ट्रिप्समध्ये मी खूप भटकलो. खूप काही पाहिले. अनुभवले. त्यावर विचार करताना नुसतेच प्रवासवर्णन किंवा स्थळांचे वर्णन न करण्याचे माझ्या मनात आले. अमेरिका अनुभवताना भारत सतत डोक्यात घोळत होता. अमेरिकेमधील कित्येक गोष्टी आपण भारतात सहज आणू शकतो, निर्माण करू शकतो किंवा प्रत्यक्षात उतरवू शकतो याची जाणीव होत होती आणि मग याच ठरावीक दृष्टिकोनातून मी अनुभवलेली अमेरिका शब्दांत मांडण्याचे मी ठरविले.

पंधरा वर्षांपूर्वी मी बँकेतर्फे आफ्रिका खंडामधील युगांडा येथे चार वर्षे वास्तव्य केले होते. त्या काळात युगांडा, केनिया, इजिप्त हा भाग पाहता आला. युगांडामधील कालखंड संपवून भारतात परत येताना इंग्लंड व युरोपमधील काही प्रदेश बघितला. त्या वेळेपासूनच मला अमेरिका पाहण्याची तीव्र इच्छा होती. आफ्रिका पाहताना तिथले सृष्टीसौंदर्य, वन्यप्राणीजीवन यांनी मन भरून गेले होते. युगांडामधील जिंजा येथून उगम पावणारी नाईल नदी कैरोला जे भव्य रूप धारण करते, ते पाहून निसर्गापुढे नतमस्तक झालो होतो. सफारी पार्क पाहताना मुक्त प्राणीजगतात अनेक तास तहानभूक हरवून आनंद लुटला होता. आफ्रिकेतील उंच, धिप्पाड व कृष्णवर्णीय माणसे जरी जवळची वाटू लागली होती तरी त्यांची

क्रूरता विसरता येणे शक्य नव्हते. अस्तित्वासाठी केली गेलेली व डोळ्यांदेखत घडलेली मानवी हत्या कदापीही विसरणे शक्य नाही. परतीच्या वाटेवर युरोप पाहताना त्या देशातील समृद्धता, विज्ञान प्रगती व त्याचबरोबर जुन्याची जपणूक, शिस्तप्रियता या गोष्टींनी मनाचा पगडा घेतला होता. त्याच वेळी अमेरिका खुणावत होती; परंतु मन भारतात असलेल्या मुलांकडे ओढले गेले. त्यावेळी अमेरिकेला न जाता भारतात परत आलो.

पुढे मुलांनी इंजिनियरिंग अभ्यास पूर्ण केला व एकामागून एक दोघेही जण उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत गेले. त्या वेळेपासूनच आपण एक दिवस अमेरिका पाहणार हे पक्के ठाऊक होते. मधल्या काळात मुलांकडून अमेरिकेबद्दल बरेच ऐकत होतो. ते सांगायचे, अमेरिकेत सर्वच भव्य असते. सर्वच बाबतीत ते उत्तम श्रेणी गाठण्याचा प्रयत्न करतात. सर्व अमेरिका इतकी स्वच्छ आहे की, रस्त्यात सुद्धा कोठेही झोपावे. तिथली खरेदीही अनुभवायलाच हवी. गाड्यांची किती मॉडेल्स, खाण्याचे किती प्रकार, एक ना अनेक गोष्टी ऐकून मंतरून जायला होत असे. प्रत्यक्षात ते सर्व कसे असेल हे न समजून मनातील अनेक शंका विचारून त्यांना भंडावून सोडत असे. अखेर दोघेही पुत्र शिक्षण संपवून द्रव्यार्जन करू लागल्यावर आमचे अमेरिका भेटीचे ठरले. व्हीसा मिळविण्याचा दिव्य पराक्रम केल्यानंतर सप्टेंबर १९९७ मध्ये आम्ही दोघे पती-पत्नी अमेरिका सफर करते झालो. त्यानंतर १९९९, २००१, २००३ आणि २००५ मध्ये परत दीर्घ काळ अमेरिकेत वास्तव्य झाले.

प्रथम अमेरिका भेटीपूर्वी अनेकांकडून अमेरिकेबद्दल ऐकले होते. अनेक प्रवासवर्णने वाचली होती. त्यामुळे माझी उत्सुकता शिगेला पोहोचली होती. तरीही एक प्रश्न मनाला त्रास देत होता. सर्व जगाला, विशेषत: युवा पिढीला अमेरिकेचे इतके आकर्षण का वाटते? तिकडे गेल्यानंतर ते स्वदेशाकडे पाठ का फिरवितात? वाचलेल्या व ऐकलेल्या वर्णनावरून अमेरिका ही निसर्गरम्य, भव्य आणि कित्येक बघण्यासारख्या स्थळांनी संपन्न असणार हे पक्के ठाऊक होते. माझ्या पाच वेळच्या अमेरिका भेटीमध्ये मी हे सर्व तर पाहिलेच; पण मी आकर्षित झालो ते इतर अनेक कारणांनी. या सर्व सुखसोयी निर्माण होण्याची कारणपरंपरा

शोधण्याचा मन सतत प्रयत्न करीत राहिले.

या वेगळ्या दृष्टिकोनातून पाहताना मला अनेक मुद्दे जाणवले किंवा लक्षात आले. कोणत्याही गोष्टीतील व्यवस्था पद्धत, त्या मागची योजना आणि त्यातील कार्यपद्धती अथवा कार्यप्रणाली मला फार आकर्षित करून गेल्या. (systems, procedures and planning for execution) अमेरिकेत पाचही वेळा भरपूर भटकताना प्रवास व तोही कित्येक मैलांचा सुसह्य झाला, तो संपूर्ण अमेरिकेतील रस्ते बांधणी व वाहतूक व्यवस्थेमुळे. हे होण्यासाठी व जनजीवन सुखकर होण्यासाठी सदैव तत्पर, सुसज्य व जागरुक असलेले पोलीस खाते पाहून मी आश्चर्याने थक्क झालो. अर्थातच, हे सर्व उपभोगण्यासाठी अमेरिकेतील जनता नियमांचे किती काटेकोर पालन करते आणि त्यामुळे सर्वांचेच जगणे कसे सुखाचे होते, ते प्रकर्षाने जाणवले. स्वच्छता आणि तीही सार्वजनिक व्यवहारात व सार्वजनिक स्थळांची पाहून मन प्रसन्न होते. त्या बाबतची बालपणापासूनच असलेली जागरुकता क्षणाक्षणाला लक्षात येते.

ग्राहक सेवा, तक्रार निवारण व्यवस्था, तत्पर सेवा हे नुसते बोधवाक्यात नसून किंवा नुसते फलकावर नसून प्रत्यक्ष कृतीत, आचरणात भिनलेले आहे हे ठिकठिकाणी जाणवते.

कोठेही जा. सुरक्षा व्यवस्था व नियंत्रण व्यवस्था इतकी चोख असू शकते यावर विश्वासच बसत नाही. नोकरीतील कामाची पद्धत, त्यातील प्रामाणिकपणा, वक्तशीरपणा, वरिष्ठ-कनिष्ठ संबंध, संस्थेविषयी नोकरवर्गाला वाटणारी आत्मीयता व त्याचबरोबर कोणत्याही नोकरीतील धोके, हे पाहून त्यांच्याकडे मिळणारे अंतिम चांगले परिणाम का व कसे येतात याबद्दल संदेह राहात नाही. मानवतेच्या दृष्टिकोनातून व समतेच्या भावनेतून अपंगांसाठी प्रत्येक ठिकाणी केलेली व्यवस्था, सोय, काळजी पाहून सलाम करावासा वाटतो. अमेरिकेत असताना अनेक चांगल्या शैक्षणिक संस्था, विद्यापीठे पाहिली. तिथले वातावरण व व्यवस्था पाहून विद्यार्थी गुणसंपन्न व उत्तम नागरिक झाला नाही तरच नवल ठरेल. सर्व वास्तव्यात अनेक पर्यटनस्थळे पाहिली. ती पाहत असताना त्या स्थळांची निर्मिती, व्यवस्था, पर्यटकांसाठी सोयी, आकर्षणे पाहून अमेरिकेत लोक का सतत हिंडत राहतात व

मजा लुटत असतात हा प्रश्न मनात येत नाही. ठिकठिकाणी निर्माण केलेली करमणुकीची साधने लहानांपासून वयस्कर लोकांपर्यंत सर्वांना पूर्ण सुख मिळवून देतात.

या सर्व चांगल्या गोष्टींबरोबरच मनाला न पटणाऱ्या अनेक गोष्टीही प्रकर्षाने जाणवल्या. सर्व व्यवस्थेमधील साचेबंदपणा, तोचतोचपणा, सारखेपणा कंटाळा आणतात. कशातही फरक वाटेनासा होतो. अमेरिकेत सर्व सुखासीनता, संपन्नता व आबादीआबाद आहे याचा थोडा भ्रमनिरास होतो. तिथेही वर्णभिन्नता, गरिबी आणि त्यातून येणारी गुन्हेगारी बरेच वेळा अनुभवाला येते. अमेरिकन सुबत्तेमुळे नकळत आलेला माज जाणवतोच. एका ठिकाणी राहूनही माणसे एकमेकांना न ओळख देता, न बोलता कशी राहू शकतात याचे आश्चर्य वाटते. वैयक्तिक संबंध किंवा सामाजिक संबंध हे अभावानेच जाणवतात. सतत जाणवते ती कोणत्याही गोष्टीतील, प्रसंगातील, संबंधातील कृत्रिमता अन् मग त्याचा उबग येऊ लागतो. केव्हा एकदा आपल्या भारतीय वातावरणात जातो असे वाटू लागते.

* * *

## प्रकरण दुसरे

# व्यवस्थापन आखणी व योजना

अमेरिकेतील कोणतीही व्यवस्था, व्यवस्थापन आणि त्याची आखणी अगदी आखीवरेखीव असते. त्यामुळे सर्व कसे सोपे, सुरळीत वाटते. कोणाला काही विचारावे लागतच नाही. प्रत्येक धंद्याची, सेवासंस्थांची, सुपर मार्केटस्‌ची, औषधांच्या दुकानांची, हॉटेल्सची, पेट्रोल पंपांची (तिकडे त्याला गॅस स्टेशन्स म्हणतात), मोटार गराजची किंवा रस्त्यालगतच्या थोड्या स्वस्त व तयार नाश्त्याच्या दुकानांची (फास्ट फूड सेंटर्स) एक साखळी किंवा चेन असते. अमेरिकेत कोठेही त्या साखळीतील कोणतेही दुकान वा सर्व्हिस स्टेशन सारखेच असणार. बाहेरचा त्याचा देखावा, रंगसंगती, नावाची पाटी, त्यांच्या खुणेचा लोगो/मोनोग्राम, त्यांची ब्रीदवाक्ये इतकेच नाही तर त्याच्या अक्षरांची जाडी, रुंदी, उंची, रंग सर्व एकसारखे असते. आतील वस्तूंची मांडणी, पैसे किंवा बिले देण्याची काऊंटर्स सारखीच असतात. कोठेही काहीही फरक नसतो. ह्या बाह्यरुपाप्रमाणेच आत दिल्या जाणाऱ्या सुविधा व ग्राहकसेवा यात कोठेही फरक नसतो.

अमेरिकेत कोणत्याही कोपऱ्यात जा. तुम्हाला वॉल ग्रीन, वॉल मार्ट, के मार्ट, पे लेस, सी. व्ही. सी., टार्गेट ऑफिस मॅक्स, कोहल्स, सर्किट सिटी, टॉईज आर अस, सीअर्स, बेस्ट बाय, लोवेज, जेसीज्, होम डेपो, बेड अँड बाथ, स्टॉप अँड शॉप अशी सुपर मार्केटस् असतात. कितीही लांबून ती ओळखता येतात. बर्गर किंग, रॉय रॉजर्स, मॅकडोनल्ड, सब वे, डंकिन डोनटस्, पिझ्झा हट ही व अशी साखळी असलेली इतर अनेक फास्ट फूड सेंटर्स आहेत. मोठमोठ्या जाहिराती, आतील सजावट, आतला व बाहेरचा रंग, दिले जाणारे तयार पदार्थ आणि त्यांच्या चवी याच्यात कोठेही फरक आढळणार नाही. हे जे त्यातल्या त्यात छोट्या स्टोअर्स किंवा हॉटेल्सचे तेच मोठ्या नाव असलेल्या कंपनीच्या भल्या मोठ्या सुपर स्टोअर्सच्या बाबतीतही दिसून येते. मॅसिज, जेसि पेनिज्, सीअर्स, केबी मार्ट, अशा मोठ्या कंपन्यांची स्टोअर्स दोन-तीन मजली आहेत. पण कोठेही जा, ती एकसारखीच असतात.

* * *

## प्रकरण तिसरे

# हवामान अंदाज व वाहतूक परिस्थिती

अमेरिकेत हवामान अंदाज व स्थानिक रस्त्यावरील वाहतुकीची परिस्थिती हे टेलिव्हिजनवर सतत दाखविले जाते. त्यांची माहिती व अंदाज अचूक असतात. हवामान अंदाज त्या दिवसाचा व पुढील चार-पाच दिवसांचा सांगितला जातो. त्या दिवसाच्या अंदाजात तासा-तासाचे बदल सांगितले जातात. प्रत्येक शहरातील टेलिव्हिजन कंपनी स्थानिक वाहतूक व त्यामध्ये असणाऱ्या अडचणी, अडथळ्यांची सविस्तर माहिती पुरवित असते. ही माहिती प्रत्यक्ष परिस्थितीचे उंचावरून चित्रण करून दाखविली जाते. अपघात व अडथळे असतील तर कोणते मार्ग बंद आहेत व नागरिकांनी कोणत्या पर्यायी मार्गाने जावे हे पण सांगितले जाते. हे सर्व इतके अचूक असते की, नागरिक त्यानुसार आपले कपडे व आपला प्रवासाचा मार्ग ठरवितात. वाहतूक सूचनेप्रमाणे आपले इच्छित स्थळी जाण्याचे मार्ग आक्रमितात व पुढील पाच दिवसांच्या अंदाजानुसार आपल्या कार्यक्रमांची आखणी करतात. हवामान अंदाजानुसार छत्री, रेनकोट, गरम कपडे, स्वेटर्स, ओव्हरकोट किंवा समरमध्ये शॉर्ट व टी शर्टस् हे पेहेराव करूनच बाहेर पडतात आणि वर्तविलेला अंदाज त्यांना कधीही दगा देत नाही. माझ्या तिथल्या वास्तव्यात मी सकाळी उठलो की, ही माहिती करून घेण्याचा परिपाठच ठरून गेला होता. सकाळी आकाश स्वच्छ असले तरी दुपारी बारा वाजता पाऊस पडेल असे सांगितले म्हणजे बरोबर त्यावेळी पाऊस पडलेला मी अनुभवला आहे. सूर्यप्रकाशाचा दिवस म्हणजे तो तसाच असणार. बर्फ पडणार म्हणून सांगितले की लोकांचे त्यासाठीचे वेष घालून बाहेर पडणे होते आणि खरोखर बर्फ पडतो. हे सर्व बिनचूक वर्तविण्यासाठी किंवा वाहतुकीची माहिती देण्यासाठी तिथे उपलब्ध असलेली साधनसामुग्री हे जरी त्यामागचे रहस्य असले तरीही त्यामागचे प्रयत्न, ज्ञान व तत्परता वाखाणायलाच हवी.

* * *

### प्रकरण चौथे

# गृहरचना व शहररचना

जी गोष्ट सुपरमार्केटस् किंवा हवामानखात्याबद्दल, तीच गोष्ट भाड्याने घर घेण्याच्या पद्धतीत किंवा मोठ्या मोठ्या हाऊसिंग कॉम्प्लेक्सबाबत आढळून येते. एखाद्या धनाढ्य माणसाने वैयक्तिक अथवा ट्रस्टतर्फे ही हाऊसिंग कॉम्प्लेक्सेस बांधलेली असतात. भाड्याचे उत्पन्न मिळविण्यासाठी केलेली ही पैशाची गुंतवणूक असते. प्रत्येक हाऊसिंग कॉम्प्लेक्समध्ये एक व्यवस्थापकीय ऑफिस (management office) असते. त्याचे मार्फतच घर भाड्याने दिले जाते. भाडे, अटी व मुदत ठरविले जाते. घर भाड्याने घेणारी व्यक्ती व मॅनेजमेंट यामध्ये भाडे करार होतो. प्रत्यक्ष मालकाची व भाडेकरुची कधीच गाठ पडत नाही. घराची डागडुजी व घरात दिलेल्या वस्तूंची काळजी घेणे हे मॅनेजमेंट ऑफिस करते. आपली अडचण व दुरुस्तीची सूचना त्यांना केली की जास्तीत जास्त ४८ तासांत ते दुरुस्ती करतात. घरात तुम्ही असा अगर नसा त्यांच्याकडे असणाऱ्या चावीने घर उघडून ते दुरुस्ती करून जातील. इतर वस्तूंना हात सुद्धा लागणार नाही. घरात सर्वसाधारणपणे रेफ्रिजरेटर, वॉशिंग मशिन, कुकींग रेंज व डिश वॉशर दिला जातो. काही वेळा फर्निचरही दिले जाते. संपूर्ण घरात वॉल टू वॉल कार्पेट असते. अर्थात, या सर्वांसाठी भाडे आकारले जाते. पण कराराची मुदत संपताच जागा खाली करावी लागते. कार्पेटसकट सर्व घर जसे ताब्यात दिले होते तसेच स्वच्छ करून द्यावे लागते. जागा मुदतीनंतर सोडायची नसेल तर भाडेकरूला किमान दोन महिने आधी कराराचे नूतनीकरण करावे लागते. सर्व कसे ठरून गेल्यासारखे असते. त्यात तक्रार, भांडणे, कोर्टकचेऱ्या काहीही उद्भवत नाही. करार करताना घरात माणसे किती राहणार, पाहुणे किती येणार, ते किती दिवस राहणार ते प्रथम सांगावे लागते. कुत्री, मांजरी ठेवायला परवानगी घेणे आवश्यक असते. या सर्व गोष्टी करार करताना नक्की केल्या जातात.

पुष्कळ ठिकाणी इमारतीच्या मुख्य दरवाजातून कोणासही मुक्त प्रवेश नसतो.

मुख्य दाराला कुलूप असते. ज्याच्याकडे तुम्हाला जायचे असेल त्याचे घरी दारापाशी असलेल्या इंटरकॉमवरून बोलावे लागते. घरातील माणसांना खात्री पटली तरच ते फोनचा ठरावीक क्रमांक फिरवून किंवा त्यासाठी खास असलेले बटण दाबून पाहुण्याला येण्यासाठी मुख्य दरवाजा उघडण्याची सोय केलेली असते. घरातील माणूस हे घरबसल्या करतो आणि तुम्हाला दरवाजा उघडून देतो. मगच तुम्हाला प्रवेश मिळतो. अशी हाऊसिंग कॉम्प्लेक्सेस २०० पासून १२०० फ्लॅटस्‌ची असतात. या सर्वांचे व्यवस्थापन पाहून फार आश्‍चर्य वाटते. मॅनेजमेंट ऑफिसजवळच त्या परिसरात घरे कशी आहेत याचा नमुना म्हणून प्रत्येक प्रकारचा एक फ्लॅट तयार करून सजवून ठेवलेला असतो. त्याचा ले आऊट पाहून तुम्ही तुम्हाला हवा तसा फ्लॅट भाड्याने घेऊ शकता. घरांचे रंग सुद्धा ठरावीक असतात. सफेद, कौलारू लाल, राखाडी असे ठरावीकच रंग आढळतात. आपल्याकडच्यासारखे विविध व भडक रंग आढळत नाहीत. बहुतेक गृहसंकुलात (Housing Complexes) फिटनेस सेंटर असते. तिथे सर्व प्रकारची व्यायामाची साधने, पोहोण्याचा तलाव तसेच टेनिस व बास्केटबॉल कोर्टस् असतात. राहणाऱ्या लोकांना त्या सर्वांचा वापर करता येतो. संपूर्ण परिसर झाडून साफ ठेवलेला असतो. घराबाहेर कोणालाही घाण करता येत नाही. घरातील कचरा ठरावीक ठिकाणी नेऊन टाकावा लागतो. तिथून तो उचलून नेण्याची व्यवस्था नित्यनियमाने केलेली असते. हिरवळ व फुलझाडे यांची खास देखरेख केली जाते. लोकांना घराबाहेर कपडे वाळत घालायला परवानगी नसते. या सर्व सोयी व नियमांमुळे संपूर्ण परिसर स्वच्छ, प्रसन्न व नीटनेटका न राहिला तरच नवल.

अमेरिकेत इमारतींच्या बाहेरच्या भिंती या दगड, विटा, सिमेंटनी बांधलेल्या असतात; पण आतील बहुतेक भिंती व इतर भाग हा लाकडाचा असतो. सर्व मजल्यावरील जमिनी या तर हमखास लाकडाच्या असतात. त्यामुळे चालताना आणि घरात वावरताना फार काळजी घ्यावी लागते. आपल्या आवाजाने वरच्या अगर खालच्या मजल्यावरील लोकांना त्रास होत नाही ना याचा सतत विचार करावा लागतो. त्यांना जरा जरी त्रास झाला तरी ते मॅनेजमेंट ऑफिसमध्ये तक्रार करू शकतात व त्यासाठी तुम्हाला ताकदवजा नोटीस येण्याची शक्यता असते.

त्यामुळे आपल्याकडील भरतनाट्यम् किंवा कथकली नाच तिथे कोणी करू शकत नाही.

प्रत्येक शहरात ठराविक गोष्टी ठराविक ठिकाणीच असतात. शहराबाहेरील रस्त्यावरून शहराच्या आतील रस्त्यावर प्रवेश केला की, राहण्याची हाऊसिंग कॉम्प्लेक्सेस असतात. त्याच्या थोडे पुढे बाजार-मार्केट एरिया असतो. तिथे सुपर मार्केटस्, केमिस्ट, गराज, पोस्ट ऑफिस, बँक इ. सर्व असतेच. शहराच्या एका भागात सर्व ऑफिसेस असतात. त्याला डाऊन टाऊन असे म्हणतात. त्या ठिकाणी खाजगी, सार्वजनिक व सरकारी कार्यालये असतात. कार्यालये सुरू होण्याआधी लोकांच्या राहण्याच्या भागातून डाऊन टाऊनकडे वाहतुकीचा प्रचंड लोंढा असतो. न्यूयॉर्क, लॉस एंजलीस, सॅनफ्रान्सिस्को अशा मोठ्या शहरात लोकांना कार्यालयात जाण्यासाठी सहज एक ते दोन तास कारने प्रवास करावा लागतो. दिवसा डाऊन टाऊनचा भाग खूप गजबजलेला असतो. सायंकाळनंतर मात्र निर्मनुष्य होऊन जातो. मग त्या भागात अगदी भयाण वाटते. त्या भागातील बहुतेक सर्व इमारती गगनभेदी असतात. त्यामुळे कोणत्याही शहरात डाऊन टाऊन कोठे आहे हे चटकन लक्षात येते. या सर्व इमारतींची आकाशाला छेदून जाणारी एक स्काय लाईन हे त्या शहराचे वैशिष्ट्य ठरते. मी अनेक शहरे पाहिली. त्यातील न्यूयॉर्कची स्काय लाईन सर्वांत आकर्षक आहे. ११ सप्टेंबरच्या आघातानंतर मात्र त्या स्काय लाईनला मधेच एक खिंडार पडल्यासारखे वाटले. सर्वांत उंच वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या दोन इमारती त्यातून अचानक गायब झाल्या. त्या असताना पाहिलेल्या असल्यामुळे तर आता जास्तच जाणवते. अर्थात, अमेरिकेच्या बऱ्याच शहरांच्या या स्काय लाईन्स व डाऊन टाऊन पाहिल्यानंतर सर्व सारखेच वाटू लागते. तोचतोचपणा जाणवतो.

शहराच्या या सर्वसाधारण समान पद्धतीमुळे, आखीवरेखीव मांडणीमुळे सर्व शहरे सारखीच वाटतात. थोडाफार लहान मोठेपणा एवढाच काय तो फरक आढळतो आणि मग काही काळातच साचेबद्धपणा येतो व त्याचा कंटाळा येऊ लागतो. परंतु शहर असो वा लहान गाव असो, मोठ्या शहरात ज्या सुखसोयी असतील त्या लहानात लहान गावातही असतात. वॉलग्रीन, सर्किट सिटी, टार्गेट, स्टेपल्स, ऑफिस मॅक्स, वॉल मार्ट, के मार्ट, स्टॉप अँड शॉप, केमिस्ट, बँका, पोस्ट ऑफिस

हे सगळे असणारच. त्यामुळे गावाकडचा माणूस या नित्यनियमित गरजांसाठी शहराकडे आकर्षित होत नाही. कोणत्याही गावात अगर शहरात शिरताना त्या गावाची अगर शहराच्या नावाची पाटी असते. तेवढीच एक नावाची पाटी. मग आत कोणत्याही पाटीवर शहराचे नाव नसते. आपल्याकडे शहरातील दवाखान्यापासून शिंप्याच्या किंवा न्हाव्याच्या दुकानापर्यंत सर्व पाट्यांवर नाव, पत्ता व शहराचे नाव असते. त्यामुळे शहराचे नाव तुम्हाला सतत दिसत असते. अमेरिकेत एखाद्याला डोळे बांधून शिकागोला नेले व सांगितले की तू सॅनफ्रान्सिस्कोला आला आहेस तरी त्याला ते खरे वाटेल. अर्थात, जाणकाराला हवामान, वातावरण व इतर संदर्भावरून ते चटकन ध्यानात येईल.

* * *

## प्रकरण पाचवे

# अमेरिकन वाहतूक व रस्ते

अमेरिकेतील रस्ते, त्यांची आखणी, देखभाल आणि त्यांची वाहतूक यंत्रणा ही अप्रतिम आहे. 'तुमचा प्रवास सुखकर होवो' अशी नुसती पाटी नसते तर तो खरोखरच सुखकर होईल याची खबरदारी घेतली जाते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस जी आर्थिक मंदीची लाट आली होती त्यावर उपाय म्हणून सरकारने रस्ता बांधणीचे काम हाती घेतले. वाहतूक व्यवस्था नीट असेल तर मंदीवर मात करणे सोपे जाईल या उद्देशाने रस्ते बांधणीचा उद्योग हाती घेण्यात आला होता. बेरोजगारांना काम मिळाले. त्या संबंधातील अनेक धंद्यांना काम मिळाले. आणि थोड्याच अवधीत अमेरिकेत सर्वत्र रस्त्यांचे जाळे विणून झाले. आता संपूर्ण अमेरिकेत उभे आणि आडवे रस्त्यांचे जाळे आहे. पूर्वेच्या एका किनाऱ्यापासून निघालेला रस्ता पार पश्चिम किनाऱ्याला जाऊन पोहोचतो. तसेच उत्तरेकडून निघालेला रस्ता दक्षिणेला जाऊन भिडतो. सर्व आडव्या म्हणजे पूर्व पश्चिम रस्त्यांना सम आणि सर्व उभ्या म्हणजे उत्तर दक्षिण रस्त्यांना विषम क्रमांक दिले आहेत. रस्त्याच्या आखणीतील नॅशनल हायवे, स्टेट हायवे आणि सिटी रोडस् असे प्रमुख तीन भाग असून अगदी आत स्थानिक रस्ते असतात. नॅशनल हायवेचा क्रमांक ९० असेल तर स्टेट हायवेचा १९० असतो. हा १९० क्रमांकाचा रस्ता हायवेवरून शहरात आत नेऊन शहराभोवती फिरतो. या स्टेट हायवेवरून शहराच्या आत नेणारा रस्ता २९० क्रमांकाचा असतो. अगदी आतल्या रस्त्यांना स्वतंत्र नंबर किंवा नावे असतात. हीच पद्धत सर्व रस्त्यांना व सर्व शहरांना लागू असते. त्यामुळे अमेरिकेत कोठेही घर शोधणे फार सोपे असते. रस्त्याचा क्रमांक व त्याला जोडणाऱ्या कोणत्या रस्त्याने आत जायचे असे सांगत किंवा पाहात आपण हव्या त्या घरासमोर येऊन थांबतो. कोठेही विचारण्याची जरूरीच पडत नाही आणि विचारायला रस्त्यावर कोणी असतही नाही. या पद्धतीने अगदी बॉस्टनपासून निघालेला कोणीही लॉस एंजलिसमधील कोणत्याही पत्त्यावर जाऊन पोहोचू शकतो.

या सर्व रस्त्यांचे नकाशे अतिशय काटेकोरपणे केलेले असतात. नकाशात अगदी छोट्यातला छोटा रस्ता सुद्धा तुम्हाला सापडतो. त्यामुळे प्रत्येक कारमध्ये हे सर्व नकाशे असावेच लागतात. हे सर्व नकाशे असलेले अमेरिकेच्या सगळ्या रस्त्यांचे विभागवार नकाशांचे एक पुस्तक मिळते. शिवाय विभागवार व प्रत्येक स्टेटचे स्वतंत्र असे नकाशे पण मिळतात. किंबहुना ए ए ए किंवा ट्रिपल ए नावाची प्रवासी सेवा देणारी एक संस्था हे नकाशे व इतर माहिती पुस्तिका त्यांच्या सभासदांना मोफत पुरवते. कार चालवित असताना ड्रायव्हर शेजारील माणसाला हे नकाशे समजून वाचता येणे अत्यंत आवश्यक असते. बहुतेक वेळा पती पत्नी हे काम आलटून पालटून करतात. नकाशे वाचून त्यानुसार मार्ग सांगणाऱ्या व्यक्तिला नॅव्हिगेटर असे म्हणतात. मग त्या दोघांचे संवाद, त्यावरून होणारी वादावादी, चिडाचिडी ठरावीक आणि ठरलेली असते. कोणत्याही वयाचा याला अपवाद असत नाही. अमेरिकेच्या वास्तव्यात अगदी तरुण जोडप्यापासून ते वयस्कर जोडप्यापर्यंत अनेकांबरोबर मागच्या सीटवरून मी खूप प्रवास केला. प्रत्येक वेळी नकाशा वाचन, त्यावरील चर्चा, रस्ता चुकणे मग त्यावरून होणारे दोघांचे वाद ही मागे बसून करमणुकीची गोष्ट होत असे. त्यातून दूर राहण्यासाठी मला नकाशा वाचता येत नाही किंवा इतके छोटे मला आता दिसत नाही असे सांगून मी त्यातून सुटका करून घेत असे.

तरीही या नकाशाशिवाय प्रवास करणे अशक्यच असते. एकदा मुलाबरोबर वॉशिंग्टनला गेलो असताना कारमधून वॉशिंग्टनचा नकाशा हरवला. आम्ही वॉशिंग्टनमध्येच हिंडत राहिलो. बाहेर येण्याचा व हायवेला लागण्याचा रस्ता मिळायला आम्हाला बराच त्रास झाला. त्यामुळे प्रवासाला निघताना सर्व नकाशे बरोबर घेतले आहेत ना याची खात्री करून घ्यावी लागते. नॅशनल हायवेवरून जाताना लगतचे शहर सहसा दृष्टिक्षेपात नसते. त्यासाठी स्टेट हायवे घेऊन आत जावे लागते. नॅशनल हायवेवरून स्टेट हायवेवर जायला किंवा स्टेट हायवेवरून स्थानिक रस्त्याला जाण्यासाठी तुम्हाला एकदम वळता येत नाही. त्यासाठी बाहेर पडणाऱ्या ठरावीक रस्त्याला, ज्याला एक्झिट म्हणतात, त्याला लागावे लागते. तसेच या मोठ्या रस्त्यावरून एकदम डावीकडे वा उजवीकडे वळता येत नाही. बाहेर पडणाऱ्या रस्त्यावर वळून डोक्यावर असणारा पुलाचा रस्ता (Overbridge

Road) तुम्हाला डावीकडे किंवा उजवीकडे घेऊन जातो. या व्यवस्थेमुळे कोणाचाही वेग कमी होत नाही. तसेच अपघाताची शक्यता जवळजवळ शून्य होऊन जाते.

या सर्व रस्त्यांवर असणाऱ्या पाट्या व खुणा यांचा सारखेपणा, सातत्य, आकार, रंगसंगती ही एक कौतुकाची बाब आहे. नॅशनल हायवेचे क्रमांक निळ्या रंगात व ठरावीक महिरपीमध्ये असतात. तसेच इतर रस्त्यांचे क्रमांकही ठरावीक रंगात व ठरावीक नक्षीमध्ये गुंफलेले असतात. एकदा तुम्हाला त्या रंगाचा व आकृतीचा अर्थ लक्षात आला व त्याचा परिचय झाला की, तो रस्ता कोणता आहे हे तुम्ही आपोआप समजू शकता. ज्या ठिकाणी जायचे असेल तो रस्ता क्रमांक व त्याकडे नेणारा रस्ता आक्रमला तर तुम्ही इच्छित स्थळी आपोआप जाऊन पोहोचता. ज्याप्रमाणे रस्त्यांच्या पाट्यांना ठरावीक रंग व आकार असतात त्याचप्रमाणे, रेस्टरुमस् - स्वच्छतागृह, फूडकोर्टस् - नाश्त्याची उपहारगृहे, गॅस स्टेशनस् - पेट्रोल पंप यांच्या पाट्यांनाही ठरावीक रंग, आकार व नक्षी केलेली असते. कितीही वेगाने तुम्ही प्रवास करीत असलात तरी या रंगसंगती व आकार संगतीमुळे काहीही चुकणे शक्य नसते. सर्व हायवेच्या बाजूला ठरावीक अंतरावर असणाऱ्या या सोयींचे फलक लावलेले असतात. या सोयी ज्या ठिकाणी असतात त्या येण्यापूर्वी बरेच अंतर म्हणजे कमीतकमी पाच-सहा मैल तरी ती जागा येत असल्याचा फलक असतो. इतकेच नाही तर ती सर्व व्यवस्था असलेली त्यानंतरची जागा किती मैलांवर आहे ते पण दर्शविलेले असते. त्यामुळे तुम्ही जरूरीप्रमाणे लगेचच्या ठिकाणी थांबायचे की त्यानंतरच्या ठिकाणी थांबायचे हे जवळचे ठिकाण येण्यापूर्वीच ठरवू शकता. या फलकांमुळे व ठरावीक अंतरावर केलेल्या सोयींमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा येत नाही. अथवा कोणाचाही वेग कमी होत नाही. या रस्त्याच्या कडेला असणाऱ्या व्यवस्थेमध्ये गॅस स्टेशनबरोबर प्रामुख्याने असते ते म्हणजे फास्ट फूड सेंटर व रेस्ट रूम्स्. या ठिकाणी असणाऱ्या रेस्ट रूमस् आपल्या घरच्या रेस्ट रूमस् पेक्षाही जास्त स्वच्छ असतात. त्या ठिकाणी गेल्यावर आपल्याकडच्या बस स्टेशनवरील किंवा सार्वजनिक स्वच्छतागृहांची आठवण जरी झाली तरी शरमेने मान खाली जाते.

बहुतेक नॅशनल व स्टेट हायवे सहा किंवा आठ पदरी असतात. निम्म्या भागावर द्विभाजक असतो. त्यामुळे विरुद्ध दिशेची वाहतूक दोन्ही बाजूंनी होते.

एका बाजूच्या वाहतुकीसाठी तीन किंवा चार पदर-लेन्स असतात. दिव्याच्या साहाय्याने खुणा दाखवून वाहतुकीचे नियम पाळल्याखेरीज या लेन्स कोणीही बदलत नाही. त्यामुळे मैलोनमैल एका सरळ रेषेत प्रवास सुरू असतो. या लेन्सपैकी सर्वांत डावीकडची लेन वेगवान व कार पुलची असते. कार पुल म्हणजे एका कारमधून दोनपेक्षा अधिक प्रवासी जाणाऱ्या कार्सना या लेनमधून प्राधान्याने जाता येते. सर्वांत उजवीकडच्या लेननंतर एक लेन राखीव असते. आकस्मिक गरजेसाठी थांबाव्या लागणाऱ्या वाहनांसाठी ती लेन असते. या लेनमध्ये गाडी थांबवून लुकलुकणारे दिवे लावले की अगदी थोड्याच वेळात पोलीस येऊन मदतीला हजर होतो. काही रस्त्यांवर (शहराच्या आतील भागात) विरुद्ध दिशेच्या लेन्सच्या बरोबर मधे एक सामायिक लेन असते. त्यावर तुम्ही येऊन पुढे मागे पाहून डावीकडे किंवा उजवीकडे वळू शकता. मधल्या या सामायिक लेनमुळे कितीतरी अपघात टळू शकतात.

अमेरिकेच्या पश्चिम डोंगराळ भागात आपल्याकडच्यासारखे घाटाचे रस्ते आहेत. परंतु घाटात सुद्धा सहा किंवा आठ पदरी रस्ते आहेत. त्यामुळे घाटातून जाताना सुद्धा कमीतकमी वेगमर्यादा व तीही ताशी ४५ मैल पाळली जाते. कोठेही ट्रॅफिक जॅम होत नाही. आणि त्या घाट रस्त्यावर चढणाचे रस्ते असे केले आहेत की, डोंगरमाथ्यावर जाऊनही चढण जाणवतच नाही. या सर्व सुरळीत वाहतुकीसाठी रस्त्यांचे बांधकाम अप्रतिम असते. क्वचितच तुम्हाला खड्डा दिसेल. रस्ता हा कडेच्या टोकापर्यंत नीटच केलेला असतो. त्याला लागून हिरवळ असते. त्यामुळे धूळ नसतेच. शहरातील अंतर्गत रस्ते फार कमी वेळा खोदकाम केलेल्या अवस्थेत आढळतात. सर्व रस्त्यांवर ठरावीक खोलीवरच विजेची, पाण्याची, फोनची व ड्रेनेजची कनेक्शन्स असतात. त्या त्या संबंधित खात्याला खोदकाम करण्यापूर्वी स्थानिक सरकारी यंत्रणेची परवानगी घेऊन मगच ठरावीक खोलीवर खोदकाम करावे लागते. काय, कोठे, किती दिवस नव्हे तर किती तास काम चालेल हे नक्की करून घ्यावे लागते. तशी सूचना वाहनांसाठी त्या रस्त्यावर लावावी लागते. काम पूर्ण होताच रस्ता पूर्ववत करण्याची जबाबदारी खोदकाम ज्या खात्याने केले असेल त्याच खात्याची असते. काम चालू असताना विटकरी रंगाचे पडदे, रेलिंग व नोटीस बोर्ड लावणे सक्तीचे असते. वाहतुकीला अडथळा आणल्याबद्दल

दिलगिरी व्यक्त करणारे फलक लावलेले असतात. हे सर्व करण्यासाठी मोठी यंत्रणा लागत असणार. खूप खर्च होत असणारच. मग हा खर्च वसूल करण्यासाठी ठरावीक अंतरावर टोलनाके आहेत. तुम्ही वापर केलेल्या रस्त्याच्या अंतरावर टोल किती भरायचा ते ठरते. रस्त्याची सुस्थिती, ठिकठिकाणी केलेल्या सोयी व जनतेच्या गरजांची घेतलेली पुरेपूर काळजी यामुळे हा टोल देण्यास कोणीही कुरकुरत नाही. टोल घेण्यासाठी माणसे तर असतातच, परंतु काही रांगा ठरावीक नाणी (Exact Coins) टाकून ऑटोमॅटिक उघडण्याच्या केलेल्या असतात. काही लेन्स आगाऊ पैसे भरून - ॲडव्हान्स पैसे भरून - पार करता येतात. या दोन्ही सोयींमुळे, न थांबता टोल भरून पुढे जाता येते. या सर्व सोयी केल्यामुळे वाहतूक किती सुरळीत होत असेल याची कल्पना येऊ शकेल.

आपल्याप्रमाणेच तिकडे सुद्धा वाहन पार्किंगची अडचण येतेच. रस्त्यावर पार्किंग मिळण्यासाठी अर्धा अर्धा तास गोल गोल फिरावे लागते. अगदी पे पार्किंग सुद्धा मोकळे मिळत नाही. यावर उपाय म्हणून ठिकठिकाणी केवळ कार पार्किंगसाठी सहा-सहा मजली इमारती बांधल्या आहेत. जगप्रसिद्ध डिस्नेलँड येथे तर एका वेळी १५,००० गाड्या पार्क करता येतील असे कार पार्क केले आहे. अशा ठिकाणी आपण आपली कार कोठे पार्क केली आहे हे लक्षात ठेवावे लागते. पण हे इतके व्यवस्थित असते की तुमच्या कार पार्क केलेल्या जागेचा मजला, ब्लॉक, रांग व नंबर लक्षात ठेवला की न चुकता तुम्ही तुमच्या गाडीजवळ जाऊ शकता. न्यू यॉर्क, लास वेगास, लॉस एंजलिस येथे तर या इमारती पाहण्यासारख्या आहेत. लास वेगास येथील जुगारी हॉटेल्सनी खेळण्यासाठी येणाऱ्या लोकांना आकर्षित करण्यासाठी त्या हॉटेल्सच्या मागेच प्रचंड मोठ्या कारपार्कस्च्या इमारती बांधल्या आहेत. लोकांना आकर्षित करण्यासाठी कारपार्क फुकट देतात. अन्यथा पे अँड पार्क मध्ये तासाला २ डॉलरपासून दिवसाला १५ डॉलरपर्यंत आकार भरावा लागतो.

मिनियापोलीस, बॉस्टन या सारख्या ठिकाणी बर्फ बराच पडतो. शहरात एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीत जाणे सुद्धा काही वेळा शक्य होत नाही. अशा वेळी लोकांना पायी जाता यावे यासाठी सर्व इमारती एकमेकांना एका बंद पूल रस्त्याने (Closed Bridge Road) जोडलेल्या आहेत. हे ब्रीजचे रस्ते आतून गरम

राहण्याची व्यवस्था केलेली असते. त्यामुळे नागरिक कोठूनही कोठेही जाऊ शकतात. अशा प्रकारच्या रस्त्यांना स्काय वे असे म्हणतात.

या सर्व सोयी रस्त्यांची अवस्था व व्यवस्था यामुळे कोठेही जा, वाहतूक अगदी सुरळीत चालू असते. दिवस मावळल्यानंतर अंधार पडल्यानंतर तर दोन विरुद्ध बाजूने वाहणारे दोन लखलखीत प्रवाहच वाटतात. समोरून येणाऱ्या वाहनांचे दिवे सफेद असतात, तर आपल्या बाजूने पुढे जाणाऱ्या वाहनांचे मागचे दिवे लाल असतात. या सफेद व लाल रंगाचे वाहणारे प्रवाह पाहताना मन वेडावून जाते. वाहतूक सुरळीत चालू राहण्यात शासनाचा जितका वाटा असतो त्याहीपेक्षा नागरिकांचा वाटा मोठा असतो. वाहतुकीचे नियम पाळणे हे जणू त्यांच्या हाडामासांतच आहे. न्यूयॉर्क यासारख्या ठिकाणी दादागिरीने गाडी चालविणारे टॅक्सी ड्रायव्हर दिसतात. एरवी कितीही उशिर झाला तरी डोके शांत ठेवून, आपला रस्ता न सोडता, एकदाही कर्कश्यपणे हॉर्न न वाजविता, परवानगी असलेल्या वेगाने, शिस्तशीरपणे सर्वजण गाडी चालवित असतात. मुख्यत्वेकरून गाडी चालविताना स्वत:चा हक्क काय आहे यापेक्षा दुसऱ्याचा हक्क काय आहे हे जास्त विचारात घेतले जाते. याला अनुसरून पायी चालणारा अथवा सायकलवरून जाणारा असेल तर त्याची सोय याला प्राधान्य दिले जाते. अगदी कार थांबवून सुद्धा. वाहनचालकाचा जरा जरी धक्का पादचारी किंवा सायकलस्वाराला लागला तर तो फार मोठा गुन्हा समजला जातो. जबर शिक्षा होते. केवळ दंड नव्हे तर वाहनचालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स रद्द होऊ शकते. ड्रायव्हिंग लायसन्स नसणे यासारखी अमेरिकेत दुसरी भयंकर शिक्षा नाही. ड्रायव्हिंग करता आले नाही तर तुमचे दुर्दैवच ओढवले समजा. तुम्हाला काहीही करता येत नाही. साधा ब्रेड आणायला सुद्धा काही मैलांवर लांब जावे लागते. मग गाडीशिवाय तुम्ही जाणार कसे? शिक्षेची भीती व नियमपालनाची वैयक्तिक जागरुकता यामुळे अमेरिकेत अखंड वाहतूक एका विशिष्ट लयीत, तालात आणि दिमाखात दिवसरात्र चालू असते.

* * *

## प्रकरण सहावे

# जनतेचा मित्र व शिस्तपालक पोलीस

अमेरिकेतील शिस्तबद्ध आणि पद्धतशीर, सुखकर जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे प्रत्येक प्रांताचे स्वतंत्र असलेले पोलीस खाते. आपण अनेक वेळा एन. वाय. पी. डी. किंवा एल. ए. पी. डी. असे ऐकतो. म्हणजे न्यूयॉर्क पोलीस डिपार्टमेंट किंवा लॉस एंजलिस पोलीस डिपार्टमेंट. कोणत्याही प्रांताचे पोलीस खाते पाहिले तर ते अत्यंत जागृत, तत्पर व कर्तव्यदक्ष, धाडसी, लोकाभिमुख आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रामाणिक असते. त्यांच्या कर्तव्याशी ते पूर्ण बांधील असतात. म्हणूनच पोलीस हा अडचणीतील लोकांचा मित्र, मदतनीस व आपलासा वाटतो. त्याच्याबद्दल जनमानसात नितांत आदर असतो. परत तो अत्यंत धाडसी व चाणाक्ष असल्याने नियमाविरुद्ध कोणी वर्तन केले तर त्यांची तो गाळण उडवून देतो. पोलिसाबद्दल आदराबरोबरच प्रचंड भीती सुद्धा असते. ती अनाठायी नाही याची सतत प्रचिती येते.

विशेषत: हायवेवर आणि स्टेटवेवर वेगाचे नियंत्रण करण्यासाठी पोलीस सदैव दक्ष असतो. रडार व क्लोज सर्किट टीव्हीच्या माध्यमातून नियम मोडणारे वाहनचालक पोलिसांच्या नजरेतून सुटणे अशक्यच असते. शिवाय रस्त्यातून गस्त घालणारे पोलीस अशा ठिकाणी दबा धरून बसलेले असतात की, तुम्हाला पत्ताच लागणार नाही. अशा नियमभंगाच्या वेळी क्षणार्धात त्यांचा भोंगा वाजवित चूक करणाऱ्या गाडीचा ते पाठलाग करतात. सावजावर आपले निळे प्रकाशझोत टाकीत त्या गाडीला ते इमर्जन्सी लेनमध्ये थांबवितात. पोलिसांनी थांबविल्यानंतर बाचाबाची व हमरीतुमरी तर सोडाच पण गाडीचालकाने गाडीतून बाहेर न येता स्टिअरींगवर दोनही हात ठेवून बसावे लागते. पोलीस जवळ येतो. हाय हॅलो करून हसत हसत गुन्हा नोंदवितो. मग त्यासाठीच्या शिक्षेचे तिकीट देतो. त्यासाठी आपापसांत मिटविणे हे कधीच नसते. नमस्कार करून पोलीस आपल्या कामासाठी निघून जातो. एव्हाना तुमच्या ड्रायव्हिंगच्या रेकॉर्डमध्ये त्या गुन्ह्याची नोंद झालेली असते. मिळालेल्या तिकीटाचा दंड तुम्हाला भरावाच लागतो. असे तिकीट मिळणे

हा ड्रायव्हिंग करताना एक धसकाच असतो. इतक्या चांगल्या रस्त्याने उत्तम अवस्थेमधील गाडी हातात असताना व इतर वाहतूक भरधाव जात असताना एका सरळ रेषेत गाडी चालविताना आपला वेग जरा जास्त होणे सहज शक्य असते किंवा पुढची गाडी हळू जात असेल तर तिच्या मागून गाडीच्या अगदी जवळ जाऊन रेटा देणे नकळत होत असते. पण असे काहीही करून चालत नाही. नियमापेक्षा एक पेग सुद्धा जास्त दारु पिऊन गाडी चालविणे हा गुन्हा ठरतो. अशा लोकांना पकडण्यासाठी काय यंत्रणा असते ते मला समजले नाही पण चाणाक्ष पोलीस त्यांना बरोबर हेरतात व शिक्षा करतात. उद्योग व्यवसाय, रोजचे जीवन यासाठी ड्रायव्हिंग लायसेन्स हे ओळखपत्र असते. अशा प्रकारे सतत जर गुन्हे तुमच्या नावावर नोंदले गेले तर ते ड्रायव्हिंग लायसेन्सच रद्द होऊ शकते. ते रद्द झाले की तुमचे हाल. यासाठी प्रत्येक जण नियमबाह्य वर्तन होणार नाही यासाठी सतत जागरुक असतो.

गुन्हेगारांना किंवा नियम मोडणाऱ्या लोकांना शोधून शिक्षा करण्यास जसे पोलीस खाते तत्पर असते, तसेच कोणत्याही अडचणींमध्ये उपयोगी पडणारा पोलीसच असतो. तुमच्या गाडीला काही अडचण आली व तुम्ही निकड दर्शविणाऱ्या लेनमध्ये लुकलुकणारे दिवे दाखवून थांबलात की क्षणार्धात पोलीस येऊन हजर होतो. मग गाडी चालण्याची तांत्रिक अडचण असो, तुमची वैयक्तिक काही अडचण असो, अगर तुमच्या गाडीमधील पेट्रोल संपलेले असो, तुमची तात्पुरती अडचण दूर करून जवळच्या पुढील मदतीच्या ठिकाणापर्यंत तुम्हाला नक्की पोहोचवून देईल. उदाहरणार्थ, जवळच्या गॅस स्टेशनवर जाण्याइतके पेट्रोल देईल. मात्र पुन्हा अशी चूक करू नका म्हणून बजावेल व सुहास्य वदनाने तुम्हाला पुढच्या प्रवासासाठी शुभेच्छा देऊन आपल्या कामाला निघून जाईल. कोणत्याही प्रकारचा अपघात झाला तर ताबडतोब हजर होऊन प्रथमत: रहदारीतील अडथळा दूर करील. कोणासही वैद्यकीय मदत हवी असेल तर त्याची तातडीने व्यवस्था करील. अपघातग्रस्त गाडी ओढून योग्य त्या ठिकाणी नेण्यास मदत करील. शिवाय हे सर्व उपकार करण्याच्या भावनेतून नव्हे तर कर्तव्यदक्ष बुद्धीने, खऱ्या मदतीच्या भावनेतून. हे सर्व करताना सुहास्य वदन ठेवून त्रासाची एक छटासुद्धा त्याच्या

चेहऱ्यावर दिसणार नाही आणि मग अशा पोलीस खात्याबद्दल प्रेम, आदर, आपलेपणा व त्याचबरोबर दरारा, भीती वाटली नाही तरच नवल. असे पोलीस खाते व अशी नियमप्रिय जनता असेल तर सर्व व्यवहार सुखासमाधानाचेच असणार.

* * *

## प्रकरण सातवे

# शिस्तपालन हा अमेरिकेच्या मातीचाच गुण

नियम केले आहेत म्हणून डोक्यावर लादलेल्या भावनेतून ते पाळणे हे वेगळे; पण केलेले नियम हे पूर्ण विचाराअंती केले असून ते आपल्या भल्यासाठीच आहेत व ते पाळायलाच हवेत हा विचार असणे वेगळे. नियमपूर्ण जगणे किंवा शिस्तबद्धता हे जणू त्यांना बाळकडूच असते आणि सर्वच जण शिस्त पाळणारे असल्याने, बाहेरून तिथे जाणाराही आपोआप नियमाने वागू लागतो. अगदी भारतातून गेलेला सुद्धा. अपघात होऊ नये म्हणून तर वाहतुकीचे नियम केले जातात. पण केलेले नियम आपल्याच सुरक्षिततेसाठी आहेत ही अमेरिकेत राहणाऱ्या प्रत्येकाची खात्री असते. मग रस्त्यात स्टॉपची खूण आली व इतर वाहतूक नसली तरी गाडी थोडावेळ थांबणार व मगच पुढे जाणार. नो एन्ट्रीच्या रस्त्याला चुकूनही कोणी गाडी घालणार नाही. फक्त डावीकडे किंवा उजवीकडे वळणाऱ्या लेनमधून जाताना चुकले असले तरी गाडी तिकडे वळणारच. विचार बदलला म्हणून रस्ता असला तरी सरळ कोणी जाणार नाही. गाडीतून जाताना सेफ्टी बेल्ट नियम पालनापेक्षा स्वत:च्या सुरक्षिततेसाठी लावणार. अगदी आपोआप गाडीत बसल्यावर हात पट्ट्याकडे जातो. ओव्हरटेक न करण्याची लाईन असेपर्यंत कोणीही ओव्हरटेक करणार नाही. खूण केल्याखेरीज, इंडिकेटर दाखविल्याखेरीज व मागून येणाऱ्या गाड्यांचा अंदाज घेतल्याखेरीज कोणी लेन बदलणार नाही. पायी चालणारा किंवा सायकलस्वार आला तरी गाडी थांबवणारच.

नियम पाळणे हे फक्त वाहनांच्या बाबतीत असते असे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारातही हे काटेकोरपणे पाळले जाते. हॉटेलमध्ये गेल्यावर एकदम कोणी जाऊन कोठेही बसत नाही. तर वेट टु बी सीटेडच्या (wait to be seated) बोर्डजवळ थांबतात. पसंतीप्रमाणे शिल्लक असणाऱ्या योग्य जागी वेटरचे काम करणारी मुलगी तुम्हाला नेऊन बसविते. आपल्याकडच्या सारखे बसलेल्या माणसाच्या खुर्चीमागे जाऊन कोणी उभा राहात नाही. अशामुळे आपल्याकडे बसलेल्या

माणसाला खाणे नको होऊन जाते. त्याच्या टेबलावर काय खाद्यपदार्थ आहेत यातही मागे उभा राहिलेला डोकावून पाहात असतो. लवकर आटपा म्हणून तो तोंडाने सांगत नाही इतकेच. नोकरीसाठी वेळेवर जाणे, कामाच्या वेळा पाळणे, दिलेले काम दिलेल्या वेळेत पूर्ण करणे, हे तर कोणाला सांगावेच लागत नाही. कोणत्याही कामासाठी, बील देण्यासाठी, वस्तू विकत घेण्यासाठी अगर परत करण्यासाठी, बँकेत, पोस्ट ऑफिसमध्ये कामासाठी कोठेही जा तुम्हाला रांगेत उभे राहावे लागते. रांगेत उभे राहताना पुढच्या माणसानंतर थोडेसे अंतर ठेवूनच उभे राहतात. आपल्याकडच्यासारखे पुढच्याच्या पाठीला मागचा माणूस पोट लावून कोणीही माणूस उभा राहात नाही. मला तर आपल्याकडे मागच्या माणसाचे पोट लागले तर असह्य होते. मग माझ्या हाताच्या कोपरांनी मागच्या माणसाच्या पोटाला त्या असह्यतेची जाणीव करून द्यावी लागते. अमेरिकेत रांगेत धक्काबुक्की नाही की मधेच कोणाचे घुसणे नाही. मागचा मनुष्य पुढच्या माणसाचे काय काम चालले आहे ते डोकावून पाहात नाही की दुसऱ्याच्या कामात नाक खुपसत नाही. कारण गुप्तता ही स्वत:च्याच कामाबद्दल नाही तर दुसऱ्यालाही ती गुप्तता ठेवण्याचा अधिकार आहे याची प्रत्येकाला जाणीव असते. काऊंटरवर काम करणारा कर्मचारी रांगेतील नंबरप्रमाणे एकेकाला जवळ बोलावतो. सुहास्य चेहऱ्याने काय काम आहे हे विचारून ते काम करून देतो. आपल्याकडे गर्दी हे कारण बेशिस्तीला, घुसाघुशीला दिले जाते. परंतु ते खरे नाही. उलट रांगेची शिस्त पाळली तर कामे लवकर होऊ शकतात. ही रांगेची शिस्त अमेरिकेत सर्वत्र दुकानात, बँकेत, थिएटरमध्ये, हॉटेलमध्ये, स्टेशनवर, एअरपोर्टवर कोठेही जा तुम्हाला अनुभवायला मिळते. सार्वजनिक नळावर पाणी पिण्यासाठी अगर सार्वजनिक टेलिफोनचा वापर करतानासुद्धा हीच शिस्त पाळली जाते.

गंमत म्हणजे भारतीय लोक अमेरिकेत असेपर्यंत ही शिस्त, हे नियम काटेकोरपणे पाळतात. कदाचित भोवतालच्या वातावरणाचा परिणाम होऊन ते आपोआप शिस्तीने वागत असतील. पण तेच लोक अमेरिकेची भूमी सोडली की मूळ स्वभावावर जातात. अमेरिकेहून परत येताना परतीच्या प्रवासात मला हे प्रकर्षाने जाणवले. बॉस्टन ते फ्रँकफर्ट या प्रवासात अमेरिकेच्या शिस्तीने वागणारे हे लोक

फ्रँकफर्ट विमानतळावर आपले रूप पालटतात. तिथून मुंबईला प्रवास सुरू करतानाच जणू त्यांच्या अंगात मुंबईचे वारे वाहायला लागतात. त्यांची मानसिक ठेवण मुंबईशी एक होऊन जाते. जणू ते अमेरिकेची कात टाकून देतात. फ्रँकफर्ट-मुंबईच्या प्रवासासाठी नियोजित टर्मिनलवर जाताच त्यांचा उच्च स्वर, अस्ताव्यस्त ठेवलेले हातातील सामान, अशोभनीय खाणे पाहून तिथेच आपण भारतात परत येऊन पोहोचलो आहोत असे वाटू लागते. विमानात बोर्डिंगसाठी सूचना मिळताच मेंढरासारखे धावत जाऊन गोंधळ करतात. जणू काही त्यांना घेतल्याशिवाय विमान मुंबईकडे झेपावणार असते. त्यावेळी तर मला आपल्याकडील बसमध्ये आरक्षणाशिवाय बसण्यासाठी झुंबड करणाऱ्या प्रवाशांची आठवण येते. विमानात प्रवेश केल्यानंतर सामान ठेवण्यासाठी धक्काबुक्की सुरू होते. तरी बरे विमानात सर्वांच्या हातातले सामान ठेवण्याएवढी भरपूर जागा असते. त्या प्रवासात याला शोभेलश्याच एअरहोस्टेस असतात. विमानात दिली जाणारी सेवा सुद्धा भारतीय पद्धतीचीच असते. उर्मटपणा तिथेच जाणवायला लागतो. मुंबई विमानतळावर उतरल्यानंतर सामान ताब्यात घेतानाचा गोंधळ पाहून आपण मुंबईला सुखरूप आल्यासारखे जाणवते. इतके दिवस अमेरिकेत राहूनही शिस्तीची व शांतपणाची सवय अंगात का भिनली जात नाही याचे फार कोडेच वाटते.

* * *

## प्रकरण आठवे

# अमेरिकेची चकचकीत स्वच्छता

स्वच्छता ही तर प्रत्येकाच्याच हिताची असते. त्यासाठी अमेरिकेत नियम केलेले आहेतच. रस्त्यावरून जात असताना कागद जरी रस्त्यावर टाकला तरी शिक्षा होते. रस्त्यावर ठिकठिकाणी बोर्ड असतात. कचरा टाकू नये. तो गुन्हा असून त्यासाठी ५०० डॉलरची शिक्षा होऊ शकते. अर्थात, त्या शिक्षेला किंवा दंडाला घाबरून कोणी घाण करीत नाही असे नव्हे तर ती स्वच्छता प्रत्येकाने पाळायची असते हे प्रत्येकाला ठाऊक आहे. रस्त्याला लागून असलेल्या घरमालकांची रस्त्यापर्यंत परिसर स्वच्छ ठेवणे ही जबाबदारी असते. अमेरिकेत स्वच्छता ठेवण्यासाठी कोणासही लाज वाटत नाही. याचे प्रत्यंतर आपल्याला खाण्याच्या जागी म्हणजे लहान हॉटेल्स, फूड कोर्टस्, फास्ट फूड सेंटर्स इथे पाहावयास मिळते. त्या ठिकाणी टेबलावर बसून खाणे झाले की, प्रत्येक जण पेपर नॅपकिनने टेबल साफ करतात. खाणे केलेल्या बश्या, उरलेले पदार्थ, वापरलेले ग्लास किंवा इतर साहित्य ट्रेमध्ये भरतात व जवळच असलेल्या भल्या मोठ्या पिंपात ते नेऊन टाकतात. त्या लाकडाच्या पिंपावर लिहिलेले असते, ‘थँक यू’. ही सवय लहानपणापासून त्यांच्या मनावर बिंबविली गेलेली असते. मोठी माणसे असे करताना पाहून लहान मुले नकळत शिकतात. मग ती मुले चॉकलेटचे वेष्टन सुद्धा इतरत्र टाकीत नाहीत, तर त्या पिंपातच टाकतात. ते कचऱ्याचे पिंप दिसेपर्यंत ते वेष्टन ती मुले आपल्या खिशातच ठेवून देतात. कारमधून प्रवास करताना सर्व कचरा बाजूच्या कप्प्यात किंवा एखाद्या प्लास्टिकच्या पिशवीत साठवून ठेवतात व योग्य संधी मिळताच तो कचरा त्या मोठ्या पिंपात टाकला जातो. तिथले रस्ते, बागा, करमणुकीची स्थळे, प्रेक्षणीय स्थळे, कोणतेही सार्वजनिक ठिकाण इथे कोठेही घाण काय कागदाचा तुकडा सुद्धा आढळत नाही. रस्ते इतके चकचकीत असतात की, खाली बसले तरी धूळ लागणार नाही. न्यूयॉर्क, बॉस्टन, शिकागो, मिनिआपोलीस, लॉस एंजलिस, कोठेही जा. उंचच उंच इमारती आहेत. त्यांच्या

काचा आतून बाहेरून धुवून पुसून चकचकीत केलेल्या असतात. इमारतीचे आपण समजू शकतो. पण रेल्वे स्टेशन्स्, बस स्टँड हे सुद्धा तितकेच स्वच्छ ठेवलेले असते. या सर्व ठिकाणांची रेस्ट रुम्स् आपल्या घरच्या पेक्षाही स्वच्छ ठेवलेली असतात. सॅक्रमांटो ते सॉल्ट लेक सिटी या १४ तासांच्या बस प्रवासात ज्या ठिकाणी थांबावे लागले होते त्या प्रत्येक ठिकाणी हाच अनुभव आला होता आणि मग आपल्या बस स्टँडची आठवण झाली की प्रचंड लाज वाटते. वॉशिंग्टन, बॉस्टनची रेल्वे स्टेशन्स् पाहिली आणि एखाद्या पंचतारांकित हॉटेलमध्ये गेल्यासारखे वाटले. आपले मनमाड, दौंड किंवा भायखळा स्टेशन असे करायचे ठरविले तर काय करावे लागेल असा प्रश्न पडला. या विचाराने अस्वस्थ होऊन गेलो. स्वच्छतेचा प्रश्न निघाला की आपल्या लोकसंख्येचे कारण पुढे केले जाते; पण ते कारण अजिबात बरोबर नाही. कारण न्यूयॉर्क, शिकागो, लॉस एंजलिस, सॅनफ्रान्सिस्को ही शहरे मुंबईपेक्षा मोठी असूनही कितीतरी पटीने स्वच्छ आहेत आणि जशी मोठी शहरे तशीच लहान लहान शहरे स्वच्छ आहेत. मोटार प्रवासात ही लहान लहान गावे नजरेत भरतात. गर्दीच्या ठिकाणी अस्वच्छ असेल असे वाटले होते पण तेही चूक ठरले. हो! मोठ्या शहरातून ज्या भागात इतर परदेशी लोक राहतात म्हणजे न्यूयॉर्कमधील भारतीय बाजार – जॅक्सन हाईटस् किंवा चायना टाऊन इथे मात्र भरपूर अस्वच्छता दिसते. न्यूयॉर्कमधील जॅक्सन हाईटस् भागात तर पानाचे ठेले व त्या भोवती थुंकल्याच्या पिचकाऱ्यांचे डाग, भाजी मार्केट बाहेर असलेला पालापाचोळा, हे पाहून क्षणभर भारतातच असल्यासारखे वाटले होते. या उलट प्रचंड गर्दी असलेल्या डिस्नेलँड, युनिव्हर्सल स्टुडिओ, नायगारा, वॉशिंग्टन, मोठमोठे मॉल्स्, म्युझियम्स् या ठिकाणी अस्वच्छता तर नाहीच उलट जास्तच काळजीपूर्वक स्वच्छता ठेवली जाते असेच म्हणावे लागेल.

व्यवसायातील स्वच्छता आणखी एका ठिकाणी प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे मोटार गराजमध्ये. आपल्याकडची गराज म्हणजे तेलाचे व काळे डाग पडलेले घसरडे, गुळगुळीत व अस्ताव्यस्त सामान पडलेले असे चित्र डोळ्यांसमोर येते. तिकडे गराज गरम पाण्याने व साबणाने सतत पुसत असतात. लागणारी हत्यारे व्यवस्थित ठेवलेली अगर भिंतीवर टांगलेली दिसतात. काम करणारे लोक कामावर

घालायचे कपडे नियमित धुवून वापरतात. कपडे फाटेपर्यंत खुंटीवरून अंगावर आणि अंगावरून खुंटीवर करीत नाहीत. हे सर्व असल्यानंतर लोकांमध्ये प्रसन्नता असणार, उत्साह असणार व सर्वांचेच आरोग्य चांगले राहणार यात शंका येण्याचे कारण नाही आणि म्हणूनच स्वच्छता ठेवली जाते असे म्हणण्यापेक्षा स्वच्छता पाळली जाते असेच म्हणावे लागेल. कारण ते कोणा सरकारचे अगर व्यवस्थापकाचे काम नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे याची प्रत्येकाला जाणीव आहे. अमेरिकेत अनेक प्रेक्षणीय स्थळांना मी भेटी दिल्या. तिथल्या अपूर्व व वेगळ्या गोष्टी तर आवडल्याच पण याहीपेक्षा मी आकर्षित झालो ते तिथल्या स्वच्छतेकडे. तुलना म्हणून नव्हे पण मग आपला देश आठवतो, कचऱ्याचे ढीग आठवतात. रस्त्याच्या कडेला पाणी घेऊन बसलेली माणसे दिसतात, बागेत किंवा सार्वजनिक ठिकाणी सर्वत्र टाकलेले भेळीचे कागद आठवतात. बस स्टँड व रेल्वे स्टेशनवरची घाण डोळ्यांसमोर येते. नाकातील केस जाळून टाकतील असे मुतारी व इतर ठिकाणचे दर्प स्मरतात आणि वाटते, आपल्याकडे हे कधी सुधारणार? नियम करून स्वच्छता कधीच साध्य होणार नाही. स्वच्छ शहराच्या वल्गना करून एखादा दिवस समारंभापुरता पुढाऱ्यांनी हातात झाडू धरून आणि फोटो काढून हे होणार नाही. याचे शिक्षण व जागरुकता घराघरातून लहानवयातच करून देणे गरजेचे आहे. प्रत्येकाने स्वच्छता पाळायचे मनोमन ठरविले पाहिजे. मग अशक्य मुळीच नाही. पण जागृती हवी.

* * *

## प्रकरण नववे

# अमेरिकेतील ग्राहक राज

अमेरिकेत आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे ग्राहक सेवा. ग्राहक आकर्षित करण्याची कला. ग्राहकांच्या तक्रार निवारण्याची कळकळ आणि सर्व बाबतीत असणारी हसतमुख तत्परता. तिथे खऱ्या अर्थाने देव मानला जातो. Satisfaction Guaranteed – समाधानाची पूर्ण हमी किंवा – Money Back Guarantee without any Question म्हणजेच वस्तू वा सेवा न आवडल्यास पैसे परत हे ब्रीदवाक्य व तेही आचरणात प्रत्यक्षात येणारे. याउलट आपल्याकडे 'एकदा विकत घेतलेली वस्तू कोणत्याही कारणास्तव परत घेतली जाणार नाही' अशा पाट्या सर्रास सर्व ठिकाणी लटकवलेल्या असतात. अमेरिकेत तुम्ही वापरलेली वस्तू सुद्धा तुम्हाला न आवडल्यास तुम्ही ती परत करून पूर्ण पैसे परत घेऊ शकता. त्यासाठी कोणतेही कारण देण्याची आवश्यकता नसते. शिवाय पावती असेल तर त्या दुकानाच्या कोणत्याही शाखेत ती घेतलेली वस्तू बदलून मिळू शकते किंवा पैसे परत मिळू शकतात. मग ती शाखा अमेरिकेच्या कोणत्याही भागात वा प्रांतात असो. लॉस एंजलिसला खरेदी केलेली वस्तू तुम्ही न्यूयॉर्कला सुद्धा परत करू शकता. खरेदीप्रमाणेच हॉटेलच्या सेवेतही ग्राहकाचे पूर्ण समाधान हेच ध्येय असते. सेवेमध्ये एखादी कमतरता आढळून आली किंवा सेवेत काही कमी आढळले तर तुमच्याकडून ते बील घेत नाहीत. या सर्वांचा मला अनेकदा अनुभव आला. त्यापैकी काही अनुभव मुद्दाम नमूद करावेसे वाटतात. ते असे,

आमच्या अमेरिकेच्या प्रथम भेटीत त्या भूमीवर पाय ठेवतानाच आलेला हा अनुभव. आम्ही म्हणजे मी व माझी पत्नी बॉस्टनच्या विमानतळावर उतरलो. सामान घेऊन बाहेर पडताना लक्षात आले की, चार बॅगांपैकी एक बॅग प्रवासात तुटलेली आहे. अमेरिकेतील आमच्या मुलाच्या आग्रहामुळे तिथेच असणाऱ्या आमच्या एअरलाईनच्या काऊंटरवर गेलो. काऊंटरवर साठ ते पासस्ट वर्षांची बाई काम करीत होती. तिला आम्ही बॅग दाखविली. तिने आमचा बोर्डिंग पास,

तिकीट इ. कागदपत्रे तपासून पाहिली. तक्रार रास्त असल्याची खात्री पटताच इतर काहीही आढेवेढे न घेता एक पानाचा फॉर्म भरून देण्याची मला विनंती केली. मी फॉर्म भरून सही केली. एका क्षणाचाही विलंब न लावता पाच मिनिटांत परत येते असे सांगून ती गेली आणि येताना एक नवी कोरी बॅग घेऊन आली. तिने ती बॅग आम्हाला देऊन वर दिलगिरी व्यक्त केली व आमचे समाधान झाले का म्हणून विचारले. थांबायला लागले म्हणून पुन्हा एकदा दिलगिरी व्यक्त केली. या सर्व व्यवहाराला जेमतेम १५ मिनिटे लागली. जणू अमेरिकन भूमीवर ग्राहकाला मिळणाऱ्या महत्त्वाची आम्हाला ही चुणूक दिसली होती.

असाच अनुभव सॅक्रमांटोहून बॉस्टनला परत येताना आला. आमचा नियोजित प्रवास सॅक्रमांटो – शिकागो – बॉस्टन असा होता. शिकागो येथे विमान बदलायचे होते. सॅक्रमांटोहून निघालेले विमान शिकागोला थोडे उशिरा पोहोचले. दुसरे विमान सुटायला थोडाच अवधी बाकी होता. आमचे जाणे आम्ही नक्की केले होते. त्यामुळे एअरलाईनने शिकागो – बॉस्टन विमान थोडेसे थांबविले होते. याची आम्हाला कल्पना नसल्याकारणाने हातातील सामान घेऊन आम्ही पळतच दुसऱ्या विमानाच्या प्रवेशद्वारापाशी पोहोचलो. आम्ही विमान गाठू शकलो पण आमचे सामान त्या पुढच्या विमानात पोहोचू शकले नाही. बॉस्टनला एअरपोर्टवर उतरल्यानंतर सामान पोहोचले नसल्याचे आमच्या लक्षात आले. साहजिकच त्या एअरलाईनच्या काऊंटरवर जाऊन आम्ही आमचे गाऱ्हाणे नोंदविले. संगणकाद्वारे चौकशी करून आमचे सामान पुढच्या विमानाने येत असल्याचे आम्हाला सांगितले. अत्यंत दिलगिरीयुक्त स्वरात त्यांनी आमचे नाव, पत्ता, फोन नंबर इ. माहिती घेतली. भारतीय मनाला वाटले, आपले सामान तरी गेले किंवा आपल्याला उशिरा रात्री परत सामानासाठी एअरपोर्टवर यावे लागणार. पण काऊंटरवर मला सांगण्यात आले की, ‘एअरलाईन सामान घरी पोहोचविण्याची व्यवस्था करील.’ मला बिलकुल खात्री नव्हती. मी घरी पोहोचलो पण झोप येईना. पण सुखद आश्चर्य म्हणजे रात्री एक वाजता एअरलाईनचा मनुष्य आमच्या पाच बॅगा घेऊन घरापाशी हजर झाला. बॉस्टन विमानतळापासून मुलाचे घर तीस ते चाळीस मैल दूर होते. अमेरिकेत राहणाऱ्या माझ्या मुलाला त्याचे मुळीच आश्चर्य वाटले नाही, पण माझे भारतीय

संशयी मन अवाक् होऊन गेले होते.

कदाचित विमान कंपनीचा मोठा कारभार, त्यांचे नाव आणि त्या व्यवसायातील स्पर्धा यामुळे त्यांना अशी सेवा देणे आवश्यक असेल; परंतु एका पिझ्झा हटमध्येही मला असाच सुखद अनुभव मिळाला. पिझ्झा हटमध्ये गेल्यानंतर आमच्या चौघांसाठी आम्ही पिझ्झाची ऑर्डर दिली. त्याचबरोबर एका छोट्या पदार्थाची म्हणजे चिकनरोस्ट - बफेलो विंगज्ची पण ऑर्डर दिली होती. ती छोटी डिश आधी देण्याची विनंती केली होती. काही वेळानंतर टेबलावर पिझ्झा आला. मधे थोडा वेळ गेल्यानंतर मॅनेजर कम वेट्रेस चिकनचा ऑर्डर केलेला पदार्थ घेऊन आली. तिने पदार्थ ठेवल्यावर आपण होऊन सांगितले की, 'तुमची ही दुसरी मागणी मी विसरून गेले होते. त्यामुळे तो पदार्थ आणण्यास विलंब झाला. माफ करा. तुम्हाला थांबावे लागले. त्यासाठी या पदार्थाचे पैसे मी बिलामध्ये लावणार नाही. पिझ्झा हटतर्फे ही मागणी तुम्हाला पुरवित आहोत.' मी तर चक्रावूनच गेलो. मला वाटले, तो पदार्थ तयार करण्यास वेळ लागल्यामुळे उशीर झाला असेल. शिवाय आपल्याकडे वेटर्स तुमच्यावर उपकार केल्यासारखे पदार्थ टेबलावर आणून आपटतात. मग हा सौजन्याचा ओघ कोठून आला? मॅनेजरने त्या पदार्थाचे पैसे न घेणे ही गौण बाब होती; पण झालेली चूक मान्य करून त्याचे परिमार्जन करणे हे महत्त्वाचे वाटले. झालेल्या दिरंगाईची व त्यामुळे गिऱ्हाइकाच्या झालेल्या गैरसोयीची जाणीव असणे, इतकेच नव्हे तर त्याबद्दल अपराधीपणा वाटणे व तो खुल्या मनाने व्यक्त करणे हे जास्त मोलाचे वाटले. त्याचे कौतुक वाटले. गिऱ्हाइकाबद्दल असलेली ही आस्था किंवा आत्मीयता बरीच जवळीक निर्माण करून जाते.

आम्ही सॅक्रमांटोहून चार दिवस ट्रीपला बाहेरगावी जाणार होतो. घरी येणारे रोजचे सकाळचे वर्तमानपत्र तात्पुरते बंद करणे आवश्यक होते. आपल्याकडे वर्तमानपत्र टाकणाऱ्या मुलाला गाठून त्याला बजावून बजावून सांगावे लागते. परत आल्यानंतर पुन्हा सुरू करण्यासाठी परत त्याला गाठून आठवण करून द्यावी लागते. परंतु याउलट तिथे अनुभव आला. निघण्यापूर्वी मी वर्तमानपत्राच्या कार्यालयाला नाव, पत्ता व आमच्या येण्याजाण्याच्या तारखा सांगितल्या. बरोबर सांगितलेल्या दिवशी वर्तमानपत्र येणे बंद झाले व सांगितलेल्या दिवशी आठवण

न करता वर्तमानपत्र पुन्हा येणे सुरू झाले. साधा आठवणीसाठी फोन सुद्धा करावा लागला नाही.

जी गोष्ट वर्तमानपत्राची तीच गोष्ट सरकारी टपालखात्याची अनुभवास आली. जाण्यापूर्वी ज्या पोस्ट ऑफिसमधून बटवारा होतो त्यांना फोन करून आठ दिवस टपाल आमच्या घरी न टाकता त्यांच्याकडेच जमा करून ठेवण्याची विनंती केली. आम्ही परत येईपर्यंत टपाल टाकले गेले नव्हते. ज्या दिवशी आम्ही परत आलो त्या दिवशी पोस्ट ऑफिसमध्ये गेलो. नाव, पत्ता सांगून ओळखपत्र दाखविले. पोस्टातील व्यक्तीने हसून स्वागत केले. प्रवास कसा झाला म्हणून चौकशी केली. परत येण्याचे स्वागत केले. ती व्यक्ती दोनच मिनिटे आत गेली. एका सुंदर आकर्षक प्लास्टिक पिशवीत आमच्या गैरहजेरीमधील आलेले टपाल व्यवस्थित साठवून ठेवले होते. ते टपाल आम्हाला सुपूर्त करण्यात आले. पोस्ट ऑफिस हे केवळ सरकारी खाते नसून खऱ्या अर्थाने जनतेची सेवा करणारे व्यावसायिक केंद्र असल्याची माझी खात्री पटली.

आमच्या अमेरिकेच्या पहिल्या ट्रीपमध्ये नायगाराला जाण्याचे ठरविले. ट्रीपला जाण्यापूर्वी मुलाने व्हिडिओ कॅमेरा विकत घेतला होता. नायगाराहून परत आल्यानंतर पाहिले तर आवाज रेकॉर्ड होण्यामध्ये काहीतरी व्यत्यय येत होता. रेकॉर्ड करीत असलेल्या आवाजाबरोबर मशिनचा एक आवाज येत होता. तो वेगळा आवाज सतत त्रास देत होता. ज्या दुकानातून आम्ही व्हिडिओ कॅमेरा विकत घेतला होता त्या दुकानात आम्ही रात्री ९ वाजता कॅमेरा घेऊन गेलो. वास्तविक दुकान बंद होण्याची वेळ होत आली होती. फक्त आम्ही चौघेच जण दुकानात ग्राहक राहिलो होतो. तिथल्या विक्रेत्याला आम्ही आम्हाला आलेली अडचण सांगितली. प्रथम त्याला वाटले की तो नायगरा धबधब्याचा आवाज असावा. तरीही खात्री करून घेण्यासाठी त्याने दुकानात थोडेसे रेकॉर्डिंग करून पाहिले. त्यानंतर ज्यावेळी आवाजाच्या अडचणीची त्याला खात्री पटली, त्यावेळी एका क्षणाचाही विलंब न लावता त्याने स्टोअरमधून नवा कोरा व्हिडिओ कॅमेरा काढला व आम्हाला तो नवा कोरा कॅमेरा दिला. वरती आम्हाला झालेल्या तसदीबद्दल माफी मागायला तो विसरला नाही. दुकान बंद होण्याची वेळ झाल्याकारणाने कपाळाला आठी घालून

आता उद्या या अशी आज्ञा केली नाही किंवा आम्ही तुम्हाला कॅमेरा विकला त्यावेळी तो व्यवस्थित काम करीत होता, तुम्ही त्यावेळी सर्व नीट पाहून घ्यायला हवे होते, तुमच्या नीट न वापरण्यामुळेच तो खराब झाला असा रोखठोक जबाब देऊन आमच्या तोंडाला पाने पुसली नाहीत. ग्राहकावर टाकलेला विश्वास आणि ग्राहकाचे पूर्ण समाधान तेही काही वेळा आपले नुकसान सहन करून. ही ग्राहकसेवा कल्पनेपलीकडे नजरेत भरली. पुन्हा जर काही खरेदी करायची असेल तर कोणता ग्राहक दुसऱ्या एखाद्या दुकानात जाईल?

भारतामध्ये मी बँकेत नोकरी करीत असल्यामुळे बँकेच्या ग्राहकांची किंवा बँकेच्या व्यवहारांची किंवा अमेरिकेत बँकांतर्फे दिल्या जाणाऱ्या सेवेची माहिती करून घेण्यामध्ये मला विशेष रस होता. जसजशी तिथल्या बँकेच्या व्यवस्थेची व दिल्या जाणाऱ्या विविध सेवांची मला माहिती झाली, त्यावेळी त्या पद्धतीचे कितीतरी नवीन उपक्रम आपण इकडे सुरू करू शकू असे मला वाटले. आपल्याकडे ग्राहक सेवा व तक्रार निवारणासाठी स्वतंत्र विभाग सुरू करावा लागतो. कर्मचाऱ्यांना त्यासाठी सतत जागृत करावे लागते. राष्ट्रीय स्तरावर ग्राहक सेवेमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी समिती स्थापन करावी लागते. बँकेमध्ये तक्रार निवारण कमीतकमी वेळात होते किंवा नाही यावर रिझर्व बँकेला व ग्राहक संघटनेला लक्ष ठेवावे लागते. तरी सुद्धा अनिर्णित तक्रारी तीन ते सहा महिन्यांपासून तीन वर्षांपर्यंतही जुन्या असू शकतात. अमेरिकेत अनुभवलेली बँकेची सेवा म्हणजे भारतात ते आणावे असे वाटणारे स्वप्नच होते. खातेदारांच्या सोयीसाठी बँकेची सेवा २४ तास हजर असते. नियमांच्या आणि कामगार संघटनेच्या चक्रात आपल्या बँकांचे संगणकीकरण हे अजून बाल्यावस्थेत अडकून पडले आहे. ते ग्राहक सन्मुख नसून पूर्णपणे कर्मचारी धार्जिणे आहे. संगणकाच्या अद्ययावत वापरामुळे दिवसाचे २४ तास ग्राहक सेवा उपलब्ध करून देणे अमेरिकन बँकांना सहज शक्य होते. राष्ट्रीय नेटवर्कमुळे देशात तुम्ही कोठेही असलात तरी तुम्हाला तुमच्या खात्यातून व्यवहार करता येतो. पैसे काढणे, खात्यातील शिल्लक तपासणे, चेक खात्यात जमा करणे ही कामे तुम्ही दिवसभरात केव्हाही व कोठेही करू शकता. तुमच्या खात्यातून पैसे काढण्यासाठी मशिन्स सर्व शाखांच्या आवारात नाहीतर हॉटेल्स, दुकाने, विमानतळ

इ. ठिकाणी उपलब्ध असतात. कोणत्याही शाखेत तुमचा चेक तुमच्या खात्यात तुम्हाला जमा करता येतो. शिवाय यासाठी बँकेच्या वेळेतच जायला हवे असे मुळीच नाही. बँकेच्या मुख्य दरवाज्याजवळ भरणा चलन ठेवलेले असते. पाकीटे ठेवलेली असतात. भरणा चलन भरून चेकबरोबर पाकिटात बंद करायचे व दरवाज्याजवळच्या एका बॉक्समध्ये ते पाकीट सरकवून द्यायचे. चेकची रक्कम नक्की तुमच्या खात्यात जमा होणारच. हे सर्व करण्यासाठी प्लॅस्टिक मनी किंवा क्रेडिट कार्डची नितांत आवश्यकता असते. अमेरिकेत प्रत्यक्ष पैशाचा म्हणजे चलनाचा वापर फारच कमी होतो. बहुतेक सर्व व्यवहार क्रेडिट कार्डानेच होतात. कोणतीही लहानमोठी खरेदी, वाणसामान, पेट्रोल ज्याला तिथे गॅस म्हणतात, बँकेचे व्यवहार या सर्वांसाठी आवश्यक असणाऱ्या वेगवेगळ्या क्रेडिट कार्डांनी लोकांचे खिसे, पाकिटे भरलेली असतात. आपल्यासारखे खिशात भरपूर चलनी नोटा घेऊन कोणीच बाहेर जात नाहीत. तिकडे फारच कमी म्हणजे जेमतेम १५ ते २० डॉलर्स घेऊन लोक बाहेर जातात. ही क्रेडिट कार्डस, विशेषत: बँकांची फार काळजीपूर्वक दिली जातात. तुमची सर्व माहिती म्हणजे नाव, पत्ता, कुटुंब, व्यवसाय, तुमची आर्थिक स्थिती हे सर्व एकत्रित केलेले असते. त्यावरून तुमची किंमत ठरविली जाते. बँकांच्या कामाच्या वेळात तुम्ही तुमच्या कारमध्ये बसूनच खात्यातून पैसे काढू शकता. बँकेसमोरच तुमची कार थांबविण्यासाठी जागा असते. त्या ठिकाणापासून बँकेचा कॅशियर १५ ते २० फुटांवर असलेल्या काचेच्या केबिनमध्ये बसलेला असतो. तुम्हाला पाहताच तो ध्वनिक्षेप सुरू करतो. तुम्ही संवाद साधल्यानंतर तुमच्या कारच्या जवळच असलेल्या पाईपमधून तुमची पैसे काढण्याची स्लीप तुम्ही कॅशियरकडे पाठवायची. कॅशियर सर्व तपासून तुम्हाला नोटा कशा हव्या आहेत ते विचारतो व काही क्षणातच त्याच पाईपमधून तुम्हाला हव्या असणाऱ्या नोटा तुमच्या कारपर्यंत येऊन पोहोचतात. या सर्वाला पाच मिनिटांहून जास्त वेळ लागत नाही. संगणकाच्या वापराने तुम्ही घरबसल्या तुमची सर्व बिले बँकेमार्फत भरू शकता. यात सर्व प्रकारची खरेदी, हॉटेल्स, वीज, फोन, अशी काहीही बिले समाविष्ट होतात. फोन करून तुम्हाला कोणाला पैसे देणे आहेत त्याचे नाव, तुमचे नाव, खाते क्रमांक, देण्याची रक्कम, कोणत्या तारखेला

व कोणत्या बँकेच्या कोणत्या खात्यात जमा करणे आहेत ही सगळी माहिती पुरविली की तुमची विनंती नोंद करून घेतल्याचा एक क्रमांक दिला जातो. त्यानंतरच्या येणाऱ्या तुमच्या खातेउताऱ्यात या व्यवहाराच्या दिलेल्या क्रमांकासकट सर्व नोंद असते. दिलेल्या कोणत्याही माहितीत कोणतीही चूक होत नाही आणि यदाकदाचित यात बँकेकडून काहीही चूक झालीच, विलंब झाला किंवा तुम्हाला भुर्दंड सोसावा लागला तर बँक त्याची दामदुप्पट भरपाई करते. आपल्याकडे साधे विम्याचे हप्ते सुद्धा वेळेवर व बरोबर पाठविले जातात का नाही याची तुम्हाला खात्री करून घ्यावी लागते.

अर्थात, आजकाल आपल्याकडेही बँकांमध्ये मेकनाइझेशन बऱ्याच प्रमाणात झाले आहे. ठिकठिकाणी ए.टी.एम. ची सोय करण्यात आली आहे. परदेशी बँका भारतात आल्यामुळे त्याच्याशी स्पर्धा करताना भारतीय बँकांना त्याच्या सेवेची पातळी उंचावणे भाग पडले आहे. कर्मचाऱ्यांचा ग्राहकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. २४ तास आणि आठवड्याचे सातही दिवस बँकिंग सेवा येऊ लागली आहे. टेलर सिस्टिम, फास्ट क्लिअरिंग, फोन व लाईटसारखी बिले बँकांमार्फत भरण्याची सोय, अशा अनेक सुधारणा प्रत्यक्षात येऊ लागल्या आहेत. खेडोपाडी बँकांचे जाळे खूप मोठ्या प्रमाणात झाले आहे. काऊंटरवरील सेवा जास्त चांगली देण्याचा प्रयत्न होऊ लागला आहे. हा बदल निश्चितच स्वागतार्ह आहे. तरीही अजून सुधारणेला खूप वाव आहे.

हे सर्व उदाहरणादाखल दिलेले अनुभव आहेत. याखेरीज इतर प्रत्येक ठिकाणी चांगलेच अनुभव आले. कोणत्याही सेवासंस्थेत, सरकारी कार्यालयात, सुपर मार्केटमध्ये 'मदत पाहिजे का?' ('May I Help You?') चा फलक आणि त्या जागी माणूस हजर असतो. सुहास्य वदनाने स्वागत करून तो तुम्हाला खरोखरच मदत करतो. या सवयी, ही सोय, ही व्यवस्था अमेरिकेत जोपासली गेली आहे. त्यामुळे सर्वांचेच काम सुखकर व सोयीचे होते. कधी कधी आपल्याकडे मात्र याच्या उलट अनुभव येतो. 'मदत पाहिजे का?' असा फलक फक्त लावलेला असतो. प्रत्यक्ष त्या जागी कोणीही नसते. जर कोणी असलेच तर त्याचा चेहरा सांगतो की ती व्यक्ती तुम्हाला मदत करू इच्छित नाही. जर त्याच्याशी बोलण्याचा

प्रयत्न केला तर तुम्ही विचारलेली माहिती तुम्हाला कशी ठाऊक नाही? असे त्रासिक उत्तर मिळू शकते. मदत करणे म्हणजे ग्राहकावर उपकार केल्यासारखेच भाव त्याच्या चेहऱ्यावर उमटतात. आपल्याकडे बँकेमध्ये काऊंटरवर तुम्ही गेलात तर हसून स्वागत करणे तर सोडाच, पण साधे मान वर करून तुमच्याकडे पाहिले सुद्धा जात नाही. आपल्याकडे टीव्ही. घ्यायला गेलात तर मांडून ठेवलेली अनेक मॉडेल्स तुमची तुम्हाला पाहावी लागतात. त्याबद्दलची माहिती विचारलीच तर 'तुम्ही खरंच घेणार आहात की नुसतीच चौकशी करता आहात?' अशा अर्थाचा एखादा प्रश्न विचारला जातो. तुम्ही कापडाच्या दुकानात गेलात तर कपडे खाली काढून दाखविण्याऐवजी वर मांडून ठेवलेल्या ताग्यामधील कोणते कापड दाखवू असेच विचारले जाते. 'एकदा विकलेला माल कोणत्याही सबबीसाठी परत घेतला जाणार नाही' असे बोर्ड सर्व दुकानातून हमखास आढळतात.

अमेरिकेत ग्राहकांच्या सुखसोयीसाठी व सुलभ वापरासाठी कोणत्याही वस्तूमध्ये एक समान सूत्र पाळले जाते ते म्हणजे प्रमाणीकरण – प्रमाणबद्धता – एकसूत्रता (STANDARDIZATION) मग ते घरबांधणीमध्ये, वाहनांमध्ये, कपड्यांमध्ये, मुलांच्या खेळण्यामध्ये सुद्धा आढळून येते. याचे आणखी एक कारण म्हणजे अमेरिकेत कोणतेही काम तुमचे तुम्हाला करावे लागते. कोणत्याही कामाला मनुष्यबळाचा वापर करावा लागला तर ते फार महाग होऊन जाते. साधे घराचे दार बदलायचे असेल तर ते नवीन दार १५० डॉलरला मिळते; पण ते बसविण्यासाठी माणसाला बोलाविले तर त्या माणसाची मजुरी १५० डॉलर होते. पण घरातील दारे, खिडक्या, पंखे, प्रकाशाच्या ट्यूब्ज, कपाटे, पलंग, तुम्ही काहीही विकत घ्या. तुमच्या घरात ते कोठे लावायचे आहे ते नक्की करून त्याची मोजमापे घेऊन गेलात तर त्या जागेत चपखल बसणारी ती गोष्ट तुम्हाला लगेच मिळू शकते. घरी आणून तुम्ही त्याचे पॅकिंग उघडले की तुम्हाला आत त्याचे उत्पादन करतानाचे डिझाईन, त्याचे फिटिंग कसे करायचे त्याच्या सूचना, त्यासाठी लागणारे स्क्रू इतकेच नाही तर त्या स्क्रूसाठी लागणारे पान्हे व ड्रायव्हर्स एकत्र मिळते. मुलांची खेळणी अशीच तयार केलेली असतात. ती उघडली की त्यामध्ये कशाप्रकारे त्यांची जोडणी करायची, बॅटरीज् कोठे व कशा बसवायच्या, सगळे व्यवस्थित

दिलेले असते. या पद्धतीने मुलाकडे त्याने आरामखुर्ची, पलंग, कपाट, इलेक्ट्रिक ट्यूब, एअर कंडिशनर हे सर्व बसवून चालू केलेले मी पाहिले आहे. जर ते नीट बसले नाही तर नक्की समजावे की तुमचे काहीतरी चुकते आहे. त्याच्या उत्पादनात किंवा पॅकिंगमध्ये काही दोष असणे शक्य नाही. मोटारीला आलेला पोचा किंवा एखादा ओरखडा काढायचा असेल तर आपल्याकडे गराजमध्ये किती वेळ व पैसे लागतात ते आपल्याला ठाऊकच आहे. पण अमेरिकेत त्यासाठी कारचे ठरावीक रंग तसेच त्यासाठी लागणारे ब्रश व इतर साहित्य हे अगदी बिनचूक मिळते. तुम्ही ते काम घरी करु शकता किंवा पोचा काढू शकता. लॉन मोव्ह करण्यासाठी, बर्फ साफ करण्यासाठी, घरचे बागकाम करण्यासाठी अनेक प्रकारची हत्यारे मिळतात. ती आणली की तुमचे तुम्हाला काहीही करणे सोपे होऊन जाते. मुख्य म्हणजे हे सर्व करताना प्रामुख्याने ग्राहकाची सोय ही गोष्ट डोळ्यांसमोर ठेवलेली असते.

अमेरिकेच्या ग्राहकांच्या या सेवेचा फायदाही अनेक ग्राहक घेतात. अगदी लग्नासाठी सूट खरेदी केला जातो. तो घालून थाटामाटात लग्न केले जाते आणि त्यानंतर तो सूट आवडला नाही असे सांगून परतही केला जातो. अमेरिकेतून सुट्टीवर भारतात आपल्या घरी येताना व्हिडिओ कॅमेरा घेतला जातो. त्याचा भरपूर उपयोग केला जातो आणि सुट्टीनंतर कॅमेरा नको आहे असे सांगून निर्लज्जपणे परत केला जातो. नाही म्हणायला अमेरिकेत मॉलमध्ये हिंडताना एक वेगळा अनुभव आला होता. सतत तुमच्यावर लक्ष ठेवण्यासाठी एखादा विक्रेता तुमच्यामागे हिंडत असतो आणि हे विशेषत: गोरी कातडी नसलेल्या लोकांच्या मागे असतात. कदाचित त्यांना पूर्वी आलेल्या अनुभवावरून ते तसे करीत असतील; परंतु आपल्याला जाणवण्याइतका हा पाठलाग असतो हे नक्की.

* * *

### प्रकरण दहावे

# अमेरिकेतील सुरक्षा व्यवस्था व दक्षता

अमेरिकेत ग्राहक सेवा जशी उच्च दर्जाची असते, त्याचप्रमाणे सर्व प्रकारची सुरक्षा व्यवस्था फारच कडक असते. कोणत्याही सुपर मार्केटमध्ये मांडून ठेवलेल्या कोणत्याही वस्तू तुम्ही हाताळू शकता. मुद्दाम त्यासाठी कोणीही विक्रेता ते दाखविण्यासाठी नसतो. परंतु कोणी एखादा ग्राहक एखादी वस्तू लंपास करण्याचा प्रयत्न करू लागला तर तो मात्र सुरक्षा व्यवस्थेच्या नजरेतून सुटू शकणार नाही. तुमच्या लक्षातही येणार नाही अशा ठिकाणी लपलेले कॅमेरे, दुर्बिणी, टीव्ही. लावलेले असतात. तुमच्या नकळत तुमच्या हालचालींवर पूर्ण लक्ष असते. त्याला चुकवून एखाद्याने वस्तू लंपास करण्याच्या इराद्याने वस्तू घेतलीच तर प्रत्येक वस्तूवर कोड असतो. तो कोड किंवा सील फक्त बिले घेण्याच्या काऊंटरवरील यंत्रच काढू शकते. ते न करता ती वस्तू तुम्ही चुकून जरी बाहेर काढू लागलात तरी दारावरचा भोंगा क्षणार्धात वाजू लागतो. रेल्वे फाटकातून किंवा एखाद्या म्युझियमच्या दारातून आत जाताना वा बाहेर पडताना तिकीट तपासनीस नसतो; पण तुम्ही तिकीट अगर विकत घेतलेले टोकन एका विशिष्ट फटीतून आत सरकवल्याखेरीज दार उघडत नाही व तुम्ही बाहेर जाऊ शकत नाही. रेल्वे फलाटावर जाताना टोकन टाकून दार उघडूनच तुम्हाला आत फलाटावर जाता येते. त्यामुळे विनातिकीट प्रवास करणारा एकही प्रवासी असू शकत नाही.

लास वेगास येथील जुगाराच्या मायाजालामध्ये असाच एक अनुभव आला. जुगार खेळायला येणारे लोक तर लबाडी करूच शकत नाहीत. कारण जुगाराच्या प्रत्येक टेबलावर जुगार खेळणारे डिलर्स - जुगार मालकाचे नोकर - नेमलेले असतात. ते सुद्धा जुगाराच्या मालकाशी अगर जुगार खेळायला येणाऱ्या ग्राहकांशी प्रतारणा करू शकत नाहीत. तिथे एका हॉटेलमध्ये हजारो टेबले असतात. अशाच एका टेबलावरील डिलरने काहीतरी बदमाशी केली. तिथे असलेल्या सुरक्षा यंत्रणेतून त्यांच्या सुरक्षा केंद्राच्या ते लगेच लक्षात आले. काही मिनिटांतच त्या टेबलाभोवती सुरक्षा पथकाच्या अधिकाऱ्यांचे कडे पडले. त्यांनी खेळ थांबविला.

तोपर्यंत जमा झालेले पैसे मोजून ताब्यात घेतले. तत्काळ त्या डिलरला पकडून घेऊन गेले. गडबड नाही. गोंधळ नाही. सायरन नाही. त्या टेबलाच्या शेजारच्या टेबलावरील खेळ मुळीच खंड न पडता चालूच होता.

युटा स्टेटची राजधानी सॉल्ट लेक सिटी हे शहर. आम्ही त्या शहरात गेलो होतो. प्रत्येक प्रांताच्या राजधानीच्या शहरात त्याची स्टेट कॅपिटल इमारत असते. ती खूप पाहण्यासारखी असते. राज्यपालाचे ऑफिस, न्यायाधीशाचे ऑफिस, त्या प्रांताचा इतिहास, त्या प्रांताची वैशिष्ट्ये, महत्त्वाच्या व्यक्तिंचे फोटो इ. संग्राह्य वस्तू पाहण्यासाठी लोकांना मुक्त प्रवेश असतो. आम्ही थोडे उशिरा म्हणजे ४.३०/५.०० वाजता तिथे पोहोचलो होतो. इमारतीत प्रवेश करून सर्व पाहण्यास तास दीड तास लागला. आत शिरताना दारे सताड उघडी होती. उशिर झाल्यामुळे आत इतर कोणी फारसे नव्हतेच. इतक्या महत्त्वाच्या इमारतीमध्ये कोठेही कोणीही रखवालदार नाही याचे आम्हाला आश्चर्य वाटत होते. सगळीकडे हिंडून पाहून झाल्यानंतर आम्ही बाहेर पडण्याच्या दरवाजापाशी आलो. पाहतो तर दरवाजा बंद होता. आम्हीच फक्त आत राहिलो होतो. आम्ही मनातून खूप घाबरलो होतो. इतर कोठेतरी बाहेर जाण्यासाठी दरवाजा असेल म्हणून शोधू लागलो. शोधता शोधता दुसरा दरवाजा आढळला. त्याच्या जवळ एक बटण होते. दरवाजा उघडण्यासाठी ते बटण असावे असे वाटले म्हणून ते बटण दाबले. ते बटण दाबताच आकाशवाणी झाल्याप्रमाणे एकदम आवाज आला. 'तुम्ही कसे आहात?' माझ्या मुलाने उत्तर दिले, 'आम्हाला बाहेर जायचे आहे.' फक्त आवाज येत होता. तो आवाज कोठून येत होता ते समजत नव्हते. प्रत्यक्ष कोणीही दिसत नव्हते; परंतु क्षणार्धात आमच्या समोरचा दरवाजा उघडला गेला. आम्ही बाहेर पडून जाऊ लागलो तोच पुन्हा आकाशवाणी झाली. 'कृपया दरवाजा नीट लावून जा.' म्हणजेच आमची जी समजूत होती की, कोणीही रखवालदार नाही किंवा आपल्याला कोणीही पाहात नाही, ती चुकीची होती. आमच्या नकळत आमच्यावर कोणीतरी नजर ठेवून होते. इतकी सुरक्षिततेची प्रचंड काळजी घेतली होती. या सर्व यंत्रणेची आम्हांला कमाल वाटली.

* * *

प्रकरण अकरावे

# अमेरिकेतील नोकरीची कार्यपद्धती

अमेरिकेत कोणतीही नोकरी अगर कोणतेही काम मेहनतीने व सचोटीने करावे लागते. अमेरिकन यंत्रणा तुम्हाला देण्यात येणाऱ्या पगाराचे पुरेपूर माप वसूल करून घेते. मग ती नोकरी दुकानातील असो, शिक्षणक्षेत्रामधील असो, कारखान्यातील असो, प्रायव्हेट असो किंवा सरकारी असो. त्यात कोणीही हयगय करू शकत नाही. कारण कामात कसूर करणाऱ्यास एका पत्राद्वारे एका दिवसात नोकरीस मुकावे लागते. मग कसूर करणारा कोणत्याही पदावर, अधिकारावर काम करीत असला तरीही त्याला हे लागू असते. सर्वांना कायदा, नियम सारखेच लागू होतात. नोकरीतून कमी करताना 'तुमच्या कामाची / सेवेची तूर्तास गरज नाही' अशा सौम्य शब्दांची नोटीस दिली जाते. अमेरिकेत कामाचा पाच दिवसांचा आठवडा असतो. सोमवार ते शुक्रवार. परंतु हे पाच दिवस साधारण सकाळी ८ ते सायंकाळी ५ ही सर्वमान्य कामाची वेळ असते. शिवाय त्याच वेळी होणाऱ्या वाहनांच्या गर्दीमुळे कामाच्या ठिकाणी जाण्यास वेळ लागतोच. त्यासाठी एखादा तास तरी घरातून आधी निघावे लागते. तसेच ऑफिसच्या वेळेनंतरही घरी पोहोचण्यास एक दीड तास तरी वेळ लागतो. प्रत्येक कुटुंबातील नवरा बायको दोघेही नोकरी करतात. मग सकाळी जाताना मुलांना शाळेत किंवा डे केअरमध्ये सोडायचे व येताना मुलांना घरी घेऊन यायचे हे एक काम असतेच. या दिवसभराच्या व्यापामुळे कोणालाही सोमवार ते शुक्रवार इतर काहीही काम करता येत नाही. शिवाय सायंकाळी घरी आल्यानंतर त्या दिवशीचा व दुसऱ्या दिवशीच्या सकाळचा स्वयंपाक करावा लागतो. अर्थात, हे झाले अमेरिकेतील भारतीयांचे दिनक्रम. अमेरिकेच्या नागरिकांचे रोजचे खाणे सोपे असते. बहुतेक वेळा ते तयार पदार्थ गरम करून खात असतात किंवा आठवड्याभराचे मुख्य पदार्थ तयार करून फ्रिजमध्ये ठेवले जातात. रोज ब्रेडबरोबर ते पदार्थ खाल्ले जातात.

अशा प्रकारे आठवड्याचे पाच दिवस कसे निघून जातात ते लक्षातही येत

नाही. मग शनिवारी आठवड्याचा बाजार करावा लागतो. अर्धा दिवस त्यातच जातो. दुपारी जेवणानंतर थोडी विश्रांती घेतली की, कुटुंबाला एकत्र बाहेर जायला सायंकाळ मिळते. मुलांना घेऊन त्यांच्या आवडीच्या ठिकाणी कुटुंब जाते. रविवार साधारण घरातील कामासाठी राखून ठेवलेला असतो. आठवडाभर साठवलेल्या कपड्यांचा धोबीघाट, घरातील सफाई, आवराआवर, पुढच्या आठवड्याची तयारी यात रविवार केव्हा मावळतो ते समजतच नाही. या साचेबंद रूटीनमध्ये सांस्कृतिक, सामाजिक कामांना व करमणुकीला मुद्दाम वेळ काढावा लागतो. अमेरिकन भारतीयांचा मुख्य सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे मुलांचे वाढदिवस व त्याच्या पार्टीज, त्यानिमित्ताने मोठ्यांच्या होणाऱ्या गप्पा. गप्पांचे विषयही ठरावीक असतात. ग्रीन कार्ड झाले का? भारतात केव्हा ट्रीप आहे? आई वडील केव्हा येणार आहेत अगर परत जाणार आहेत? भारतात अजूनही कसा मागासलेपणा, अज्ञान व अस्वच्छता आहे याचे अनुभवासहित रसभरीत वर्णन चालू असते. तरीही भारतात कायम परत जाण्याचा विचार असल्याची बढाई मधून मधून चालूच असते. हे आणि असेच अमेरिकन भारतीयांचे दिवस अन् दिवस, महिनोन्महिने, वर्षानुवर्षे चालूच राहते. मग त्याच त्या रूटीनचा त्यांना सुद्धा कंटाळा येऊ लागतो.

तरीही तिकडची हवा, स्वच्छता, सुखसोयी व विशेषत: नोकरीच्या जागेवरचे वातावरण यामुळे थकायला कमी होते. कंटाळा कमी येतो. काही ऑफिसमध्ये विशेषत: कारखान्यातून तुमच्या सोयीनुसार वेळेत (Flexible timing) काम करण्याची परवानगी असते. दिवसाचे व आठवड्याचे अमूक इतके तास करण्याचे ठरविले जाते. शक्य असेल त्याठिकाणी काम किती करायचे तेही ठरविले जाते. मग तुम्ही तुमच्या सोयीनुसार काम सकाळी लवकर सुरू करून सायंकाळपर्यंत वेळ भरून काम करा किंवा दुपारी कामाला सुरुवात करून रात्री उशिरापर्यंत काम करीत बसा. तुम्हाला ठरवून दिलेले काम ठरवून दिलेल्या वेळेत पूर्ण करा. तुम्ही असे का केले, असे तुम्हाला कोणी विचारणार नाही. मात्र त्या कामात कामाची क्वालिटी म्हणजे कामाची प्रत मात्र उत्तमच असावी लागते. त्यात कोणतीही तडजोड मान्य नसते. कमी प्रतीचे काम खपवून घेतले जात नाही. या पद्धतीमुळे बहुतेक सर्व कार्यालये दिवसभर किंबहुना २४ तास चालूच असतात. दिलेले काम ठरावीक मुदतीत पूर्ण

करायचे असल्यामुळे पुष्कळ वेळा शनिवार रविवार सुद्धा काम करावे लागते. कामाचे तास केवळ भरून काढण्यापेक्षा प्रत्येकजण कामाच्या दर्जाबद्दल जागरूक असतो.

अमेरिकेत वरिष्ठ आणि कनिष्ठ यांचे संबंध फार खेळीमेळीचे आणि वैयक्तिक पातळीवरचे असतात. मुख्य म्हणजे कितीही वरिष्ठ अधिकारी असला तरी त्याला त्याच्या नावानेच संबोधले जाते. त्यामुळे आपोआपच जवळीक व आपलेपणा साधला जातो. सर! सर!! करून त्याच्या पुढे पुढे करून नाचावे लागत नाही. साहेबाची मर्जी सांभाळण्यासाठी, साहेबाची बडदास्त ठेवण्यात कनिष्ठांना राबावे लागत नाही. तोच वेळ व श्रम कनिष्ठाने कामात खर्ची घालावेत ही अपेक्षा असते. कारण कोणाही कर्मचाऱ्याचे ऑफिसमधील मूल्यमापन हे फक्त त्याच्या कामावरून केले जाते. कोणत्याही व्यवसायाचा अगदी उच्च पदाधिकारी मग त्याला चेअरमन, प्रेसिडेंट काहीही हुद्दा असो इतर अनेकांसारखीच त्याची कामाची केबीन असते. त्याचे ऑफिस अगदी साधे असते. ते बंद दाराच्या खोलीत नसते. दारच नसल्यामुळे कोणीही व्यक्ती कामाच्या संदर्भात त्याला केव्हाही भेटू शकते. त्याच्याशी चर्चा करू शकते. कोणाच्याही चांगल्या कामाची प्रशंसा केली जाते. प्रत्येक गोष्ट पैशाच्या मोबदल्यात मोजली जात नाही. सर्व काम एका संघभावनेतून करण्याची सवय लावली जाते. त्यामुळेच संस्थेबद्दलची आपुलकी, जिव्हाळा, प्रेम प्रत्येकाला वाटत राहते.

अमेरिकेत कोणत्याही ऑफिसचा परिसर अतिशय सुंदर व प्रसन्न ठेवलेला असतो. भरपूर जागा, मुबलक पाणी, वीज व पैसा हे त्याचे कारण असू शकेल; पण तरीही तसे करण्याची व उभारलेले विश्‍व जतन करण्याची दृष्टी असावी लागते. अतिशय डोळसपणे केलेले ऑफिसच्या इमारतीसमोरचे लॉन, व्यवस्थित विचार करून लावलेली झाडे, फुलझाडे व जागोजागी तयार केलेली कारंजी या सर्वांमुळे त्या परिसराचे रूप फार सुंदर होऊन जाते. मुबलक जागा असल्यामुळे नीट आखणी करून केलेली कार पार्कस् प्रत्येकाची सोय पाहत असतात. इमारतीमध्ये शिरल्याबरोबर वेगवेगळी पेंटिंग्ज फ्रेम्स् व संस्थेचा लोगो-चिन्ह तुमच्या डोळ्यांत भरेल असे सजवून ठेवलेले असते. कोणत्याही ऑफिसमध्ये शिरण्यापूर्वी तुमची

माहिती, कामाचे स्वरूप, कोणाला भेटायचे आहे याची नोंद करून घेतली जाते. सुरक्षिततेच्या दृष्टीनेही अशी काळजी घेतली जाते. संपूर्ण इमारतीचा नकाशा, त्यातील प्रत्येक मजल्यावर व हॉलमध्ये कोणती खाती काम करतात याचा नकाशा व माहिती स्पष्ट कळेल अशी प्रदर्शित केलेली असते. कोठेही जाण्यासाठी मार्ग कसा आहे हे स्पष्ट केलेले असते. संपूर्ण इमारतीची आतून बाहेरून रंगसंगती अत्यंत आल्हाददायक व नेत्रसुखद असते. काम करणाऱ्याला प्रसन्न वाटेल अशीच ती असते. कामाला सोयीस्कर होईल, सुखकर होईल अशीच आतील फर्निचरची मांडणी असते. साधारण सर्व ऑफिसेसमध्ये क्यूब पद्धतीचे एकेका कर्मचाऱ्याचे चौकोन केलेले असतात. त्या फर्निचरचा रंग ऑफिसमध्ये सगळीकडे एकसारखाच असतो. वीज कमतरता नसल्याने सतत भरपूर प्रकाश असतो. अशा प्रकारचे एकूण वातावरण असल्याकारणाने कामाच्या दर्जामध्ये, लोकांच्या मानसिकतेमध्ये खूपच वरच्या दर्जाची पातळी निर्माण होते.

आजकाल भारतामध्ये सुद्धा या सर्व गोष्टींकडे लक्ष पुरविले जाते. मुंबई, बंगलोर, हैद्राबाद, पुणे यासारख्या शहरांमध्ये असणाऱ्या अनेक मल्टीनॅशनल कंपन्यांची ऑफिसेस याच धर्तीवर निर्माण होऊ लागली आहेत. आता हे आपल्याकडेही हळू हळू आले आहे. विशेषत: संगणक क्रांतीमुळे सुरू झालेल्या सॉफ्टवेअर आणि इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी या क्षेत्रात हा फरक प्रामुख्याने जाणवत आहे. बंगलोर, पुणे, मुंबई, हैद्राबाद येथील या व्यवसायांच्या वास्तूमध्ये शिरल्यानंतर आपण भारतात आहोत की अमेरिकेत आहोत ते समजतच नाही. त्या व्यवसायातील परिसर, आतील मांडणी, फर्निचर, रंगसंगती, व्यवस्था हुबेहूब अमेरिकेसारखीच असते. कर्मचाऱ्यांची कामाची पद्धत, त्यांचे परस्परसंबंध, मूल्यमापन, कामाच्या वेळा हे सर्व अमेरिकेप्रमाणेच असते. अर्थात, त्यांच्या कामाचा वेग आणि त्याचा दर्जा हाही त्यामुळे उंचावलेला आहे यात शंका नाही.

कोणतेही काम अमेरिकेमध्ये कमी प्रतीचे किंवा हलक्या दर्जाचे समजले जात नाही. त्यामुळे कोणालाही कसलेही काम करायला कमीपणा वाटत नाही. त्याबाबत मी तिथे असताना एक गोष्ट वाचली होती ती अशी. एका ऑफिसमधील काम करणाऱ्या एका सुशिक्षित माणसाला इतरांपेक्षा त्याच्या उच्च प्रतीच्या कामाचा गर्व

वाटायचा. तो त्याबद्दल प्रौढी मिरवित असे. एक दिवस त्याला विचारण्यात आले की, तू एक महिना तुला नेमून दिलेले काम केले नाहीस किंवा तू एक महिना हक्काची रजा घेतलीस आणि तुझ्या जागी इतर कोणीही तुझे काम केले नाही तर कोणाला त्रास होईल? आणि त्याचप्रमाणे एका सफाई कामगाराने एक महिना काम केले नाही व दुसऱ्या कोणाला त्याचे काम करण्यास नेमले नाही तर काय होईल व कोणास त्रास होईल? त्याने उत्तर दिले - अर्थातच, सफाई कामगाराच्या गैरहजेरीमुळे सर्वांचेच आरोग्य धोक्यात येईल. पुन्हा त्यालाच विचारण्यात आले, मग कोणाचे काम महत्त्वाचे ठरते? किंवा कोण व्यक्ती महत्त्वाची व आवश्यक ठरते? तो मनुष्य मनातून ओशाळला. काय ते समजून गेला. मनाला त्याने समजाविले की कोण व्यक्ती महत्त्वाची हे त्याच्या कामावर अवलंबून नसते, तर ते कामाच्या स्वरूपावर अवलंबून असते. प्रत्येक व्यक्ती समाजासाठी महत्त्वाचीच असते. त्यामुळे करीत असलेल्या कामावरून दुसऱ्याला कमी लेखणे हे चूकच आहे. त्यामुळे ज्याला जे काम करावेसे वाटते व जमते ते काम ती व्यक्ती आत्मीयतेने, प्रामाणिकपणे करीत असते. आपल्या आवडीच्या विषयात कोणीही प्रावीण्य मिळवू शकतो. त्याचबरोबर कामामधील फरकाप्रमाणे मिळकतीमध्ये फार तफावत असत नाही. अत्यंत विद्वानाला किंवा उच्च पदाधिकाऱ्याला पगार थोडा जास्त असेल; पण अगदी खालच्या पदावर काम करणाऱ्या माणसाला आपले कुटुंब व्यवस्थित सांभाळण्याइतकी मिळकत नक्कीच असते. त्या मिळकतीमधून कुटुंबाच्या किमान गरजा तो नक्कीच भागवू शकतो. त्यासाठी त्याला कर्ज काढून आयुष्यभर ते फेडीत बसावे लागत नाही. ही तफावत कमी असल्यामुळेच अमेरिकेत गरीब-श्रीमंत असा भेदभाव व मत्सर कमी आढळतो. शिवाय अमेरिकेत जीवनात आनंद उपभोगण्याच्या किंवा मौजमजा करण्याच्या सोयी सर्वांच्या खिशाला परवडतील अशा उपलब्ध आहेत. उदाहरणच द्यायचे झाले तर अमेरिकेतील प्रसिद्ध जुगारी शहरात अत्यंत श्रीमंत मनुष्य ५००० डॉलर पॉइंटने खेळू शकतो आणि सामान्य माणूस खिशात अगदी १५ डॉलर ठेवूनही जुगाराच्या खेळाची मजा लुटू शकतो. तसेच अमेरिकेत सर्वांत कमी खर्च रोजच्या जेवणासाठी होतो. १९९७ पासून पाच वेळा अमेरिकेत गेलो तरी खाण्याच्या पदार्थांच्या किमती दहा सेंटने सुद्धा बदलल्या

नाहीत म्हणजे वर गेल्या नाहीत. त्या कारणामुळे सुद्धा मिळकतीमधील तफावत नागरिकांच्या रोजच्या व्यवहारात त्यांना त्रस्त करीत नाही.

आपल्या भारतीय लोकांच्या कामातील प्रामाणिकपणा, कष्ट करण्याची तयारी, हुशारी या सर्वांबद्दल त्यांचे तिथे खूप कौतुक केले जाते. ते काम तसे करतातच. त्यांच्या गुणवत्तेचे तिकडे खूप नाव होते; परंतु आश्चर्य असे वाटते की, हे सर्व ते अमेरिकेत असेपर्यंतच सत्य असते. त्या मातीचाच तो गुण म्हणायला पाहिजे. तोच भारतीय मात्र भारतात परत आल्यानंतर या भूमीच्या सवयीप्रमाणे वागू लागतो. असे का घडते ते खरोखरच समजत नाही. वास्तविक भारतात परत आल्यानंतर आपल्या कामातील वागणुकीमुळे इतरांना ते आदर्श ठरायला हवेत. इथले वातावरण त्या माणसाला बदलायला का प्रवृत्त करते याचे सखेद आश्चर्य वाटते.

* * *

## प्रकरण बारावे

# अमेरिकन शिक्षणपद्धती व विद्यार्थी

अशा तऱ्हेची माणसे तयार करणे व विद्यार्थ्यांच्या कोणत्याही आवडत्या विषयाचा अभ्यास करण्याची सोय करणे यात अमेरिकेतील शिक्षणसंस्था फार मोलाची कामगिरी बजावतात. तुम्ही मनात आणाल त्या विषयातील अभ्यासक्रम अमेरिकेतील विद्यापिठात तयार असतो. तुमच्या ठरावीक साचेबंद अभ्यासक्रमाबरोबरच तुमच्या एखाद्या आवडीच्या विषयाचा तुम्हाला अभ्यासक्रम निवडता येतो. विज्ञानाच्या विद्यार्थ्याला वाटले तर त्याला कुकिंगचा सुद्धा एक विषय अभ्यासासाठी निवडता येतो. अगदी वेगळे विषय म्हणजे शिवणशास्त्र, प्राण्यांना शिक्षण देणे, वाद्यसंगीत असेही विषय कोणी घेऊ शकतो. मुख्य अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेमध्ये अशा वेगळ्या विषयांचा विचार होत नसला तरी तुमच्या मुख्य शिक्षणासोबतच तुम्हाला तुमचा छंद जोपासणे सहज शक्य होते. कधी कधी मुख्य अभ्यासक्रमापेक्षा या वेगळ्या घेतलेल्या विषयातच विद्यार्थी अधिक रममाण होऊन प्रावीण्य मिळवितात व त्याच विषयात ते आपली आयुष्याची उपजीविका ठरवू शकतात. आपल्याकडे ठरावीक आणि चाकोरीमधील विषयांचेच शिक्षण पुरे करावे लागते. मग ते करत असताना छंद म्हणावा तसा जोपासला जात नाही. छंदाकडे जास्त लक्ष दिले तर चाकोरीतील शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. मग त्याची सामाजिक प्रतिष्ठा धोक्यात येते.

आणखी एक महत्त्वाचा फरक म्हणजे अमेरिकेत विद्यार्थी १५ / १६ वर्षांचा झाला की तो सर्वार्थाने स्वतंत्र असतो. त्यानंतरच्या त्याच्या शिक्षणाची किंबहुना जगण्याची जबाबदारी ही आईवडिलांची राहात नाही. आपल्याकडे साधारण विद्यापिठातील शिक्षण सुद्धा आईवडिलांच्या आधारावरच चालू राहते. मुलांच्या त्या शिक्षणासाठी तरतूद आईवडिलांना मुलांच्या लहानपणापासूनच करावी लागते. आयुष्याच्या वाढलेल्या वयातही आईवडील मुलाच्या शिक्षणासाठी कर्ज काढीत असतात. अमेरिकेत हे चित्र अजिबात दिसत नाही. शाळेनंतरचे शिक्षण विद्यार्थी

स्वत:च्या जबाबदारीवर करतो. त्या वयात विद्यार्थी आईवडिलांपासून दूर राहायला लागतो. त्यासाठी शक्यतो तो त्याच्या राहत्या ठिकाणापासून दूरच्या विद्यापिठाची निवड करतो. त्यांना दूर राहून अर्थार्जन करून स्वतंत्र राहून आपल्या खर्चाने शिक्षण घ्यायचे असते. त्यासाठी सरकारी कर्ज सोयीस्करपणे विनासायास आणि वेळेवर मिळू शकते. याशिवाय कष्ट करून पैसे मिळवून स्वत:चा खर्च स्वत: करण्यासाठी पुष्कळ सोयी उपलब्ध असतात. अर्थार्जन करून स्वावलंबी होण्याचे शिक्षण त्याला लहानवयातच प्राप्त होते. विद्यापिठात आणि शिक्षणसंस्थांमधून विद्यार्थ्यांना करण्याजोगी अनेक कामे उपलब्ध करून दिली जातात. त्यायोगे कमवा आणि शिक्षण घ्या हे तत्त्व सर्वत्र मान्य केले जाते.

विद्यापिठाची अनेक कामे उदाहरणार्थ, लायब्ररी चालविणे व सांभाळणे, विद्यापिठाच्या स्टोअरमध्ये काम करणे, आवार साफ करणे, बागकाम करणे, इतकेच नाही तर विद्यापिठाच्या मेसमध्ये काऊंटर सांभाळणे, बशा धुणे, बाथरूम्स साफ करणे ही कामे सुद्धा विद्यार्थ्यांना दिली जातात. या विद्यार्थ्यांना सरकारी विभाग किंवा सामाजिक संस्थाही कामाची संधी देतात. न्यूयॉर्कमध्ये शिकत असताना माझ्या धाकट्या चिरंजीवाने पोलीस खात्याचे एक काम मिळविले होते. रस्त्यावरील रहदारीवर नियंत्रण आणण्यासाठी रस्त्यावरून दर तासाला होणाऱ्या वाहतुकीची त्यांना माहिती मिळवायची होती. ती माहिती पहाणी करून त्यांना सादर करण्याची जबाबदारी चिरंजीवाने मिळविली होती. मी अमेरिकेतील मोठी मोठी दहा बारा विद्यापिठे पाहिली. त्यावेळी अनेक विद्यार्थी अशी कामे करताना मला पाहायला मिळाले होते.

विद्यार्थ्यांना असे अर्थार्जन करण्याची संधी तिकडचे अनेक उद्योगधंदे किंवा कारखाने मिळवून देतात. अशा उद्योगधंद्यांना अनेक अभ्यासपाहण्या करायच्या असतात. किंवा कारखान्यांना त्यांच्या उत्पादनात सुधारणा करणे, नवीन वस्तू उत्पादन करणे, केलेल्या उत्पादनाच्या चाचण्या करणे अशी अनेक कामांची जरूरी असते. अशी कामे ते विद्यापिठातील प्रोफेसरांना समजावून सांगतात. ते करण्यासाठी त्या प्रोफेसरांना काही रक्कम दिली जाते. त्या प्रोफेसरांच्या मार्गदर्शनाखाली ते विद्यार्थी त्या ठरवून दिलेल्या प्रोजेक्टवर काम करतात. हे करीत असताना त्यांना

त्याचा मोबदला तर मिळतोच शिवाय शिकत असलेल्या विषयात प्रत्यक्ष कामाचा अनुभव सुद्धा मिळतो. अशारितीने अमेरिकेतील उद्योग व कारखाने युवा पिढी उत्तम तयार होण्यासाठी भरपूर सहभागी झालेले आहेत. आपल्याकडेही असे होण्यास काहीच हरकत नाही. थोड्याफार प्रमाणात काही रेस्टॉरंटसमध्ये व हॉटेल्समध्ये विद्यार्थ्यांना काम मिळायला आजकाल सुरुवात झाली आहे.

हे स्वावलंबनाचे व कामाच्या अनुभवाचे तंत्र अगदी शाळेपासून जोपासले जाते. शाळेतच विद्यार्थी हे धडे गिरवितो. अमेरिकेच्या नॉर्थ डाकोटा परगण्यातील अगदी छोट्या फार्गो या गावी मी गेलो होतो. तिथे मी एका शाळेत गेलो होतो. शाळेच्या वार्षिक संमेलनानिमित्त एक प्रदर्शन आयोजित केले होते. त्या प्रदर्शनात शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केलेल्या अनेक वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या होत्या. त्या मार्गाने विद्यार्थ्याला अंगातील कलागुण दाखविता येऊन विक्रीतून तो थोडेफार पैसे मिळवू शकत होता.

त्याच शाळेकडे एक जागा उपलब्ध होती. ती जागा शाळेनी मुलांच्या ताब्यात दिली आणि त्यावर एक घर बांधण्यास सांगण्यात आले. मुले उत्साहाने कामाला लागली. ज्याला ज्या कामाची आवड असेल व शिकण्याची तयारी असेल ते काम करण्याची विद्यार्थ्यांना परवानगी देण्यात आली. कोणी गवंड्याचे, कोणी सुताराचे, कोणी प्लंबिंगचे, कोणी इलेक्ट्रिकचे तर कोणी रंगाचे काम करायला घेतले. मार्गदर्शन व लक्ष ठेवण्यासाठी शाळेचे शिक्षक व इतर त्या कामातील तरबेज माणसे होतीच. काही महिन्यांत घर तयार झाले. शाळेने ते घर गावातील लोकांसाठी विक्रीस ठेवले. ते घर विकले गेले. अर्थातच, खर्च वजा जाता नफाच झाला. ज्या विद्यार्थ्यांनी ते घर उभारण्यासाठी काम केले होते त्या विद्यार्थ्यांना त्यांनी केलेल्या कामानुसार नफा वाटून दिला. स्वकष्टार्जित कमाईचा त्या विद्यार्थ्यांना किती प्रचंड आनंद झाला असेल त्याची कल्पना आपण सहज करू शकतो. मला तर ही फार सुंदर व अभिनव कल्पना वाटली.

आपल्याकडे असे होतच नाही असे नाही; पण फार थोड्या प्रमाणात हे घडते. माझ्याच पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात ही कल्पना ४० ते ५०

वर्षांपूर्वीपासून रुजविली गेली आहे. शाळेमध्ये विद्यार्थी भांडार हे विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी शिक्षकांच्या मदतीने चालवलेले शालेय वस्तूंचे भांडार आहे. त्याचप्रमाणे शाळेमार्फत सुट्टीमध्ये एका नामवंत कंपनीचे साबण व इतर उत्पादने विद्यार्थ्यांना विक्रीसाठी दिली जातात. स्वत:चे भांडवल न गुंतविता त्यांना त्या मालाची विक्री करता येते. त्यांनी केलेल्या विक्रीवर त्यांना कमिशन मिळते. शिवाय विक्रयकलेची माहिती होते. बिनभांडवली धंद्यापासून कमाई व शिक्षण दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतात.

अमेरिकेत सरकारी व खाजगी दोन्ही प्रकारच्या शाळा आहेत. खाजगी शाळा फार महाग असतात. साधारण माणसाला त्या परवडणाऱ्या नसतात. मात्र या दोन्ही शाळातील शिक्षणक्रमात, शिक्षणपद्धतीत व गुणवत्तेत काहीही फरक नसतो. विद्यार्थी - पालक व शाळा यांचे फार जिव्हाळ्याचे संबंध असतात. शाळेच्या अनेक कार्यक्रमात पालकांचा सहभाग असतो. शिस्त, स्वच्छता व प्रामाणिकपणा त्या वयातच मुलांना शिकवला जातो. शहराच्या ज्या विभागात तुम्ही राहात असता, त्या विभागातील शाळेतच तुमच्या मुलाला तुम्हाला शाळेत प्रवेश घ्यावा लागतो. शाळा ही तुमच्या घराच्या ठरावीक परिसरातच असावी लागते. शाळांच्या गुणवत्तेनुसार शाळेमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी पालक धडपड करतातच. त्या शाळांच्या एकूण गुणवत्तेप्रमाणे त्या भागातील घरांच्या किमती ठरतात. उत्तम शाळांच्या विभागातील घरे भाड्याने अगर विकत खूप महाग असतात.

या सर्व शिक्षण माध्यमातून अमेरिकेत असलेले नागरिक चार प्रकारच्या गटात विभागता येतात. पहिल्या गटात साधारण २० ते २५ वर्षांपूर्वी स्थलांतरित झालेले भारतीय मोडतात. त्या काळात जास्त करून डॉक्टर्स वा इंजिनिअर्स अमेरिकेत गेले. त्या काळात अशा लोकांची जरूरी होती त्यामुळे विनासायास त्या लोकांना अमेरिकेत स्थिरावता आले. या व्यवसायातील लोकांची अमेरिकेत त्या काळात कमतरता असल्याने त्या काळात गेलेल्या लोकांचे स्वागतच झाले. त्यांना सन्मानाने स्थिरावता आले. आता ते केवळ नावापुरते एक जमात म्हणून मूळचे भारतीय वंशाचे राहिले आहेत व स्वत:ला तसे म्हणवतात; पण बाकी आचाराने, विचाराने व संस्कृतीने ते पूर्ण अमेरिकन झाले आहेत. अमेरिकेनेही त्या लोकांना पूर्ण

सामावून घेतले आहे. ते लोक स्थानिक लोकांत मिसळून गेले आहेत. आणि म्हणूनच सर्वार्थाने ते अमेरिकन झाले आहेत. त्यांची पुढची पिढी तर भारतीय म्हणून ओळखू सुद्धा येत नाही. जन्मापासून तिथे असल्यामुळे त्यांच्या चालीरीती, आचार, वागणे, विचार, पोशाख किंबहुना संपूर्ण जगणे हे अमेरिकन झाले आहे. अर्थात, यात गैर व आश्चर्य मुळीच नाही आणि अर्धवट काहीतरी जगण्यापेक्षा हे फार चांगले. म्हणतातच ना जसा देश तसा वेश आणि जगणे असावे.

त्यानंतर गेल्या १५ वर्षांपासून अमेरिकेत प्रगत व उच्च शिक्षण घेण्यासाठी जगातील युवापिढीला मोठे आकर्षण निर्माण झाले. विशेषत: संगणक युगात तर जगभरातून विद्यार्थ्यांचे लोंढे अमेरिकेत पोहोचले. या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाच्या काळात खूप कष्ट करावे लागतात. एक तर विशीमधील वय असते. कुटुंबापासून प्रथमच दूर राहात असतात. अमेरिकेतील दडपून जाणारे वातावरण, हवामानाचा अतिरेक, बाहेर दिसणारे आकर्षक जग, अभ्यासाचे मनावरचे दडपण आणि त्यातच जवळ असणारे मोजके पैसे. परंतु या परिस्थितीमधून गेल्यानंतर ही मुले अमेरिकेची परिस्थिती, वातावरण, राहणीमान पूर्णपणे आत्मसात करतात. शिक्षण पूर्ण केल्यानंतर अर्थातच सर्वजण नोकरी करतातच. हुशारी, मेहनत, प्रामाणिकपणा आणि जिद्द या जोरावर त्यांना बऱ्यापैकी द्रव्यार्जन होऊ लागते. मग हळूहळू ते अमेरिकेतील ऐहिक सुखांचा आनंद घ्यायला सुरुवात करतात. थोड्याच कालावधीमध्ये ते गाडी, घर व इतर उपभोग्य वस्तूंचा आनंद लुटतात. लग्न करतात आणि सुखी त्रिकोणी किंवा चौकोनी कुटुंबाचे आयुष्य जगतात. भारतातील त्यांचे आईवडील धन्य होतात.

गेल्या पाच वर्षांत आणखी एक प्रकारचे स्थलांतरित भारतीय आढळून येतात. हे लोक त्यांचा अभ्यास पूर्ण झाला की, एकदम नोकरीनिमित्त अमेरिकेत स्थलांतरित होतात. विशेषत: संगणक क्षेत्राने अशा लोकांना अमेरिकेची दारे सताड उघडी केली आहेत. अशा अवस्थेत स्थलांतरित झालेल्या लोकांनी विद्यार्थीदशेमधील कष्ट अनुभवलेले नसतात. अमेरिकेच्या वातावरणाची त्यांना हळूहळू ओळख न होता ते या वातावरणात एकदम येऊन दाखल झालेले असतात. ते सामोरे जातात ते अमेरिकेच्या सुखासिन, भव्यदिव्य, आकर्षक व चैनीच्या आयुष्याला.

सुरुवातीपासूनच त्यांच्या खिशात पुरेसा पैसा खुळखुळत असतो. मग असे स्थलांतरित अंगात वारं संचारल्याप्रमाणे अमेरिकेच्या प्रत्येक चैनीची मजा लुटतात. त्यांचा दृष्टिकोन मग अमेरिकेतील चांगल्या गोष्टी आत्मसात करण्याचा राहत नसून बाह्य दिसणारी सुखं, चैन उपभोगण्यात ते स्वत:ला व आपल्या कुटुंबाला झोकून देतात. अशा मानसिकता असणाऱ्या लोकांचा एक वेगळा गट तयार होतो. भारतातच पुण्याहून चेन्नईला, बंगलोरला किंवा दिल्ली, कोलकत्त्याला गेल्यावर माणसांचे जसे होते तसेच असे लोक पुण्या मुंबईहून अमेरिकेत गेल्यानंतर घडते. त्यांच्या रोजच्या राहणीत, आचारात, विचारात काहीच फरक पडत नाही.

घरीही अमेरिकेत कोणत्याही स्वरूपात, वा कारणाने वा उद्देशाने गेलेला मराठी माणूस त्याचे चाकोरीतील आयुष्य जगत असतो. सोमवार ते शुक्रवार खूप काम करायचे. शनिवार रविवार कुटुंबाला सुखी करण्याचे कार्यक्रम व कामे पार पाडायची. सोशलायझेशन म्हणजे इतर मराठी मित्र व कुटुंबांबरोबर ठरावीक गप्पा व करमणूक कार्यक्रम करायचे, त्याच त्याच विषयांचे चर्वीचरण करायचे, मधून मधून भारतात परत जाण्याचा विषय तोंडी लावायला चघळायचा. निर्णय मात्र लांबणीवर टाकायचा, असे चक्र चालू असते. पूर्वी आलेली व अमेरिकेत स्थिरावलेली भारतीय पिढी आता आपल्या मुलांच्या युवा आयुष्याच्या वाटचालीकडे त्रयस्थपणे पाहत असते. अमेरिकेत कायमच्या राहण्याच्या त्यांच्या निर्णयामुळे ते मुलांना भारतीय संस्कृतीत राहण्याचा आग्रह करू शकत नाहीत. तसेच पूर्णपणे अमेरिकन संस्कृती मुलांनी आचरणे त्यांच्या पचनी पडू शकत नाही. आपल्या मुलींनी केलेले व वर्षाआड बदललेले बॉय फ्रेंडस्, त्यांच्या वागण्यात होणारे बदल, त्यांच्या डेटिंगच्या कल्पना, त्यांच्या सांसारिक आयुष्याची त्यापुढील अनिश्चितता, याबद्दल त्यांना काय वाटत असेल व त्यांच्या मनात काय द्वंद्व चालू असेल, असा माझ्या मनात सतत प्रश्न असतो. वरकरणी आमच्या मुली आता असेच वागणार असे ते म्हणतात, पण मला वाटते त्यांच्या मनात खोलवर कोठेतरी त्याबद्दल सतत टोचत असल्यासारखे होतच असणार.

शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे पालक ते इथल्या विद्यापिठात येऊन पोहोचताच धन्य झालेले असतात. इथे आलेला प्रत्येक मुलगा/मुलगी त्याच्या

विषयात सर्वांत हुशार असल्याचे ते आवर्जून सर्वांना सांगत असतात. कोणत्याही परीक्षेचा पाल्याचा रिझल्ट लागल्यानंतर तो किंवा ती विद्यापिठात पहिली आल्याचे सर्वांना सांगतात. वास्तविक पहिल्या किंवा दुसऱ्या नंबरने उत्तीर्ण होणे असे काहीही इथे नसते. प्रत्येकाला प्रत्येक विषयात ग्रेडस् दिल्या जातात. त्या ग्रेडस् इतरांशी स्पर्धा किंवा तुलना करण्यासाठी नसतात तर त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे, ज्ञानाचे, विषय समजण्याचे मूल्यमापन असते. पण भारतीय मातेला आपल्या पाल्याचे महत्त्व व हुशारी जगाला पटवून देण्यासाठी त्याला प्रथम क्रमांकाच्या स्थानावर बसविणे अत्यावश्यक वाटते. विद्यार्थीदशेतून बाहेर पडल्यावर तो भारताच्या प्रथम भेटीला येतो त्यावेळी त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला असतो.

या सर्वांपेक्षा निराळा असा एक अमेरिकेत स्थलांतरित समाज आहे. पैसे मिळविणे या एकाच उद्देशाने तिथे गेलेले छोटे व्यापारी किंवा व्यवसाय करणारे हे ते लोक असतात. एखादा कोणीतरी पुढे जातो आणि मग तो त्याच्या जवळच्या, लांबच्या सर्व नातेवाइकांना, मित्रांना अमेरिकेची वाट मोकळी करून देतो. या मंडळींना कायम राहण्यासाठी परवाना मिळो अगर न मिळो त्यांना त्याची पर्वा नसते. ते शिक्षित तर नसतातच. त्यांचे मुख्य क्वालिफिकेशन म्हणजे कोणतेही काम करण्याची तयारी. अमेरिकेच्या भूमीवर एकदा का हे लोक उतरले की तिथून बाहेर पडण्याचे ते नावच घेत नाहीत. अमेरिकेच्या मातीत ते गडप होऊन जातात. त्यांना कधी कधी स्वत:ची भाषा वगळता इतर कोणत्याही भाषेचा गंधही नसतो. परंतु असे लोक कळपाने जगत असतात. एकमेकांना सांभाळतात. आधार देतात. पैसे मिळविण्याचे साधन उपलब्ध करून देतात. व्हिसा देताना कडक नियम लागू करणारी अमेरिकन कायदे व्यवस्था या लोकांचे काहीही वाकडे करू शकत नाही. मग कालांतराने नाना खटपटी करून हीच माणसे अमेरिकेत कायम वास्तव्याचा परवाना प्राप्त करून घेतात. पुन्हा त्यांचे नवीन नातेवाईक, मित्रांना हाच तो मार्ग असे समजावून सांगतात व पुढचा काही माणसांचा ओघ येत राहतो. अमेरिकेतील न्यू यॉर्क, शिकागो, सॅनफ्रान्सिस्को अशा मोठ्या शहरात असे बेकायदेशीर वास्तव्य केलेले अनेक लोक राहात असतात.

अमेरिका हा देशच सर्व स्थलांतरीत लोकांनी उभा केलेला असल्यामुळे या

सर्व प्रकारच्या स्थलांतरित लोकांना ती सामावून घेते. अमेरिकेच्या २००० हजार साली झालेल्या जनगणनेनुसार केलेल्या अभ्यासावरून काही आकडे प्रसिद्ध झाले आहेत. ते फार बोलके आहेत. अमेरिकेतील सर्वांत उच्चशिक्षित व उच्च कमाई करणारे स्थलांतरित भारतीय म्हणून गणले जातात. ते बहुतेक सर्वजण तरुण वयात मोडतात. असे एकूण स्थलांतरित एशियन १.६५ मिलियन असल्याचे आढळून आले आहे. यापैकी ७५ टक्के परदेशात जन्मलेले तर २५ टक्के अमेरिकेत जन्मलेले मूळचे भारतीय वंशाचे लोक आहेत. यापैकी ५४ टक्के लोक सन १९९० नंतर अमेरिकेत स्थलांतरित झालेले आहेत. या एकूण स्थलांतरित लोकांचे साधारण वय ३० असून त्यापैकी ६४ टक्के लोक पदवीप्राप्त किंवा त्याहूनही उच्च शिक्षण घेतलेले आहेत. अमेरिकेत चीनमधून स्थलांतरित सर्वांत अधिक आहेत. त्यांनी ठिकठिकाणी चायना टाऊन म्हणून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण वसाहती निर्माण केल्या आहेत. भारतीयांची सिलिकॉन व्हॅली म्हणजे कॅलिफोर्नियामधील भारतीय लोकसंख्या पाहता तिथे भारत बझार किंवा छोटा भारत निर्माण व्हायला फारसा वेळ लागणार नाही. त्या ठिकाणी सर्व भारतीय जाती, पंथ, सण, उत्सव, संस्कृती, सवयी यांचे दर्शन घडते. कोणत्याही भारतीय गोष्टीपासून आपण दूर आहोत असे वाटत नाही. कळपाने राहण्याची माणसाची वृत्ती जोपासली गेलेली पुरेपूर जाणवते.

* * *

## प्रकरण तेरावे

# अमेरिकेतील अपंग

अपंग व्यक्ती पाहताच कोणालाही त्याची दया येते. मनात त्याच्याबद्दल अनेक विचार येऊन जातात. परंतु दया येऊनही त्यांनासुद्धा आपल्यासारखे जगण्याचा अधिकार आहे असा विचार प्रामुख्याने मनात येत नाही. अमेरिकेत मात्र अपंग किंवा असहाय्य व्यक्तिबद्दल असलेली आपुलकी, त्याच्यासाठी केलेल्या विविध सोयी, त्यांना दिलेली समान संधी हे सर्व प्रकर्षाने जाणवते आणि हे सर्व प्रयत्नपूर्वक करण्यात त्यांच्याबद्दल केवळ करुणा नसते तर आत्मीयता असते. त्यांचे रोजचे जीवन सुखकर करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न असतो. ते याच समाजाचे घटक असून त्यांना इतर सर्वांसारखेच जगण्याचा हक्क आहे याची जाण असते. त्यांच्यासाठी केलेल्या प्रत्येक ठिकाणच्या सोयी पाहिल्या की समानता मनाला भिडून जाते.

मुळात अपंग लोकांनाही कोणावर अवलंबून राहिलेले मुळीच आवडत नाही. त्याही परिस्थितीत ते स्वतंत्रपणे जगू शकतात याचा त्यांना अभिमानच वाटतो. अनेक वेळा अगदी एक पाय नसलेला मनुष्य स्वत: गाडी चालवून बाजारात आलेला मी पाहिला आहे. त्यासाठी खास तयार केलेल्या गाड्या त्यांना मिळू शकतात. अमेरिकेत कोठेही जा. कार पार्किंगच्या आवारात अशा अपंग लोकांना सोयीस्कर जागा राखून ठेवलेल्या असतात. त्या जागेवर चुकून सुद्धा एखाद्या धडधाकट माणसाने गाडी पार्क केली तर तो फार मोठा गुन्हा समजण्यात येतो. इतर कोणत्याही गुन्ह्यापेक्षा या गुन्ह्याला जबर दंड ठोठावण्यात येतो. या राखीव जागा विशिष्ट खुणेने राखीव करून ठेवतात. या जागा अत्यंत सोयीच्या जागी असतात. दुकानात, थिएटरमध्ये, हॉटेलमध्ये, रेल्वेस्टेशनवर, विमानतळावर, रेस्ट रुम्स्मध्ये, सार्वजनिक पाणी पिण्याच्या नळावर किंवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी त्यांना त्यांच्या सोयीने व अग्रक्रमाने प्रवेश असतो. त्यांना प्रवेशासाठी स्वतंत्र मोकळा रस्ता असतो. त्या रस्त्यावरून त्यांना त्यांच्या व्हिलचेअर्स सहज रितीने नेता येतात. कोणत्याही सुपर मार्केटमध्ये त्यांच्यासाठी स्वयंचलित गाड्या असतात. त्याच गाड्यांना विकत घेतलेल्या वस्तू ठेवण्यासाठी बास्केटची सोय असते. त्यांना

त्या गाड्यात बसून आपल्या इच्छित वस्तूंची खरेदी करता येईल अशी सर्व वस्तूंची खास मांडणी केलेली असते. त्यांचे बील घेण्यासाठी स्वतंत्र सोयीस्कर काऊंटर असतात. बस, रेल्वे व विमान प्रवासात प्रवेश करण्यासाठी व बसण्यासाठी तर त्यांची खास व्यवस्था केली जाते. कोणत्याही करमणुकीच्या किंवा पर्यटनाच्या जागी जा, त्यांना इतरांसारखेच सर्व बघता येईल व त्याचा आनंद घेता येईल याची खबरदारी घेतलेली असते. त्यामागे त्यांनी या सर्व आनंदाला मुकू नये हाच मुख्य उद्देश असतो. हे सर्व पाहिले की वरवर माणुसकी किंवा आपुलकी नसलेल्या या देशात हा विचार कसा होऊ शकतो याचे आश्चर्य वाटते. म्हणजे कशातही दिखाऊपणा न दाखवता समता भावनेतून हे घडते की यातही कृत्रिमता असते याचा मनाला संभ्रम पडतो. तरीही अपंगांसाठी ठिकठिकाणी केलेल्या सोयी पाहून फार आनंद होतो.

इतक्या सर्व व्यवस्था करूनही काही वेळा काही अपंग लोक नाराज दिसतात. हे सर्व मिळण्याचा त्यांचा हक्क मान्य केला तरी कधी कधी ते दाखवित असलेली बेफिकीर, उर्मट वृत्ती मान्य करता येत नाही. कोणी मनातील तळमळीने एखाद्याला मदत करायला गेला तर त्यालाच तुच्छतेने झिडकारले जाते. जळजळीत नेत्रकटाक्ष टाकला जातो. मग मात्र मनात येते त्यांच्यावर ओढवलेल्या या परिस्थितीमुळे त्यांची ही मन:स्थिती झाली असावी की सर्व सुरळीत मिळते म्हणून हा माज आला असावा? त्यांच्या तुच्छतापूर्वक नजरेने व वागण्याने आपणच असहाय्य होऊन जातो.

* * *

## प्रकरण चौदावे

# अमेरिकेची पर्यटन व्यवस्था

अमेरिकेतील गेल्या पाच वेळच्या फेऱ्यांमध्ये खूप हिंडलो, खूप पाहिले. पूर्व किनाऱ्यावर बॉस्टन, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, बाल्टिमोर, फिलाडेल्फिया, व्हाईट माऊंटन, फॉल कलर्समध्ये न्यू हँपशायर, लॉस्ट रिव्हर तसेच नायगरा इत्यादी पाहिले. मध्य उत्तरेस मिनिआपोलीस, फार्गो बघितले. पश्चिमेस जाताना शिकागो व पश्चिमेकडील सॅक्रमांटो, सॅनफ्रान्सिस्को, लॉस एंजलिस, सान डिआगो, लास वेगास, रिनो, सॉल्ट लेक सिटी, लोगन हे सर्व डोळे भरून पाहिले. हे सर्व पाहत असताना मोहात पडत होतो ते अमेरिकेच्या पर्यटन विभागाच्या व्यवस्थापनाच्या. त्यांनी केलेली वातावरण निर्मिती पाहून थक्क होत होतो. पर्यटकांसाठी निर्माण केलेल्या सोयींचा अनुभव घेऊन मन गुंग होऊन जात होते. करमणुकीची आकर्षणे पाहून अवाक् व्हायला होत होते. अत्यंत योजनापूर्वक केलेल्या आखणीमुळे पर्यटकांना त्यांनी घालविलेला वेळ व खर्च केलेला पैसा वसूल झाल्यासारखे वाटते.

अमेरिकेतील प्रत्येक प्रांताच्या हवामानाप्रमाणे व भौगोलिक परिस्थितीप्रमाणे त्या त्या प्रांताचे एक खास वैशिष्ट्य पर्यटनासाठी आकर्षण ठरून गेले आहे. त्या नैसर्गिक देणगीचा सरकारने व स्थानिक लोकांनी पुरेपूर फायदा करून घेतला आहे. असणाऱ्या परिस्थितीचे पर्यटन आकर्षणात रूपांतर करून व त्याची भरपूर जाहिरात करून ते असंख्य पर्यटकांना आकर्षित करून घेतात.

बॉस्टनचे जुने इंग्लिश वातावरण व शैक्षणिक केंद्र, न्यू हँपशायरचे फॉल कलर्स आणि सृष्टीसौंदर्य, फिलाडेल्फिया व वॉशिंग्टन अमेरिकेची माजी व आजी राजधानीची शहरे, बाल्टिमोरचा सुंदर समुद्रकिनारा व जगातील उत्तम मत्स्यालय, न्यू यॉर्कचा झगमगाट आणि टोलेजंग गगनभेदी इमारतीची रांग, समुद्रात उभा केलेला स्वातंत्र्यदेवीचा भव्यदिव्य पुतळा, नायगराचा जगप्रसिद्ध धबधबा, हे सर्व पूर्व किनाऱ्यावर पाहता येते. अमेरिकेच्या हवामानास अनुसरून लॉस एंजलिसला डिस्नेलँडची स्वप्ननगरी उभी केली आहे. चित्रपट निर्मितीसाठी तिथे युनिव्हर्सल आणि पॅरेमाऊंटसारखे स्टुडिओज् उभे केले आहेत. सान डिआगो येथे माशांचे व

प्राणीजगताचे सर्कशीचे खेळ मांडले आहेत. सॅनफ्रान्सिस्कोला समुद्रावरील भव्य पूल, चायना टाऊन, उंचसखल भागात वाहतूक करणारी ट्राम, समुद्रकाठावरील फिशरमन्स वॉर्फ हे अतिशय प्रेक्षणीय आहे. या भागात होणाऱ्या अमाप द्राक्षापासून वाईन तयार करण्याच्या वायनरीज्चे जाळे सर्वत्र पसरले आहे. नेवाडा प्रांत फारच रुक्ष व वालुकामय आहे. त्या भागात इतर नैसर्गिक उत्पन्न नाही. म्हणून त्या भागात मानवनिर्मित मोहजाल निर्माण करण्यात आले आहे. त्या प्रांतात जुगाराला कायदेशीर परवानगी देण्यात आली आहे. त्यातूनच लास वेगास व रिनो येथे सर्वांत मोठी व सुंदर जुगारांची हॉटेल्स निर्माण झाली आहेत. त्यायोगे नेवाडा हा अमेरिकेतील अत्यंत सधन प्रांत म्हणून गणला जाऊ लागला. युटा हा जगातील सर्वांत जास्त बर्फ पडणारा प्रदेश ओळखला जातो. म्हणूनच तिथे असणाऱ्या डोंगरावर बर्फातील खेळ खेळण्याच्या सर्व सोयी निर्माण केल्या गेल्या. बर्फाच्या मोसमात सर्व अमेरिकेमधून स्कीईंगसाठी तिथे लोक जमतात. अशा डोंगरावरून खाली घसरत येण्यासाठी खूप प्रावीण्य मिळवावे लागते. पण त्यातील मजा काही वेगळीच असते. अशा तयार केलेल्या डोंगरमाथ्यांना स्नो पार्क असे म्हणतात. नवशिक्यांना बर्फावरून घसरण्यासाठी प्लास्टिकच्या लहान लहान बोटीसारख्या पट्ट्या केलेल्या असतात. त्यावरून घसरण्याला स्लेजिंग असे म्हणतात. डोंगरमाथ्यापासून तळापर्यंत डोंगर बर्फामध्ये बुडलेला असतो. बर्फ खूपच भुसभुशीत असतो. लहानांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सर्वजण त्या बर्फात मनमुराद खेळत असतात. त्या स्नो पार्कपर्यंत जाण्याचे रस्ते उत्तम तयार केलेले असतात. अगदी ६००० फूट उंचीवर सुद्धा गाडीने आरामात जाता येते. डोंगरमाथ्यावर जाण्यासाठी मोठमोठ्या लिफ्ट असतात. त्या लिफ्टमधून एका वेळी सामानासकट साधारण २५० माणसे डोंगरमाथ्यावर नेली जातात. अशा या बर्फातील खेळाचा आनंद सर्वजण मनसोक्त लुटत असतात. युटा आणि ॲरिझोनामध्ये कोलोरोडो नदीचे खूप खोल म्हणजे ५००० फूट खोलीचे खोरे निर्माण झाले आहे. नदीच्या प्रवाहाने डोंगर कपाऱ्या खोदून अनेक नैसर्गिकरितीने आकार निर्माण झाले आहेत. हे ग्रांड केनियन पाहण्याची फार छान व्यवस्था तयार केली आहे. प्रत्यक्ष त्या घळीच्या काठावर जाईस्तोवर आपण निसर्गाचा चमत्कार पाहणार आहोत याची पुसटशी सुद्धा कल्पना येत नाही. त्याचबरोबर त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी केलेली व्यवस्था, सोय, रस्ते पाहून आश्चर्यचकित व्हायला होते.

अमेरिकेच्या दक्षिण भागात तसेच हवाई बेटावर वेगळेच हवामान असते. इतर भागातील थंड हवेतून इकडच्या समुद्रकाठच्या हवेत मजा लुटायला मुद्दाम लोक जातात. मनसोक्त समुद्रकिनाऱ्यावर मोकळ्या हवेत हिंडून घेतात.

या सर्व सोयी उपलब्ध असल्यामुळे अमेरिकेतील जनता खूप भटकंती करते. सोमवार ते शुक्रवार खूप काम करून शनिवार रविवार भटकंती करण्याचे त्यांना वेडच आहे. बाहेर भटकायला साधारण ते सहकुटुंब स्वत:च्या कारने जातात. स्प्रिंग व समर सुरू व्हायचाच अवकाश ते आपल्या वाहनांना सायकली, मोटारबोटी इ. बांधून दर वीकएंडला घराबाहेर पडतात. ट्रीपच्या जागी सायकलिंग, बोटिंग, जॉगिंग, पायी भटकणे मनमुराद करतात. पुन्हा आठवडा सुरू झाला की, ताजेतवाने होऊन कामाला सुरुवात करतात. आपण आपल्या महिन्याच्या कमाईतून बचत करतो ती सर्वसाधारणपणे मुलांच्या शिक्षणासाठी किंवा त्यांच्या लग्नकार्यासाठी किंवा स्वत:च्या उतारवयासाठी करत असतो. अमेरिकेत बचत ही फक्त भटकंती करता यावी व आयुष्यात आनंद उपभोगता यावा यासाठी केली जाते.

या पर्यटनस्थळांची अगर जवळपासच्या पिकनिक स्पॉटस्‌ची माहिती देण्यासाठी प्रत्येक प्रांताची माहिती केंद्रे मुख्य राष्ट्रीय व स्टेट रस्त्यांवर ठिकठिकाणी असतात. फ्री वे जवळ असणाऱ्या सर्व्हिस स्टेशन, पेट्रोल पंप, फूड कोर्टजवळ तर ही केंद्रे हमखास असतात. त्या केंद्रात असलेली व्यक्ती तुम्हाला हवी ती सर्व माहिती पुरविते. त्या माहितीकेंद्रात पर्यटनस्थळांची माहिती, रस्त्यांचे नकाशे, जवळपासची हॉटेल्स इ. सर्व माहिती अतिशय सुंदर कागदावर आकर्षक छपाई करुन तुम्हाला मोफत पुरविली जाते. विनामूल्य मिळणारी ही माहितीपत्रके इतकी आकर्षक बनवलेली असतात की तुम्ही ती नक्की उचलून घेऊन पाहताच. मी अमेरिकेत फिरत असताना अशी माहितीपत्रके गोळा करण्याचा मला नादच लागला आणि मग भारतात परत येताना त्या कागदांचेच वजन २० ते २५ किलो जमा झाले.

प्रेक्षणीय पर्यटनस्थळे जास्तीतजास्त आकर्षित कशी करता येतील हे अमेरिकेत कटाक्षाने पाहिले जाते. एखाद्या स्थळाला जितकी जास्त गर्दी असेल तितकी उत्तम व चोख व्यवस्था ठेवली जाते. करमणुकीची साधने उपलब्ध करताना अगदी लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांचेच मनोरंजन कसे होईल ते आवर्जून पाहिले जाते. या ठिकाणांजवळ केलेल्या व्यवस्थेमध्ये हॉटेल्स, कार पार्कस्‌, खाण्याचे

स्टॉल्स्, मुलांची विविध खेळणी, मोठ्यांसाठी रोलर कोस्टरचे अनेक प्रकार, खरेदीसाठी दुकाने, इ. सर्व सोयींची पद्धतशीर मांडणी केलेली असते. जागोजागी असलेली म्युझियम्स पाहायची म्हटली तरी महिनोंमहिने पुरतील. वॉशिंग्टन कॅपिटल इमारत ते लिंकन मेमोरियल हा दोन मैलांचा मार्ग आहे. या रस्त्याच्या दुतर्फा वेगवेगळी अनेक म्युझियम्स आहेत. त्यापैकी एक एक म्युझियम पाहायला दोन-तीन दिवस सुद्धा अपुरेच पडतील. कॅपिटल इमारतीत किंवा न्यूयॉर्क येथील युनोच्या बिल्डिंगमध्ये सर्वांना प्रवेश खुला असतो. लोकांना अगदी सिनेटर हॉल व युनोचा मेन अॅसेम्ब्ली हॉल सुध्दा पाहायला खुला होता. नाही म्हणायला ११ सप्टेंबरच्या हल्ल्यानंतर त्यावर बंधने घातली गेली आहेत. आपल्याकडे महापालिकेच्या सभागृहाला भेट देताना सुद्धा लोकांना अनेक अडचणी येतात.

लास वेगास या जगप्रसिद्ध शहरात तिथली हॉटेल्स, त्यांची सजावट, दिव्यांचा झगमगाट, प्रचंड मोठी कार पार्कस् पाहून डोळे दिपून जातात. जुगार खेळायला आपल्या हॉटेलमध्ये लोकांनी यावे म्हणून कमी दरात पण उत्तम व्यवस्थेची राहण्याची सोय, उत्तम प्रतीचे पण कमी दरातील जेवण, विनामूल्य कार पार्कस् याची व्यवस्था केलेली असते. मोठी माणसे जुगारात रमलेली असताना, लहान मुलांसाठी वेगवेगळ्या खेळांची थीम पार्कस् असतात. सर्कस सर्कस नावाच्या हॉटेलमध्ये सर्कशीचे खेळ असतात. एका हॉटेलमध्ये जादूचे प्रयोग दाखवितात. एके ठिकाणी ज्वालामुखी कसा होतो त्याचे प्रात्यक्षिक तर एके ठिकाणी जहाजावरील खलाशांची लुटुपुटुची लढाई दाखवितात. सिझर्स पॅलेसमध्ये उभे केलेले ग्रीक साम्राज्याचे दृश्य, मिराज हॉटेलमधील पांढरा वाघ व त्याचे खेळ, लक्सर हॉटेलमध्ये उभी केलेली इजिप्तमधील पिरॅमिडस्ची प्रतिकृती हे व असे अनेक कार्यक्रम बघताना रात्री केव्हा संपतात ते समजत नाही. या सर्व हॉटेल्सचे बांधकाम पाहण्यासारखे आहे. जगातील प्रसिद्ध शहरे म्हणजे न्यूयॉर्क, रोम, व्हटिकन सिटी, लक्सर, लंडन यांच्या हुबेहूब प्रतिकृती उभ्या केल्या आहेत. त्या ठिकाणी हिंडत असताना मनात आले की आपल्या जयपूर, जोधपूर किंवा जैसलमेर येथील राजवाड्यांची प्रतिकृतीसुद्धा उत्तम आकर्षण ठरू शकेल. लास वेगासच्या जुगारी जगतात आश्चर्य वाटले ते याचे की, जुगार खेळण्याचा आनंद गरीब माणसापासून ते गर्भश्रीमंत माणसापर्यंत सर्वांना सारखाच घेता येतो. तरीही सर्वांना वागणूक मात्र

सारखीच असते. तुम्ही पाच सेंट पॉइंटने खेळा अगर पाच हजार पॉइंटने खेळा, दोघांनाही मिळणाऱ्या सेवेत व करमणुकीत काहीही फरक नसतो. ही जुगाराची दुनिया पाहताना घृणा येते तरीही याचा अनुभव घ्यायलाच हवा असा असतो.

लोकांच्या मनोरंजनासाठी व लोकशिक्षणासाठी उत्तम आखणी करून उपयोग करून घेतला आहे तो म्हणजे लॉस एंजलिस येथील बॉलिवूडच्या युनिव्हर्सल स्टुडिओचा. रोज असंख्य लोक भेट देऊन सिनेमा कसा बनतो याचा प्रत्यक्ष अनुभव घेतात. पूर्वीच्या अनेक प्रसिद्ध सिनेमातील सेटस् लोकांना पाहण्यासाठी जतन करून ठेवले आहेत. हिचकॉकच्या सायकोमधील घर, ज्यॉजमधील चित्तथरारक दृश्ये, बॅक टू फ्यूचरमधील घड्याळ, टेन कमांडमेंटस्‌मधील समुद्र दुभंगण्याचे, आग लागण्याचे व पाऊस पडण्याचे कृत्रिम दृश्य हे व असे अनेक पाहता येते. या सर्वामागे त्यांची योजना व कल्पकता अवर्णनीय आहे. प्रेक्षणीय स्थळे उगाच निर्माण होत नाहीत आणि त्या ठिकाणी लोक उगाच गर्दी करीत नाहीत. त्यासाठी विचारपूर्वक काम करून त्याची कायम स्वरूपात देखभाल करावी लागते.

प्रेक्षणीय स्थळे निसर्गनिर्मित असोत अगर मानवनिर्मित असोत, कल्पकता, नियोजन व विचारपूर्वक यंत्रणा हे अमेरिकेचे वैशिष्ट्य ठरते. जी गोष्ट लास वेगासची तीच गोष्ट सॅक्रमांटोच्या सत्तार स्ट्रीटची, जुन्या सॅक्रमांटो शहराची, न्यू हँपशायरमधील लॉस्ट रिव्हरची, ओल्ड मॅन किंवा इंडियन फेसची असते. सॅक्रमांटो येथील सत्तार स्ट्रीटवर उन्हाळ्यात भरणारा आठवड्याचा बाजार पाहिला की, आपल्या कोणत्याही खेड्यामधील आठवडा बाजाराची आठवण आल्याखेरीज राहात नाही. जवळपासचे शेतकरी त्यांच्या शेतातील ताजा पिकलेला माल घेऊन विकायला बसतात, खाण्याचे स्टॉलस्, तोंडे व केस रंगवून घेण्यासाठी बसलेली माणसे, गोंदवून घेणारी माणसे, छोट्या छोट्या हातगाड्यावर कलाकुसरीच्या वस्तू विकायला घेऊन आलेले छोटे व्यापारी, तत्काळ पोट्रेट काढून देणारे चित्रकार हे सगळे अगदी आपल्याकडच्यासारखे असते. बँडच्या तालावर लोक नाचत असतात, आरडाओरड, दंगा जोराजोरात चालू असतो. मस्त धुंद वातावरण असते. त्या भागाला अगदी जत्रेचे स्वरूप आलेले असते. मला तर नारायणगाव किंवा पौड येथील बाजारात गेल्यासारखे वाटले.

अशाच प्रकारे जुन्या सॅक्रमांटोचे जतन केले आहे. सॅक्रमांटो ही कॅलिफोर्नियाची राजधानी. सोन्याच्या शोधात इथे युरोपातून लोक स्थलांतरित झाले. त्यासाठी तिथे रेल्वे सुरू झाली होती. त्या निमित्त तिथे रेल्वेच्या पूर्वीच्या अवस्थेपासून आत्तापर्यंतचा इतिहासच मांडून ठेवला आहे. जुन्या काळातील लाकडी घरे, उतरती लाकडाची छपरे, रस्त्यावरील जुने दिव्यांचे खांब व जुने दिवे, लाकडाचा पायी जाणाऱ्यांसाठी फुटपाथ हे सर्व जसेच्या तसे आपल्याला पाहता येते. आपल्याला त्या काळात थेट घेऊन जाण्यासाठी धष्टपुष्ट दोन किंवा चार घोड्यांच्या बग्ग्यातून तुम्हाला हिंडता येते. रस्त्यावरून फिरणारे घोडेस्वार पाहून बर्क डग्लस किंवा बर्क लँकेस्टर केव्हाही घोड्यावरून तंग विजार, डोक्याला हॅट, कमरेला पिस्तूल, बंदूक लटकवलेली असा अवतरेल असा भास होतो. आपण १५० ते २०० वर्षांमागे जाऊन पोहोचतो. न्यू हँपशायरमधील लॉस्ट रिव्हर म्हणजे एका डोंगराच्या चढ उतारावरून खळाळत जाणारा झरा; पण त्या झऱ्याच्या मार्गावर उभे केलेले लाकडी पूल, पायवाटा, मधेच पाण्याबरोबर काढलेली बोगद्यांची वाट यामुळे त्या वाटेवरून हिंडताना दोन-तीन तास कसे निघून जातात ते समजत नाही. त्याच भागात उंच डोंगराच्या माथ्यावर नैसर्गिकरित्या निर्माण झालेला वृद्ध माणसाचा चेहरा व एक रेड इंडियन माणसाचा चेहरा (अमेरिकेत त्यांना रेड इंडियन म्हणत नाहीत तर नेटिव्ह अमेरिकन्स असे म्हणतात.) अशी दोन स्थळे आहेत. त्या ठिकाणी आनंद लुटण्याची फार छान व्यवस्था केली आहे.

या नैसर्गिक ठिकाणांप्रमाणेच मानवनिर्मित वास्तू दर्शन हे सुद्धा अमेरिकेत वैशिष्ट्यपूर्ण असते. बॉस्टनपासून दोन तासांच्या अंतरावर १०० ते १५० वर्षांपूर्वी श्रीमंत व्यापाऱ्यांनी समुद्रकिनारी घरे बांधली आहेत. घरे कसली ती? एक एक बंगला म्हणजे राजवाडेच आहेत. संगमरवर, उंची लाकूड, उत्तम नक्षीकाम व सुंदर भव्य पडदे यांनी सजवलेले हे महाल त्या प्रांताच्या पुराण वास्तू जतन करण्याच्या विभागाने विकत घेतले आहेत. त्या महालांची देखभाल ही आता त्या सरकारी विभागाची जबाबदारी आहे. आम जनतेला माफक दरामध्ये हे महाल पाहण्यासाठी मोकळे करून दिले आहेत. प्रत्येक महाल पाहायला दोन ते तीन तास सहज लागतात. असे जवळजवळ १५ ते २० राजवाडे त्या छोट्याशा गावात त्या काळी समुद्रकिनारी बांधले आहेत. असे राजवाडे आपल्याकडे नाहीत असे मुळीच नाही.

विशेष असे आहे की त्यांचे वेगळेपण ओळखून ते एक पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याच्या अमेरिकन दृष्टिकोनाची मनापासून प्रशंसा करावीशी वाटते. याच पद्धतीने बॉस्टनपासून दोन तासांच्या अंतरावर असलेली नॉर्मल रॉकवेल या प्रसिद्ध चित्रकाराची आर्ट - पेंटिंगजची - गॅलरी आहे. त्याची अनेक चित्रे, त्याने चित्रकलेसाठी वापरलेल्या वस्तू इ. चे सुरेख प्रदर्शन तिथे मांडून ठेवले आहे. या आणि अशा अनेक स्थळांना भेटी देण्यासाठी प्रचंड संख्येने शनिवार रविवार लोक हिंडत असतात. सॅनफ्रान्सिस्को येथील गोल्डन गेट व बर्कली ब्रीज, न्यू यॉर्कचे ब्रुकलीन, जॉर्ज वॉशिंग्टन ब्रीज, त्या ठिकाणचे नदी व समुद्राखालचे बोगद्यांचे रस्ते, हे सुद्धा मुद्दाम पाहण्यासारखे आहेत.

हे सर्व पाहत असताना सारखे मनात येत होते की, आपला भारत देश हा तर निसर्गाच्या विविधतेने नटलेला आहे. मानवनिर्मित कितीतरी प्रेक्षणीय स्थळे आहेत. काश्मिर, सिमला, नैनिताल, केरळ, गोवा, कन्याकुमारी, कोकण इथला निसर्ग काय, महाराष्ट्रातील दऱ्याखोऱ्या काय, निसर्गाने वेगवेगळ्या रूपांची उधळण केल्यासारखी वाटते. राजस्थानातील वास्तुशिल्प, त्यातील कलाकूसर, दिल्लीचा कुतुबमिनार, आग्र्याचा ताजमहाल, फत्तेपूर सिक्रीचा राजवाडा, मध्यप्रदेशातील भेडा घाट, सांचीचा स्तूप, खजुराओ, इंदौरजवळील मांडव, कोणार्क मंदिर, दक्षिणेमधील अनेक देवळे, महाराष्ट्रातील किल्ले असे किती किती म्हणून आठवते. परंतु सर्व ठिकाणची अवस्था, तिथे जाण्यासाठी करावी लागणारी प्रवासाची दगदग, प्रत्यक्ष त्या स्थळांजवळ असलेली अव्यवस्था, गैरसोय, घाण, कर्मचाऱ्यांची बेपर्वा वृत्ती पाहिली की पर्यटन हा आनंद नसून शिक्षा आहे असेच वाटायला लागते. हे सर्व सुधारणे मुळीच अशक्य नाही; पण आपण त्याकडे विचारपूर्वक, गांभीर्याने पाहतच नाही याचेच दु:ख होते. हे सर्व व्यवस्थित केले तर भारतीय पर्यटकांना तर आनंद मिळेलच पण त्याशिवाय जगातील अनेक पर्यटक आतापेक्षा कितीतरी पटीने आपण आकर्षित करू शकू.

* * *

## प्रकरण पंधरावे

# अमेरिकेचे सण, उत्सव आणि सुट्ट्या

मनुष्याचा स्वभावच उत्सवप्रिय असतो. जगात कोठेही जा. मजा, मौज, उत्सव साजरे करायला माणसाला काहीतरी निमित्तच हवे असते. त्या निमित्तांना मनुष्य त्याच्या कार्यात, संस्कृतीत, इतिहासात अगर कल्पनेत शोधित असतो. भारतीय सण व उत्सवांचे दिवस बहुतेक वेळा पंचांगस्थिती यावर नक्की केलेले असतात. त्यामुळे ते दरवर्षी इंग्रजी कॅलेंडरच्याबरोबर त्याच तारखेस येत नाहीत. काही भारतीय उत्सव आणि दिनविशेष हे इंग्रजी तारखेप्रमाणे साजरे केले जातात. उदाहरणार्थ, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, ऐतिहासिक व्यक्तिंचे स्मरण दिवस, हे दिवस त्याच तारखेला दरवर्षी येतात. तसेच हिंदू धर्माच्या कथा पुराणे व सांस्कृतिक चालीरीती, रुढी, परंपरा याप्रमाणे भारतात निरनिराळे सण साजरे केले जातात. या उलट अमेरिकेत मात्र ख्रिश्चन धर्मानुसार एक दोनच सण साजरे केले जातात. बाकीचे तिथे साजरे केले जाणारे दिवस बहुतेक इतिहास, परंपरा व कोणातरी व्यक्तिंच्या अगर घटनेच्या स्मृतिप्रीत्यर्थ साजरे होतात.

भारतीय सण व उत्सव हे त्यांच्या देवदेवतांशी निगडित किंवा संबंधित असतात. मुळात हिंदू धर्मात असंख्य देवदेवता आहेत. त्या प्रत्येकाची खास पूजाअर्चा, प्रार्थना करण्यासाठी काही ना काही सण व उत्सव ठरून गेले आहेत. लोकांनी आपापल्या आवडत्या देवाची पूजा प्रार्थना करण्यासाठी निरनिराळी निमित्ते शोधून काढली. म्हणूनच बंगालमध्ये दुर्गापूजा, पश्चिमेला कृष्णजन्म, गुजराथेत बालाजी व कृष्णाची दुसरी रूपे, उत्तरेत रामजन्मोत्सव व रामविजय, महाराष्ट्रात गणेश व विठोबा, दक्षिणेत शिवशंकर व देवी यांचे जास्त प्रमाणात पूजन केले जाते. त्यांचे उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे होतात. या उलट अमेरिकेत सर्वमान्य एकच देव आहे. तो म्हणजे येशू ख्रिस्त. म्हणूनच त्या देवाचे असे दोनच उत्सव असतात. ख्रिसमस व ईस्टर हे ते दोन सण. बाकी सर्व सण नसतात तर त्या सरकारमान्य सार्वजनिक सुट्ट्या असतात.

भारतातील सण व उत्सव हे कौटुंबिक आनंदाचे अगर कोणाच्या तरी किंवा कशाच्या तरी गौरवार्थ असतात; पण त्याला सार्वजनिक स्वरूप सुद्धा असते. कोणताही सण किंवा उत्सव स्वत:पुरता मर्यादित न ठेवता सार्वजनिक आनंद व सहभाग यावर अधिक भर दिलेला असतो. सार्वजनिक आनंदाबरोबरच एकमेकांना भेटून शुभेच्छा देण्यात भारतीय माणूस जास्त सुख अनुभवतो. अमेरिकन माणूस तसा स्वत:पुरता फार झाले तर आपल्या कुटुंबापुरता जीव रमविणारा प्राणी आहे. तो तसा संकुचित असतो. त्यामुळेच त्याला गर्दी किंवा परक्या जनसमुहामध्ये आनंद लुटता येत नाही. प्रासंगिक कधीतरी गर्दी किंवा खूप जनसमुदाय एकत्र येतो. पण त्या गर्दीत सुद्धा तो स्वत:ला झोकून देऊ शकत नाही. स्वत:ला हरवून टाकून सर्व समूहाचा एक भाग बनू शकत नाही. या कारणामुळेच त्यांच्या कोणत्याही समारंभाला सामुदायिक स्वरूप येऊ शकत नाही. उलट भारतीय माणूस थव्याने जगणारा म्हणूनच जितका जास्त समुदाय तितका जास्त फुलून येतो. तिथे जास्त जल्लोश होतो.

तसेच भारतीय माणूस सणासुदीला छान छान वेष परिधान करून, स्त्रिया दागदागिने घालून नटूनथटून समाजात मिरविण्यात खूप मजा लुटतात. त्या मानाने अमेरिकेत सणच कमी असल्याने त्यांना नटण्यामुरडण्याला कमी वाव मिळतो. आपल्याकडे दसरा, दिवाळी, पाडवा, संक्रांत इ. सणांना लोकांच्या उत्साहाचे उधाण, रंगीबेरंगी पोशाख, नाच, गाणी याचा सार्वजनिक जल्लोश मला अमेरिकेत कोणत्याच निमित्ताने पाहायला मिळाला नाही. फक्त नाही म्हणायला ख्रिसमसला घरांना दिवे लावून घरे उजळून काढलेली दिसतात. तरीही आपल्याकडच्या दिवाळीच्या रोषणाईची सर येत नाही. अमेरिकेत अनेक खास दिवशी सुद्धा एक प्रकारचा कोरडेपणा, अलिप्तता व कृत्रिमता फार जाणवते. कदाचित त्यांचे हे सगळेच विशेष दिवस कुटुंबापुरतेच साजरे करण्याचे असल्याने त्याला दृश्यस्वरूप येत नसावे. परंतु त्यामुळे आपल्याकडचा रसरशीतपणा व उत्साह याचा अभाव जाणवतो. अमेरिकन संस्कृतीमधील कृत्रिमपणा आणखी एका बाबतीत जाणवतो. भारतीय आचार व संस्कृतीमध्ये वरिष्ठांचा मान राखणे, आदर करणे, त्यांचा आशीर्वाद घेणे ही उपजत व नैसर्गिकपणे आलेली शिकवण असते. त्यामुळे आपल्याला

नातेसंबंधातील प्रेम व आदर व्यक्त करण्यासाठी वर्षभरात मुद्दाम एखादा दिवस ठरवावा लागत नाही. कितीही प्रेम व आदर वाटत असला तरी तो व्यक्त करताना अमेरिकेत अत्यंत औपचारिकपणा पाळला जातो. म्हणूनच तिथे मदर्स डे, फादर्स डे, ग्रँड पेरेंटस् डे असे विशेष दिवस ठरवून पाळले जातात. आपल्याकडे नाही म्हणायला रक्षाबंधन व भाऊबीज हे दोनच सण भाऊबहिणीचे नाते दृढ करणारे व त्याची जाणीव करून देणारे असे आहेत. तरीही ते सुद्धा हिंदू देव कृष्ण व सर्वप्रिय चंद्र यांच्याशी निगडित आहेत.

आता आपण काही अमेरिकन उत्सव व दिनविशेष काय आहेत त्याचा आढावा घेऊ. यापैकी बहुतेक सर्व सणवार व उत्सव नसून दिनविशेष आहेत. म्हणूनच अमेरिकेत त्यासाठी दिल्या जाणाऱ्या सुट्ट्या सरकारकडून अधिकृतरित्या जाहीर होणे आवश्यक असते. कॅलेंडरच्या नक्की तारखेस दरवर्षी येणाऱ्या अशा अमेरिकेत फक्त चार सुट्ट्या आहेत. त्या म्हणजे १ जानेवारी - वर्षारंभ, ४ जुलै - स्वातंत्र्यदिवस, ३१ ऑक्टोबर - हालोवीन आणि २५ डिसेंबर - ख्रिसमस. बाकी सर्व सुट्ट्या आठवड्याच्या प्रथम दिवशी म्हणजे सोमवारी दिल्या जातात. त्यामुळे या इतर सुट्ट्यांच्या तारखा दरवर्षी बदलत असतात. त्या सर्वांपैकी महत्त्वाचे दिवस व त्यांचे निमित्त, इतिहास व चालीरीती यांच्याशी त्या निगडित असतात.

## १. CHRISTMAS : ख्रिसमस २५

दरवर्षी २५ डिसेंबर या दिवशी साजरा होणारा हा अमेरिकेतीलच नव्हे तर जगाच्या फार मोठ्या भागात साजरा होणारा हा सण. जगात ख्रिश्चन धर्माची लोकसंख्या आजतरी सर्वाधिक आहे. त्यामुळे साहजिकच त्यांचा हा महत्त्वाचा सण जास्त प्रमाणात बहुसंख्य देशात साजरा केला जातो. या सणाच्या नावाप्रमाणेच तो CHRISTA MAESEE किंवा CHRIST MAAS यापासून अस्तित्वात आला. हा सण म्हणजेच जीझसचा जन्मोत्सव. सर्वप्रथम हा सण रोम येथे इ. स. ३३६ मध्ये साजरा केला गेला.

ख्रिसमसच्या सणाचा पूर्वेतिहास पाहिला तर ४००० वर्षांपूर्वीपासून म्हणजेच जीझसच्या जन्माआधीपासूनच हा सण साजरा करण्याची प्रथा होती. मेसोपोटेमियन संस्कृतीमध्ये नवीन वर्षाची सुरुवात या दिवशी होत असे. त्यांचे अनेक देव मानले

जात. त्यापैकी मुख्य देव हा मार्डूक (MARDUK) होता. हा देव दुष्ट, राक्षस, सैतान यांचे निर्मूलन करणारा म्हणून या देवाची भक्ती केली जात असे. त्याच्या या निर्मूलनाला उत्साह येण्यासाठी व यश प्राप्त होण्यासाठी हा उत्सव फार थाटात साजरा केला जात असे. त्यानंतर राजा या देवाची यथासांग पूजा प्रार्थना करीत असे. राजाच्या मृत्यूनंतर एखाद्या कैद्याला किंवा गुलामाला राजासारखे सजवित, नटवित मिरवणूक काढीत आणि त्याच्याकडून पूजा करून घेतल्यानंतर त्याचाच बळी देवाला अर्पण करीत असत. ख्राईस्टच्या जन्मापासून नव्या रुढी व प्रथा अस्तित्वात आल्या.

ख्रिसमसच्या सणाला सदाबहार असे ख्रिसमसचे झाड उभारून ते पणत्या, दिव्यांनी व इतर शोभिवंत वस्तूंनी सजविले जाते. ख्रिसमसचे झाड हे सदासतेज, पवित्र व हिरवेगार असे देवाचे प्रतिक मानले जाते. त्या झाडाच्या पानाला तीन टोकदार कंगोरे असतात. ते म्हणजे वडील, मुलगा आणि पवित्र नवचैतन्य समजले जातात. असे झाड उभे करण्याची प्रथा जर्मनीमध्ये सातव्या शतकात सुरू झाली. पुढे १८०० सालापर्यंत सगळीकडे पसरली. तिथून ती इंग्लंडमध्ये व पेनसिल्व्हियनांनी अमेरिकेत स्थलांतर केल्यानंतर त्यांच्याबरोबर अमेरिकेत पोहोचली. धर्मोपदेशक मार्टिन ल्यूथर हा १६ व्या शतकात एके दिवशी रात्री उशिरा जंगलामधून पायी प्रवास करीत होता. चालताना साहजिकच त्याचे लक्ष झाडाच्या फांद्यांमधून वर आकाशात गेले. स्तिमित करणारे दृश्य त्याच्या नजरेस पडले. झाडांच्या फांद्यांमधून चमचम करणारे तारे त्याला फार मोहक वाटले. त्याला ते लुकलुकत्या दिव्यासारखे पण तेज:पुंज भासले. ते अतिसुंदर मोहक दृश्य त्याच्या मनात भरले. तसेच काहीतरी घरापुढे उभे करण्याची त्याला प्रेरणा झाली. त्याने एक छोटेसे झाड काढून बरोबर घेतले. घरी येऊन ते झाड पुन्हा रोविले. त्यावर मेणबत्त्या लावल्या व पुन्हा एकदा तसाच देखावा त्याने अनुभविला. तेव्हापासून ख्रिसमसच्या सणाला अमेरिकेत घराच्या परसात झाड उभारले जाते. त्यावर मेणबत्त्या, चॉकलेटस्, कँडीज्, केकस्, रिबिनी, रंगीबेरंगी चमचमणाऱ्या वस्तू टांगल्या जातात. दरवर्षी त्या देखाव्याचा आनंद लुटला जातो. इ. स. १८८२ मध्ये प्रथमत: झाडावर इलेक्ट्रिकचे दिवे लावले गेले. इ. स. १९२३ मध्ये प्रथमत: अमेरिकेच्या अध्यक्षाचे व्हाईट हाऊसचे

अंगण ख्रिसमस ट्रीने उजळून निघाले. झाडाच्या टोकदार असलेल्या पानांना जीझसच्या मृत्यूच्या वेळी घातलेल्या मुकुटाचे काटे असेही मानण्याची प्रथा आहे.

ख्रिसमसच्या या सणाला आणखी एक आगळीवेगळी प्रथा म्हणजे मुले आपल्या घराबाहेर दाराजवळ त्यांचे स्टॉकिंग्ज, मोजे, बूट धुवून वाळत घालतात. यामागे एक दंतकथा आहे. जगप्रसिद्ध सांताक्लॉज हा सर्वांचा लाडका देवदूत. तोही या दंतकथेमधून आपल्याला ओळखीचा होतो. चौथ्या शतकात कॅथॉलिक धर्मगुरु निकोलस (ST. NICHOLAS) होता. लहान असतानाच तो इजिप्त, पॅलेस्टाईन इथे प्रवास करून आला. वयाच्या सतराव्या वर्षीच तो मिरा (MIRA) येथील बिशप झाला. तो अत्यंत दयाळू, मायाळू, गरिबांचा कनवाळू म्हणून प्रसिद्ध होता. गरीब व गरजू लोकांसाठी त्यानी केलेले अनेक चमत्कार दंतकथा म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यापैकी एका कथेमध्ये एका गरीब शेतकऱ्याला तीन मुली होत्या. त्याची पत्नी फार लवकर मरण पावली. आर्थिक परिस्थिती व मुलींना आई नसल्यामुळे बापाला मुलींच्या लग्नाची चिंता सतत सतावित होती. एक दिवस रात्री मुलींनी आपले स्टॉकिंग्ज – मोजे धुवून दाराबाहेर वाळत घातले होते. धर्मोपदेशक निकोलस त्या घरासमोरून जाताना त्या गरीब बापाची व त्याच्या तीन मुलींची व्यथा त्याच्या ध्यानात आली. त्याने कोणाच्याही नकळत त्या स्टॉकिंग्जमध्ये सोनेनाणे भरून ठेवले. सकाळी उठल्यावर मुलींच्या हे लक्षात आले. त्यांची चिंता दूर झाली. तिघींचीही लग्ने झाली व ते कुटुंब सुखी झाले.

हाच धर्मोपदेशक म्हणजे सर्वांचा लाडका सांताक्लॉज समजला जातो. त्या मुलींना जशी त्याने भेट दिली तशी भेट आपल्यालाही मिळेल या आशेने लहान मुले अजूनही ख्रिसमसच्या दिवशी दाराबाहेर आपले मोजेबूट टांगून ठेवतात. व सांताक्लॉजच्या भेटवस्तूची वाट पाहतात. यावरून मोठ्या माणसातही एकमेकांना भेट देण्याची पद्धत सुरू झाली.

युरोप, ग्रीस, रशिया इ. अनेक देशात निकोलस सर्वमान्य होता. त्याचे अनेक भक्त होते. डच लोकांबरोबर आलेला निकोलस अमेरिकेतही भजला गेला. मान्यता पावला. परंतु पुढील काळात प्रोटेस्टंट धर्माच्या उदयानंतर त्या धर्माचे अनुयायी निकोलसला अशा दयाळू अंत:करणाने भेटवस्तू देणारा म्हणून मानायला

तयार होईनात. कारण निकोलस हा कॅथॉलिक पंथाचा धर्मगुरू होता. मग प्रत्येक देशामध्ये त्यांना हवा असलेला धर्मगुरू सांताक्लॉज म्हणून मानला जाऊ लागला.

अशा तऱ्हेने अमेरिकेतील सर्वांत प्रमुख सण किंवा उत्सव साजरा केला जातो. त्यांच्या या जीझस याच्या जन्मोत्सवाप्रमाणेच आपला रामजन्मोत्सव असतो. फरक इतकाच की, जीझस नववर्षांपूर्वी सहा दिवस जन्मला आणि प्रभू श्रीराम नववर्षदिनानंतर आठ दिवसांनी जन्मले. ख्रिसमस ट्रीप्रमाणेच आपल्याकडे रामजन्मोत्सवाचे काळात गुढ्या उभारल्या जातात.

## २. HALLOWEEN : हालोवीन

प्रतिवर्षी ३१ ऑक्टोबरला येणारा हा हालोवीनचा सण कॅथॉलिक चर्चपासून सुरू झाला. चर्चला व सर्व धर्मोपदेशकांना वंदन करण्यासाठी हा दिवस ठरविला गेला होता. साधारण ३१ ऑक्टोबरला उन्हाळा संपून थंडीचा व त्याबरोबरच उत्साहाचा ऋतू सुरू होतो. त्याच्या आगमनाच्या स्वागतासाठी हा उत्सव केला जातो. प्रत्येक प्रथा, परंपरा यामागे काही ना काही काल्पनिक कथा जोडलेल्या असतातच. तशाच पारंपरिक समजुतीप्रमाणे हालोवीनला मागील वर्षातील मृत माणसांचे आत्मे नवीन शरीरे धारण करण्यासाठी मनुष्यवस्त्यांमध्ये या सुमारास भटकत असतात. त्यांना नवे आयुष्य प्राप्त करण्याची ही एक संधी असते, आशा असते. या काळात काळवेळाचे सर्व नियम ठप्प होतात आणि मृत आत्म्यांना नवीन शरीरे धारण करण्यास काळ मदतच करतो. जीवित लोक मृतात्म्यांना तसे करू न देण्यासाठी घरातील अग्नी विझवितात. मिट्ट काळोख करतात. त्यायोगे हवेत थंडावा निर्माण करतात. चित्रविचित्र पोशाख व मुखवटे घालून रात्रभर आरडाओरडा करतात व भूत, पिशाच्च, सैतानाला पळवून लावतात. ही समजूत बऱ्याच काळपर्यंत रुढ होती. पुढे त्याला उत्सवी स्वरूप आले. आता लहान मुले असे विचित्र पोशाख करून घरोघर जातात. त्यांना खूश करण्यासाठी गोळ्या, चॉकलेटस् वाटली जातात.

नवव्या शतकात युरोपियनांच्या मते मृत व्यक्तिला व त्यांच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून हालोवीनला खूप केक व गोडधोड करून ते वाटावेत म्हणजे त्यांच्यामार्फत मृतात्म्यांना शांती लाभते अशी प्रार्थना केली जात असे. इ. स.

१८४० मध्ये आयरिश लोकांनी अमेरिकेत स्थलांतर केले. त्यांच्याबरोबर हा सण अमेरिकेत आल्याचे मानले जाते. फार पूर्वी म्हणजे प्रथम शताब्दीमध्ये रोमन लोक त्यांच्या पोनामा देवीचा उत्सव ऑक्टोबर महिन्यात साजरा करीत. ती फळा, झाडांची देवता होती. तिला प्रसाद म्हणून ॲपल पाय – सफरचंदाचा केक केला जात असे. तो ॲपल पाय हालोवीनला अजूनही केला जातो.

हालोवीनला घरोघर तांबडे भोपळे मांडून सजावट केली जाते. त्यामागे सुद्धा JACK-O-LANTERN म्हणून आयरिश दंतकथा प्रसिद्ध आहे. एक दिवस जॅक नावाचा माणूस दारुच्या धुंदीत सलगम झाडाच्या खोडावर क्रॉसची प्रतिमा खोदतो. रात्रीच्या अंधारात त्याला त्रास देणाऱ्या एका भूत पिशाच्च्याला तो त्या क्रॉसमध्ये अडकवून ठेवतो. पिशाच्चाने जॅकला त्रास न देण्याचे कबूल केल्यावर जॅक पिशाच्च्याची क्रॉसमधून सुटका करतो. जॅकच्या मरणानंतर त्याच्या वागणुकीमुळे त्याला स्वर्गात प्रवेश नाकारला जातो; परंतु त्याने पिशाच्चाला जो धडा शिकविला त्यासाठी त्याला नरकातही पाठविले जात नाही. स्वत:ची सुटका केल्याबद्दल पिशाच्च त्याला बक्षिस म्हणून मार्ग आक्रमण्यासाठी सलगम झाडाच्या बुंध्यातील एका खळगीत एक निखारा देतो. तोच हा जॅकचा कंदील समजला जातो. आयरिश लोकांना अमेरिकेत सलगम झाडे फारशी आढळली नाहीत. त्यांना तांबडे भोपळे खूप दिसले. म्हणून तेव्हापासून तांबड्या भोपळ्याची सजावट हालोवीनला केली जाते. भोपळ्यामध्ये दिवा लावला जातो.

हालोवीनसारखाच आपला होळीचा सण. आपणही शेकोटी पेटवून निरनिराळे मुखवटे घालून आपल्याभोवतीचे वाईट, त्रासदायक दु:ख त्या अग्नीमध्ये जाळून टाकतो. सुदीचे दिवस आले म्हणून झाडाची, पिकांची, फळांची पूजा करतो.

## ३. NEW YEAR'S DAY : वर्षारंभ

जगात वेगवेगळ्या दिवशी नवीन वर्षाचा प्रारंभ केला जातो. वर्ष म्हणजे कालगणना करण्यासाठी ठरवून घेतलेले एक परिमाण असते. ही कालगणना करण्याचे जे साधन ते कॅलेंडर सर्व देशात एक नाही. त्यामुळेच वर्षारंभ एकाच दिवशी सगळीकडे येत नाहीत. काही देशांची कॅलेंडरे चंद्राच्या फिरतीवर बांधलेली असतात तर काहींची सूर्याच्या स्थानावर तर काही या दोहोंचा विचार करून

केलेली असतात.

जगातील सर्वांत जुन्या अशा इजिप्तच्या संस्कृतीत नाईल नदीला जेव्हा पूर येईल तेव्हा त्यांचे नववर्ष सुरू होत असे. संपूर्ण वाळवंटात धरणीमाता प्रसन्न होऊन पीक येण्यास नाईल नदी भरून वाहणे हे फारच महत्त्वाचे होते. म्हणूनच त्यांचे नवीन वर्ष त्या आनंदात सुरू करीत. बॅबिलोनियन म्हणजे आताचे इराक हे वसंत ऋतूबरोबर नवीन वर्षाचे पान उघडीत असत. निसर्गाला फुटलेल्या पालवीबरोबरच त्यांची नव्या वर्षाची सुरुवात होत असे.

रोमन महाराज ज्युलियस सीझरने नवीन कॅलेंडर सुरू करेपर्यंत तिथे एक मार्चला नवीन वर्ष सुरू होत असे. नव्या कॅलेंडरबरोबर नव्या वर्षाचा प्रथम दिवस हा एक जानेवारी ठरविला गेला. रोमन देवता JANUS यावरून त्या महिन्याचे नाव जानेवारी आले आहे. या देवाला दोन तोंडे असून देव एका मुखाने गत वर्षातील घटनांचा आढावा घेतो व दुसऱ्या मुखाने पुढील वर्षातील घटनांकडे लक्ष ठेवतो अशी समजूत होती. हे कॅलेंडर बऱ्याच प्रमाणात विशेषत: जागतिक कालमोजणीसाठी उपयोगात आणले जाते.

सेल्टस् (CELTS) हे लोक गौल (GAUL) म्हणजे आताच्या फ्रान्सचे. नवीन वर्षाच्या उत्सवाला साम्हेन (SAMHAIN) म्हणजे उन्हाळ्याचा शेवट म्हणत. त्यामुळेच त्यांचे नवीन वर्ष ऑक्टोबरमध्ये सुरू होत असे. ज्यू लोकांचा वर्षारंभ होळीच्या सुमारास असून त्यावेळी पूर्वी केलेल्या चुका व वाईट गोष्टी सोडून देऊन येणाऱ्या नवीन वर्षात अधिक चांगले वागण्याचा निर्धार करतात. इस्लामी कॅलेंडर चंद्रकलेवर आधारित असल्याने त्यांचे नववर्ष दरवर्षी ११ दिवस अलीकडे सरकते. व्हिएतनामचे वर्ष २१ जानेवारी ते १९ फेब्रुवारी दरम्यान केव्हातरी येते. त्यांचाही दिवस दरवर्षी बदलत असतो. जपानी लोक नववर्षदिन खूप हसून त्याचे एक जानेवारीला स्वागत करतात. चायनीजचा नववर्षदिन फार उत्साहात असतो. त्या दिवशी ते घरावर प्रचंड रोषणाई करतात. सार्वजनिक मिरवणुकांतून गात नाचत जातात. १७ जानेवारी ते १९ फेब्रुवारी दरम्यान येणाऱ्या पौर्णिमेला त्यांच्या नवीन वर्षाचा प्रारंभ होतो. त्यांचाही हा दिवस प्रतिवर्षी बदलत असतो. हिंदूंच्या नवीन वर्षाची सुरुवात निरनिराळ्या प्रांतात वेगवेगळ्या दिवशी

केली जाते हे आपण जाणतोच. अमेरिकेत रोमन कॅलेंडर असल्याने एक जानेवारीला नवीन वर्ष सुरू होते. खूप उत्साहाचे वातावरण असते. सार्वजनिक सुट्टी असते. त्या दिवशी निरनिराळे शोभादर्शक रथ – फ्लोटस् करून मिरवणुका काढल्या जातात. सार्वजनिकपणे फटाक्यांची आतषबाजी होते. नवीन वर्षात काहीतरी वेगळे चांगले करण्याच्या शपथा घेतल्या जातात. देशभर त्या दिवशी फुटबॉल खेळला जातो.

एकूण जगात कोठेही जा, नवीन वर्ष म्हणजे जुने वाईट विसरून नव्या चांगल्याचा संकल्प करणे हेच खरे. वर्षात किती काळ तो निश्चय टिकतो त्यावरच भविष्य अवलंबून राहते.

## ४. 4th JULY - INDEPENDENCE DAY : अमेरिकेचा वाढदिवस – स्वातंत्र्यदिन

४ जुलै १७७६ या दिवशी जगातील बलाढ्य लोकशाहीचा जन्म झाला. या दिवशी ब्रिटिश राजसत्तेशी जोडलेली नाळ तोडून टाकून अमेरिकेने आपला स्वतंत्र झेंडा फडकविला. अमेरिकेतील तेरा परगण्यामधून ब्रिटिश राजसत्ता भरवून करवसुली करीत असे. मात्र त्या बदल्यात योग्य व न्याय्य असलेल्या ब्रिटिश सत्ताधिकारात अमेरिकन माणसाला स्थान देण्यात आले नव्हते. त्याबद्दल प्रचंड असंतोष पसरत होता. प्रखर निदर्शने होत होती. चळवळ दडपण्यासाठी ब्रिटिश सेना पाठविली गेली होती; पण कशाचाच उपयोग होत नव्हता. अखेर व्हर्जिनियाच्या रिचर्ड हेन्री ली याने ७ जून १७७६ रोजी एक मसुदा तयार केला. ब्रिटिश राजसत्तेखालून अलग होऊन स्वतंत्र देशाची निर्मिती करण्याबाबतचा हा मसुदा मध्यवर्ती काँग्रेसला सादर केला होता. तो ब्रिटिश राजसत्तेला सादर करण्यासाठी मंजुरी मागितली होती. काँग्रेसने थॉमस जेफरसन यांच्या अध्यक्षतेखाली त्या मसुद्यावर सांगोपांग विचार करण्यासाठी एक समितीची नेमणूक केली. सरतेशेवटी समितीने तयार केलेला मसुदा स्विकार करून ४ जुलै १७७६ रोजी ब्रिटिश राजसत्तेकडे पाठविण्यात आला. त्याचबरोबर अमेरिका स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर उगवले. तोच हा अमेरिकेचा स्वातंत्र्य दिवस फार गर्वाने व उत्साहाने साजरा केला जातो.

आतापर्यंत वर दिलेले चारच सण म्हणा, उत्सव म्हणा, स्मृतिदिन म्हणा दरवर्षी कॅलेंडरच्या ठरावीक तारखेला साजरे केले जातात. बाकीच्या सर्व अमेरिकेच्या

सार्वजनिक सुट्ट्या असून त्या आठवड्याच्या सुरुवातीस अगर अखेरीस ठरावीक महिन्याच्या ठरावीक आठवड्यात येतात. या सर्व सुट्ट्यांना अमेरिकेतील सर्वोच्च पदाधिकारी - अध्यक्ष याची मान्यता घ्यावी लागते. त्यापैकी काही ठळक दिवस असे आहेत.

## ५. EASTER AND GOOD FRIDAY : ईस्टर व गुड फ्रायडे

वसंत ऋतुच्या आगमनालाच हा सण येतो. जगभरातील ख्रिश्चन धर्माचे लोक या दिवशी जीझस ख्राईस्टला पुनर्जन्म प्राप्त झाला असे समजून अत्यंत धार्मिक़ भावनेने त्या दिवशी चर्चमधील प्रार्थनेला न चुकता हजर राहतात. अर्थात, मूर्तीपूजक लोक ख्रिस्त जन्मापूर्वीपासून ईस्टरचा सण साजरा करीत होते. स्कँडेनेव्हियन 'OSTRA', 'OSTERN' किंवा 'ESTRE' या शब्दापासून आताचा ईस्टर शब्द आला असावा. पौराणिक काळात या देवतेची पूजाअर्चा केली जात असे. वसंत ऋतु व सुपिकता याचे वरदान त्या देवीच्या प्रार्थनेने होते असा समज होता.

ईस्टर पूर्वीचा शुक्रवार हा जीझसच्या मृत्यूचा दिवस मानला जातो. मग ईस्टरला त्याचा पुनर्जन्म होतो. ख्रिश्चन धर्मातही ईस्टरपूर्वी ४६ दिवस उपवास करण्याची पद्धत आहे. या ४६ दिवसांत रविवार सोडून इतर दिवशी मांसाहार वर्ज असतो. रविवारी मात्र त्यांनी त्यातून सोयीस्कर सुटका करून घेतली आहे. या उपवासाला ते लेंट म्हणतात. ॲश वेनस्डे हा ईस्टरपूर्वी ४६ दिवस आधी येणारा बुधवार हा लेंटचा प्रथम दिवस असतो. त्या दिवशी चर्चमध्ये जाऊन सर्वजण तिथला अंगारा लावून घेतात. हे भस्म म्हणजे पापक्षालन व दु:खहरणासाठी केलेली प्रार्थना असते. ईस्टरमध्ये इतरही काही प्रथा आहेत. ईस्टर ससा हा शकुनाचा समजला जातो. तो सुपिकता, समृद्धी आणतो असे मानतात. ईस्टरला अंड्यांना सुंदर रंग देऊन सजावट केली जाते. अंडे हे नवीन निर्मितीचे, प्रगतीचे द्योतक समजले जाते. ससा हा चंद्राचेही प्रतिक मानतात.

## ६. THANKS GIVING DAY : ऋणनिर्देश दिवस

मेफ्लॉवर हे मूळचे इंग्लिश वंशाचे अत्यंत कडक - जाज्वल्य धार्मिक वळणाचे पण फुटीर - विभक्तवादी चर्चचे भक्तगण होते. इंग्लंडमधील धार्मिक छळाला कंटाळून ते हॉलंडला गेले. परंतु हॉलंडमधील उच्च राहणीमान त्यांना

पेलवले नाही. अखेर लंडनमधून मदत मिळवून त्यांनी अमेरिकेत स्थलांतर केले. ११ सप्टेंबर १६२० रोजी ते पूर्व किनाऱ्यावर प्लिमाउथ रॉक (PLYMOUTH ROCK) येथे स्थिरावले. तिथे आल्यानंतरचा पहिला हिवाळा त्यांना फारच कडक जाणवला. त्या असह्य भयंकर हिवाळ्यात युरोपमधून आलेल्या एकूण १०२ लोकांपैकी ४६ लोक थंडीने मरण पावले. परंतु लगेचच पुढच्या वर्षी म्हणजे १६२१ साली त्यांना शेतीमध्ये प्रचंड उत्पन्न मिळाले. अमाप पीक आले. या वर्षभरात या स्थलांतरित लोकांना स्थानिक लोकांनी – मूळचे इंडियन्स खूप मदत केली. त्यांनी ठरविले की त्या आनंदोत्सवात त्यांना मदत करणाऱ्या त्या स्थानिक लोकांनाही सहभागी करून घ्यायचे. ४ जुलै १६२१ पासून तीन दिवस हा आनंद सोहळा चालू होता. त्यांच्या या आनंदाप्रित्यर्थ त्या प्रांताचा गव्हर्नर विल्यम ब्रेडफोर्ड याने त्याच्यातर्फे गीज व बदके पाठविली. आता थँक्स गिव्हिंगला हमखास टर्कीची मेजवानी असते. गव्हर्नरने त्यावेळी टर्की पाठविली होती असा कोठेच उल्लेख नाही. पण कालांतराने टर्कीच्या मेजवानीची प्रथा रुढ झाली आहे. त्या आधीच्या वर्षी अवर्षण दुष्काळ असल्यामुळे ब्रेड, अंडी, दूधदुभते असे काहीच नव्हते. मात्र तांबडा भोपळा मुबलक होता. त्यामुळे पमकिन पाय – भोपळ्याचा केक करून समारंभ साजरा केला होता. तेव्हापासून थँक्स गिव्हिंगला पमकिन पाय हमखास बनवितात. त्या काळात बटाटा नुकताच पिकायला लागून ओळखीचा झाला होता. परंतु बटाटा हा निषिद्ध समजला जात असे.

पुढील एक-दोन वर्ष हा सण साजरा झाला नाही. पण १६२३ साली पुन्हा अवर्षण आले. लोक देवाची प्रार्थना करायला एकत्र आले. याही वेळा स्थानिक लोक त्यांच्या प्रार्थनेत सामील झाले. योगायोगाने प्रार्थनेच्या दुसऱ्या दिवशी पाऊस पडला. शेते भिजली. आनंदाला उधाण आले. गव्हर्नरने पुन्हा एकदा उत्सवाची घोषणा केली. त्यानंतर प्रतिवर्षी हा निसर्ग प्रार्थनेचा व निसर्गाचे आभार मानण्यासाठी उत्सव करण्याची प्रथा सुरू झाली. हळूहळू देशभर सृष्टीला धन्यवाद देण्यासाठी लोक उत्सव करू लागले. काही ठिकाणी काही लोकांचा याला विरोध होता; परंतु सारा जोसेफ हले (SARAH JOSEPH HALE) या एका साप्ताहिकाच्या संपादिका महिलेच्या अथक प्रयत्नांमुळे प्रेसिडेंट लिंकन यांना त्याचे महत्त्व पटले.

१८६३ मध्ये अखेर प्रेसिडेंट लिंकन यांनी राष्ट्रीय सुट्टीला व उत्सवाला मान्यता दिली. १९४१ पासून नोव्हेंबर महिन्यातील चौथा गुरुवार हा थँक्स गिव्हिंग डे म्हणून नक्की केला गेला.

या दिवशी अमेरिकेत नियमाने सर्व कुटुंबीय एकत्र येतात व समृद्धी, संपन्नता यासाठी ईश्वराचे आभार मानतात.

## ७. BOXING DAY : बॉक्सिंग डे

ख्रिसमसनंतरच्या उगवणाऱ्या २६ डिसेंबरच्या दिवसाला बॉक्सिंग डे असे म्हणतात. नावाप्रमाणे बॉक्सिंगच्या खेळाशी याचा संबंध नसून हा एका खास कारणासाठी दिवस असतो. मध्ययुगात इंग्लंडमध्ये गरीब माणसे धनिक लोकांच्या घरी मोलमजुरीची कामे करीत. ख्रिसमसच्या दिवशी सुद्धा त्यांना काम करावे लागत असे. म्हणून ख्रिसमसच्या दुसऱ्या दिवशी त्यांना सुट्टी मिळत असे. नोकरवर्ग त्यांच्या स्वत:च्या घरी कुटुंबियांना भेटायला धाव घेत असत. जाताना धनिक मालक त्यांना बॉक्समध्ये घालून बक्षिसी भेट देत असत. म्हणून त्या दिवसाला बॉक्सिंग डे असे नाव पडले. त्याचप्रमाणे वर्षभर सेवा करणारे कष्टकरी, छोटे दुकानदार, पेपर विक्रेते, पोस्टमन, पोर्टर्स अशा लोकांनाही बक्षिसी देण्याची प्रथा होती व आजही आहे. आपल्याकडे याप्रमाणेच आपण दिवाळी व होळीच्या सणाला या लोकांना पोस्ट देतोच की.

तसेच ख्रिसमसच्या आधीपासून चर्चमध्ये एक दानपेटी ठेवलेली असते. भाविक लोक इच्छा असेल व शक्य असेल तसे दान टाकतात. अशा तऱ्हेने जमलेली ती दानपेटीतील रक्कम २६ डिसेंबरच्या दिवशी दानपेटी उघडून गरीब व गरजू लोकांच्या कल्याणासाठी वापरली जाते.

गरीब व गरजू लोकांसाठी हा बॉक्सिंग डे फार महत्त्वाचा ठरतो.

## ८. CARNIVAL : कार्निव्हल

नाच, गाणी, मिरवणुका, उत्सव याचा दरवर्षी येणारा हा कार्निव्हल अमेरिकेसारखाच इतर अनेक देशात साजरा केला जातो. अमेरिकेत निरनिराळ्या प्रांतात वेगवेगळ्या दिवशी हा उत्सव साजरा करतात. या सांस्कृतिक मेळ्यातून

जगात निरनिराळ्या भूखंडात सापडलेल्या जीवसृष्टीची, मानवी वंशांची, चालीरीतींची व जीवनाची ओळख करून घेणे हा मुख्य उद्देश असतो. या उत्सवात लोक रंगीबेरंगी भडक पोशाख करून तोंडाला रंगरंगोटी करून किंवा मास्क लावून गटागटाने मिरवणुका काढून गात नाचत जातात. आफ्रिकन्स व मूळचे अमेरिकन इंडियन्स यांचा यात फार मोठा सहभाग व उत्साह असतो. त्यांच्या रक्तातच नाच गाणे असल्याने मिरवणुकीमध्ये ट्रंम्पेटस्, ड्रम वाजवित, लाठ्यांचे लुटुपुटीचे युद्ध करीत, नाचत ओरडत जातात. यामागे, येणाऱ्या पुढच्या काळात उज्ज्वल भविष्य, सध्याच्या दु:खाला विराम व त्याचबरोबर मृत नातेवाइकांना शांती मिळण्यासाठी प्रार्थना असा हेतू असतो.

तशी कार्निव्हलची सुरुवात व प्रथा इटलीच्या लोकांनी केली. ख्रिश्चन धर्मातील उपवास म्हणजे लेंटपूर्वी चार दिवस हा उत्सव असतो. म्हणजेच फेब्रुवारी महिन्यात फॅट सॅटर्डेपासून ते श्रोव्ह ट्यूसडेपर्यंत (FROM FAT SATURDAY TO SHROVE TUESDAY) हा उत्सव होतो व त्यानंतर येणारा ॲश वेनस्डे (ASH WEDNESDAY) ला लेंट सुरू होतो. भारतामध्ये गोवा प्रांतातही हा उत्सव याच वेळी फार मोठ्या प्रमाणात साजरा करतात. ते एक गोवा पर्यटनाचे आकर्षण ठरून गेले आहे.

दक्षिण अमेरिकेत त्रिनिनाद व इतरही देशांत हा उत्सव फार मोठ्या उत्साहाने साजरा करतात. त्रिनिनादमध्ये १८३४ मध्ये जेव्हा गुलामगिरी संपुष्टात आली व गुलामांना स्वातंत्र्य मिळाले तेव्हा ते आनंदाने रस्तोरस्ती नाचले. गात गात नाचत नाचत त्यांनी मिळालेल्या स्वातंत्र्याचा आनंद व्यक्त केला. स्वत:चे अस्तित्व, स्वत:मधील ताकद, अभिमान, अधिकार, व्यक्तिस्वातंत्र्य जगाला दाखविण्याचा तो मोठा आनंदमय उत्सव होता. म्हणूनच कार्निव्हलचा कलाकुसर प्रदर्शित करण्याचा हा उत्सव स्वशक्तिचे दर्शन व त्याचा कसून शोध घेण्यासाठी प्रेरक शक्तिचे एक प्रबळ साधन ठरते. त्यायोगे समाजाची पाळेमुळे तपासून पाहता येतात. त्यातून बाहेरच्या जगाकडे पाहण्याचा एक वेगळाच दृष्टिकोन प्राप्त होतो. वेगवेगळ्या समाजाची, संस्कृतीची ओळख होते. परिणामत: सर्व जगाला एकाच मानवी धाग्याने बांधून ठेवण्याची ताकद निर्माण होते. या उत्सवामधूनच सर्व मानव

जातीत समान काय आहे व तरीही एक समाज दुसऱ्या समाजापासून वेगळा कसा व का आहे याचा शोध लागतो. या कलापूर्ण उत्सवातील ताकद आणि निर्मितीमूल्येच आपल्या जीवनात बदल घडवून आणून भविष्य चैतन्यमय करून टाकतात.

तसे पाहिले तर आपल्या भारतीय सण उत्सवातही हेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवलेले असते ना? उत्सवामधून समाजाचे लोकशिक्षण, जनजागृती, उन्नती, प्रगती व पर्यायाने सर्वांचे कल्याण हेच आपण साधायचा प्रयत्न करायला हवा.

## ९. LABOUR DAY : कामगार दिन

'लेबर डेची सुट्टी इतर कोणत्याही सार्वजनिक सुट्टीपेक्षा वेगळी असते.' सॅम्युअल गोंपर्स (SAMUEL GOMPERS) अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर या संघटनेचा संस्थापक व अनेक वर्षे अध्यक्ष म्हणून काम केलेल्या कामगार पुढाऱ्याचे हे शब्द आहेत. तो पुढे म्हणतो, 'इतर प्रत्येक सुट्टी माणसाच्या एकमेकांविरुद्ध असलेल्या संघर्ष, आक्रमण, चढाई, लढाई किंवा सत्तेची हाव आणि एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर केलेली मात, कुरघोडी यापैकी एका घटनेशी निगडित असते; परंतु लेबर डेची सुट्टी कोणत्याही जात, जमात, धर्म, राष्ट्र यांच्याबरोबर जोडलेली किंवा संबंधित नसते.'

अमेरिकेत पूर्वी कामगारांच्या रोजच्या कामाच्या तासांना नियम नव्हते. कामगारांना जरूरीप्रमाणे राबवून घेतले जाई. याविरुद्ध आठ तासांचा कामाचा दिवस कायद्याने ठरवून घेण्यासाठी कामगारांचा लढा सुरू झाला. शिकागो शहरात प्रखर निदर्शने झाली. निदर्शकांनी उग्र स्वरूप धारण केले. निदर्शक व पोलीस यांनी एकमेकांवर बाँब टाकले. दोन्ही बाजूची माणसे मृत्युमुखी पडली. या लढ्यामध्ये मरण पावलेल्या कामगारांच्या स्मरणार्थ लेबर डेची सुरुवात झाली. जवळजवळ १०० वर्षांपासून हा स्मृतीदिन पाळला जातो. तरीही तो नक्की कोणी सुरू केला याबद्दल एकमत नाही. काहींच्यामते कामगार संघटनेचा सहसंस्थापक पिटर मॅग्विरे (PETER MCGVIRE) याने सुरू केला असावा. इतरांच्या मते १८८२ मध्ये मॅथ्यू मॅग्विरे (MATHEW MAGVIRE) याने हा दिवस सुचविला असावा.

कोणीही सुरू केला असला तरी सप्टेंबरमधील पहिला सोमवार हा अमेरिकेच्या

कामगार चळवळीला तसेच कामगारांच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीला समर्पित केलेला दिवस आहे. राष्ट्राला स्थैर्य, बळकटी, प्रगती, उन्नती मिळवून देण्यामध्ये कामगारांनी केलेल्या योगदानाला, त्यांनी लावलेल्या हातभाराला सलाम करण्यासाठी हा दिवस सर्व अमेरिकेत पाळला जातो.

मंगळवार दि. ५ सप्टेंबर १८८२ रोजी प्रथम कामगार दिन साजरा झाला. न्यूयॉर्क शहराने तो मान सर्वप्रथम मिळविला. १८८४ पासून सप्टेंबरचा पहिला सोमवार हा दिवस दर वर्षासाठी नक्की करण्यात आला. १८८५ पासून न्यूयॉर्कप्रमाणे इतरही शहरात पाळला जातो. कामगार चळवळीची ताकद व एकजूट आम जनतेला दाखविण्यासाठी या दिवशी मिरवणुका काढल्या जातात. कामगारांसाठी करमणुकीचे कार्यक्रम व पुढाऱ्यांची व्याख्याने आयोजित केली जातात.

## १०. COLUMBUS DAY : कोलंबस डे

१२ ऑक्टोबर १४९२ या दिवशी ख्रिस्तोफर कोलंबस (CHRISTOPHER COLUMBUS) याने अमेरिकेच्या भूमीवर पहिले पाऊल ठेवले व युरोप देशांना अमेरिकेचे प्रवेशद्वार खुले झाले. कोलंबस याने अमेरिकेचा शोध लावला असे इतिहासात नमूद केले गेले आहे. पण हे सत्य नव्हे. कारण तो इथे येण्यापूर्वीपासूनच अमेरिकेचे मूळ इंडियन्स अमेरिकेत राहातच होते. त्याच्या अमेरिका पदार्पणाला १७९२ साली ३०० वर्षे पूर्ण झाली. त्याच्या स्मरणार्थ त्या वर्षी १२ ऑक्टोबरला स्मृतीदिन न्यूयॉर्क शहरात साजरा झाला. १२ ऑक्टोबर १८६६ रोजी अमेरिकेतील इटालियन लोकांनी त्यांच्या इटलीपुत्राचा स्मृतीदिन साजरा केला. १९३७ मध्ये प्रे. फ्रँकलीन रुझवेल्टने असा स्मृतीदिन दरवर्षी साजरा करण्यास अनुमती दिली व १९६८ मध्ये प्रे. जॉनसनने हा दिवस सार्वजनिक सुट्टीचा म्हणून शिक्कामोर्तब केले. त्यानंतर १९७१ पासून १२ ऑक्टोबरच्या जवळचा सोमवार हा कोलंबस डे म्हणून देशभरात पाळला जातो. अमेरिकेप्रमाणे कॅनडा व लॅटीन अमेरिकेतही या स्मृतीदिनाला मान्यता मिळाली आहे. तिथेही तो पाळला जातो.

जिनिव्हा येथे एका लोकर उत्पादकाच्या घरात जन्मलेला कोलंबस १४७० मध्ये पोहत जाऊन पोर्तुगालला पोहोचला. १४७७ ते १४८२ त्याने अनेक समुद्र सफरी केल्या. १४९२ मध्ये ९० खलाशांच्या ताफ्याला घेऊन तो जगाच्या

सफरीवर गेला. त्याच सफरीत त्याने बहामा, क्युबा, हैती व अमेरिकेचे दर्शन घेतले. पृथ्वी गोल आहे यावर त्याचा विश्वास नव्हता. स्पेनला परत जाऊन १४९३ साली त्याने १७ जहाजांचा ताफा घेऊन दक्षिण अमेरिकेची सफर केली. ७ नोव्हेंबर १५०४ रोजी तो स्पेनला परतला आणि २० मे १५०६ रोजी स्पेनमध्ये त्याने शेवटचा श्वास घेतला.

## ११. MEMORIAL DAY : सैनिक स्मृतीदिन

मेमोरियल डे म्हणजेच स्मृतीदिनाला पूर्वी DECORATION DAY सजावटीचा दिवस असे म्हणत. देशासाठी सर्वस्व अर्पण केलेल्या लोकांची आठवण करून त्यांना वंदन करण्याचा हा दिवस. या दिवसाची सुरुवात कोणी व कोठे केली याबद्दल बऱ्याच कथा प्रचलित आहेत. त्यापैकी प्रामुख्याने मानली जाते ती अशी. वॉटर्लू न्यूयॉर्क येथे असणाऱ्या थडग्यांना फुले वाहून सजावट करण्याचे काम तेथील स्त्रियांची एक संघटना सातत्याने करीत असे. त्यांनी सातत्याने मनापासून केलेली ही स्मृतीवंदनाच या स्मृतीदिनाचा उगम असल्याचे प्रे. लिंडन जॉनसन याने १९६६ साली मान्य केले.

उत्तरेकडील युनियन सोल्जर्स व दक्षिणेकडील कॉनफेडरेशन सोल्जर्स यांच्यामध्ये १८६१ मध्ये यादवी युद्धाचा भडका उडाला होता. अमेरिका हे एकसंध राष्ट्र राहावे की त्याची दोन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात यावीत या मुख्य मुद्यावरून हे यादवी युद्ध सुरू झाले होते. उत्तरेच्या निळ्या रंगाच्या वेषातील युनियन सैन्याला देश एकसंध राहावा अशी इच्छा होती. त्या उलट दक्षिणेतील करड्या रंगातील कपड्याच्या कॉनफेडरेशन सैनिकांना देशाचे विभाजन हवे होते. हे यादवी युद्ध चार वर्षे चालले होते. घनघोर लढाई होत होती. पुष्कळ वेळा एकाच कुटुंबातील लोक विरुद्ध बाजूने प्राण पणाला लावून लढत होते. अनेकजण धारातीर्थी पडले. अखेर युनियन सोल्जर्सची सरशी होऊन देश एकसंध राहिला. विभाजन झाले नाही. ५ मे १९६८ या दिवशी ग्रांड आर्मीचा नॅशनल कमांडर जनरल जॉन लोगन याने या धारातीर्थी पडलेल्या सैनिकांना स्मृतीवंदना करण्यासाठी आव्हान केले. ३० मे १९६८ हा दिवस नक्की केला गेला. ARLINGTON NATIONAL CEMENTERY - अर्लिंग्टनची स्मशानभूमीत दोन्ही सैन्यातील परिचित व अनामिक सैनिकांच्या

थडग्यांना पुष्पचक्र वाहण्यात आली.

आता हा स्मृतीदिन मेच्या अखेरच्या सोमवारी पाळला जातो.

## १२. MARTIN LUTHER KING DAY - DAY OF SERVICE : सेवादिन

'EVERYBODY CAN BE GREAT BECAUSE EVERYBODY CAN SERVE' अमेरिकेतील शांतता पुरस्कर्ता डॉ. मार्टिन ल्यूथर किंग याचे हे शब्द आहेत. त्यांनी त्यांच्या आयुष्यभर सार्वजनिक सामाजिक प्रश्नांना उत्तर शोधण्यासाठी सर्व तऱ्हेच्या लोकांना एकत्र आणून सामायिक उपाय शोधण्याचा अथक प्रयत्न व पाठपुरावा केला. सर्व वयाच्या, जातीच्या, धर्माच्या, पार्श्वभूमीच्या सर्व लोकांना एकत्र आणण्यासाठी डॉ. मार्टिन ल्यूथर यांनी अमेरिकेतील जनतेला सतत प्रोत्साहित केले. त्यायोगे सर्व समाजाची ताकद वाढून गरिबीचे निर्मूलन होऊन सामाजिक उन्नती होईल यावर त्यांचा विश्वास होता. असे केल्याने संपूर्ण मानवजातीला मोठेपणा, प्रतिष्ठा व सन्मान प्राप्त होऊ शकेल असे त्यांचे प्रतिपादन होते. यासाठी सेवाधर्माचे पालन करणे हे अत्यंत महत्त्वाचे साधन असल्याचे त्यांचे ठाम मत होते.

आयुष्यभर डॉ. किंग सामाजिक हक्कांसाठी झगडत राहिले. त्यासाठी त्यांनी शांततापूर्वक विरोधाची कास धरली होती. (Philosophy of Non Violent Resistance) त्यासाठी त्यांना अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला होता. मला तर महात्मा गांधींच्या कायदेभंग चळवळीची आठवण झाली. डॉ. ल्यूथर यांच्या जीवनभराच्या कार्यासाठी त्यांना १९६४ सालचा शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार बहाल करण्यात आला होता. व्हिएतनाम युद्ध विरोध व गरिबी हटावसाठी त्यांचे प्रयत्न व गरीबांसाठीची अत्यंत कळकळ यामुळे त्यांना विरोधकही होतेच. ४ एप्रिल १९६८ या दिवशी लोरेन हॉटेलच्या (LORRAIN HOTEL) गॅलरीत ते उभे असताना त्यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. दरवर्षी जानेवारी महिन्यातील तिसऱ्या सोमवारी त्यांचा स्मृतीदिन साजरा करतात. डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांचे कार्य, शांततेसाठी लढा, गरीबांचा कैवार, त्यांना झालेला विरोध, तुरुंगवास आणि अखेर हत्या हे सर्व पाहिले की, महात्मा गांधींची आठवण

आल्याशिवाय राहात नाही.

## १३. VALENTINE DAY : व्हॅलेंटाईन डे

रोमन ख्रिश्चन धर्मगुरू व्हॅलेंटाईनच्या नावाने हा दिवस कोरला गेला आहे. त्याने ख्रिश्चन धर्मासाठी मरण पत्करून अमरत्व प्राप्त केले. त्याचा छळ करून त्याला तुरुंगात टाकले होते. तुरुंगात असताना जेलरच्या कन्येशी त्याचे प्रेम जमले. १४ फेब्रुवारी १९६९ रोजी त्याला देहांताची शिक्षा झाली. मरणापूर्वी त्याने आपल्या प्रेमिकेला अखेरचा निरोप देण्यासाठी एक पत्र लिहिले होते. त्या पत्राखाली त्याने "From Your Valentine" - तुझा व्हॅलेंटाईन अशी सही केली होती. त्याच्या या प्रेमाला प्रणाम करण्यासाठी हा प्रेमळ दिवस अस्तित्वात आला असावा.

दुसऱ्या एका आख्यायिकेप्रमाणे रोमन महाराज क्लॉडियसच्या काळात १४ फेब्रुवारी या दिवशी रोमन देवता जुनो - Juno - हिचा पूजा प्रार्थनेचा दिवस होता. जुनो देवतेवर महिला व लग्नजोडप्यांची अपार श्रद्धा होती. देवीच्या उत्सवानंतरचा दुसरा दिवस - Lupercallia - लुपरकलिया या नावाने साजरा होत असे. त्या दिवशी गावातील तरुणतरुणी एकत्र जमा होत. तिथे एका रांजणात, जमलेल्या सर्व तरुणतरुणींच्या नावाची एक चिठ्ठी करून ठेवीत असत. तरुण त्या चिठ्ठीपैकी एक चिठ्ठी उचलून आपल्या जोडीदारीणीची निवड करीत असत. पुढे उत्सवाचे काही दिवस त्या जोड्यांनीच नाच, गाणी, खाणे, हिंडणे एकमेकांच्या साथीने करायचे असे. त्यातूनच कधी कधी प्रेमसंबंध जुळून येत व लग्नगाठी पक्क्या होत असत.

रोमन महाराज क्लॉडियस हा करारी, क्रूर व त्यामुळे फारसा लोकप्रिय नव्हता. त्यामुळे त्याच्या सैन्यात भरती होण्यास तरुण तयार नसत. आपल्या प्रेमिकांच्या व कुटुंबाच्या ओढीमुळे तरुण लोक सैन्यात भरती होत नाहीत असा त्याचा समज होऊन गेला होता. त्यामुळे देवीच्या उत्सवातून व इतर पद्धतीने जुळलेले सर्व विवाह व लग्नगाठी त्याने रद्द ठरविल्या. त्यावर बंदी घातली. लोक नाराज झाले. प्रेमिकांचा पुरस्कर्ता धर्मगुरू व्हॅलेंटाईन याने गुपचूपपणे या लग्नगाठी बांधून दिल्या. त्यामुळे चिडून जाऊन धर्मगुरूला क्लॉडियसने तुरुंगात खेचले व १४ फेब्रुवारी १९६९ रोजी त्याला मृत्यूला सामोरे जावे लागले. त्यावेळेपासून लुपरकलिया या

दिवसाला प्रेमिकांचा कैवारी धर्मगुरू व्हॅलेंटाईन डे असे नाव मिळाले.

आजकाल तर १४ फेब्रुवारी या व्हॅलेंटाईन डे ला प्रेमिकांचे संदेश एकमेकांना देणे, कविता करणे, भेटवस्तू देणे किंवा फुले पाठविणे हे खूप आवडीने केले जाते. धर्मगुरू व्हॅलेंटाईन हा प्रेमिकांचा फार आवडता व पुरस्कर्ता होऊन गेला आहे.

गेल्या दहा-बारा वर्षांत भारतातही विशेषत: कॉलेज युवक वर्गामध्ये फार उत्साहाने हा दिवस साजरा केला जातो. काही लोकांचा याला विरोध आहे. परंतु प्रेमाला कसल्याच मर्यादा असू शकत नाहीत. कोणत्याही देशात तुम्ही असलात तरी प्रेमाला फरक पडत नाही. त्यामुळे हा दिवस आपल्याकडेही युवकांनी साजरा केला तर त्यामध्ये काहीच बिघडत नाही. फक्त त्यामध्ये असणारे गैरप्रकार व मनाविरुद्ध केलेली प्रेमयाचना नसायला हवी हे सांगायला हवे का?

## १४. EARTH DAY : धरित्री मातेचा दिवस

Senetor Gaylord Nelson सेनेटर गेलॉर्ड नेल्सन् याने हा धरित्री माता व पर्यावरण याबद्दल जनजागृती करण्यात पुढाकार घेतला होता. १९६२ सालापासून सात वर्षे त्याने त्यासाठी सतत धडपड केली. त्याच्या मते प्रथमत: पर्यावरण व वातावरण हे मुद्दे व ह्या संबंधीचे सर्व प्रश्न राजकारणापासून वेगळेच राहायला हवेत. पण सरकार दरबारी मान्यता मिळविण्यासाठी अखेर त्याने प्रेसिडेंट केनडी यांच्याकडे हा विषय मांडला. १९६९ चा उन्हाळा व व्हिएतनाम युद्धाचे ते दिवस होते. त्याचे निमित्त साधून त्याने तळागाळापासून सर्व थरातील जनतेला पर्यावरणावर होत असलेले अनन्वित अत्याचार आणि त्यामुळे निर्माण होणारे धोके याबाबतीत जागरूक करण्यासाठी चंग बांधला. सर्व स्तरावर चळवळ उभी केली. लोकांना त्याचे महत्त्व पटून त्यांच्याही मनात तळमळ उत्पन्न झाली. १९७० च्या वसंत ऋतुमध्ये अमेरिकेत सगळ्या भागात निदर्शने झाली. याचा अपेक्षित परिणाम घडून आला. पर्यावरणावर व पर्यायाने माणसाच्या रोजच्या जीवनावर आलेले संकट याचे भीषण स्वरूप, आणीबाणीची परिस्थिती व पुढे उभे राहणारे जटील प्रश्न याची जनतेला जाणीव झाली. पर्यावरण म्हणजेच जमीन, नद्या, तलाव व भोवतालची हवा या सर्वांबद्दलचाच विचार असतो.

कॅलिफोर्नियामध्ये झालेल्या भीषण धरणीकंपानंतर तर पर्यावरणाकडे सर्वांचेच लक्ष गेले. इतके झाल्यानंतर धरित्रीला वंदन करण्यासाठी वसंत ऋतुच्या आगमनकालापेक्षा जास्त योग्य कोणता दिवस असणार? २१ मार्च या दिवशी दिवस व रात्र जगभरात सम प्रमाणात असते. लोकांची मने व हृदये मधुर वातावरणानी एकाग्र होऊन ऐक्य पावलेली असतात. निसर्ग रसरशीत फुलून येऊन धरित्रीमाता टवटवीत झालेली असते. वसंत ऋतुच्या आगमनाने जगातील कोणत्याही देशात पाहा. लोकांची मने शांत होऊन ते निसर्गाच्या देणगीला प्रणाम करायला तयार असतात. म्हणूनच २१ मार्च १९७० हा दिवस पृथ्वीला वंदन करण्याचा, निसर्गाने अमाप, निर्व्याज जे दिले आहे त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा व त्यात कोणताही बिघाड न घडविण्याचा निश्चय करण्याचा दिवस नक्की झाला. आता अमेरिकेतच नव्हे तर जगभरात सर्व ठिकाणी हा दिवस पाळला जातो. मानवजातीची प्रत्येक व्यक्ती वैयक्तिक व सामुदायिकरित्या या नैसर्गिक देणगीचा पालनकर्ता असल्याची शपथ घेतली जाते.

## १५. ARBOR DAY : लतावेलींचा दिवस

अमेरिकेतील नेब्रास्का हे परगणेबरोबर मध्यभागी असलेल्या पठारावर आहे. आज जर कोणी या प्रांतामध्ये फिरायला गेला तर काही वर्षांपूर्वी या पठारावर अजिबात झाडेझुडपे नव्हती यावर त्याचा विश्वास बसणार नाही. ते एक ओसाड रखरखीत पठार होते. १८५४ मध्ये MR. J. STERLING - श्री. जे. स्टर्लिंग हा नेब्रास्का परगण्यात खूप भटकंती करीत होता. तो व त्याची पत्नी दोघेही निसर्गप्रेमी होते. झाडे, फळे, फुले नसलेल्या या प्रदेशातून हिंडताना त्यांना फार वाईट वाटले. त्या दोघांनी झाडे, फुलझाडे, वेली पेरुन, लावून ती मोठी करण्याचा ध्यासच घेतला. व्यवसायाने जे. स्टर्लिंग हा पत्रकार होता. नेब्रास्काच्या पहिल्या वर्तमानपत्राचा तो मुख्य संपादक झाला. त्या संधीचा फायदा घेऊन वृक्ष लागवडीसंबंधी वर्तमानपत्रामधून त्याने विपुल लेखन केले. झाडांची मोठ्या प्रमाणात लागवड केल्याने जमिनीची वाऱ्यामुळे होणारी धूप थोपविली जाते, तसेच वृक्षापासून इंधन व बांधकामासाठी लागणारे लाकूड मिळते. शिवाय प्रखर उन्हापासून रक्षणासाठी वृक्षांची थंड सावली मिळते यावर सतत लिखाण करून त्याबद्दल जनजागृती केली.

लोकशिक्षण साधले. वैयक्तिक पातळीबरोबरच त्याने अनेक सामाजिक संस्था व विविध माणसांच्या ग्रुप्सना वृक्षलागवडीसाठी उत्तेजित केले. त्यांना त्याचे महत्त्व पटवून दिले. १० मे १८७२ हा दिवस खास वृक्षारोपणाचा दिवस ठरविला. जास्तीतजास्त वृक्ष लागवड करणाऱ्यास बक्षिसे ठेवण्यात आली. हजारोंनी त्यात भाग घेतला. त्या एका दिवसात दहा लाखाहून अधिक झाडे लावण्यात आली. हरितक्रांतीचे जोरदार वारे वाहिले. शाळांमधून वृक्ष लागवडीचा खास कार्यक्रम आखला जाऊ लागला. मुले त्यात आनंदाने सहभागी होऊ लागली. तो लोकांचा उत्साह पाहून नेब्रास्का प्रांताच्या सरकारने ८ मे १८७४ हा दिवस आर्बर डे - ARBOR DAY - म्हणून जाहीर केला. इतरही आसपासच्या प्रांतांनी नेब्रास्काचे अनुकरण केले. आता अमेरिकेतील बहुतेक सर्व प्रांत मार्च ते एप्रिल या दरम्यान एक दिवस वृक्षसंवर्धन - लागवडीसाठी आर्बर डे जाहीर करतात. जे. स्टर्लिंग यांचे प्रयत्न खऱ्या अर्थाने फलद्रूप झाले. नेब्रास्का प्रांत फुलाझाडांनी बहरून गेला. रुक्ष पठाराचे नंदनवन झाले.

जे. स्टर्लिंगने म्हटलेच आहे, 'OTHER HOLIDAYS RESPONSE UPON THE PAST, ARBOR DAY PROPOSES FOR THE FUTURE.' 'A PEOPLE WITHOUT CHILDREN WOULD FACE A HOPELESS FUTURE, A COUNTRY WITHOUT TREES IS ALMOST AS HOPELESS.'

आपल्याकडेही याबाबत आता खूपच जागरुकता आली आहे. वृक्षारोपण, झाडे लावा आणि वाढवा, जगवा, स्मृतिवने इ. अनेक प्रकल्प हाती घेतले जात आहेत. वृक्षतोडीवर गंभीरपणे विचार केला जातो आणि आपल्याकडेही म्हणतात ना, ‘जन्माला यावे अन् एकतरी झाड लावावे.’

## १६. MOTHER'S DAY : मातृदिन

ग्रीक लोकांची देवता रिहा - RHEA - नावाची देवी. ही देवदेवतांची माता समजली जाते. मदर्स डे चा मागोवा घेतला तर या देवीच्या उत्सवात तिचा उगम सापडतो. ग्रीसमध्ये या देवीचा उत्सव साजरा करीत, तोच हा मदर्स डे.

इंग्लंडमध्ये लेंट म्हणजे उपवासाच्या दिवसामधील चौथा रविवार हा मदरिंग सन्डे (Mothering Sunday) म्हणून साजरा करीत. त्या काळी गरीब लोक

धनिकांच्या घरी कष्ट करीत. ते त्यांच्याच घरी काम करायला राहात असत. मदरिंग सन्डेच्या दिवशी त्यांना सुट्टी मिळून त्यांच्या स्वत:च्या घरी आईला भेटण्यासाठी मोकळीक देण्यात येत असे. त्या दिवशी आईच्या सन्मानासाठी स्पेशल केक केला जात असे. अमेरिकेत १८७२ मध्ये बॉस्टन, मॅसाच्युसेटस्मध्ये प्रथमत: हा दिवस साजरा केला गेला. साहजिकच आहे. कारण युरोपमधून अमेरिकेत प्रथम ब्रिटिश आले व ते बॉस्टन, मॅसाच्युसेटस् भागात राहायला लागले होते.

१९०७ फिलाडेल्फिया येथील ॲन जेव्हींस – ANN JERVIS हिने तिच्या आईच्या स्मृतीसाठी मदर्स डे पाळण्यासाठी मान्यता मिळविण्यासाठी जोरदार प्रयत्न केला. साधारण १९११ साली अमेरिकेतील बहुतेक सर्व प्रांतात हा दिवस मान्य झाला होता.

त्या पूर्वी मि. फ्रँक हा १९०२ साली एका शाळेत भेटीसाठी गेला होता. एका वर्गात सगळी मुले पोस्टकार्डवर काहीतरी लिहीत होती. फ्रँकने विचारताच वर्गशिक्षकाने सांगितले, प्रत्येक महिन्याच्या एका दिवशी मुले आपल्या आईला तिच्याबद्दल जे वाटते ते लिहून पाठवितात. फ्रँकला ही कल्पना फार आवडली. ती कल्पना रुजविण्यासाठी त्याने खूप प्रयत्न केले.

या सर्वांच्या प्रयत्नांमुळे राष्ट्रीय सरकारने दरवर्षी मे महिन्यातील दुसरा रविवार मदर्स डे म्हणून अधिकृतरित्या जाहीर केला.

## १७. FATHER'S DAY : पितृवंदना दिवस

SONORA LOUISE SMART DODD ही WILLIAM SMART या अमेरिकेतील अंतर्गत सिव्हिल वॉरमधील निष्णात लढवय्याची कन्या. बायकोच्या मृत्युनंतर विलियम्सने आपल्या सहा मुलांना अत्यंत कुशल पद्धतीने व उत्तम रीतीने वाढविले. आईविना पोरक्या मुलांचे संगोपन फार मन लावून, जीव ओतून केले. पूर्व वॉशिंग्टनमधील त्याची मुलगी सोनोरा या मुलीला आपल्या पित्याचे यासाठी जाहीर कौतुक करून त्याचे ऋण मान्य करण्याची अतीव इच्छा होती. तिचे आपल्या पित्यावर निस्सीम प्रेम होते. वडिलांचा जन्म जून महिन्यातील असल्यामुळे १९०९ सालात सतत प्रयत्न करून जून १९१० मध्ये स्पोकने, वॉशिंग्टन येथे

जाहीरपणे आपल्या वडिलांचा स्मृतीदिन साजरा करण्यात तिने यश मिळविले होते. प्रेसिडेंट लिंडन जॉन्सन् यांनी जून महिन्यातील तिसऱ्या रविवारी अधिकृत फादर्स डे ची घोषणा केली. या दिवशी मुले आपल्या वडिलांना भेटून त्यांना सुंदर टाय भेट म्हणून देतात. वडील हयात असताना तांबडा गुलाब आणि त्यांच्या निधनानंतर पांढरा गुलाब आपल्या शर्टवर लावून त्यांची आठवण करून त्यांना वंदन करतात.

## १८. GRAND PARENTS' DAY : आजीआजोबांचा दिवस

कोणत्याही लहान मुलाला आजीआजोबांचे नाते फार प्रिय, नाजूक, लाडके असे असते. आजीआजोबांना सुद्धा नातवंडे ही दुधावरची साय असते. मग भारतात असोत की अमेरिकेत असोत. पश्चिम व्हर्जिनिया – WEST VIRGINIA येथील MARIAN MCQUADA - मरियन मॅकवाडा व तिचा पती यांना १७ मुले, ४० नातवंडे व ८ पतवंडे होती. आपल्या या नातेसंबंधांचा MARIAN LUCILLE HERNDON MCQUADA - मरियन लुसिल्ले हरन्डोन मॅकवाडा हिला फार आनंद व अभिमान होता. त्या आनंदाचे जाहीर प्रकटन करण्यासाठी तिने ज्येष्ठ नागरिकांसाठी हा दिवस सार्वजनिकपणे साजरा करण्यास पाठपुरावा केला. प्रथमत: पश्चिम व्हर्जिनियामध्ये व नंतर प्रेसिडेंट जिमी कार्टर यांनी लेबर डे नंतर येणाऱ्या रविवारसाठी मान्यता दिली. हा दिवस पूर्णपणे कौटुंबिक वातावरणात आजीआजोबांचा सन्मान करण्याचा व त्यांच्याबद्दल प्रेम व आदर व्यक्त करण्यासाठी राखून ठेवलेला असतो. या समारंभाद्वारे दोन पिढ्यांमधील अंतर कमी करून एकमेकांना अधिकाधिक समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो.

## १९. MOTHER IN LAW'S DAY : सासूबाईंचा दिवस

जगाच्या पाठीवर कोठेही गेलात तरी हे एक अजब नाते असते. भारतात सासू सून एकत्र राहण्याची खूप शक्यता असते. मात्र अमेरिकेत ती शक्यता नसतेच. तरीही नवऱ्याच्या माध्यमातून सासूबद्दल आणि मुलाच्या माध्यमातून सुनेबद्दल जे नाते निर्माण होते ते शब्दात पकडणे कठीणच आहे. तरीही सगळ्याच जगण्यातील औपचारिकपणाला धरूनच सुनेला सासूचा सन्मान करण्यासाठी तिच्या तोंडावर का होईना तिच्याबद्दल चांगले बोलण्यासाठी हा एक दिवस वर्षातून एकदा उगवतोच. ५ मार्च १९३४ पासून या प्रथेला प्रारंभ झाला.

## २०. BOSS'S DAY : साहेबाचा दिवस

अगदी अलीकडच्या काळात म्हणजे ४६ वर्षांपूर्वी १९५८ साली इलीनॉईस – ILLINOIS प्रांतातील सेक्रेटरी म्हणून काम करणाऱ्या PATRICIA BAYS HAROSKI - पेट्रिशिया बेज् हारोस्की या महिलेने आपल्या साहेबांचा जाहीर सत्कार केला होता. तसा तिने साहेबाचा सत्कार का केला असावा? तिला प्रमोशन हवे होते म्हणून का? नाही. तो साहेब म्हणजे तिचे प्रिय वडीलच होते. १६ ऑक्टोबर हा तिच्या वडिलांचा वाढदिवसही होता. मात्र या दिवसाला सरकारी गोटातून अधिकृत मान्यता अजून तरी नाही. तरीही बऱ्याच ऑफिसमध्ये कर्मचारी एकत्र येऊन साहेबाचा सन्मान करतात. त्याचे गुणगान करतात. छोटीशी भेट देतात किंवा त्याला घेऊन बाहेर कोठेतरी पार्टी साजरी करतात व साहेबाला त्यांच्या भावना कळवितात.

## २१. NURSES WEEK - DAY : नर्सेसचा आठवडा व दिवस

१२ मे हा जगप्रसिद्ध नर्स फ्लोरेन्स नाईटिंगेल FLORENCE NIGHTINGALE हिचा जन्मदिवस. तिच्या स्मरणार्थ ६ मे ते १२ मे असा आठवडा पाळला जातो. त्याच आठवड्यामधील येणारा बुधवार हा नर्सेस डे असतो. समाज व सार्वजनिक आरोग्य या संदर्भात नर्सेस करीत असलेल्या योगदानासाठी, त्यांचा गौरव करण्यासाठी हा दिवस आहे.

१८२० ते १९१० फ्लोरेन्स नाईटिंगेल या आदरणीय नर्सचा जीवनकाल. या इंग्लिश नर्सने आजारी व जखमी सैनिकांच्या सेवेसाठी स्वत:ला वाहून घेतले होते. तिच्या या अखंड व अतुलनीय कार्यासाठी तिच्या नावे जमविलेल्या फंडाच्या पैशातून तिने एक लोकउपयुक्त संस्था निर्माण केली. १८६० मध्ये लंडन येथील सेंट थॉमस् हॉस्पिटल येथे नर्सेसच्या प्रशिक्षणासाठी सुरू केलेली नाईटिंगेल स्कूल अँड होम फॉर नर्सेस ट्रेनिंग हीच ती संस्था. या संस्थेतून शिक्षण घेणे हे कोणत्याही नर्सला फार अभिमानास्पद समजले जाते. फ्लोरेन्स नाईटिंगेलला 'THE LADY WITH THE LAMP' असे गौरवाने संबोधिले जाते. 'NURSES'S CARE WAS NEVER CEASING NIGHT OR DAY' असे ती नेहमी प्रतिपादन करीत असे. नर्सिंग हे अत्यंत सेवाभावी व सत्कार्य आहे असा तिचा दृढविश्वास होता आणि

आयुष्यभर तसेच जगून तिने ते खरे करून दाखविले.

अशा थोर व्यक्तिच्या गौरवार्थ हा स्मृतीदिन अमेरिकेप्रमाणेच सर्व जगभर साजरा केला जातो.

## २२. SWEETEST DAY : गोड दिवस

ऑक्टोबर महिन्यातील तिसरा शनिवार हा अमेरिकेत अत्यंत गोड मानला जातो. CLEVELAND क्लिव्हलँड येथील हरबर्ट बिर्च किंगस्टन (HERBERT BIRCH KINGSTON) हा कँडीच्या कारखान्यात काम करणारा परोपकारी वृत्तीचा आणि लोकहितवादी होता. अनाथ मुलांच्या आयुष्यात आनंदाचे दिवस आणण्याची त्याची मनापासूनची इच्छा होती. त्यासाठी १९२२ साली त्याने अशा अनाथ मुलांना कँडीचे बॉक्स करून ते वाटले व त्यांच्या डोळ्यांतील आनंद पाहिला.

त्यानंतर स्फूर्ती घेऊन प्रसिद्ध सिनेकलावंत ॲन पेनिग्टनने २२०० कँडी बॉक्सेस न्यूज पेपर विक्रेत्या गरीब मुलांना भेट म्हणून दिले. ती मुले समाजासाठी करीत असलेल्या सेवेचे व कष्टाचे हे कौतुक होते. आणखी एका कलाकाराने १०००० बॉक्सेस हॉस्पिटलमध्ये वाटले. आता अमेरिकेत पुष्कळ ठिकाणी अशा भेटी देऊन गरीब व गरजू लोकांच्या जीवनात एक तरी दिवस गोड केला जातो.

आपल्याकडेही दसरा दिवाळीला फराळाचे, गोडधोड पदार्थ गरीबांना देण्याची प्रथा आहेच ना! आपल्या घरातील नोकरचाकर लोकांना सणासुदीला आपण रिक्त हाताने कधीच जाऊ देत नाही. आपल्या कुवतीप्रमाणे त्यांनाही आपल्या आनंदात सहभागी करून घेतोच की.

## २३. VETERN'S DAY 11.11.11 DAY :

आत्तापर्यंतच्या जागतिक युद्धांत देशासाठी लढलेल्या जीवित अथवा रणभूमीवर धारातीर्थी पडलेल्या राष्ट्राची सेवा केलेल्या सर्व जवानांच्या शौर्याला व सेवेला स्मरुन त्यांचा गौरव या दिवशी केला जातो. ११ नोव्हेंबर १९२१ या दिवशी ११ वाजता वीर मरण पत्करलेल्या पण अनोळखी जवानाला ARLINGTON NATIONAL CEMENTERY - अर्लिंग्टन राष्ट्रीय स्मशानात मूठमाती देण्यात

आली होती. त्याचवेळी इंग्लंडमधील WEST MINISTER ABBEY - वेस्ट मिनिस्टर ॲबे आणि फ्रान्समधील AREDE TRIOMPHE अरडे ट्रीओम्फी येथेही असेच अंतिम संस्कार करण्यात आले होते. जागतिक युद्धाच्या पहिल्या वर्षअखेरीस बरोबर ११ वाजता ११ नोव्हेंबर या दिवशी अशा सर्वांना श्रद्धांजली वाहण्यात आली. १९२६ पासून त्या दिवशी आर्मिस्टिक डे म्हणून सुट्टी देण्यात येत होती. त्यानंतर १२ वर्षांनी या दिवसाचे नाव व्हेटर्न्स डे असे ठेवण्यात आले.

वर वर्णन केलेल्या या दिवसांखेरीज आणखी काही विशेष दिवस अमेरिकेत साजरे होतात, ते असे – १ मे चा मे दिन, सेंट पॅट्रिक्स डे, बास्टिल डे, काम करणाऱ्या महिलांचा दिवस, व्यवस्थापन व्यवसायातील काम करणाऱ्यांचा दिवस इ. इ. यादी करायची म्हटली तर ती खूपच लांब होऊ शकेल. असो.

* * *

## प्रकरण सोळावे

# ब्रुकलीन ब्रीज

एखाद्याचे आयुष्य तुम्हाला सतत विचार करायला भाग पाडते. असेच हे एक आयुष्य आहे.

इ. स. १८६७ च्या सुमारास जॉन रोएब्लिंग (John Roebling) या अमेरिकेतील कल्पक इंजिनिअरला एक अफलातून कल्पना डोक्यात आली. न्यू यॉर्कमधील मॅनहटन व ब्रुकलीन या दोन विभागांना जोडणारा एक नेत्रदीपक भव्य असा पूल बांधण्याची कल्पना त्याच्या डोक्यात आली. पुलाच्या बांधकामात प्रवीण असलेल्या इतर जगभरातील व्यावसायिक बंधूंना ही कल्पना अशक्यकोटीची वाटली. त्या सर्वांनी रोएब्लिंग याला तो वेडपटपणाचा विचार डोक्यातून काढून टाकायला सांगितले. हे होणे शक्य नाही हे त्याला सांगण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. असा पूल बांधणे व्यवहारी नसल्याचे ते रोएब्लिंगला सांगत होते. पूर्वी कधीही कोठेही असा पूल उभारला गेलेला नाही असे सर्वजण प्रतिपादन करीत होते.

तो पूल बांधण्याची डोक्यात शिरलेली कल्पना रोएब्लिंग काढून टाकू शकत नव्हता. त्याच्या डोक्यात सतत त्याच्याबद्दल विचारचक्र सुरू असायचे. त्याला मनापासून खात्री वाटत होती की, आपण आपल्या कल्पनेतील पूल नक्की बांधू शकू. त्याला त्याच्या कल्पनेतील पुलाचे स्वप्न कोणाला तरी बोलून त्यावर चर्चा करणे जरूरीचे वाटत होते. त्याचा मुलगा वॉशिंग्टन हा सुद्धा एक तरुण हुशार व नावारूपाला येऊ घातलेला इंजिनिअर होता. त्याच्याशी अनेक वेळा चर्चा करून त्याचे मत आपल्यासारखे करण्यात रोएब्लिंग यशस्वी झाला होता. तो पूल वडिलांच्या कल्पनेसारखा बांधता येईल याच्याशी मुलगा अखेर सहमत झाला. बापलेक प्रथमच एकत्र काम करणार होते. दोघांनी एकमेकांचा सल्ला घेऊन पूल बांधण्याची कल्पना प्रत्यक्षात कशी साकारता येईल आणि पुढे येणाऱ्या अडचणींमधून कसा मार्ग काढता येईल याची रुपरेखा ठरविली. खूपच उल्हसित होऊन आणि अंतरीच्या मनस्वी प्रेरणेने भारले जाऊन त्या दोघांसमोर उभ्या ठाकलेल्या त्या

आव्हानाला त्यांनी हात घातला. त्यांनी मुकादम, कामगार, सामान, यंत्रसामुग्री या सर्वांची जुळवाजुळव केली आणि त्यांच्या अफाट कल्पनाशक्तीमधील पुलाच्या बांधकामाला सुरुवात केली.

पूल बांधकामाच्या प्रकल्पाला वेगाने सुरुवात झाली. परंतु दुर्दैवाने कामाला सुरुवात झाल्यापासून काही महिन्यांनी कामाच्या जागी एक भयानक अपघात झाला. त्या भयंकर अपघातात मूळ कल्पक रोएब्लिंगला प्राण गमवावे लागले. त्याचा मुलगा वॉशिंग्टन हा सुद्धा त्या अपघातात जबर जखमी झाला. त्याच्या मेंदूला इजा पोहोचली होती. त्यामुळे त्याला अजिबात चालता बोलता येईनासे झाले होते. इतकेच नव्हे तर त्याला बिलकुल हालचाल करता येईना.

'आम्ही आधीच त्यांना सांगत होतो.' 'वेडसर बापलेक अन् त्यांच्या वेडसर कल्पना.' 'अशा प्रकारची अविचारी कल्पना मूर्खपणाची असते.' प्रत्येकाने आपले नापसंतीचे व नाके मुरडण्यात मत नोंदविले. सर्वांना वाटत होते की, इंजिनिअर रोएब्लिंग गेल्यामुळे हा पूल बांधण्याचा प्रकल्प बासनात गुंडाळून ठेवाव लागणार. कारण प्रत्येकाची अशी समजूत होती की फक्त रोएब्लिंगलाच तो पूल कसा बांधायचा याची पूर्ण कल्पना होती व ज्ञान होते. इकडे इतक्या हतबल परिस्थितीमध्ये जाऊनही त्याचा मुलगा वॉशिंग्टन कधीच नाऊमेद झाला नव्हता. त्याच्या मनात तो पूल बांधून पूर्ण करण्याची इच्छा सतत धगधगत होती. त्याच्या शरीराची नसली तरी मनाची उभारी पूर्वी इतकीच तीव्र अशी जागृत होती. त्याने त्या अवस्थेतही काही मित्रांना तो प्रकल्प पूर्ण करण्यासाठी उल्हसित करून त्यांना त्यासाठी तयार करण्याचा प्रयत्न केला; परंतु सर्वजण त्या प्रकल्पाविषयी धास्तावले होते.

वॉशिंग्टन हॉस्पिटलच्या खोलीत बिछान्यावर पडल्या पडल्या सतत पूल बांधण्याच्या प्रकल्पाचा विचार करीत असे. एक दिवस त्या खोलीच्या खिडकीला लावलेला पांढरा शुभ्र झिरझिरीत पडदा मंद वाऱ्याच्या झुळकीने थोडासा बाजूला झाला. त्या फटीतून स्वच्छ सूर्यकिरणे आत डोकावली. बाहेर पाहात असलेल्या वॉशिंग्टनला उंच उंच झाडांच्या माथ्यावर क्षणभरच निळेभोर आकाश दृष्टीस

पडले. त्याचे डोळे चमकले. मन पुन्हा उल्हसित झाले. काहीही झाले तरी पूल बांधण्याचा प्रकल्प सोडून न देण्याचा जणू संदेशच त्याला मिळाला. एकाएकी त्याच्या डोक्यात एक कल्पना चमकली. त्या क्षणी त्याला करता येण्यासारखी एकच गोष्ट होती ती म्हणजे त्याच्या एका हाताचे एक बोट हलविणे. त्याने त्याचा जास्तीतजास्त उपयोग करून घेण्याचे ठरविले. लवकरच ते बोट हलवून, आपल्या पत्नीशी संवाद साधण्यासाठी त्याने एक सांकेतिक भाषा तयार केली. त्याने आपल्या पत्नीच्या हाताला स्पर्श करून तिला आपल्या मनातील इच्छेची सूचना दिली. त्या कामात जे सहभागी होते त्या पूर्वीच्या सर्व इंजिनिअर्स व मुकादम लोकांना परत बोलविण्याची इच्छा त्याने प्रकट केली.

त्यानंतर बोट हलवून त्याच सांकेतिक भाषेत तो इंजिनिअर्सना सूचना देऊ लागला. पुढील काम कसे करायचे ते समजावून सांगू लागला. हे सर्व फारच वेडेपणाचे वाटत होते. तरी पण पूल बांधण्याचा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित झाला होता. थोडी थोडकी नव्हे तर तब्बल तेरा वर्षे वॉशिंग्टन आपल्या एका बोटाने पत्नीच्या हाताला स्पर्श करून सर्व सूचना देत राहिला. सरतेशेवटी पुलाचे बांधकाम पूर्ण झाले. आजही न्यू यॉर्कमधील तो ब्रुकलीन ब्रीज मोठ्या दिमाखात उभा आहे. अत्यंत प्रेक्षणीय, नेत्रोद्दीपक म्हणून त्या ब्रीजची अख्ख्या जगाला ओळख करून दिली जाते. त्याच्या सर्व दिमाखदार वैशिष्ट्यांसह तो ब्रीज, एका माणसाच्या असामान्य कल्पनेचे, जिद्दीचे आणि त्याला मिळालेल्या अद्वितीय यशाचे प्रतिक किंवा स्मारक म्हणून उभा ठाकला आहे. भोवतालच्या प्रतिकूल परिस्थितीपुढे त्याने कधीही हार मानली नाही. अर्ध्या जगाने खरे तर त्याला वेडा ठरविले होते. तो पूल म्हणजे वॉशिंग्टन आणि त्याच्या पत्नीच्या प्रेमाचे आणि त्यागाचे स्मारक आहे. त्याच्या पत्नीने अखंड तेरा वर्षे पतीच्या सांकेतिक भाषेची उलगड करून त्याने दिलेल्या सर्व सूचना काम करणाऱ्या इंजिनिअर्सपर्यंत योग्य स्वरूपात पोहोचविल्या होत्या.

कदाचित असहाय्य परिस्थितीत सुद्धा 'देवा आता मरण येऊ दे' अशा वृत्तीपासून परावृत्त होण्याचे हे एक ज्वलंत उदाहरण म्हणून देता येईल. हे उदाहरण म्हणजे अत्यंत दुर्बल शारीरिक परिस्थितीतही हिंमत न हारता अशक्यकोटीतील

गोष्ट साध्य केलेले एकमेवाद्वितीय असेच उदाहरण ठरेल.

आपल्या रोजच्या जीवनात इतर अनेकांना तोंड द्याव्या लागणाऱ्या अडचणी व संकटे नजरेस पडली की, आपल्या वाटेला आलेल्या अडचणी व संकटे फारच किरकोळ वाटू लागतात. आपली कोणतीही स्वप्ने अशक्य वाटली तरीही जिद्द, निश्चय, पाठपुरावा याच्या जोरावर ती प्रत्यक्षात साकारता येतात हे ब्रुकलीन ब्रीजच्या रुपाने सिद्ध झालेले आहे.

येणारा पुढील नवीन आठवडा तुम्हाला उत्कर्षाचा जावो.

## ब्रुकलीन ब्रीजसंबंधी अधिक माहिती –

अमेरिकेतील अत्यंत महत्त्वाच्या आणि जगातील सर्वांत श्रीमंत, भव्य, आर्थिक आणि उद्योग व्यवहारात अग्रगण्य असलेल्या न्यूयॉर्क शहरातील हा ब्रुकलीन ब्रीज. न्यू यॉर्क शहराचे एकूण पाच विभाग आहेत. त्यापैकी ईस्ट नदीने विभागलेल्या मॅनहटन व ब्रुकलीन या दोन विभागांना जोडणारा हा अतिभव्य जगप्रसिद्ध ब्रीज. ब्रीज बांधणी व्यवसायात आदर्श, नावीन्यपूर्ण व प्रेक्षणीय ठरलेला हा ब्रीज.

या ब्रीजच्या एका बाजूस रहिवासी इमारती, शाळा, कॉलेजेस् व काही व्यवसायांच्या इमारती आहेत. दुसऱ्या बाजूस न्यू यॉर्कमधील प्रचंड आर्थिक उलाढाली करणाऱ्या उद्योग व्यवसायांची कार्यालये आहेत. त्यांच्या एकापेक्षा एक टोलेजंग इमारती उभ्या आहेत. ११ सप्टेंबर २००१ ला जमीनदोस्त झालेल्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या दोन इमारती याच भागात उभ्या होत्या. ब्रीजपासून फार जवळच्या अंतरावर त्या होत्या. ब्रुकलीन विभागाकडून मॅनहटन विभागाकडे जाताना डाव्या बाजूला अटलांटिक महासागर व त्या सागरात उभा असलेला स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा फार सुंदर असून तो नजरेत भरतो.

हा ब्रुकलीन ब्रीज दुमजली आहे. त्याच्या वरच्या मजल्यावरून अतिवेगाने दुतर्फा धावत असलेली वाहने आणि न्यू यॉर्कची ट्यूबरेल्वे धडधड करीत जात असते. ब्रीजचा खालच्या मजल्यावरचा मार्ग मात्र खास करून पादचारी व सायकलस्वारांसाठी राखून ठेवलेला आहे. केव्हाही पाहा त्या पादचारी मार्गावर

न्यूयॉर्कचा हौशी तरुण वर्ग जॉगिंग करताना तुम्हाला दिसेल. न्यूयॉर्कच्या दोन महत्त्वाच्या विभागांना जोडून वाहतूक, व्यवसाय यांची वाढ, प्रगती करणारा हा ब्रीज फार महत्त्वाचा मानला जातो. वर दिलेली ब्रीजच्या बांधकामाची कहाणी ब्रीजच्या एका बाजूला कोरून ठेवली आहे. जो कोणी ती कहाणी वाचेल त्याला स्वत:चे आयुष्य अर्थपूर्ण करण्याची प्रेरणा मिळेल.

त्या ब्रीजच्या बांधकामातील घटनांची क्रमवारी तसेच बांधकामाविषयी काही आकडेवारी लक्षणीय आहे.

अ) ब्रुकलीन ब्रीज होण्यापूर्वी – ब्रुकलीन विभागात इ. स. १६३६ मध्ये डच शेतकऱ्यांची वसाहत झाली.

ब्रुकलीन – मॅनहटन विभागात ईस्ट नदीमधून बोटीची प्रथम फेरी इ. स. १६४२ मध्ये झाली होती.

ब्रुकलीन विभागाची लोकसंख्या – इ. स. १८६०---२६८,०००

– इ. स. १८७०---३८६,००

ईस्ट नदीवर ब्रुकलीन ब्रीज बांधण्यासाठी न्यूयॉर्क सरकारने इ. स. १८५७ व इ. स. १८६६ साली ठराव पास केले. २३ मे १८६७ या दिवशी श्री. जॉन ए. रोएब्लिंग यांची बांधकामासाठी मुख्य अभियंता म्हणून नेमणूक करण्यात आली.

जॉन ए. रोएब्लिंग यांचा जन्म १२ जून १८०६ साली पर्शियामध्ये झाला होता. त्यांनी पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट ऑफ बर्लिन येथून सिव्हिल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेऊन १८२६ मध्ये पदवी प्राप्त केली. इ. स. १८३१ मध्ये अमेरिकेतील पेनसिल्व्हानिया येथे त्यांनी स्थलांतर केले होते. ब्रुकलीन ब्रीजची कल्पना मांडताना तो यशस्वी होणारच यावर त्याचा दृढविश्वास होता. त्याबद्दल त्याचे असे म्हणणे होते की, 'ब्रुकलीन ब्रीज तयार झाल्यानंतर त्याच्या डेकवरून चालत जाणे हे अवर्णनीय आनंदाचे ठरणार आहे. ब्रीजवर बांधले जाणारे उंच मनोरे हे शहराचे आणि पर्यायाने राष्ट्राचे मानबिंदू ठरतील. ब्रीजचे बांधकाम म्हणजे उत्कृष्ट कलेचा व यशस्वी प्रगत इंजिनिअरिंगशास्त्राचा एक नमुना म्हणून, येणाऱ्या पुढील अनेक वर्षांसाठी उदाहरण देत राहील. हा ब्रीज म्हणजे, तो बांधणाऱ्या लोकांसाठी,

समाजासाठी, शक्ती, धाडस, संपत्ती व प्रतिष्ठेचे कायमचे प्रतीक बनून राहील. ती एक महत्त्वाची घटना म्हणून इतिहासात नोंद होईल.' आणि ब्रीजचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर रोएब्लिंगचे हे विचार तंतोतंत खरे ठरले.

ब) ब्रीज बांधकामातील ठळक घटना - २३ जुलै १८६७ रोजी जॉन ए. रोएब्लिंगची बांधकामासाठी मुख्य अभियंता म्हणून नेमणूक झाल्यानंतर पितापुत्रांनी अत्यंत उत्साहाने कामाला सुरुवात केली. परंतु दोन वर्षांच्या आतच ब्रीजचे बांधकाम चालू असतानाच ६ जुलै १८६९ रोजी एक भयंकर अपघात झाला. या अपघातात दोघेही पितापुत्र जबर जखमी झाले. रोएब्लिंगचे पाय दुखावले होते व नाइलाजाने कापावे लागले होते; पण तो मनाने इतका घट्ट होता की पायावर इलाज चालू असतानाच त्याने पाय बधीर करून घेण्यास नकार दिला. शस्त्रक्रिया चालू असताना त्याने सहनशीलतेची परिसीमा गाठली.

ब्रुकलीन ब्रीज हा नवतंत्राने पोलादी वायर्सना ताण देऊन बांधलेला (Suspension Bridge) आधुनिक तंत्राचा नमुना आहे. अपघातानंतर २२ जुलै १८६९ रोजी रोएब्लिंगचा मृत्यू झाला. त्यानंतरची वॉशिंग्टनची कहाणी वर वर्णन केलेलीच आहे.

क) ब्रीजच्या बांधकामातील काही ठळक आकडेवारी व नोंद - वॉशिंग्टनच्या सूचनेनुसार २ जानेवारी १८७० रोजी बांधकामास पुन्हा सुरुवात झाली. ब्रीजवरील मनोऱ्याचे बांधकाम जुलै १८७६ मध्ये पूर्ण झाले. ब्रीजचे लोकांच्या वापरासाठी उद्‌घाटन २४ मे १८८३ रोजी झाले. त्या प्रथम दिवशी १५०,३०० लोकांनी डेकवरून पायी चालत जाऊन ब्रीज पार केला. त्या दिवशी एकूण १,८०० वाहने पुलावरून प्रवास करून गेली. त्या दिवशी ब्रीजचा वापर करण्यासाठी ५ सेंट इतकी फी आकारली गेली होती.

ब्रीजच्या पहिल्या मजल्याची पाण्याच्या पृष्ठभागापासूनची उंची १३५ फूट व मनोऱ्याची पाण्याच्या पृष्ठभागापासूनची उंची २७६$^{१}/_{२}$ फूट. पहिल्या मजल्याचे वर

टॉवरची उंची १५९ फूट.

त्यावेळी म्हणजे १८६३ साली न्यू यॉर्कमधील सर्वांत उंच इमारत २८१ फूट होती.

ब्रीजच्या मुख्य चार पोलादी साखळ्यांचा व्यास १५$^{३}/_{४}$ इंच.

ताण देण्यासाठी वापरले गेलेले साखळदंड लहान व्यासाच्या एकूण १९ पोलादी दोरखंडांच्या वेढ्यांनी बनविले आहेत.

बांधकामात वापरलेली एकूण पोलादी साखळदंडांची लांबी ३६०० मैल भरते.

बांधकामात एकूण पोलादी साखळदंडांचे ताण १५२० आहेत.

पुलावर येण्यासाठी ब्रुकलीन विभागाकडूनचा प्रवेशरस्ता ८७१ फूट असून मॅनहटनच्या बाजूला उतरण्याचा प्रवेशरस्ता १५६२ फूट आहे. पुलाची एकूण लांबी ५१८९ फूट किंवा १.१३ मैल व रुंदी ८५ फूट आहे. पुलाचे एकूण वजन १४,६८० टन आहे.

१९८८ साली पाहणी केल्याप्रमाणे पुलावरील वाहतुकीचे आकडे - दररोज १४४,००० वाहने पुलावरून जातात. शेजारील असलेल्या मॅनहटन ब्रीजवरून मात्र फक्त ७८,००० वाहने जातात. पुलावरून रोज ३५६२ पादचारी व ११११५ सायकलस्वार पूल पार करतात. या पुलाचे बांधकाम करणाऱ्या कंपनीचे नाव होते - न्यू यॉर्क ब्रीज कंपनी.

अशा प्रकारे जगप्रसिद्ध असलेल्या ह्या ब्रीजवरून चालत जाताना १९९७ व १९९९ साली मला एक वेगळाच आनंद अनुभवायला मिळाला.

* * *

## प्रकरण सतरावे

# भारत - अमेरिका मनन

अमेरिकेतून भारतात परत आल्यानंतर तुलनात्मक द्वंद्व सुरू होते. अमेरिका किती चांगली आहे व भारतात किती व काय कमी आहे हा विचार मनात नसतो, तर अमेरिकेत जर हे होऊ शकते तर भारतात का घडू शकत नाही या विचाराने अस्वस्थ होऊन जायला होते. आपल्याकडे काय कमी आहे? प्रचंड बुद्धिवान माणसे आहेत. कल्पनाशक्ती आहे. निसर्गाची देणगी आहे. जर काही नसेल तर जिद्द, सातत्य, पाठपुरावा, योजकता. भारताची लोकसंख्या, त्याचबरोबर भेडसावणारे दारिद्र्य व भ्रष्टाचाराचा भस्मासूर ही दरवेळी बुजगावण्यासारखी कारणे दाखविली जातात; परंतु आपण सतत कारणेच दाखवित राहणार का? यासाठी उपाययोजना केव्हा करणार? उपाययोजना कागदावर केल्या जातात पण प्रत्यक्षात मात्र फार कमी उतरतात. अमेरिकेत गरीब जनता नाही असे नाही. अनेक ठिकाणी भिकारी दिसतात. गळ्यांत 'होमलेस' अशी पाटी अडकवून चांगले कपडे घालून ते भीक मागत असतात. त्यातलेच काहीजण गुंडगिरीचा मार्गही अवलंबितात.

आपल्याकडे सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता पाळायला का अडचण येते? एक सुरत शहर पूर्वीपेक्षा स्वच्छ झाले तर किती कौतुक करून घेतले गेले. पुण्या मुंबई शहरात नुसत्याच स्वच्छतेच्या घोषणा झाल्या. एक-दोन दिवस पुढाऱ्यांना प्रसिद्धी मिळाल्यानंतर सर्वजण ते विसरून गेले. उत्तरप्रदेश, बिहारसारख्या राज्यात तर स्वच्छता म्हणजे काय हे ठाऊक सुद्धा नाही. स्वच्छतेची शिकवण लहानपणापासूनच घरातून व शाळामधून का दिली जात नाही? जुन्या शहरात रस्ते रुंद करणे आता शक्य होत नसेल परंतु नवीन होणाऱ्या वसाहतींमध्ये हा विचार का होऊ शकत नाही? झोपडवस्ती निर्माण होऊ नये यासाठी पहिली झोपडी उभी राहतानाच ती न होण्याची दक्षता का पाळली जात नाही? अनेक ठिकाणी निरनिराळ्या कारणासाठी होणारी खोदकामे आपण थांबवू शकणार नाही का? दुरुस्तीच्या कामात आपण वेळेचे बंधन घालू शकणार नाही का? वाहतुकीचे

नियम प्रत्येकाने पाळायचे ठरविले तर त्यात सर्वांचा फायदा होणार नाही का? नुसते पीयूसीचे दाखले देऊन काय उपयोग? प्रत्यक्षात वाहनांची अवस्था तशी ठेवली तर प्रदूषण आपोआप कमी होणार नाही का? प्रत्येक चौकात सिग्नलनंतर प्रत्येकाचे जोरजोरात हॉर्न वाजविणे सुरू होते. त्याची काय आवश्यकता असते? ते वाजविण्याचे बंद झाले तर आवाजाचे प्रदूषण बंद होणार नाही का? युनिव्हर्सल स्टुडिओ पाहात असताना मला आपल्या बॉलिवूडची खूप आठवण झाली. त्याच पद्धतीने आपल्याकडेसुद्धा प्रेक्षकांची ओढ नाही का निर्माण करता येणार? अमेरिकेतील उच्च क्रमांकाची अनके विद्यापीठे मला पाहायला मिळाली. मी ती आवर्जून पाहिली. त्यात स्टॅनफोर्ड, बर्कली, एम. आय. टी., हारवर्ड, कारनेल, ब्रुकलीन, बी.वाय.के., युटास्टेट, डेव्हिस, ब्रांडाईस अशा नामवंत युनिव्हर्सिटीज् होत्या. आपल्याकडेपण श्रेष्ठ दर्जाच्या युनिव्हर्सिटीज् आहेत; परंतु जागतिक क्रमवारीमध्ये अमेरिकेच्या बरोबरीने आपण का बसू शकत नाही? या अशा अनेक प्रश्नांमुळे मी अस्वस्थ होऊन जातो.

अमेरिकेत सारेच काही सोन्याचे नाही. अमेरिकेची सुरुवातच मुळी २५० ते ३०० वर्षांपूर्वी झाली आहे. त्यामुळे नवीन निर्मितीसाठी एका ठरावीक वरच्या पातळीवरूनच त्यांची सुरुवात झाली आहे. भारताचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. तो बदलून सुधारणा करायला थोडा अवधी द्यायला हवा. पण किती वेळ द्यायचा हे ही ठरवून घेतले पाहिजे. भारतातील शेजारधर्म, एकत्र कुटुंब पद्धती व माणुसकी ही आपली बलस्थाने आहेत. अमेरिकेची कृत्रिमता आपल्याकडे नाही. सर्व सरळ आणि दिलखुलास असते. फक्त यातील कडवटपणा काढून टाकायला हवा. हेवेदावे बाजूला करायला हवेत. आपल्याकडील शेजारधर्माचा उपयोग लोकशिक्षण व जनजागृतीसाठी करून घ्यायला हवा.

अमेरिकेतही वर्णव्यवस्था व वर्णभेद आहेच. पण त्याचबरोबर समानता शिकविण्याचे व आचरणात आणण्याचे प्रयत्न केले जातात. आपल्याकडे प्रत्येक बाबतीत जात व धर्म विचारला जातो. ती जात व तो धर्म एकच 'भारतीय' का होत नाही? आपणाकडे आहे. त्यापेक्षा कितीतरी पटीने अमेरिकेत गुन्हेगारी आहे. पण त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तिथले पोलीस खाते सदैव तत्पर असते. सचोटी,

बेडरवृत्ती व तत्परता हे काही न येण्यासारखे गुण नाहीत; पण नेमकी याच गुणांची आपल्याकडे वानवा असते. अमेरिका ही सुवर्णसंधीची खाण (Land of Opportunities) आहे असे म्हटले जाते. परंतु भारत सुधारायचा असेल व प्रगत करायचा असेल तर या संधी आपल्याकडे काय कमी आहेत? मात्र वाईट एकच वाटते की या सर्वांपासून आपली तरुण पिढी दूर पळते आहे. अमेरिकेत गेलेला प्रत्येक जण त्या मेल्टिंग पॉटमध्ये विरघळून जातो. परत यायचं नावच काढीत नाही. काही दिवसांनंतर भारतातील सर्वच गोष्टी त्याला वाईट, घाण, क्षुद्र व कमी प्रतीच्या दिसू लागतात. मग भारतात सुधारणा घडवून आणण्याची जबाबदारी कोणाची? आपला भारत सुद्धा नंदनवन होऊ शकेल. त्यासाठी हवी जिद्द आणि वृत्ती. कोठेतरी कोणीतरी हे सुरू केल्याशिवाय पूर्तता होणार नाही. असे पर्वताच्या पायथ्याशी उभे असताना त्याच्या उंचीचा बाऊ न करता चढण चढायला सुरुवात केली पाहिजे, तरच आपण माथ्यावर पोहोचू शकतो. एकदा माथ्यावर पोहोचलो की, किती रस्ता पार करून आलो याचा आनंद मिळतो. मी पूर्ण आशावादी आहे. आपल्याकडे हे सर्व घडेल याची मला खात्री आहे. ते होण्यासाठी जो काही अल्पश: प्रयत्न माझ्याकडून होईल तो करीत राहण्याचा निर्धार करूनच मी भारतात परत येत असतो. नोकरीत इमानेइतबारे काम करणे, ग्राहकांना उत्तम सेवा देणे, स्वत:चा परिसर स्वच्छ ठेवणे, नियमांचे स्वत: पालन करणे हे तर मला सहज करता येते.

अमेरिकेत मौजमजा, खाणे व प्रवासाचा आनंद तर मी भरपूर लुटला; पण त्याचबरोबर हे वेगळेपण टिपण्याचाही मनापासून प्रयत्न केला. अमेरिका किती चांगली आहे व भारतात किती उणिवा आहेत हे सांगण्याचा माझा उद्देश नाही. जे जे चांगले असेल ते ते आपल्याकडे आले पाहिजे हा विचार मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

अनेक माणसे पुढाऱ्यापासून ते सामान्य माणसापर्यंत अमेरिकेत जात असतात. त्यांनी बॅगा भरून तिकडच्या कल्पना व विचार आणले तर कस्टम अधिकाऱ्यासकट सर्व भारतीय जनता त्यांचे कायमचे ऋणी राहतील. जयहिंद.

* * *

प्रकरण अठरावे

# अमेरिकेतील मनाला खटकणाऱ्या काही गोष्टी

अमेरिकेत लोकांना खरेदीचे जणू व्यसनच आहे. ९९ सेंटस् म्हणजे कोई भी चीज उठाओ फक्त ९९ सेंटस् या दुकानापासून ते वॉलमार्ट, के मार्ट किंवा अनेक मोठे मॉलस् यापैकी तुम्ही कोठेही जा. दुकाने सर्व तऱ्हेच्या वस्तूंनी खचाखच भरलेली असतात. आठवड्यात केव्हाही व विशेषत: शनिवार रविवारी कुटुंबांचे कळपच्या कळप या दुकानांमधून हिंडताना दिसतात. प्रत्येकाकडे खरेदी केलेल्या वस्तू जमा करण्यासाठी मोठमोठ्या ढकलगाड्या असतात. त्यात पुढच्या भागात बसवलेली लहान मुले असतात. ढकलगाड्यात जमा केलेल्या नव्या वस्तूंचा ढिगारा साठत असतो. मागे पुढे कुटुंबातील इतर माणसे चालत असतात. अशी वरात तासन्‌तास चाललेली असते. दुकानात नव्याने दिसेल ते हवे असो वा नसो, त्याच प्रकारची वस्तू घरात असली तरी, ती नवी वस्तू विकत घेण्याचा लोकांना भारी सोस आहे. ते घेताना त्या वस्तूसाठी असणारी प्रलोभने शोधली जातात. कशावर जास्त डिस्काऊंट आहे, एक घेतल्यास दुसरे फुकट (Buy One Get One Free) - दुकानदार दोन्ही वस्तूंची किंमत एका वस्तूमधून वसूल करत असला तरी – अशा अनेक आकर्षणांना ग्राहक फसत राहतो. खाद्यपदार्थ व वाणसामानाच्या सुपर मार्केटमध्ये लोकांच्या भरलेल्या ढकलगाड्या पाहिल्या की ही त्यांची वर्षभराची खरेदी असावी किंवा त्यांच्याकडे काहीतरी लग्नकार्य असावे असेच वाटते. प्रत्येकजण आठवडाभर काम करून पैसे मिळवितो आणि आठवड्याच्या मिळकतीपेक्षा क्रेडिट कार्डवर केलेली शनिवार रविवारची खरेदी नेहमीच जास्त असते. या सर्व अफाट व अनावश्यक खरेदीमुळे अमेरिकेतील बहुतेक घरी गोडाऊनमध्ये रूपांतरित झालेली दिसतात. अमेरिकेत साधारण सर्व घरांना तळघर ज्यात दोन कार पार्कस् व थोडी मोकळी जागा ही असतेच. ती मोकळी जागा लवकरच या सततच्या खरेदीमुळे व्यापून जाते आणि त्या जागेला खरोखरच गोडाऊनचे स्वरूप येते. हे सर्व बघितले

की वाटते अमेरिकेत लोकांना इतर काही विरंगुळा नाहीच का? मित्रमैत्रिणी असतच नाहीत का?

अमेरिकेत कोणत्याही फास्ट फूड सेंटरमध्ये गेलो की मला एका गोष्टीचे अत्यंत दु:ख होत असे. ते म्हणजे तिथे वाया जाणाऱ्या अन्नपदार्थांचे. अशा ठिकाणी सेल्फ सर्व्हिस असल्यामुळे चीज, सॉस, दूध, साखर इ. पदार्थ आपणास हवे तेवढे घेता येतात. वास्तविक हे पदार्थ प्रत्येकाला किती हवे आहेत ते समजत असतेच; परंतु स्वत:च्या जरूरीपेक्षा कितीतरी जास्त हे पदार्थ प्रत्येकजण आपल्या ट्रेमध्ये घेत असतो. खाणे झाल्यावर हे उरलेले पदार्थ परत केले जात नाहीत तर ते कचऱ्याच्या डब्यांत फेकून दिले जातात. खाण्याचे विकत घेतलेले पदार्थ सुद्धा नकोसे झाले की कचऱ्याच्या डब्यांत अर्पण केले जातात. अशा फेकून दिलेल्या पदार्थांवर आफ्रिकेतील एखादा गरीब देश नक्कीच पोसला जाईल असे वाटते. हे सर्व पाहून असे वाटते की अती सुबत्तेमुळे तिथे लोकांना माज आला आहे. पैशाची गुर्मी नसानसांत भिनली आहे. वृत्तीमध्ये एक प्रकारची मस्ती आणि बेपर्वाई आली आहे. म्हणूनच मनातून तिथे वावरताना फार वाईट वाटते. अन्नदेवतेचा होत असलेला अपमान सहन होत नाही.

अमेरिकेत हिंडत असताना अनेक विरोधाभास नजरेत येतात. तंग कपडे घालून ढुंगण व छाती उघडी टाकून स्त्रियांनी बाहेर गेले तरी कोणी काहीही म्हणत नाही; पण भारतीय पायजमा शर्ट घालून घराच्या बाहेर गेले तर लोकांच्या चमत्कारिक नजरा तुमच्यावर रोखल्या जातात. बायका अगदी बॉयकट करून केस कमी करतात; परंतु पुरुष मात्र केस वाढवून त्याची शेपटी करतात, पोनिटेल बांधतात. नाक, कान, भुवई, ओठ, जीभ इतकेच नव्हे तर झाकलेल्या अनेक अवयवात टोचून घेतात. डूल, सुंकल्या, मणी हे बायकांपेक्षा पुरुषच अधिक धारण करतात. जगातील हिजड्यांना किंवा तृतीयपंथी पुरुषांना नावे ठेवली जातात; परंतु समलिंगी नातेसंबंध इतकेच नव्हे तर त्यांच्या लग्नसंबंधांना सुद्धा कायद्याने मान्यता व प्रतिष्ठा बहाल केली गेली आहे. ऑफिसमध्ये वरिष्ठांना किंवा मान्यवरांना बहुमानार्थी संबोधन करणे त्यांना ठाऊकच नाही. सर्वांना करण्यात येणाऱ्या एकेरी संबोधनामुळे अति जवळीक निर्माण होऊन आदरभावाचा पूर्णपणे नायनाट झालेला

आढळतो. सार्वजनिक ठिकाणी किळस वाटावी इतक्या जोरात व गलिच्छपणे पेपर टॉवेलमध्ये कोणी नाक शिंकरले तरी चालते. हॉटेलमध्ये अगदी शेजारच्या टेबलावर बसून सुद्धा हे केले जाते. चारचौघांत ढुमदिशी पादले तरी कोणाला लाज वाटत नाही; परंतु या सर्वांच्या उलट हॉटेलमध्ये तृप्त होऊन कोणी ढेकर दिली तर ते मात्र असभ्यपणाचे मानले जाते. त्याच्याकडे लगेच विचित्र नजरेने पाहिले जाते. अमेरिकेत वर्णभेद करीत नाहीत व तसा न करण्याबद्दल ठिकठिकाणी पाट्या लावलेल्या असतात. परंतु काळ्या लोकांवर झालेले व अजूनही होत असलेले अत्याचार, अन्याय पाहिले की या सूचना खोट्या आहेत असेच वाटते. आपल्या देशात अल्पसंख्यांक नेते अनेकवेळा मान्य झाले. त्यांनी सर्वांत उच्च असे राष्ट्रपतीपद अनेक वेळा भूषविले आहे.

लहान मुले ही राष्ट्राची संपत्ती आहे हे सर्वच देशात मान्य आहे. त्यासाठी अमेरिकेत लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठी आत्यंतिक काळजी घेतली जाते. इतकी की प्रत्यक्ष मातापित्याने किंवा शिक्षकाने त्यांना त्यांच्या चुकीसाठी रागावलेले अगर हात उगारलेला सुद्धा गुन्हा समजला जातो. या गुन्ह्यासाठी त्यांना शिक्षा होऊन लहान मुलांना सांभाळण्यासाठी सरकार आपल्या ताब्यात घेऊ शकते. म्हणूनच काही व्रात्य मुले आपल्या जन्मदात्यांनाच दम देतात की तुम्ही जर रागावलात अगर हवे ते करू दिले नाहीत तर मी पोलिसात तक्रार करीन व मग तुम्हाला शिक्षा होईल. आहे का नाही अजब न्याय? याच लहान मुलांचे अघोरी अमानुष चाळे आपण अनेक वेळा वाचले आहेत. गंमत म्हणून ही अजाण बालके इतरांवर, आपल्या सवंगड्यांवर, आपल्या भाऊबहिणींवर इतकेच नव्हे तर आपल्या जन्मदात्या आईवडिलांवर सुद्धा बेछूट गोळीबार करतात. या बंदुका त्यांच्या हाताला कशा लागू दिल्या जातात याचे मोठे कोडे वाटते.

* * *

## प्रकरण एकोणिसावे

# माझी अमेरिका

### (श्री. आर.के.नारायण ह्यांच्या लेखाचा अनुवाद)

आजकालची तरुण पिढी अमेरिकेला जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी जिवाचे रान करून धडपडत असते. तिथे जाऊन उच्च शिक्षण पूर्ण केले की नोकरी करणे क्रमप्राप्त होऊन बसते. एकदा नोकरी सुरू झाली की अमेरिकेचे ग्रीन कार्ड मिळविण्यासाठी त्यांची धडपड सुरू होते. ग्रीन कार्ड म्हणजे अमेरिकेत कायम रहिवाशांना मिळणारे ९० टक्के सर्व हक्क मिळतात. नोकरीसाठी त्यांना प्राधान्य मिळते. अशा सुखसोयी मिळविण्यासाठी लागणारे निरनिराळे परवाने (व्हीसा) मिळविण्यासाठी ही तरुण पिढी अमेरिकन वकिलातीला खूपच काम निर्माण करते. त्या वकिलातीतील कर्मचाऱ्यांना खूपच व्यस्त ठेवते. अमेरिकन वकिलातीमधील चाणाक्ष अधिकारीवर्ग अशा इच्छुक अर्जदारांची छाननी करून त्यांच्यापैकी कायमच्या वास्तव्यासाठी अमेरिकेत जाणारे कोण आणि तात्पुरते काही ठरावीक कारणासाठी, काही काळापुरते अमेरिकेला भेट देणारे कोण हे बरोबर हेरतात. सर्वसाधारण अमेरिकन माणूस हा उदारमतवादी असतो. त्यामुळे अधिकाधिक भारतीय इंजिनिअर्स वा डॉक्टर्सनी अमेरिकेत स्थलांतर केल्याने त्याचा परिणाम म्हणून स्थानिक अमेरिकन लोकांच्या उपलब्ध संधीवर गदा येईल व त्याचा फायदा परदेशी लोकांना होऊन स्थानिक लोकांना तोटा सहन करावा लागेल असे ते कधीही मानीत नाहीत... एका अमेरिकन प्राध्यापकाचे याबाबतीतील मत अतिशय बोलके आहे. ''इतर अनेक परदेशी लोकांप्रमाणेच भारतीयांनी अमेरिकेत का येऊ नये? काळाच्या ओघात इथे आलेली भारतीय जनता सुद्धा अमेरिकन होऊन जातील. अमेरिकेचे सध्याचे नागरिक हे सुद्धा एकेकाळी स्थलांतर करून आलेले परदेशी नागरिकच होते. ते लोक युरोप किंवा आफ्रिकेच्या एखाद्या देशातून अमेरिकेत स्थलांतर केलेले आहेत. मग भारतातून लोकांनी का येऊ नये? आम्हा अमेरिकन लोकांना भारतीय आमच्या देशात आलेले नक्कीच आवडतात.''

या बाबतीत सर्वसाधारण दोन मतप्रवाह आढळतात. अमेरिकेत स्थायिक

झालेल्या मुलामुलींचे पालक त्यांना भेटण्यासाठी अमेरिकेच्या वाऱ्या करतात. त्यांच्या या वर्षा दोन वर्षा आड घडणाऱ्या भेटीमध्ये ते नायगारा, डिस्नेलँड इ. सर्व प्रेक्षणीय स्थळांच्या सहली करतात. या प्रेक्षणीय स्थळांना भेटी देत असतानाच आपल्या मुलामुलींचे सुख, समाधान व भरभराट पाहून धन्यता मानतात. अमेरिकेतील ग्रेहाउंड बसने अमेरिका दर्शन झाले की मग मात्र त्यांना आपल्या भारताची आठवण येते. अमेरिकेचा कंटाळा येऊ लागतो. तिथली रुक्षता, तुटकपणा, निरसता, तोचतोचपणा जाणवू लागतो. मग ते न्यूयॉर्क, न्यू जर्सी किंवा कॅलिफोर्निया, सिलिकॉन व्हॅली कोठेही वास्तव्य करीत असोत, त्यांना भारतात परतण्याचे वेध लागतात. ते भारतात परत येतात; पण आल्याबरोबर मात्र सर्वांना सांगतात आणि स्वत:च्या मनाची पण समजूत घालतात. ''काहीही असले तरी आमचा मुलगा/ मुलगी अमेरिकेत सुखासमाधानात आहे. या भारतात त्यांनी परत कशाला यायला हवे? त्यांच्या गुणांची आणि शिक्षणाची इथे कोण कदर करणार? इथे परत येऊन त्यांना अशी काय मान्यता मिळणार आहे?'' आपले तरुण तरुणी उच्च विद्याभ्यासासाठी किंवा काही ठरावीक प्रशिक्षणासाठी अमेरिकेची वाट पकडतात. तिकडे जाताना ते छातीठोकपणे जाहीर करतात की, त्यांचे शिक्षण पूर्ण होताक्षणी ते भारतात नक्की परत येणार. फार तर एक-दोन वर्षे कामाचा अनुभव घेऊन त्यानंतर परत येऊ; पण परत नक्की येणार. परत येण्यामागे आपल्या मायभूमीसाठी काहीतरी करण्याची तसेच त्यांच्या कुटुंबाच्या कल्याणासाठी परत येण्याची भरीव आश्वासने देतात. त्यामागे त्यांची प्रामाणिक मनोकामना असते आणि विचार असतो; परंतु प्रत्यक्षात तसे कधीच घडत नाही. शिक्षणानंतर जेव्हा तो भारतभूमीवर परत येतो तेव्हा त्याच्या डोक्यात असंख्य कल्पना, स्वप्ने व योजना असतात; परंतु ती स्वप्ने साकारताना त्याला सतत अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. परत आल्यानंतर तो त्याच्या पसंतीची नोकरी शोधण्याचा किंवा त्याच्या मनातील प्रकल्प सुरू करण्याचा प्रयत्न करतो. पण त्या बाबतीत त्याला सर्वत्र कटु अनुभव येतात. अनेक प्रकारच्या कागदपत्रांची पूर्तता करणे, जातीयवाद व इतर अनेक प्रकारच्या बंधनांना तोंड देणे, नोकरशाही कारभारामधील अनेक अडथळे पार करणे या सर्व अडचणींमुळेही परत आलेली तरुण मंडळी वैतागून जातात. अनेक

प्रकारच्या कागदपत्रांची पूर्तता करून व एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात हेलपाटे घालून ते अतिशय कंटाळून जातात. मनातून भारतीय व्यवस्थेवर संतापून जातात. त्यांचा वेळ वाया गेल्याची त्यांना खंत वाटते. या सर्वांचा परिणाम म्हणजे त्यांना मनस्ताप होतो. अशा प्रकारच्या कार्यपद्धतीची व अनुभवांची त्यांना अमेरिकेत राहून सवय राहिलेली नसते. अमेरिकेत ते कोणत्याही कार्यालयात केव्हाही बिनधास्त जाऊ शकतात. अधिकाऱ्याला त्याच्या पहिल्या नावाने संबोधून स्वत:च्या भेटीचे कारण व उद्देश त्याला मोकळेपणाने सांगू शकतात. या उलट भारतात समान पातळीवरील अधिकाऱ्याला तो भेटायला जातो, त्याच्या मनातील संकल्पाविषयी चर्चा करण्याचा प्रयत्न करतो, त्यावेळी त्याला कळून चुकते की, तो त्या अधिकाऱ्यापर्यंत पोहोचूच शकत नाही. व्यवस्थापनरचनेमधील खालच्या पातळीवरील अधिकाऱ्यापर्यंतच त्याला जाऊन भेटता येते. एकदा एक जीवशास्त्रातील विद्वान तरुण उत्साहाने ओसंडून जाऊन मोठ्या आशेने आपल्या मनातील अनेक प्रकल्प घेऊन भारतात परत आला होता. तो त्याच उत्साहाच्या भरात अतिशय मोकळेपणाने एका उच्च पदाधिकाऱ्याच्या केबिनचा दरवाजा उघडून धाडकन त्याच्यासमोर उभा राहिला होता. त्याला अत्यंत स्पष्ट शब्दांत त्या अधिकाऱ्याने बजावले की, तुम्ही असे अचानक परस्पर माझ्याकडे येण्याचे कारण नाही. तुम्हाला योग्य त्या मार्गानेच म्हणजे माझ्या हाताखालच्या लोकांमार्फतच तुमचे म्हणणे माझ्यापर्यंत पोहोचवावे लागेल. त्या अनुभवानंतर तो विद्वान शास्त्रज्ञ भारताबाहेर गेला तो पुन्हा परत न येण्याची मनात खूणगाठ बांधूनच. भारतात येण्याच्या प्रयत्नात त्याने एकच चांगली गोष्ट केली होती, त्याने त्याचे अमेरिकेतील संबंध राखून ठेवले होते.

या बाबतीत अमेरिकेतील अस्सल लोकशाही पद्धतीच्या व्यवहारामुळे तिकडे गेलेली भारतीय तरुण पिढी बिघडली आहे असेच म्हणावे लागेल. त्यांचा भारतीय व्यवहार, व्यवस्थापन, यंत्रणा व त्या सर्वांचा कामे करण्याचा वेग याबाबतीतला संयम संपुष्टात आलेला असतो. याउलट भारत निवासी तरुण वर्ग हे सर्व आपल्या पाचवीला पूजलेले कर्म आहे हे गृहीत धरूनच जगत असतो. व्यवहार करीत असतो. अमेरिकेतून येणारा प्रत्येकजण त्याला खास वागणूक व प्रतिसाद मिळेल

अशी अपेक्षा धरून आलेला असतो. पण इथे भारतात कोणत्याही विद्यापीठाचा कुलगुरु हा दुसऱ्या विद्यापीठाच्या फक्त कुलगुरुशीच संवाद साधेल किंवा कोणत्याही उद्योगाचा उच्चपदस्थ उदाहरणार्थ, अध्यक्ष हा इतर कोणत्याही उद्योगाच्या फक्त त्याच पातळीवरील व्यक्तिबरोबर चर्चा करेल. खालच्या पातळीवरील कोणाही व्यक्तिबरोबर बोलणे, चर्चा करणे हे कोणत्याही परिस्थितीत तो कमीपणाचे समजतो. भारतातील व्यवस्थापन यंत्रणा अत्यंत धीमी, संथ गतीची, कंटाळवाणी आणि नोकरशाही पद्धतीची आहे. अजूनही ती यंत्रणा ब्रिटिशांच्या कार्यपद्धतीच्या साखळदंडातून मुक्त झालेली नाही.

## हव्या त्या संधीची उपलब्धता नसणे

अमेरिकेतून भारतात परत येऊ इच्छिणारा कोणताही तरुण हा निश्चितपणे त्याच्या विषयात उच्चशिक्षित असतो. त्याच्या या उच्च शिक्षणाला योग्य अशी काम करण्याची किंवा त्याने मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग करण्याची अशी योग्य संधी भारतात न मिळणे हे ही एक भारतात परत येण्यापासून त्याचा पाय मागे खेचण्याचे कारण असू शकते. एका इंजिनिअर तरुणाला एक उद्योगपती त्याच्या रोबोटिक्सच्या प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य करण्यास तयार होता. तो इंजिनिअर जीव तोडून त्या धनिकाला रोबोटिक्स म्हणजे काय ते समजावून देण्याचा प्रयत्न करीत होता; परंतु त्या धनिकाला रोबोटिक्स व त्या संबंधीचा प्रकल्प याबद्दल काहीही उमगत नव्हते. या प्रचंड गर्दीच्या देशात रोबोटचा काहीही फायदा होऊ शकणार नाही हे त्या इंजिनिअरला समजले व स्वत:चा वेळ वाया गेल्याची त्याला खात्री पटली.

भारतीय मनुष्य अमेरिकेत एकाकी पडलेला असतो. भारतातील त्याची पाळेमुळे नष्ट झालेली असतात आणि त्याचवेळी अमेरिकेत मूळ धरणे त्याला शक्य होत नाही. काही अमेरिकावासी भारतीय आपल्या संस्कृतीचा व सामाजिक रुढींचा/परंपरेचा/जीवनाचा पाया अमेरिकेत रोवण्याचा प्रयत्न करतात, तर काही भारतीय अमेरिकन संस्कृती व सामाजिक जीवन आत्मसात करण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी ते आवर्जून अमेरिकन कुटुंबियांशी मैत्रीचे संबंध जोडतात, त्याच्या घरी

भेट देतात, अमेरिकन थिएटर, ऑपेराला मुद्दामहून जातात. अमेरिकन मानसशास्त्र व त्याच्या चेतनाशक्ती जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. पण भारतीय माणसाचे हे सामाजिकीकरण केवळ आपल्या कामावरील सहकाऱ्यांपुरतेच व तेही कार्यालयीन सभा, परिषदा, संमेलने व त्या वेळच्या चहा जेवणापुरतेच मर्यादित राहते. हा! स्वत:च्या घराभोवतीचे लॉन नीट करताना कुंपणावरून शेजारच्या अमेरिकन माणसाला 'हाय' करण्यापर्यंतच त्यांची मजल जाते. अशावेळी सुद्धा ओठ थोडेसे विलग करून फक्त स्मितहास्य होते. ओठ उघडून चार दोन शब्द काही तोंडावाटे बाहेर पडत नाहीत. एरवी शेजारी सुद्धा पूर्वनियोजित ठरविलेल्या वेळेशिवाय एकदाही भेटत नाहीत. प्रत्येक कुटुंब घराच्या बंद दरवाज्यात सुरक्षितपणे स्वत:ला कोंडून घेऊन दिवस कंठीत असतो. इतर अनेक कुटुंबांप्रमाणे स्वत:च्या घरात फ्रीज, टीव्ही., व्ही.सी.आर., म्युझिक सिस्टीम, डिशवॉशर, वॉशिंग मशीन, मायक्रोवेव्ह व मुख्य म्हणजे नवराबायकोच्या स्वतंत्र दोन गाड्या इतके सारे जमा झाले की, हुश्श करीत घरातच लोडाला टेकून टीव्ही. पाहात आरामात बसून राहतो. ईश्वराने भरभरून दिलेल्या ऐहिक चैनीच्या गोष्टीसाठी ईश्वराला नमस्कार करीत सुखात रमतो. अशा अवस्थेत तो बाहेरून खूप सुखी समाधानी वाटतो; परंतु अंतर्यामी मात्र तो अस्वस्थ असतो. असमाधानामुळे त्याच्या मनाला एकप्रकारची पोकळी निर्माण होऊन हुरहूर लागून राहिलेली असते. आतल्या आत मनाचा कोंडमारा होऊन कधीतरी ते मन प्रक्षुब्ध होऊन उठते. काय होते ते कोणालाच काहीही सांगू शकत नाही. सर्व प्रकारची शारीरिक, वस्तुनिष्ठ सुखे तो भरपूर अनुभवतो. कामाच्या ठिकाणी त्याला कामाचे पूर्ण समाधान मिळते; परंतु हे फक्त बाह्यस्वरूपी सुखसमाधान असते. आंतरमनाचे सुखसमाधान त्याला लाभत नाही.

## कंटाळवाणेपणा

आठवड्याच्या शेवटी सुट्टीच्या दिवशी भारतीय मनुष्य आपल्या कुटुंबाला घेऊन लांबवर अगदी १००/१५० मैलसुद्धा स्वत: गाडी ड्राईव्ह करून दुसऱ्या एखाद्या भारतीय मित्राच्या कुटुंबात जातो. दिवसभर जेवणखाण व गप्पांमध्ये जीव रमवून घेतो. गप्पांचे विषय ठरावीकच असतात. भारतातील वैगुण्ये, ग्रीन कार्ड मिळण्याबाबतची त्यावेळची स्थिती, भारतीय राजकारण, किंवा शेवटी अगदी

जिव्हाळ्याचा विषय म्हणजे इन्कम टॅक्स. अमेरिकेतील भारतीय डॉक्टर्स व आय.टी. क्षेत्रातील लोकांचा तर हा फारच जिव्हाळ्याचा व न संपणारा विषय असतो. या वीकएंडच्या कार्यक्रमात एकूणच तोचतोचपणा असतो. विविधता नसतेच. म्हणूनच मग हा कार्यक्रम यांत्रिकपणे व ठरावीकपणे कित्येक आठवड्यामागून आठवडे चालूच राहतो. फक्त सोयीप्रमाणे जमण्याची ठिकाणे बदलत असतात. या सर्व वाटचालीमध्ये भारताने अनेक वैयक्तिक विचारवंत आणि प्रवीण लोकांना गमावलेले असते. परंतु त्याचबरोबर या लोकांपैकी प्रत्येकाला भारताला आणि भारतीयत्वाला पारखे व्हावे लागलेले असते. हेही विसरून चालणार नाही. सरतेशेवटी हिशोब केला तर हा तोटा सर्वांत गंभीर मानावा लागेल. भारतात जगण्याची जीवनमूल्ये वेगळी आहेत. त्या जगण्यातील अनेक अभाव, संताप येणाऱ्या गोष्टी, ऐहलौकिक सुखांची कमतरता/उणीव, अनेक सुविधांची वानवा आणि सर्वसाधारण गोंधळ, घोटाळा, गुंतागुंत, अव्यवस्था हे सगळे गृहीत धरूनही भारतीय जीवनाला एक प्रकारची अंत:स्थ ताकद असते. ही ताकद एका हळुवार पण अत्यंत गूढ अशा बंधनातून आलेली असते. ही बंधने अनेक प्रकारची म्हणजे धार्मिक, कौटुंबिक किंवा सर्वसाधारण मानवी संबंधांची असू शकतात. सध्याच्या प्रगत, शास्त्राधारित युगात त्या शक्तिला पाहिजे तर मानसिक इनपुट म्हणावे लागेल. त्यायोगे भारतीय जीवनाला एक प्रकारची विविधता व समृद्धी मिळून ती संस्कृती अस्तित्वात राहण्यासाठी साहाय्य मिळते. अमेरिकेमध्ये हिंदूंची भव्य देवळे बांधणे, त्यामध्ये हिंदू देवतांची प्रतिष्ठापना करणे, त्यासाठी भारतातून खास उपाध्याय नेणे हे म्हणजे केवळ भारतीय अस्तित्वाचा देखावा किंवा अनुकरणशीलता म्हणावी लागेल. याला फारच कमी अर्थ प्राप्त होतो. याला एकूणच फार कमी महत्त्व असते. या हिंदू देवळात होणारे सामाजिक व धार्मिक कार्यक्रम, सभा, संमेलने हे आलेल्या कंटाळ्याचे शमन करण्याचा एक उपाय होऊ शकतो. पण तो अगदी तात्पुरता असतो. बराच काळ अमेरिकेत वास्तव्य केलेल्या कुटुंबात जर आपण डोकावून पाहिले तर असा आलेला कंटाळा त्या संपूर्ण कुटुंबात भरून राहिलेला, उतरलेला आढळून येईल. अशी कुटुंबे स्वत:च्या घरात चार भिंतीआड घुसमटून गेलेली दिसतात.

वयाने वाढणारी भारतीय कुटुंबातील मुले ही एक सध्याच्या काळातील फार गंभीर समस्या बनली आहे. अत्यंत उथळ अशा संगोपनामुळे कोणत्याही संस्काराशिवाय, ते धड भारतीय नसतात व धड अमेरिकन पण नसतात. त्यांना स्वत:च स्वत:ला घडविणे आवश्यक ठरते. अशी मुले भारताविषयी संपूर्ण अनभिज्ञ असतात. त्यांना त्यांच्या पालकांबद्दल बिलकुल आदर, आत्मीयता, सहानुभूती किंवा सभ्यता असत नाही. हे सर्व भारतात लहानाचे मोठे होणाऱ्या मुलांना बाळकडू म्हणूनच मिळत असते. या उलट अमेरिकेत वाढणाऱ्या मुलाला वागण्या, बोलण्याची नीतिमूल्ये स्वत:लाच ठरवून ती आचरणात आणावी लागतात. अमेरिकेतील भारतीय पालकांना आपल्या मुलांच्या भारताविषयीच्या अज्ञानाबद्दल पूर्ण जाणीव असते. त्यामुळे ते मनातून काहीसे नाराजही असतात. मग वर्षाच्या मिळणाऱ्या छोट्याशा सुट्टीच्या निमित्ताने स्वस्तातले स्वस्त पर्यटन विमान तिकीट काढून ते मुलांना भारतात आणतात. त्या थोड्याशा अवधीत व प्रवासात, भारतातील वास्तव्यात ते मुलांच्या डोक्यात भारताविषयी असंख्य गोष्टी कोंबण्याचा धडाका लावतात. त्या प्रयत्नात काहीच साध्य होत नाही. मुलांच्या मनात गोंधळ आणि भारताविषयी अधिक दुरावा मात्र निर्माण होतो.

## दोन संस्कृतीमधील महत्त्वाचे फरक

आपण जर शेवटी सर्व मुद्यांचे विश्लेषण केले व नीट विचार केला तर असे आढळून येईल की, भारत व अमेरिका यात मुळातच फार फरक आहे. दोन्ही संस्कृतीमधील मूल्ये जर एकमेकांना पूरक ठरून ती आचरणात आली तर त्याहून उत्तम काहीच असणार नाही. भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे कठोर किंवा जहाल मतांचे पालन असते; परंतु ते कोणत्याही अडथळ्याशिवाय व काहीही गुंतागुंत नसलेले सरळ धोपट मार्गाने जीवन जगणारे दैनंदिन आयुष्य असते. याउलट अमेरिकन तत्त्वज्ञान हेच सांगते की, आयुष्यभर उपभोग्य वस्तूंचा साठा करीत राहा आणि अमाप संपत्ती व संपन्नता सतत वृद्धिंगत करीत राहा. भारतीय माणसाला लहानपणापासूनच मनावर ठसविले जाते की, कठोर संस्कृती, संस्कार पालन व संतुष्टता हीच सुखी आयुष्याची आवश्यक व उत्तम गुरुकिल्ली आहे. याप्रकारचे अनेक शाब्दिक धडे आजीच्या गोष्टींमधून, देवळामधील प्रवचनामधून आणि

अनेक बोधकथांच्या पुस्तकामधून त्याच्या गळी उतरविले जातात. अमेरिकेतील मुलांची प्रकृती किंवा स्वभाव मात्र वास्तवतेला धरून असतो. अमेरिकन माणसाच्या मनात शाश्वतकालाबद्दल, सनातन तत्त्वाबद्दल एक प्रकारची ठाम, अढळ अशी बेपर्वाई असते. त्याला फक्त एकच गोष्ट ठाऊक असते. दर रविवारी नियमाने चर्चला जाणे, प्रिस्टने दिलेला नीतिपाठ श्रवण करणे व भविष्याची अजिबात चिंता न करणे, काळाच्या पडद्याआड गेलेला दिवस आणि उगविण्यापूर्वीचा उद्याचा दिवस या दोन्हीबद्दल चिंता करून आजच्या दिवसाचा आनंद का घालवून बसा? असाही तो विचार करतो. ओमर खय्यामची विचारसरणी तो आचरणात आणतो. तो आपले नित्याचे काम अत्यंत तत्परतेने, कष्टाने व सचोटीने करतो. संपत्ती जमा करतो. आयुष्य मनापासून उपभोगतो. स्वत:च्या मरणानंतर काय होईल याचा विचार करायला त्याला वेळच नसतो. तो आपले मृत्युपत्र मात्र योग्य रितीने करून ठेवतो. आपल्या मरणानंतर नेमून दिलेली वैकुंठ संस्था त्या पुढची सर्व काळजी घेईल यावर विश्वास ठेवून तो निश्चिंत राहतो. अमेरिकेत राहणारा भारतीय मनुष्य या मूलभूत तत्त्वांशी मनापासून निगडित राहू शकत नाही. त्यामुळे त्याची अवस्था अर्धवट, त्रिशंकूप्रमाणे लोंबकळणारी होते. तो व्यावहारिकदृष्ट्या कितीही संपन्न झाला तरी ह्या पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या गुंतागुंतीच्या विचारचक्रातून बाहेर पडू शकत नाही. कदाचित अशी आशा करता येईल की, अमेरिकेतच जन्मलेली, वाढलेली पुढची पिढी खूपच चांगले आयुष्य जगू शकेल. कारण त्या वेळेपर्यंत त्या पिढीने अमेरिकन वातावरणाशी मिळतेजुळते करून घेतलेले असेल किंवा सर्व अडचणी, त्रुटींसह भारतात परत येऊन भारतीय वळणाचे आयुष्य त्यांनी स्विकारले असेल.

प्रसिद्ध साहित्यिक श्री. आर. के. नारायण यांनी एका ठिकाणी मांडलेले हे विचार आहेत. त्यातील प्रत्येक मुद्दा अजूनही तितक्याच महत्त्वाने लागू पडणारा आहे. म्हणूनच त्याचा अनुवाद करण्याचे धाडस मी केले आहे.

* * *

## प्रकरण विसावे

# एका यशस्वी देशी अधिकाऱ्याची भारत भेट

एक अमेरिकास्थित सरदारजी इंजिनिअर वरिष्ठ अधिकारी त्याच्या सहाय्यकाबरोबर कंपनी कामासाठी भारत भेटीस येतो. त्याला त्या भेटीत आलेले अनुभव त्याच्याच शब्दांत वाचण्यासारखे आहेत –

मी एका कंपनीच्या कामासाठी अधिकृतपणे भारतभेटीसाठी गेलो होतो. त्यावेळी मला आलेले अनुभव मी एकत्रित मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. मी एका रासायनिक उत्पादन कारखान्याचा वरिष्ठ प्रकल्प प्रमुख म्हणून काम करतो. माझ्या कंपनीने तयार केलेला एक नवीन प्रकल्प भारतात कार्यान्वित करण्याच्या प्राथमिक कामासाठी भारतात येत होतो. मुख्य म्हणजे मी अमेरिकेत स्थायिक झालेला मूळ भारतीय वंशाचा अमेरिकन नागरिक आहे. भारतातील नवीन प्रकल्प सुरू करण्याच्या कामात, भारतातील तंत्रज्ञांच्या मदतीसाठी, माझ्याबरोबर माझ्या कंपनीमधील एक अँग्लो सेक्सन अमेरिकन, माझा साहाय्यक म्हणून माझ्याबरोबरच भारतात येत होता. माझ्या इतर सर्व जबाबदाऱ्यांबरोबर, येणाऱ्या या साहाय्यक तंत्रज्ञाचे कामावर लक्ष देऊन त्याला वेळोवेळी सूचना, सल्ला देणे हे सुद्धा एक नेमून दिलेले काम होते. परंतु माझ्यावर टाकलेल्या या विशेष जबाबदारीवर आपल्या देशात कोणीच विश्वास ठेवण्यास तयार नव्हते. त्यामुळे या भेटीदरम्यान कित्येक वेळा मला व माझ्या साहाय्यक तंत्रज्ञाला अडचणीत आणणारे प्रसंग उद्‌भवले. माझे डोळे साफ उघडणारे या ट्रीपमधील अनुभव मी तुमच्यासमोर उघड करतो आहे. मी आमच्या कंपनीच्या प्रवास आखणी करणाऱ्या विभागाशी संपर्क साधला. त्यांना मी मुद्दामच एअर इंडियाची तिकीटे काढण्याची सूचना दिली. मी कंपनीचा वरिष्ठ अधिकारी असल्याने विमानाचा प्रवास प्रथम श्रेणीने करण्यास पात्र होतो. माझ्याबरोबर येणाऱ्या अमेरिकन साहाय्यक तंत्रज्ञाला मात्र इकॉनॉमी श्रेणीनेच प्रवास करणे भाग होते. प्रवासाला निघताना मी एअर इंडियाच्या स्वागत कक्षावर माझे प्रथम वर्गाचे तिकीट दाखविले आणि प्रथम वर्गाच्या काऊंटरवर जाऊन उभा राहिलो. त्या

काऊंटरवर काम करायला एक भारतीय महिला होती. ती माझ्याकडे ढुंकूनही न पाहता आपलेच काम समोरच्या संगणकावर करीत राहिली. मी जेव्हा तिचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिने एक जळजळीत कटाक्ष टाकून उर्मटपणे बोलण्यास प्रारंभ केला.

''दिसत नाही का? हा प्रथम वर्गाच्या प्रवाशांसाठी असलेला काऊंटर आहे. शेजारच्या काऊंटरवर असलेल्या रांगेत सर्वांत शेवटी जाऊन उभे राहा.'' अर्थातच शेजारचा काऊंटर हा इकॉनॉमी वर्गाच्या प्रवाशांसाठी होता. मी म्हणालो, ''माफ करा. आपण माझे तिकीट एकदा तपासून पाहाल काय?'' त्यावर उत्तर आले, ''सरदारजी आपको अंग्रेजी समझता नहीं क्या? हा काही मदत हवी आहे का चा बोर्ड लावलेला काऊंटर नाही. जा शेजारच्या रांगेत शेवटी उभे राहा.''

चला माझ्या प्रवासातील पहिला धडा मला मिळाला. तुम्ही तुमच्या दृष्टीने कितीही यशस्वी व उच्चपदस्थ असा, तरीही तुमचे देशी भाई बहेने तुम्हाला श्रीयुत अल्पमोली (स्वस्त) म्हणूनच ओळखतात. असो. शेवटी मी पहिल्या वर्गाचा प्रवासी म्हणून चेक इन केले. बोर्डिंग पास घेतला. विमानात बसण्यासाठी सूचना मिळताच मी प्रथम श्रेणीच्या विभागात प्रवेश केला. मला पाहताच विमानातील हवाई सुंदरीच्या चेहऱ्यावरचे हसू एकाएकी लुप्त झाले. ती अत्यंत तुच्छतेने माझ्याकडे पाहून मला म्हणाली, ''ऐकले नाही का? आम्ही फक्त प्रथम श्रेणीच्या प्रवाशांना येण्यासाठी सूचना केली होती. तुमचे तिकीट दाखवा पाहू.'' मी म्हणालो, ''पण माझ्याजवळ प्रथम श्रेणीचे तिकीट नाही असे तुम्ही कशावरून समजता?'' उलट धमकीवजा सूचना आली, ''तुमचे तिकीट दाखवा हो. तुम्ही रांगेतील इतर प्रवाशांचा विनाकारण खोळंबा करता आहात.''

मी परत हुज्जत घालीत थोडच्याशा रागातच म्हणालो, ''काहो? आत्ता माझ्यापुढे गेलेल्या माणसाला तुम्ही त्याचे तिकीट दाखवायला का सांगितले नाही? का तो गोऱ्या कातडीचा होता आणि माझा रंग तुमच्याचसारखा आहे म्हणून हा फरक करता आहात?''

''माझ्याजवळ फालतू चर्चा करायला बिलकुल सवड नाही. एकतर मला तुमचे तिकीट दाखवा अन्यथा या रांगेतून बाजूला होऊन उभे राहा पाहू.'' ती पुन्हा

फुत्कारली आणि तिने कोणाला तरी साद घातली. ‘‘मनीष, अरे लवकर इकडे येऊन या प्रवाशाला तूच सांभाळ बरे. हा जरा जास्तीच आक्रमक दिसतो आहे.’’ त्यानंतरची हकिकत थोडक्यात सांगायची म्हणजे, मनीष हा तसा मवाळ व सभ्य देशी वाटला. तरीही माझे तिकीट तपासल्यानंतरच त्याने झाल्या प्रकाराबद्दल माझी माफी मागितली. त्यानंतरचा प्रवासही फारसा सुखाचा झाला नाही. नेमकी मगाचीच हवाई सुंदरी प्रथम वर्गाच्या माझ्या विभागासाठी नियुक्त झाली होती. तिने तिच्या चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त करण्याची सुद्धा तसदी घेतली नाही. लंडनपर्यंतच्या प्रवासात तिने मला कस्पटाप्रमाणे सेवा देऊ केली. आमचे विमान दिल्ली विमानतळावर पहाटे उतरले. माझ्याबरोबर आलेल्या कनिष्ठ तंत्रज्ञाची विमानातून बाहेर येण्याची वाट पाहात मी थांबलो होतो. इमिग्रेशनच्या चक्रातून आम्ही दोघे एकदम बाहेर पडू शकू हाच माझा त्याच्यासाठी थांबण्यामागचा उद्देश होता. त्याचा हा प्रथमच परदेश प्रवास होता. मला असे वाटले की भारत हा माझा देश असल्यामुळे मी त्याला योग्य ती मदत करू शकेन.

पण लवकरच माझ्या ध्यानात आले की, जर खरोखरच मदत कोणाला हवी असेल तर ती मलाच गरजेची होती. आम्ही ज्या क्षणी इमिग्रेशन तपासणीच्या रांगेत उभे राहिलो त्याचक्षणी एका अतिशय धटिंगण कडव्या अशा जाठ अधिकाऱ्याने माझ्या पटका बांधलेल्या डोक्याकडे पाहिले. माझ्या मागे उभ्या असलेल्या माझ्या गोऱ्या तंत्रज्ञाकडेही त्याचे लक्ष गेले. तत्काळ तो मला म्हणाला, "सरदारजी जरा बाजू में खडे हो जाओ." आणि तो स्टीव्हला मोठ्या अदबीने म्हणाला, "सर, आप आगे आईये’’ स्टीव्ह नम्रपणे उत्तरला, ठीक आहे. आपण त्यांना आधी तपासू शकता. नाही तरी आम्ही दोघे बरोबरच आहोत."

स्टीव्हच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून तो जाठ अधिकारी त्याला पुन्हा म्हणाला, ‘‘सर, आपण पुढे या. त्याच्यासाठी मी तुम्हाला ताटकळत ठेवणार नाही. तुम्ही आमचे पाहुणे आहात आणि यांच्यासारख्या लोकांची आम्हाला कसून तपासणी करावी लागते. तुम्हाला आजकाल चालू असणाऱ्या आतंकवादाची कल्पना असेल ना?’’ त्याच्या या बोलण्याने मी चक्रावलोच. मी माझी नाराजी व्यक्त करून निषेध नोंदविला. पण त्याचा त्याच्यावर काहीही परिणाम झाला

नाही. उलट त्या दंडेल जाठाने मला दम भरला, ‘‘माझ्या कामात अडथळा आणण्याचा जर का तू प्रयत्न केलास तर मला तुला अटक करावी लागेल.’’

माझा आतला आवाज मला शांत राहण्यासाठी सांगू लागला. मी स्वत:ला आवर घातला. मी स्टीव्हला पुढे होण्यास सांगितले. त्याच्या पाठोपाठ येतोच असे त्याला आश्वासनपूर्वक सांगितले. थोडक्यात काय तर आम्ही भारतभूमीवर पाऊल ठेवताच मी स्टीव्हवर फारसा चांगला छाप पाडू शकलो नव्हतो. त्या जाठ अधिकाऱ्याने माझ्या तपासणीसाठी त्याच्या मनाप्रमाणे भरपूर वेळ घेतला. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव त्याच्या मनात काय चालू होते ते मला स्पष्ट करून सांगत होते. जणू काही तो मनात म्हणत होता, ‘‘हा सरदारजी भले अमेरिकेत राहात असू दे, पण इथला राजा मी आहे. मी म्हणेन तेच इथे व्हायला हवे.’’

अखेर तपासणीच्या सर्व सोपस्कारानंतर आम्ही आमच्या बॅगा घेण्यासाठी गेलो. बॅगा घेतल्या आणि कस्टम तपासणीसाठी रांगेत उभे राहिलो. स्टीव्हला मी म्हणालो, ‘‘आपल्याजवळ कस्टमच्या नियमात न बसणारे काहीच सामान नाही तर मग ग्रीन लाईनमधून आपण सरळ बाहेर पडूया’’. माझा अंदाज पुन्हा एकदा चुकला. ग्रीन लाईनमधून स्टीव्ह सहीसलामत आरामात बाहेर गेला. पण मी तसे जाऊ शकलो नाही. अंदाज करा यावेळी मला कोणी अडविले असेल. तो एक शीख भाईच होता. त्याने स्टीव्हला सन्मानपूर्वक ग्रीन लाईनमधून बाहेर जाण्यास सांगितले. मला फर्मावले, ‘‘सरदारजी, आप रेड लाईन में चले जाईये.’’ पुन्हा एकदा स्टीव्हने माझ्या मदतीला धावून येण्याचा प्रयत्न केला. तो म्हणाला, ‘‘पण आम्ही दोघे बरोबर आहोत. एकत्र प्रवास करून आलो आहोत.’’ शीख कस्टम ऑफिसरने नम्रतापूर्वक त्याला सांगितले, ‘‘सर, तुम्हाला या असल्या लोकांबद्दल कल्पना नसेल. तुमच्या देशात असे काही घडत नसेल पण इथे मात्र हे लोक सर्व गोष्टी चोरट्या मार्गाने आणतात.’’

इतके बोलून स्टीव्हकडे बघून त्याने डोळे मिचकावले. पुढे असेही म्हणाला, ‘‘माझी पक्की खात्री आहे, त्याने विमानप्रवासातच तुम्हाला पटविले असणार. दिल्लीत राहण्याची उत्तम सोय करून, एखादी सुंदर यौवना सोबतीला देण्याचेही आमिष त्याने तुम्हाला दाखविले असेल.’’

मी पुन्हा एकदा साफ चक्रावून गेलो. पण कशाचाच उपयोग नव्हता. शेवटी मी स्टीव्हला माझ्यासाठी बाहेर थांबण्याची विनंती केली. नाइलाजाने मी रेड लाईनमध्ये गेलो. तिथल्या ऑफिसरने नको इतकी सर्व सामानाची तपासणी केली. त्याला हवा तेवढा माझा मानसिक छळ केला. इतकेच नाही तर मला विनाकारण रु. ५००/– कस्टम ड्युटी भरायला लावली. या सर्व छळाला त्याने ५० मिनिटे घेतली. त्याला हे ठाऊक नव्हते की मी तासाला ६० डॉलर्स कमावतो म्हणजे माझ्या त्या ५० मिनिटांची किंमत रु. १६००/– होत होती. स्टीव्ह माझा हा सगळा मानसिक छळ पाहायला तिथे हजर नव्हता हे मी माझे भाग्यच समजतो; पण माझा हा मानसिक छळ तिथेच संपला नाही.

भारतातील कंपनीचा ड्रायव्हर आम्हाला घेण्यास विमानतळावर हजर होता. स्टीव्हला पाहताच त्याने त्याचे सामान झटकन उचलून गाडीत ठेवले. मोठ्या अदबीने त्याने स्टीव्हला गाडीचे दार उघडले आणि स्टीव्हला बसण्याची विनंती केली. माझ्याकडे त्याने ढुंकूनही पाहिले नाही. माझे सामान तो डिकीत ठेवण्याची मी वाट पाहात थांबून राहिलो. त्यावर तो ड्रायव्हर मला म्हणाला, ‘‘सरदारजी ईश्वराने दोन हात आपल्याला कशाला दिले आहेत?’’ आम्ही हॉटेल अशोकामध्ये गेलो. स्वागतकक्षामध्ये स्टीव्हचे तोंडभरून स्वागत झाले. अर्थातच, हॉटेलच्या बॉयने स्टीव्हचेच सामान प्रथम उचलले. या सर्व ठिकाणी स्टीव्ह त्याच्याकडून नाराजी व्यक्त करीत होता. मी त्याचा वरिष्ठ अधिकारी असल्याने माझी काळजी जास्त करून, मला प्रथम सेवा देण्यासाठी तो सतत जीव तोडून सांगत होता. परंतु गोऱ्या माणसाचा वरिष्ठ एक भारतीय असू शकतो यावर कोणीही विश्वास ठेवायला तयार नव्हते. कदाचित इतक्या वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही गोऱ्या कातडीच्या गुलामगिरीतून ते अजूनही बाहेर पडले नव्हते.

ज्या भारतीय उद्योगाच्या कामासाठी आम्ही दोघे आलो होतो, त्या कंपनीच्या मुख्य कार्यालयात दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही पोहोचलो. तिथेही मला दुय्यम दर्जाची वागणूक देणे चालूच राहिले. त्या कंपनीच्या चीफ इंजिनिअरने स्टीव्हचे जोरदार स्वागत करून त्याच्याशी प्रथम हस्तांदोलन करण्यातच धन्यता मानली; परंतु तिथे मात्र परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे मला शक्य झाले. मी स्टीव्हला प्रत्यक्ष

प्लांटवर जाऊन तिथली मशिन्स व इतर गोष्टींची तपासणी करण्यासाठी अधिकारवाणीने सूचना दिल्या, तेव्हा मात्र त्या चीफ इंजिनिअरच्या ध्यानात आले की माझ्याशीच त्याला संपर्क साधून पुढचे काम करणे आवश्यक आहे. त्यासाठी स्टीव्ह हा माणूस नसल्याचे तो समजून गेला. तो लगेच ओशाळला. त्याने माझी माफी मागितली. मी स्टीव्हला घेऊन जेव्हा राज्य हस्तकला भांडारात खरेदीसाठी गेलो तिथे मात्र सर्वांत वाईट अनुभव आला आणि खूप मनस्ताप झाला. खरे तर त्या दुकानात स्टीव्हला त्याच्या कुटुंबीय व मित्रमैत्रिणींना देण्यासाठी विकत घेण्याच्या भेटवस्तू निवडण्यासाठी मी मदत करणार होतो. परंतु त्या एम्पोरियममधील महिला विक्रेतीने मला पूर्ण दुर्लक्षिले आणि स्टीव्हवर सर्व लक्ष केंद्रित करून त्याच्यावर स्वागताचा वर्षाव केला. मी जेव्हा तिच्या बोलण्यात भाग घेऊन मधे येण्याचा प्रयत्न केला तेव्हा इंग्रजी भाषेतूनच ती मला रागाने म्हणाली, ''ओ मिस्टर! तुम्ही जरा गप्प राहता का? मला या पाहुण्याला अटेंड करू दे. हे पाहुणे डॉलर्समध्ये भरपूर खरेदी करणार आहेत. तुमच्यासारखी स्वस्तातील स्वस्त साडी खरेदी करून बायकोला खूश करणार नाहीत.''

तिचे हे बोलणे खुद्द स्टीव्हलाही मुळीच आवडले नाही. तो त्या महिला विक्रेतीला म्हणाला, ''मॅडम या देशातील तुम्हा लोकांना झाले आहे तरी काय? तुम्ही तुमच्याच लोकांना अशी वाईट वागणूक का देता? हे गृहस्थ माझे वरिष्ठ अधिकारी आहेत. माझ्यापेक्षा यांची मिळकत दुप्पट आहे. कदाचित माझ्यापेक्षा दुप्पट खर्च हे गृहस्थ करणार आहेत.'' त्या महिलेचा चेहरा उतरून पाहण्यासारखा झाला होता. स्टीव्हने मला ताबडतोब त्या एम्पोरियममधून काहीही खरेदी न करता बाहेर काढले. मला वाटते त्यालाही त्यानंतर ते सर्व सहन करणे अशक्य झाले होते.

बाहेर पडताना स्टीव्ह मला म्हणाला, ''तुमच्या कातडीच्या रंगामुळे अमेरिकेत तुम्हाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असेल, पण तुमच्याच देशात तुमच्याच लोकांकडून मिळणारी ही भेदभावाची वागणूक फारच वाईट व भयंकर आहे. आपण इथे येण्यापूर्वी तुम्ही मला हे सांगत होतात. परंतु माझा त्यावर विश्वास बसत नव्हता. मला वाटत होते तुम्ही विनोदाने सांगत आहात.''

यावर मान खाली घालून ऐकण्यापलीकडे मी काहीच करू शकत नव्हतो.

* * *

## प्रकरण एकविसावे

# अमेरिका न परतीची वाट – अर्थात क्ष + १ अवस्था

एखादा भारतीय व्यावसायिक अमेरिकेत स्थलांतर करून जेव्हा 'अनिवासी भारतीय' म्हणून ओळखला जाऊ लागतो, त्यानंतर लगेचच त्याला एका चमत्कारिक रोगाने पछाडले जाते. त्या रोगाची अनेक लक्षणे आहेत. अस्वस्थता, चिंता, धास्ती, आशा, भविष्यातील संदिग्धता ही सगळी लक्षणे ठाण मांडून बसलेली आढळतात. या सर्वांमागे भारतात परत जाण्याचा डोक्यात वळवळणारा जंतू हेच कारण असते. शेक्सपिअरच्या शब्दांत म्हणजे ''मन त्या गोष्टीसाठी धाव घेते आहे, परंतु हाडामासाचे शरीर त्याला साथ देत नाही. ते कमी पडते.'' वैद्यकीय शास्त्रात या अवस्थेला अजून तरी योग्य शब्द सापडलेला नाही. या अत्यंत चमत्कारिक अवस्थेला आपण नाव देऊ क्ष + १ – अवस्था.

या रोगाला जाणून घेण्यासाठी त्याची पूर्वपीठिका जाणून घ्यायला हवी. विशिष्ट अशा हुशार मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांचे शाळेच्या आयुष्यापासून एक ध्येय नक्की ठरलेले असते. ते म्हणजे भारतीय सरकारने पुरस्कारित केलेल्या व सरकारच्या अमाप मदतीवर चालणाऱ्या एखाद्या तांत्रिक उच्च विद्यापीठात प्रवेश मिळविणे व उत्तम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त करणे. स्वत:चे अफाट कष्ट व संपूर्ण कुटुंबाचे नैतिक पाठबळ या जोरावर तो विद्यार्थी ध्येय गाठतो. आता सारे जग जिंकण्याच्या ईर्षेने पेटलेल्या विद्यार्थ्यांच्या नजरेसमोर एका नव्या जगाचे दिवे चमकू लागतात. अमेरिकेच्या वकिलातीमधून शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्याचा एफ् – १ परवाना मिळविण्याची त्यांची धडपड सुरू होते.

व्हीसा मिळण्याची अनेक अडथळ्यांची शर्यत पार केल्यानंतर आणि त्यानंतर सर्व कुटुंबीय, मित्रमंडळींचा साश्रू नयनांनी निरोप घेतल्यानंतर हे हिरो उच्च विद्याभ्यासाच्या मक्केला येऊन पोहोचतात. निघण्यापूर्वी ते आपल्या कुटुंबीयांना, मित्रमैत्रिणींना अमेरिकेहून एक दिवस परत येण्याची भरघोस आश्वासने देतात.

त्यानंतर आपल्या पाल्याचे प्रत्येक यश संपादण्याच्या प्रत्येक टप्प्याचे रसभरीत वर्णन आपल्या नातेवाइकांना पालक मंडळी अत्यंत अभिमानाने सतत करीत राहतात. त्याचे शिक्षणकालातील पहिल्या काही परीक्षेमधील त्याने मिळविलेले मार्क्स (Grade Point Average), त्याने विकत घेतलेली पहिली कार - बहुधा ती २० वर्षांची जुनी असते, त्याची पहिली नायगारा धबधब्याची सहल - तिथे त्याने काढलेल्या ठरावीक जागेवरचे फोटो, त्याचा अमेरिकेतील पहिला हिवाळा - बर्फात पहुडलेल्या त्याच्या फोटोसकट - अंगातील जॅकेट व हातातील गरम मोज्यांसह सर्वांचे प्रदर्शन करून हे वर्णन जास्तीतजास्त कौतुकाचे करण्याचा आटापिटा चाललेला असतो. दोन वर्षे भुरकन उडून जातात. अर्थातच, प्रत्येक पाल्य प्रथम क्रमांकाने पदवी प्राप्त करतो. मग त्याची अशा एका नोकरीची शोधाशोध सुरू होते की ज्यामध्ये त्याला गलेलठ्ठ पगार तर मिळेलच शिवाय ती कंपनी त्याला ३'' x ३'' च्या भुऱ्या रंगाचा प्लास्टिकचा तुकडा मिळवून देण्यासाठी उपयोगी पडेल. हा प्लास्टिकचा तुकडा म्हणजेच सर्वांना परिचित असलेला व हवे असलेले ग्रीन कार्ड असते. अमेरिकन कंपनीला हा स्वस्तातील सौदा वाटून त्याला नोकरी देण्यास कंपनी तयार होते. त्याला नोकरीच्या पहिल्या पंधरवड्यानंतर पगाराचा चार आकडी रकमेचा डॉलरमधील चेक हातात पडतो. मिळालेला चेक पाहून त्याच्या मनात खळबळ माजून जाते. त्याचबरोबर भारतात परत येण्याचे विचार हवेत विरून जातात. त्यानंतरचे त्याचे सर्वांत प्रमुख उद्दिष्ट असते ग्रीन कार्ड मिळविणे. तेही त्याला वर्षभरात साध्य होते. एव्हाना त्याच्या भारतातील कुटुंबीय मंडळींना त्याच्यावर होणाऱ्या अमेरिकन वातावरणाच्या परिणामांची विशेषत: एड्स् सारख्या रोगाची चिंता वाटू लागते. मग ते पालक जवळच्या, ओळखीच्या सुयोग्य अशा साथीदाराची, आपल्या पाल्यासाठी एक यादी बनवून ठेवतात. यादी झाल्यानंतर आपल्या दिव्य, सद्गुणी, असामान्य पाल्याची प्रथम भारत भेटीची आतुरतेने वाट पाहात राहतात. अखेर पहिल्याच मिळालेल्या संधीचा व सुट्टीचा फायदा घेऊन चिरंजीव भारत भेटीसाठी येतात. येताना सर्व नातेवाइकांना काही ना काही भेटवस्तू निदान चॉकलेट तरी घेऊन यायला विसरत नाही. आल्यानंतर अमेरिकेच्या सुबत्तेच्या सुरस कथा, तोंड फाटेपर्यंत अमेरिकेची स्तुती करून सांगत राहतो. भारतातील

लोकांना ते सर्व वर्णन कल्पनेपलीकडचे असते. त्यानंतर पालकांनी तयार केलेल्या यादीतील प्रत्येक उमेदवाराची तो मुलाखत घेतो. त्यामधूनच तो एका सुयोग्य वाटणाऱ्या मुलीची अमेरिकनाईज्ड करण्यासाठी निवड करतो. मुलाचे प्रदीर्घ मुदतीचे अमेरिकेतील वास्तव्य हेच मुळी पसंतीचे मूलभूत कारण असते, त्यामुळे त्यानंतर भारतात लगेच परत येण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

नवीन लग्न झालेले दांपत्य अमेरिकेला येते. पती कामावर गेल्यावर पत्नीला एकच काम असते. भारतीय विवाहात ह्या 'अरेञ्ड' पद्धतीने लग्नगाठी कशा बांधल्या जातात हे स्थानिक अमेरिकन लोकांना समजावून सांगणे. अमेरिकन लोकांना मात्र हे फार रानटी स्वरूपाचे आणि समतावादी असल्यासारखे वाटते. बिंदी लावणे आणि साडी नेसणे हे अमेरिकन लोकांना समजावून सांगताना नववधूची त्रेधातिरपीट उडते व बोबडी वळून जाते. या सर्वांतून सुटका करून घेऊन घरगुती वातावरणाच्या ओढीने मग आठवड्याच्या सुट्टीच्या दिवशी हे युगुल एखाद्या मित्राच्या घरी मुक्कामाला जाते. तिथे सर्व प्रकारचे करमणूक व सामाजिक कार्यक्रम होतात. त्यामध्ये लंच/डिनर पार्टीज्, हिंदी किंवा आपल्या भाषेतील सिनेमा व्हिडिओवर पाहणे, इंडियन स्टोअरमधून गरजेच्या लागणाऱ्या वस्तूंची खरेदी करणे किंवा भजने असे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम असतात. सुरुवातीच्या काळात नववधू आप्तस्वकीयांच्या मायेला आणि प्रेमळ सहवासाला मुकते. ते तिला खूप जाणवते; परंतु घरात असणाऱ्या वॉशिंग मशीन, व्हॅक्युम क्लिनर, डिश वॉशर ह्या सुखसोयी निर्माण करणाऱ्या आधुनिक यंत्रसामुग्री व त्याचबरोबर अत्यंत प्रखरपणे आपला अंमल चालवणाऱ्या सासूबाईंची अनुपस्थिती तिला सुखावून टाकते. भारतातून सुट्टीवरून परत जाणाऱ्या मित्रांकडून मिळणाऱ्या भारतातील थोड्याफार बातम्या व हकिकती त्यांची भारताबद्दलची उत्सुकता थोडीफार शमवून टाकतात.

मित्रांच्या बैठकीत भारतात परत जाण्याचा विषय अनेक वेळा चर्चेला येतो; परंतु अशा बैठकीचा प्रमुख वक्ता किंवा सर्वांत महत्त्वाची असलेली व्यक्ती तो विषय टाळून दुसरा विषय चर्चेला घेते. कारण त्या वेळेपर्यंत बैठकीतील अशी महत्त्वाची व्यक्ती कार्पोरेट जगतात वरच्या थरातील उगवता तारा झालेली असते.

तसेच त्या व्यक्तिने नुकतेच दोन कार्ससाठी असलेल्या गराजची सोय असलेले घर खरेदी केलेले असते. असे दोन कारच्या गराजचे घर विकत घेण्याचे स्वप्न हे अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांचे एक महत्त्वाचे स्वप्न असते. येऊ घातलेल्या बाळाची चाहूल ही तर भारतीय कौटुंबिक जीवनातील आनंदाची व परिपूर्णतेची परिसीमा असते. अगदी वेळेवर सासूबाईंचे आगमन होते. शेवटी कोणाही सुजाण पालकाला निवड करायला सांगितले तर आपला कुलदीपक अमेरिकेऐवजी भारतात जन्माला यावा असे कदापीही वाटणार नाही.

पण अखेर, पैशाने विकत घेता येणारी सगळी भौतिक सुखे हेच मुळी अस्वस्थतेचे मूळ कारण बनते. ती सर्व सुखे मिळूनही काहीतरी हरवल्याची एक प्रकारची भावना सतत मनाला टोचणी देत राहते. परदेशी बनावटीच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू, परदेशी कार इ. सर्व वस्तू वापरून मन तृप्त झालेले असते. आठवडा अखेरीची संमेलने, पार्ट्या याच्यातील तोचतोचपणामुळे त्याचाही कंटाळा आलेला असतो.

मध्यमवयात किंवा प्रौढवयात उभ्या राहणाऱ्या अनेक समस्या भेडसावायला लागतात. व्यवसायामधील कारकिर्दीचा आतापर्यंतचा वर वर जाणारा आलेख आता सरळ रेषेत उमटू लागतो. एकूणच कर्तृत्वाची व यशाची उंची सरळ पठारावर येऊ लागते. तरुण व अधिक आक्रमक तडफदार अमेरिकन युवकांना तुम्हाला डावलून तुमच्या आधी बढत्या मिळतात. अर्थचक्राच्या ठरावीक चक्रानुसार येणाऱ्या मंदीच्या लाटेमुळे आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे केले जाणारे विलीनीकरण, लादली जाणारी नवीन नवीन बंधने यामुळे करत असलेल्या नोकरी व्यवसायावरच गदा येण्याची दाट शक्यता निर्माण होते. अमेरिकन सोसायटी व सामाजिक जीवनात मिसळून जाणे शक्य नसल्याने आणि तसे करण्यास भारतीय माणसाची मनोमन इच्छा होत नसल्याने तो स्वत:ला एक प्रकारच्या कोषात अडकवून ठेवतो. घरात वाढत्या वयाची मुले समजण्याच्या अवस्थेत येतात. अमेरिकन उच्चाराबरोबरच ती मुले, कार्टून्स पाहात बसणे, हॅम्बर्गर्स व तत्सम कचरा (जंक) अन्नपदार्थ खाणे अशा सवयी लावून घेतात. याखेरीज काही 'डेटिंग' सारखी अमेरिकन मूल्ये त्यांना अंगवळणी पडू लागतात. भारतीय जीवनातील अतिशय स्वच्छ, सदाचारी वर्तनाची

मूलतत्त्वे पालक त्यांच्या पाल्यांना आचरणात आणण्याचा कळकळीचा सल्ला देतात. त्याला प्रतिसाद म्हणून मुले असंख्य न संपणाऱ्या प्रश्नांचा भडिमार करीत असतात.

दोन पिढ्यांमधील अंतराबरोबरच सांस्कृतिक पातळीवरील दरीमुळे दोन पिढ्यात महद्‌अंतर निर्माण झालेले असते. भारतात परत जाण्याचा विचार गंभीर स्वरूपात सर्वप्रथम अशा परिस्थितीतच येतो आणि त्याबद्दल मुळीच आश्चर्य वाटत नाही. त्यानंतर नजिकच्या काळात मिळणाऱ्या सुट्टीचा फायदा घेऊन, भारतात कायमचे परत येण्याचा निर्णय कसा काय मानवेल या शक्यतेचा अंदाज घेतला जातो. भारतात कमी मिळणारा पगार किंवा मानधन आणि भारतातील नोकरशाही पद्धतीचा सरकारी कारभार याकडे तो थोडेफार दुर्लक्ष करतो; परंतु त्याच वेळी खाजगी क्षेत्रातील व्यक्तिगत दडपशाहीमुळे घाबरून, गोंधळून जातो. त्याने मिळविलेल्या लांबलचक शिक्षणाच्या पदव्यांची माळ लक्षात घेता तो कोणत्याही उद्योगाचा कार्यकारी संचालक किंवा अध्यक्ष होण्याच्या लायकीचा असतो व त्याची तशी उमेदही असते; पण भारतात तो स्वत:चाच व्यवसाय करण्याचा विचार करतो. १९७० च्या दशकात त्याच्यामध्ये असणाऱ्या व्यवसायातील व्यवस्थापन कौशल्य दाखवायला जास्तीतजास्त कुक्कुटपालन व्यवसायाचीच निवड केली जात असे. १९८० च्या दशकात संगणक व इलेक्ट्रॉनिक्स विषयाभोवती व्यवसायजगत फिरत होते. भारतीय सरकारी यंत्रणेमधील लालफितीचे अडसर व प्रचंड भ्रष्टाचार याविरुद्ध खंबीरपणे सामना करण्याचा तो ठाम निश्चय करतो; परंतु या सर्वांमागे एकच मोठी अडचण असते ती त्याला सतत भेडसावत असते. अमेरिकेत अशा प्रकारच्या फारच कमी समस्यांना तोंड द्यावे लागते. शेवटी काय? तुम्ही आयुष्यभर जतन करून ठेवलेल्या, मनात योजून ठेवलेल्या अनेक कल्पना एकाएकी झटकन बाजूला टाकू शकत नाही हे खरेच. भारतात परत जायचे म्हणजे टॅक्सचे गणित सोडविणे, तसेच कस्टमच्या नियमामधून सहीसलामत बाहेर पडणे या विषयांचे मनात चक्र सुरूच असते. ह्या सर्व विचारांचा एकत्रित परिणाम म्हणजे भारतात परत जाण्याची तारीख नक्की करणे, हे पुढे पुढे ढकलणे. यामध्ये या क्ष + १ कहाणीचे मर्म सापडते.

पुढची अनेक वर्षे येतात अन् जातात. पण आमच्या या मित्राची भारतात परत येण्याची काहीच लक्षणे नसतात. सुमारे ४० वर्षांनंतर आमचा हा वृद्ध झालेला मित्र जणू काही ठरल्याप्रमाणे हार्ट ॲटॅकमुळे मरण पावतो. मित्राने फार पूर्वी इच्छा व्यक्त केलेली असते की मरणानंतर त्याच्या जन्मगावी, भारतभूमीवरच त्याला चिरनिद्रा घ्यायला आवडेल. त्यानुसार अखेर शेवटी आमचा मित्र जन्मभूमीवर कायमचा परत येतो. परंतु त्या वेळेपर्यंत मित्राच्या परतीची इतके दिवस आतुरतेने वाट पाहात होते ते, त्याच्या आधीच त्यांच्या अंतिम प्रवासाला निघून गेलेले असतात.

वेगळ्या शब्दांत सांगायचे झाले तर 'क्ष' म्हणजे चालू वर्ष असे गृहीत धरले तर भारतात परतीचे वर्ष क्ष + १ असे उद्दिष्ट ठेवलेले असते. 'क्ष' हे गृहीत सतत बदलत असते त्यामुळे साध्य हे कधीच गाठले जात नाही. ग्रेट मेल्टिंग पॉट अशा म्हटल्या जाणाऱ्या अमेरिकेत स्वत:ला वितळवून किंवा मिसळवून टाकता येत नाही. आपल्या पूर्वापार भारतीय संस्कारांचे, बंधनांचे गलबत भक्कम साखळदंडांनी नांगरून जखडून ठेवलेले असते. त्याचबरोबर भौतिकसुखांच्या मायाजालातून बाहेर फेकल्या जाण्याच्या भीतीमुळे आमच्या या भारतीय अनिवासी मित्राची धरसोड सुरू असते. दोन वेगळ्या जगण्याच्या जगांच्या संधीप्रकाशाच्या झोतात तो अधांतरी हेलखावे खात राहतो. सर्वांत आश्चर्य म्हणजे या प्रकारची दोलायमान अवस्था आशिया खंडातील फक्त भारतीय लोकांच्याच वाट्याला का येते? इतर सर्व आशिया खंडातील लोक - जपानी, चिनी, कोरियन, इतकेच नव्हे तर पाकिस्तानीसुद्धा या अवस्थेपासून दूर असतात. हीच अमेरिकन भारतीयांची शोकांतिका ठरते.

श्री. आर. के. नारायण यांचा हा एक लेख पण मला भाषांतर करावा असे मनापासून वाटले. भारतीय मनाचा अभ्यासपूर्वक केलेला हा विचार आपल्या सर्वांनाच विचार करायला लावणारा असा आहे.

* * *

### प्रकरण बाविसावे

# माझे अमेरिकेत स्थलांतर - एक तडजोड

जानेवारी २००० साली सचिनने भारतात येण्याचा निर्णय घेतला. एक अनुभव म्हणून व मुलांना भारतीय राहणीची ओळख व्हावी, आजीआजोबांचा सहवास मिळावा हा उद्देश तर होताच. शिवाय मी निवृत्त झालो होतो त्यामुळे आम्ही पण जवळ राहू शकू या हेतूने त्याने भारतात येण्याचा निर्णय घेऊन तो अमलात आणला. मी व रेखा खूप खूश झालो. त्यानंतर १२ वर्षे आम्ही जास्त करून त्याच्याजवळ बंगलोरला राहिलो. आम्हाला नातवंडांचे बालपण डोळे भरून पाहता आले. निवृत्तीनंतरचे आयुष्य आरामात कशाचीही चिंता न करता व्यथित करता आले. मुलांना आमचा सहवास मिळाल्यामुळे त्यांना आजी आजोबांच्या नात्याचे फायदे व मजा मिळाली. त्यांच्याजवळ असल्याने आमची चिंता न करता सचिन व मोनिकाला राहता आले.

श्रीनिवास मात्र परत न येण्यावर ठाम होता आणि त्याच्या निर्णयास योग्य असे आयुष्य तो व स्वाती जगत होते. अमेरिकन पध्दतीचे जगणे त्यांनी आत्मसात केले. त्यातील फायदेतोटे ओळखून आपल्या दिनक्रमात त्यांनी बदल केले. आयुष्य आनंदाने व झोकून देऊन जगण्याची वृत्ती त्यांना आवडली. अमेरिकनांसारखी मधूनमधून भटकंती चालू केली. त्याचबरोबर आपले संस्कार पण तो विसरला नाही. दरवर्षी नियमितपणे गणपती उत्सव घरी करतो. बोस्टनच्या सांस्कृतिक मंडळाचा तो एक प्रमुख घटक बनला आहे. त्याच्या जोडीने स्वातीचा सहभाग असतो. घर, गाड्या आणि सर्व आधुनिक सुखसुविधा यांचा आनंद घेत असतो. ईशानला अमेरिकेत राहण्याच्या दृष्टीने तयार करण्यात दोघांचा कायम प्रयत्न चालू असतो. अभ्यास, खेळ, कला सर्व गोष्टीत त्याने प्रावीण्य मिळवावे यावर त्यांचा कटाक्ष आहे. ईशानने सुध्दा त्याला भरघोस प्रतिसाद दिला आहे. गेल्या पंधरा वर्षांत आम्ही त्याच्याकडे पण चार वेळा दीर्घ कालासाठी राहून आलो. त्यामुळे ईशानला पण आमच्याशी जवळीक निर्माण झाली.

ऑगस्ट २०११ साली सचिनने परत अमेरिकेत येण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे ते सर्वजण ८ ऑगस्ट २०११ रोजी फोलसम येथे येऊन पोहोचले. त्याला मिळालेल्या इंटेलच्या वर्ष २०१० मधील एक्सलन्स ॲवॉर्डमुळे त्याला ही संधी चालून आली. त्याचा तो निर्णय सर्वांना विचार करायला लावणारा होता. पण त्याच्या करिअर व मुलांच्या दृष्टिकोनातून अगदी वेळेवर घेतला गेलेला तो निर्णय ठरला. आणखी थोडा उशिर झाला असता तर मुलांना इथे रुळायला थोडे जड गेले असते. पण २०११ साली आल्याबरोबर दोघे जणू काही इथेच वाढले आहेत इतके इकडचे होऊन गेले. मुख्य म्हणजे शाळेत ते कोठेही कमी पडले नाहीत. अभ्यास, खेळ, इतर वागणे, बोलणे, खाणे यात त्यांनी स्वत:ला सगळे बदलून टाकले आहे.

गेल्या दोन वर्षांपासून श्रीनिवास आमच्या मागे ग्रीन कार्ड म्हणजे अमेरिकेत कायम वास्तव्य करण्याचा व्हीसा घेण्यासाठी मागे लागला होता. आता सचिन पण अमेरिकेत परत आला म्हटल्यानंतर आम्ही तसे करण्याचा पक्का विचार केला. श्रीनिवासने त्यासाठी अर्ज भरला. चक्रे फिरू लागली. त्यासाठी लागणारी कागदपत्रे जमा करण्यातच आठ महिने लागले. शेवटी एकदाचे ११ एप्रिल २०१२ रोजी ग्रीन कार्ड मिळाले. लगेचच २५ एप्रिल रोजी आम्ही बोस्टन येथे येऊन थडकलो. अमेरिकेचे कायमचे रहिवासी म्हणून वास्तव्य सुरू केले. भारताची नाळ तोडून टाकताना मनाला खूप यातना झाल्या.

पण हा निर्णय आम्ही दोघांनी पूर्ण विचार करून घेतला होता. वाईट जरूर वाटले पण कसलाही पश्चात्ताप झाला नाही. एक नक्की की हा निर्णय म्हणजे माझ्या आयुष्यात केलेली सर्वांत मोठी व दूरगामी अशी तडजोड होती यात शंकाच नाही. मनाला पटत नव्हते तरी डोक्यातील मेंदूने घेतलेला हा निर्णय होता. अनेकांनी आम्हाला वेड्यात काढले. असे न करण्याचा सल्ला दिला. पण आम्ही आमच्या निर्णयावर ठाम होतो. तडजोड जरी असली तरी पूर्ण विचारांती, आनंदाने, स्वखुशीने स्वीकारलेला, माझ्या कुटुंबासाठी योग्य वाटला असा हा पर्याय होता व आहे. निर्णय घेताना दोन्ही ठिकाणी राहण्यातील सोई गैरसोयींची तुलना होणे अपरिहार्य होते. पण त्या तुलनेमध्ये तोट्यापेक्षा फायदेच जास्त नजरेसमोर आले.

हा निर्णय घेताना जे विचार माझ्या डोक्यात आले ते थोडक्यात मांडायचा मी प्रयत्न करतो.

१. आता या वयात सुध्दा ग्रीन कार्डासाठी लागणारी कागदपत्रे गोळा करताना आपल्याला त्रास झाला. आणखी काही वर्षांनंतर हे आपल्याला अशक्यच होईल. त्यासाठी लागणारी धावपळ आपल्याच्याने होणारच नाही. मग हे आताच केलेले चांगले.

२. आता दोन्ही मुले व कुटुंब अमेरिकेत कायमचे राहणार, आम्हा दोघांना गरज पडेल तेव्हा त्यांना भारतात येणे शक्य होणार नाही. त्यावेळी त्यांना व आम्हाला दोघांनाही मनस्ताप होणार. त्यापेक्षा अमेरिकेत जवळ राहणे शहाणपणाचे होईल.

३. भारतात राहिल्यास मला किंवा रेखाला आजारपण आल्यास मुलांनी काय करायचे? त्यांना त्यांचे काम सोडून वारंवार येणे शक्य नाही. आणि माझ्या पायाच्या आजारपणात हे सिध्दच झाले.

४. आता येणार नाही असे म्हणून पुढे आणखी अडचण निर्माण झाल्यावर कोणत्या तोंडाने आम्ही येतो म्हणून त्यांना सांगता येईल?

५. गेली १२ वर्षे आम्हाला सचिन, मोनिका व मुले यांच्या सहवासाची सवय होऊन गेली होती. त्यांच्यापासून दूर राहणे आता फार जड गेले असते आणि आम्हालाही त्यांच्या सहवासाचे सुख हवे होतेच.

६. एकदा इकडे सचिनकडे किंवा श्रीनिवासकडे आलो की आम्हाला कशाचीच काळजी राहणार नाही. बाहेरचे आणणे नेणे नाही. कशाची बिले भरणे नाही. कोठेही जायचे झाले तर काळजीपूर्वक आम्हाला न्यायला ते चौघे जण तत्पर असतातच. कोणतीही गोष्ट मागायच्या आधीच हजर असते. मुलांचे वाढते वय व त्यांची प्रगती पाहून मन भरून जाते.

७. अमेरिकेतील स्वच्छ व मोकळ्या हवेमुळे व वक्तशीर दिनचर्या यामुळे प्रकृती चांगली राहते. इथल्या टोकाच्या हवामानाचा त्रास होतो पण त्यासाठीची उपाययंत्रणा तयार असते. शिवाय प्रदूषणाचा अजिबात त्रास

नसतो. किरकोळ तक्रारी उद्‌भवत नाहीत. माझ्या मधुमेहामुळे येणारे आजार हे भारतातही मला सतावित असतात. ते इथे उद्‌भवले तर भारतात जे करायचे ते इथे करणे सहज शक्य आहे. शिवाय ग्रीन कार्ड मिळाल्यानंतर मिळणाऱ्या वैद्यकीय विम्याचे संरक्षण इथे मिळते. हे सुध्दा पायाच्या आजारपणात प्रत्ययास आलेच.

८. नैसर्गिकदृष्ट्या दोनही देशांची वैशिष्ट्ये आहेत. पण त्या निसर्गाचा आपल्या जगण्यात कसा उपयोग करुन घ्यायचा हे अमेरिकेत जास्त विचारपूर्वक केले जाते. त्या निसर्गाचा आनंद मिळवून देण्यास दोघेही मुलगे सदैव तयार असतात. सर्व सोयीनुसार त्याचा आनंद आम्हाला कसा घेता येईल यासाठी त्यांची धडपड चालू असते. मनात आणले तरी भारतात आता आमचे आम्ही दोघेही कोठेही जाऊ शकणार नाही.

९. पर्यटनस्थळांची विविधता भारतात खूप आहे. पण तिथपर्यंत पोहोचणे हे एक दिव्य पार पाडण्यासारखे आहे. याउलट इथे कोठेही जाताना आमची सोय हा प्रथम विचार केला जातो. त्यामुळे त्याचा आनंद आम्हाला जास्त होतो.

१०. मी वर म्हटल्याप्रमाणे वर्णभेद हा अमेरिकेत सुध्दा जास्त दिसू लागला आहे; पण त्यात उच्चवर्णीयांचा द्वेष दिसत नाही. जो भारतात ठायीठायी दिसतो. ज्याचा उच्चवर्णीयांना आता भयंकर त्रास होऊ लागला आहे. प्रत्येक क्षेत्रातील राखीव तंत्रामुळे उच्चवर्णीयांना वालीच उरला नाही. हे कटु सत्य असले तरी मान्य करायलाच हवे.

११. त्याप्रमाणेच गरीब, श्रीमंत व भिकारी यातील दरी जी भारतात प्रचंड आहे. अमेरिकेत गरीब असला तरी त्याला त्याचे रोजचे जगणे अशक्य होत नाही. अगदी भिकाऱ्याला सुध्दा दर आठवड्याला पुरेल एवढा भत्ता सरकारकडून दिला जातो. त्यामुळे अमेरिकेतील भिकारी आरामात राहून आळशी व निर्लज्ज बनतो.

१२. भारत इतर कशातही पुढारलेला नसला तरी मार्केट सजविण्यात, विक्री कलेत मात्र अमेरिकेची बरोबर करू शकतो. भारतातील मॉल संस्कृती

पाहिली की आपण भारतात आहोत की अमेरिकेत आहोत असा संभ्रम होतो.

१३. अमेरिकेत वैद्यकीय उपचार हा विमा व डॉक्टरी व्यवसाय यांच्या कचाट्यात सामान्य माणसाला न परवडणारा होऊन गेला आहे; पण एकदा का तुम्हाला विम्याचे कवच मिळाले की तुमच्या तब्येतीची काळजी तुम्हाला नाही तर ती डॉक्टर व विमा कंपनीला असते. आपल्याकडे डॉक्टर व तंत्रज्ञ यांचे ज्ञान व प्रावीण्य तसूभरही अमेरिकेपेक्षा कमी नाही; पण आजाऱ्याला हव्या असणाऱ्या इतर सोयी फार वाईट आहेत. त्यामुळेच आपल्याकडे सरकारी दवाखान्यात जायला सामान्य माणूस धजावत नाही. या उलट अमेरिकेत दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय उपचारात जात, धर्म, गरीब, श्रीमंत असा कोणताही भेदभाव केला जात नाही. या बाबतचा माझा अनुभव मी विस्तृतपणे शेवटच्या लेखात मांडला आहेच.

१४. अमेरिकन माणूस सार्वजनिक स्वच्छता, शिस्तपालन, रहदारी नियमपालन यात काटेकोर व निष्णात आहे. याउलट या प्रत्येक बाबतीत आपण भारतीय बेफिकीर व सुधारण्याच्या पलीकडे गेलेलो आहोत. रोजच्या जगण्यात त्याचा अत्यंत त्रास होतो.

१५. भारतातील खादाडी मी नक्कीच हरवून बसलो; पण त्याही बाबतीत मोनिका व स्वाती ते देण्याचा बराच प्रयत्न करीत असतात. अगदी कोपऱ्यावरची भेळ, खास ठिकाणची मिसळ, काही खास खाद्यपदार्थ, लग्नाच्या जेवणातील अळूची पातळ भाजी व त्याबरोबरचा मसाले भात हे मिळत नाही. पण त्याऐवजी अमेरिकन वेगवेगळे चविष्ट पदार्थ चाखायला मिळतात. जिभेचे चोचले तर पुरविले जातात आणि नाही म्हटले तरी हे पदार्थ खायला आता प्रकृतीची परवानगी नाही. शिवाय आत्तापर्यंतच्या आयुष्यात ते भरपूर खाऊन झाले आहे.

१६. एका गोष्टीची मात्र मला फार हळहळ वाटते. ते न मिळाल्यामुळे मन कधीकधी फार उदास होऊन जाते. ती म्हणजे मित्रांची मैफल. शेजाऱ्याचे आपुलकीचे संबंध. हे मिळत नसल्यामुळे फार चुकल्यासारखे होते. जीव

कधी कधी गलबलून जातो. अशा वेळी असे वाटते की धावत सुटावे आणि तिकडे यावे. मित्रांना भेटावे असे फार वाटते. अमेरिकेत शेजारधर्म फारसा नसतोच. असते ते कृत्रिम हसणे. नुसतेच हाय हॅलो करणे. अमेरिकन माणूस तसा एकलकोंडा व माणूसघाणा आहे. आपणहोऊन तुमच्याशी तो क्वचितच बोलेल. तुम्ही बोलायला गेलात तर त्याच्या खाजगी आयुष्यात तुम्ही ढवळाढवळ करता आहात असे तो समजेल. त्याला ते फारसे आवडणार नाही.

हे व असे अनेक विचार मनात आले. एक खूणगाठ मनाशी बांधली आहे की आता जे राहायचे ते आनंदाने, कुरकुर न करता राहायचे, जिथे राहू तिथे आपला त्रास कोणाला होणार नाही असा प्रयत्न करायचा. त्यांचा आनंद कसा द्विगुणित करता येईल त्याचा प्रयत्न करायचा. आपण या जगातून गेल्यावर आपल्या आठवणी त्यांना सुखकर ठरतील असे वागायचे. ईश्वर हे साध्य करण्यासाठी मला शक्ती देवो हीच त्याच्या चरणी प्रार्थना.

* * *

## प्रकरण तेविसावे

# अमेरिकेतील वैद्यकीय उपचार व सुविधा, . . . . .

हा लेख लिहिण्यामागे माझा अमेरिका व भारत येथील वैद्यकीय उपचार पध्दती, सुविधा, डॉक्टर व तंत्रज्ञ यांची तुलना करण्याचा मुळीच उद्देश नाही. फक्त अमेरिकेतील होणाऱ्या चांगल्या गोष्टी मी मांडायचा प्रयत्न केला आहे. भारतात या गोष्टी आणण्यासाठी अनेक अडचणी आहेत याची मला पुरेपूर जाणीव आहे. मी स्वत: भारतात अनेक वर्षे यामधूनच गेलो आहे. तिथे मला मिळालेल्या वैद्यकीय उपचाराबद्दल मी पूर्ण समाधानी आहे. किंबहुना भारतातील वैद्यकीय उपचारामुळेच मी आजवर माझ्या दुखण्यातून बाहेर पडू शकलो. भारताची लोकसंख्या, गरिबी, पोषणयुक्त अन्नाची कमतरता, एकूणच असलेले व्यवस्थापन, लोकांचा हलगर्जीपणा, हवामानामुळे होणारे तोटे व या सर्वाला अपुरी पडणारी सरकारी व खाजगी व्यवस्था ज्याच्या तुलनेत कितीतरी अधिक प्रमाणात असलेले आजारी लोक हे भारतातील वैद्यकीय उपचारातील कमतरतेचे कारण असू शकते. माझ्या या आजारपणात आणखी एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे अशा काळात आपल्याकडे असणारी नातेसंबंधातील व मित्रपरिवारातील माणसांची होणारी मदत. अशा वेळी आजारी व्यक्तिची काळजी घेऊन त्याला मदत करायला जणू काही चढाओढच लागते. मला ते नसल्याचे इथे फार जाणवले.

हे जरी असले तरी अमेरिकेत असलेली नि:स्पृह सेवावृत्ती, मार्दवता, गोड बोलणे, कामात असणारी सचोटी, स्वच्छता, नियोजन आपल्याकडे आपण का आणू शकत नाही? खऱ्या अर्थाने गरिबांसाठी – मोफत नाही पण परवडतील अशा पैशात उपचार करणारी यंत्रणा आपण का निर्माण करू शकत नाही? आणि हे शक्य नाही असे मुळीच नाही; पण त्यासाठी प्रत्येक नागरिकाने योगदान करणे आवश्यक आहे. असे भारतात घडावे ही मनापासून माझी इच्छा आहे.

आपण नेहमी ऐकतो की जर एखाद्याला सर्वांत उत्तम वैद्यकीय उपचार करून घ्यायचे असतील तर ते अमेरिकेतच शक्य आहेत. वैद्यकीय ज्ञान, व्यवस्था, सोयी हाताशी असणारी साधनसामुग्री, डॉक्टर्स व त्यांच्या मदतीला असणारा इतर कर्मचारी वर्ग यामुळे हे सहज शक्य होते. त्यामुळेच जगातून ज्यांना शक्य होते ते सगळे जण अमेरिकेत येऊन उपचार करून घेतात. याचबरोबर हेही खरे की सामान्य माणसाला अमेरिकेत वैद्यकीय उपचार घेणे हे त्याच्या आवाक्याबाहेरचे असते. त्यासाठी त्याला वैद्यकीय विमा असणे अत्यंत गरजेचे असते. कोणत्याही आजारासाठी डॉक्टरकडे जाणे हे प्रचंड खर्चाचे असते.

सामान्य माणसाला वैद्यकीय विमा हा त्याच्या नोकरीच्या संस्थेकडून किंवा कंपनीकडून काढून मिळतो. त्यामुळे नोकरी बदलली किंवा गेली तर सर्वप्रथम डोक्याला प्रश्न पडतो तो या वैद्यकीय विम्याचा. सामान्य माणसाला स्वत: विमा घेणे अवघड असते. कारण तुमचे वय, तुम्हाला असलेले आजार. तुम्ही त्यावेळेपर्यंतचे घेतलेले वैद्यकीय उपचार इ. गोष्टींचा विचार करून विम्याचा हप्ता ठरविला जातो. तो सर्वसाधारण न परवडण्यासारखा असतो.

विमा नसेल तर तुम्हाला वैद्यकीय मदत मिळतच नाही. कारण कोणताही डॉक्टर त्याशिवाय तुम्हाला तपासणारच नाही. अर्थात, यावर उपाय म्हणून सामान्य माणूस नेहमीच तत्काळ वैद्यकीय सेवा केंद्राकडे धाव घेतो. (Emergency Health Care Center) तिथे मात्र तुमचा विमा असो वा नसो तुम्हाला वैद्यकीय मदत मिळणार नाही असे होणारच नाही. तुम्हाला मिळणाऱ्या वैद्यकीय उपचारात कसलाही फरक राहत नाही. तुम्हाला उत्तम उपचारच दिला जातो किंवा विमा नाही म्हणून तुम्हाला वैद्यकीय मदत नाकारली जाणार नाही. उपचाराचे बील कसे द्यायचे ते नंतर ठरविले जाते.

या अडचणी लक्षात घेऊनच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री. बराक ओबामा यांनी एक कायदा संसदेत पास करून घेतला. प्रत्येक अमेरिकन नागरिकाची वैद्यकीय विम्याची जबाबदारी मूलत: प्रत्येक अमेरिकेच्या स्टेटची असेल असा तो कायदा पास झाला. परंतु यासाठी खूप खर्च असल्याने सर्व स्टेटना तो मान्य झाला नाही व तो कायदा सर्व स्टेटना अत्यावश्यक वा अनिवार्य होऊ शकला नाही. फार

मोजक्या स्टेटस्‌नी हा कायदा त्यांच्या स्टेटपुरता लागू केला आहे. त्या स्टेटच्या नागरिकांना त्याचा नक्कीच फायदा मिळत आहे.

आपल्याकडे जसे फॅमिली डॉक्टर ही पध्दत नाहीशी झाली आहे तसेच इथेही झाले आहे. त्याची जागा विमा कंपनीला मान्य असलेल्या व तुम्ही निवड केलेल्या एका प्रायमरी डॉक्टरने घेतली आहे. प्रथमत: त्या डॉक्टरला वेळ ठरवून घेऊन भेटावे लागते. त्या भेटीत तो डॉक्टर तुमच्या प्रकृतीची सर्व चौकशी करतो. तुम्हाला आणखी कोणा विशेष तज्ज्ञ डॉक्टरची आवश्यकता असेल तर त्याची भेट ठरवून देतो. या प्रायमरी डॉक्टरने ठरविल्याशिवाय तुम्हाला दुसऱ्या तज्ज्ञ डॉक्टरकडे जाता येत नाही. हा प्रायमरी डॉक्टर पुढे तुमची सर्व माहिती ठेवत असतो. हा डॉक्टर उपचारापेक्षा सल्ला देण्याचे काम जास्त करतो. पण एकदा तुमचा विमा झाला आणि प्रायमरी डॉक्टर नक्की झाला की तुम्ही निर्धास्त होऊ शकता. कोणतीही वैद्यकीय मदत तुम्हाला मिळू शकते. विमा कंपनीचे नियम, तुम्ही भरत असलेला विम्याचा हप्ता व घेत असलेली वैद्यकीय मदत यावर तुम्ही उपचार खर्चापैकी किती भार सहन करायचा ते ठरते. अर्थात, त्याला वरची मर्यादा घालून दिलेली असते. मग त्या खेरीज उपचार खर्च कितीही आला तरी विमा कंपनी त्या बिलाचे पैसे चुकते करते. तुम्हाला भराव्या लागणाऱ्या पैशाला तुमचे अंशदान किंवा कॉण्ट्रिब्यूशन किंवा कोपे असे म्हणतात. असे म्हणतात की एकदा विमा घेतला की तुमच्या तब्येतीची काळजी तुम्हाला नाही तर विमा कंपनीला व डॉक्टरांना करावी लागते.

या प्रायमरी डॉक्टरची किंवा एखाद्या स्पेशालिस्ट डॉक्टरची तुम्ही एकदा वेळ ठरवून घेतलीत की ती वेळ डॉक्टरने सुध्दा पाळायची असते. तुम्हाला सकाळी दहा वाजताची वेळ दिली तर तुम्ही खरोखरच डॉक्टरच्या केबिनमध्ये दहा वाजता असता. त्या आधी दहा मिनिटे नर्स तुमची प्राथमिक तपासणी करून त्याची नोंद केलेला केस पेपर डॉक्टरला सुपुर्द करते. तुम्हाला दहाची वेळ देऊन तुमचा नंबर दुपारी १२ वाजता आला असे कधीच होत नाही. अशा उशिराची डॉक्टरच्या विरुद्ध नोंद होते. आपल्याकडे एखाद्या डॉक्टरने वेळ दिली म्हणजे त्या दिवसभरात तुमचा केव्हातरी नंबर लागणार. तपासायला जायचे म्हणजे दोन तीन तास गृहीत

धरूनच जावे लागते.

गेल्या पंधरा वर्षांत मी अमेरिकेचे अनेक अनुभव घेतले. पर्यटन, वेगवेगळी सौदर्यस्थळे, नॅशनल पार्कस्, देशातील प्रवास, रस्ते, स्वच्छता, शिस्त, लोकांचे नियम पालन, हॉटेल्स, विविध प्रकारचे खाणे, सगळ्याचा मनमुराद आनंद लुटला. या वेळी एक वेगळा अनुभव घेणे माझ्या आयुष्यात लिहिलेले होते. हा अनुभव कोणी मागून घेणार नाही किंवा हा अनुभव कोणी आनंदाने स्वीकारणार पण नाही किंवा आनंदाने उपभोगणार नाही. दुर्दैवाने मला तो फार प्रदीर्घ काळ अनुभवावा लागला. तो अनुभव म्हणजे वैद्यकीय उपचाराचा, तोही हॉस्पिटलमध्ये थोडेथोडके दिवस नाहीत तर दोन महिने व सात दिवस.

हॉस्पिटलमध्ये इतके दिवस राहणे अत्यंत क्लेशकारक तर होतेच; पण माझ्या आवश्यक असणाऱ्या उपचारासाठी ते सहन करणे क्रमप्राप्त होते. या काळात त्या अनुभवाची चांगली बाजू मला प्रकर्षाने जाणवली. माझ्या शारिरीक क्लेशाबरोबर हा वेगळा अनुभव मला विचार करायला लावणारा होता. मला मिळालेली ट्रिटमेंट, डॉक्टरांनी वेळोवेळी दिलेला सल्ला, समजावून सांगितलेल्या गोष्टी, हॉस्पिटलची व्यवस्था, स्वच्छता, नर्सेस व इतर कर्मचाऱ्यांकडून मिळणारी वागणूक, वेळापत्रकाचे काटेकोर पालन, हॉस्पिटलमध्ये असणारी वैद्यकीय तपासणी व उपचाराची असणारी यंत्रे व साधने, त्या साधने व यंत्रांसाठी असणाऱ्या ऐसपैस जागा, ते वापरणारे निष्णात लोक व सर्वांत मुख्य म्हणजे सर्वांच्या तोंडात असणारा आपुलकीचा व गोड शब्द. आजारी माणसाला जितके मानसिक स्वास्थ्य मिळेल तितका त्याचा आजार लवकर बरा होईल हे त्यांना माहीत असते.

पुण्याच्या ट्रीपमध्ये शेवटच्या चार दिवसांत माझ्या डाव्या पायाच्या अंगठ्याजवळच्या बोटाला ठेच लागली. माझ्या पायाला संवेदना नसल्यामुळे माझ्या ते लक्षात आले नाही. एक दिवस उजव्या पायाला ड्रेसिंग करताना रेखाचे लक्ष डाव्या पायाकडे गेले व झालेली जखम तिच्या लक्षात आली. डॉक्टरकडे जाऊन दाखविण्याइतका वेळ हातात शिल्लक नव्हता. १७ मार्च रोजी मी बोस्टन येथे आलो. दोन आठवडे त्या बोटावर रेखा व श्रीनिवास मलमपट्टी करत होते; पण त्या नंतर मला ताप येऊ लागला. पायावर सूज आली. लक्षणे ठीक दिसेनात.

शेवटी १० एप्रिलला श्रीनिवासने दवाखान्यात जाण्याचा निर्णय घेतला. माझा वैद्यकीय विमा फोलसम येथील असल्यामुळे बोस्टनला माझे उपचार विमा कंपनी अत्यावश्यक सेवा - इर्मजन्सी - म्हणून मान्य करतील का असा प्रश्न होता.

हॉस्पिटलमध्ये दाखल होण्यासाठी सकाळी ८ वाजता स्वागतकक्षात गेल्यापासूनच मला फार वेगळा अनुभव येण्यास सुरुवात झाली. प्राथमिक चौकशी करून माहिती घेतल्यानंतर त्यांना पायाची जखम किती गंभीर आहे याची कल्पना आली. त्याबरोबर त्यांची उपचाराची चक्रे वेगाने फिरू लागली. व्हॅस्क्युलर सर्जन - रक्तवाहिन्या शल्यविशारद, मधुमेहाचे तज्ज्ञ, मधुमेहाने होणाऱ्या पायावरील परिणामाचे तज्ज्ञ डॉक्टर, सर्वांनी येऊन तपासले. पायात इन्फेक्शन झाले होते त्यामुळे त्यावरील उपचार तातडीने सुरू झाले. आलेल्या सर्व तज्ज्ञांनी विचारविनिमय करून ते माझ्याशी येऊन बोलले. माझ्या पायाच्या गंभीर स्वरुपाची मला पूर्ण कल्पना दिली. रक्तपुरवठा होत नसल्याने खराब झालेले बोट प्रथम काढणे आवश्यक होते. ते दुपारी चार वाजता काढण्यात आले पण त्याच वेळी ती जखम बरी होणार नाही याची त्यांनी मला कल्पना दिली. ताबडतोब पायाचे एक्सरेज, डॉपलर टेस्ट करून रक्तप्रवाहाचा अंदाज घेतला. एकूण चित्र फारसे बरे नव्हते. त्यामुळे अँजिओग्राफी, बायपास सर्व उपचारांचा विचार झाला. त्यात असलेले अनेक धोके मला समजावून सांगण्यात आले. जास्तीतजास्त काय होईल तर माझा गुडग्याखालचा पाय कापावा लागले याची मला स्पष्ट कल्पना देण्यात आली. माझी मनस्थिती भयंकर झाली होती. पण वारंवार सगळे डॉक्टर येऊन मला धीराच्या चार गोष्टी सांगत होते. माझी मनस्थिती ठीक करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. त्याच वेळी माझ्या घरच्या लोकांनाही ते स्पष्ट कल्पना देत होते. हे सर्व डॉक्टरांची एकूण टीम मिळून करीत होती. शुक्रवार दिनांक १७ एप्रिल रोजी माझ्या पायावर बायपास करून रक्तप्रवाह सुरू करण्याचा प्रयत्न करण्याचे ठरले. पण गुरुवारी रात्री ९ वाजता मुख्य व्हॅस्क्युलर सर्जन माझ्या रूमवर आले व त्यांनी सांगितले, मी आज चार पाच तास तुमच्या केसचा विचार व घेतलेल्या एकूण चाचण्यांवरून अभ्यास केला व असे ठरविले आहे की बायपासऐवजी आपण रक्तवाहिनीमध्ये बलून सोडून रक्तप्रवाह सुरू करण्याचा प्रयत्न करू. तो यशस्वी

होईल अशी माझी खात्री आहे. त्यायोगे आपण बायपासमधील धोके टाळू शकू व तुम्हाला फोलसम, कॅलिफोर्निया येथे पुढच्या उपचारांसाठी जाता येईल. ते त्यांच्या मतावर ठाम होते. त्याप्रमाणे शुक्रवारी सकाळी बलून घालण्यासाठी अँजिओग्राफी झाली व ती यशस्वी झाली. त्यानंतर मला शनिवार दि.१८ एप्रिलला घरी सोडले. फोलसमला येण्यापर्यंत ड्रेसिंग कसे करायचे हे घरच्यांना शिकविले. माझ्या वैद्यकीय विम्याच्या दृष्टीने ते सोयीचे झाले.

हे दहा दिवसांचे हॉस्पिटलमध्ये राहणे व उपचार कसा अत्यावश्यक व अर्जंट होता हे विमा कंपनीला सांगणे इतकेच नव्हे तर पटवून देणे हे डॉक्टरांनी करणे आवश्यक असते. हॉस्पिटलमध्ये केस मॅनेजर म्हणून एक व्यक्ती आहे. डॉक्टर व त्या केस मॅनेजरने माझी केस विमा कंपनीला सांगून आत्तापर्यंतचे सगळे कव्हर करून घेतलेच, पण त्याबरोबर पुढे मला फोलसम येथे लगेच वैद्यकीय मदत लागणार आहे हे पण पटवून दिले. माझ्या पुढील उपचाराचा मार्ग सुकर झाला.

त्या दहा दिवसांत मला वैद्यकीय उपचार तर चांगले मिळालेच, पण त्यापेक्षा हॉस्पिटलचे वातावरण, व्यवस्थापन, सोयी, स्वच्छता, आजाऱ्यांची घेतली जाणारी काळजी यांनी मला चकित करून टाकले. हॉस्पिटलमध्ये दाखल होण्यासाठी गेल्याबरोबर जो स्वागतकक्ष आहे तो म्हणजे एखाद्या पंचतारांकित हॉटेलसारखा प्रशस्त, अतिशय छान सजावट असलेला, आरामदायक सोफा, खुर्च्या, निरनिराळ्या झाडाफुलांच्या कुंड्या व भिंतीवर सुरेख पेंटींग्ज यांनी प्रसन्न केलेला, तसेच मंद पण सुरेल संगीत चालू असलेला एक दिवाणखानाच होता. तिथला कर्मचारी तुम्हाला बसायला सांगतो. थोड्याच वेळात तो तुम्हाला नोंदणी कक्षात जाण्यास मार्ग दाखवतो. या सर्वांचा परिणाम म्हणजे तुम्ही हॉस्पिटलमध्ये आला आहात व आजारी आहात हे विसरून जाता. नोंदणीकक्षात तुमचे नांव, पत्ता व जन्मतारीख विचारल्यावर संगणकावर तुमची बाकीची सर्व माहिती उपलब्ध होते. ही माहिती ज्या डॉक्टरतर्फे तुम्ही हॉस्पिटलमध्ये आला आहात त्याच्यामार्फत आलेली असते. मग लगेच आजाऱ्याच्या आवश्यकतेनुसार बेडवरून अगर व्हीलचेअरवरून तुम्हाला दिलेल्या रूमवर नेले जाते.

त्यानंतर काय उपचार सुरू करायचे ते नर्स स्टाफला कळविलेले असते.

वर म्हटल्याप्रमाणे हॉस्पिटलच्या प्रत्येक विषयातील निष्णात लोकांची टीम असते. ते त्यांच्या विषयाप्रमाणे सूचना देतात. हॉस्पिटलमध्ये तांत्रिक परीक्षांसाठी वेगवेगळे विभाग असतात. त्या सर्व विभागांना उत्तम तंत्रज्ञ, भरपूर जागा, एकाहून अधिक मशिन्स, उदाहरणार्थ, एक्सरे, एम्.आर्.एम्. इ. उपलब्ध असतात. लहान-मोठी अशी अनेक ऑपरेशन थिएटर्स असतात. या सर्व ठिकाणी नेण्यासाठी व परत रूममध्ये पेशन्टला आणण्यासाठी स्वतंत्र ट्रान्सपोर्टेशन विभाग असतो. तुम्ही म्हणाल हे तर आपल्याकडेही असतेच की सगळे. पण पेशन्ट व उपलब्ध व्यवस्था, जागा, मशिनरी याचे प्रमाण पाहिले तर आपल्याकडे ते कधीच पुरेसे पडत नाही. त्यामानाने अमेरिकेत हे कितीतरी जास्त असते. त्यासाठी पैसा हे एकच कारण आपण सतत देतो; परंतु ते करण्याची आपल्याला सवयच नाही. आपल्याकडे हॉस्पिटलचे लागणारे पैसे व त्यातून मिळणारा पैसा यातून हे निर्माण करणे सहज शक्य आहे. लोकांना नि:स्पृहपणे काम करायला तर पैसे पडत नाहीत ना? ज्ञान व प्रावीण्य याबाबतीत आपले तंत्रज्ञ व डॉक्टर कोठेच कमी नाहीत. तरीही हे आपल्याकडे होऊ शकत नाही हे सत्य मान्य करायलाच हवे. खऱ्या अर्थाने हॉस्पिटल हा सामाजिक बांधिलकीचा व्यवसाय राहिला नसून तो जास्त पैसा मिळविण्याचा धंदा झाला आहे. गरिबांसाठी कमी दरातील हॉस्पिटल अशी जाहिरातबाजी केली जाते पण प्रत्यक्षात भरपूर पैसे उकळले जातात. पेशन्टचे उपचार सुरू करण्यापूर्वी आपल्याकडे होणाऱ्या बिलांपैकी मोठी रक्कम ॲडव्हान्स म्हणून भरावी लागते. त्याशिवाय डॉक्टर पेशन्टकडे ढुंकूनही पाहत नाही. या उलट अमेरिकेत तुमचा विमा असो वा नसो इमर्जन्सी सेंटरवर तुम्हाला उपचार मिळणार नाही असे कधीच घडत नाही.

मी पायासाठी इमर्जन्सी सेंटरवर गेल्यावर माझ्या जखमेचे गांभीर्य पाहून लगेच प्राथमिक उपचारासाठी एका तात्पुरत्या पण सुसज्ज रुममध्ये नेले होते. अशा बऱ्याच रुम असतात. कोणत्याही ऑपरेशनच्या पूर्वी पेशंटला पूर्वतयारीसाठी वेगळ्या पण ऑपरेशन थिएटरच्या जवळ नेले. तिथे परत एकदा पेशन्टला काय उपचार केले जाणार आहेत, किती वेळ लागणार आहे, जर भूल देणे असेल तर त्या बद्दल कल्पना दिली जाते. डॉक्टर, भूल देणारे, तसेच मदत करणाऱ्या नर्स

पेशन्टला प्रत्यक्ष येऊन भेटून मानसिक धीर देतात. उपचाराचे परिणाम व संभाव्य दुष्परिणाम याची पूर्ण कल्पना देतात. या सर्व बाबतीत अत्यंत पारदर्शकता पाळली जाते.

सर्वांत फरक जाणवला तो म्हणजे ऑपरेशननंतर घेतली गेलेली काळजी. सतत पेशन्टवर नजर ठेवणे, त्याला काय हवे नको ते पाहणे. त्याची औषधे वेळेवर देणे हे नित्यनियमित पाहिले जाते. डॉक्टर दर दिवशी भेटून व प्रगती पाहून जातात. शारिरीक व मानसिक दृष्टीने तुम्हाला आरामदायी - कंफर्टेबल ठेवले जाते. पेशन्टची तब्येत सुधारण्यास याचा खूप फायदा होतो.

बोस्टनहून फोलसमला २१ तारखेला आल्यानंतर इथले व्हॅस्क्युलर सर्जन, पायाचे डॉक्टर यांच्या भेटीनंतर मी लगेच २४ एप्रिल रोजी इथल्या हॉस्पिटलमध्ये दाखल झालो. पूर्वेकडून अगदी पश्चिमेकडे येऊन सुध्दा कशातही फरक नव्हता. स्वागतकक्ष, नोंदणी विभाग, रूम व्यवस्था, स्वच्छता, तांत्रिक व उपचार, देखभाल करणारा नर्सेस स्टाफ, सफाई कामगार, पेशन्टला मिळणारी शुश्रूषा, यात कसलाच फरक नव्हता. हे हॉस्पिटल मिशनरी लोकांच्या ट्रस्टचे असल्याने कांकणभर जास्तच चांगले होते. येथील यंत्रसामुग्री, जागा ही तर खूप अद्ययावत व उत्तम होती. अमेरिकेत कोठेही गेलात, तरी या व्यवस्थेत व सोयीमध्ये काहीही फरक नसतो.

हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यानंतर पुन्हा सगळ्या तपासण्या व चाचण्या तीन दिवस सुरू होत्या. डॉक्टर्सनी विचारविनिमय करून माझा पाय वाचवायचा ठरविले. परत एकदा अँजिओग्राफी करून रक्तप्रवाह सुरू करण्याचा प्रयत्न झाला. त्याला बऱ्यापैकी यश आल्यानंतर २८ एप्रिलला एक शस्त्रक्रिया केली. डाव्या पायाची सर्व बोटे व थोडासा खालचा भाग काढला. एक आठवड्यानंतर ते पुरेसे नव्हते म्हणून ५ मे रोजी आणखी थोडासा भाग काढला. तिथपर्यंत रक्तप्रवाह येतो आहे हे लक्षात आल्यानंतर डॉक्टरांना पण खूप बरे वाटले. बॉस्टन व फोलसमच्या सर्व डॉक्टर्सनी माझा पाय वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मला झाला तितकाच आनंद त्यांनाही झाला. पाय पूर्ण बरा होण्यास अजून तीन चार महिने लागतील याची मला कल्पना देण्यात आली. काय काळजी घ्यायची याची मला

व घरच्यांना कल्पना देण्यात आली. चार महिन्यांनंतर का होईना मला माझ्या पायावर उभे राहता येईल याचाच खूप आनंद झाला. सर्व सूचना पाळून आता मला घरी जायला मिळेल अशी आशा मनात निर्माण झाली.

पण तसे होणार नव्हते. अमेरिकेत अशा शस्त्रक्रियेनंतर नर्सिंग केअर सेंटर मध्ये पाठवितात. मलाही तसेच नर्सिंग सेंटरला चार आठवड्यांसाठी जावे लागेल असे सांगण्यात आले. हॉस्पिटलमधून १३ मे रोजी मला परस्पर नर्सिंग होम सेंटर मध्ये हालविण्यात आले. नेताना एका स्पेशल व्हॅनने मला बेडवरूनच नेले. या गाड्या फार स्पेशल बांधलेल्या असतात. पेशन्टच्या जरूरीप्रमाणे बेड किंवा व्हीलचेअर उचलून व्हॅनमध्ये चढविले जाते. गाडी चालताना हलू नये म्हणून सगळ्या बाजूने सीटबेल्ट असतात तसे पट्टे लावले जातात. सर्व विचारात घेऊन या गाडीची रचना केलेली असते. नर्सिंग केअर सेंटरमध्ये माझ्यासाठी हॉस्पिटलनेच रूम राखीव करून ठेवली होती.

नर्सिंग केअर सेंटर म्हणजे हॉस्पिटल व घर यांच्यामधील व्यवस्था असते. अमेरिकेत कित्येक जण एकटेच राहत असतात. त्यांची देखभाल करायला घरी कोणीच नसते. आजारातून उठल्यावर प्रत्येकालाच मदतीची गरज असते किंवा शस्त्रक्रियेनंतर अनेक बाबतीत परावलंबित्व येते. असे परावलंबित्व कमीतकमी येऊन पेशन्टला स्वत: त्याचे रोजचे व्यवहार कसे करता येतील याचे शिक्षण देणे हाही या नर्सिंग केअर सेंटरमध्ये काही दिवस ठेवण्याचा उद्देश असतो. पेशन्टला आवश्यक तसे रोजचे जेवण दिले जाते. त्याची औषधे देण्यास सुशिक्षित नर्स असतात. डॉक्टरी उपचार सोडले तर नर्स पेशन्टची सगळी काळजी घेतात. या नर्सना व पेशन्टना मदतीसाठी एक असिस्टंट नर्स असते. ती जरूरीप्रमाणे पुरुष किंवा स्त्री असते. ती पेशन्टचा बेड करणे, त्याला बेडवरून व्हीलचेअरवर बसायला मदत करणे, जेवण करण्यास मदत करणे, कपडे बदलणे, हवे नको ते पाहणे, तसेच आठवड्यातून दोनदा आंघोळ घालणे अशी कामे करते. घरी एकटे राहणाऱ्या पेशंटला तर यासारखी दुसरी सोय नाही. काही दिवसांतच या सर्व लोकांशी येणाऱ्या पेशंटचे एक वेगळेच नाते निर्माण होऊन जाते.

मी सेंटरला दाखल झालो त्या नर्सिंग सेंटरमध्ये चार विंग्जमध्ये ८० रूम्स्

व साधारण १२५ पेशन्टस् होते. सर्व जागा तळमजल्यावर होती. बहुतेक पेशन्टस् व्हीलचेअरवरून इकडून तिकडे भटकताना दिसत असत. गेलो त्या व दुसऱ्या दिवशी तिथले एकूण वातावरण पाहून माझा जीव घाबरून गेला. मला मराठी सिनेमा 'पेडगावचे शहाणे' मधील वेड्यांच्या हॉस्पिटलचा सीन आठवला. त्यात जसे सगळे वेडे चाळे करीत होते तसेच या सेंटरमधील पेशन्ट वेगवेगळे चाळे करताना आढळले. अशा लोकांबरोबर आपल्याला चार आठवडे तरी काढावे लागणार आहेत हे मनात येऊन भयंकर वाटले. पळून जावे असेच वाटले. तो एक वेड्यांच्या बाजारासारखा रोग्यांचा बाजार वाटला.

त्यातील बहुतेक आजारी मनाचा तोल गेलेले होते. एकटेपणाने त्यांच्या डोक्यावर परिणाम झाला होता. माझ्या शेजारचा एक म्हातारा सतत माझ्याच रूममध्ये येत असे. त्याला कोठे जायचे हेच समजत नसे. सतत तोंडाने "आय् क्यानॉट कुक" म्हणत हिंडत असे. एकटा राहत असताना त्याला जेवण बनविण्यात अडचण येत असावी. तो बाहेर दिशाहीन हिंडायला लागला की सेंटरची मुख्य नर्स त्याला हाका मारायची. "ओ माय बॉय फ्रेंड व्हेअर आर यू गोईंग?" असे म्हणून ती त्याला त्याच्या रूमवर नेत असे. एक म्हातारा सतत भिंतीजवळ आपल्या हाताच्या सावलीशी खेळत असे. एक ७२-७३ वयाची स्त्री रोज सायंकाळी ठीक ४.४५ वाजता नर्सकडे येऊन खिशातून जुने चार पाच कागद काढत असे. त्यातील एक चिठोरे नर्सला दाखवून म्हणत असे, "मला माझ्या वडिलांना या नंबरवर फोन लावून दे" नर्स तिला म्हणायची, "अगं बाई तुझे वय काय? तुझे वडील तर स्वर्गात आहेत त्यांना मला फोन लावता येणार नाही." आणि हे रोज घडत असे. एक बाई बरेच दिवस सेंटरला राहत होती. तिला नीट बोलता येत नव्हते. बहुधा तिच्या स्वरयंत्राला काहीतरी प्रॉब्लेम असावा. तरी ती व्हिलचेअरवर हिंडत सतत ओरडत असे, मला घरी जायचे आहे. रोज पहाटे चार वाजल्यापासून हे तिचे सुरू होत असे. एका पेशन्टचा गुडघ्यापर्यंतचा पाय काढला होता. तो मात्र तरीही हसत हिंडत असे. त्याला तर दर दिवसाआड डायलिसिसला जावे लागे. त्याच्या मनाची उभारी पाहून मला फार आश्चर्य वाटत असे. हे असे अनेक प्रकारचे पेशन्ट मला तिथे पाहायला मिळाले. पण त्याचबरोबर त्या नर्सिंग सेंटरमध्ये काम करणाऱ्या

लोकांचे मला फार कौतुक वाटले. अशा पेशन्टला हाताळताना त्यांचा आवाज कधीच चढत नसे. उलट ते अत्यंत प्रेमाने सर्व पेशन्टना सांभाळीत असत. कधी कोणा कोणावर रागावले आहे असे मी एकदाही पाहिले नाही. ही सेवाभावी वृत्ती ते कोठून आणतात हे न कळे. माझा त्यांना सलाम.

नर्सिंग सेंटरमधील लोकांना आनंदी ठेवण्यासाठी व त्यांच्या विरंगुळ्यासाठी निरनिराळे कार्यक्रम ठेवलेले असत. सेंटरच्या मुख्य स्वागतकक्षांत आठवड्यातून एकदा कोणीतरी बाहेरचा कलाकार येऊन आपली कला सादर करीत असे. वाद्यसंगीत, गायन, नकला किंवा गप्पांचा कार्यक्रम असे. लोकांचा एक दीड तास मजेत जात असे. सेंटरच्या एका छोट्या हॉलमध्ये दर सोमवारी दुपारी एक सिनेमा व त्याच्या जोडीला पॉपकॉर्न असा कार्यक्रम असे. रोज नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण सर्वांना रूमवर आणून दिले जाई. जरूर असेल त्यांना जेवण करण्यास मदत केली जात असे. जेवणात एखाद्याला काही बदल हवा असेल तर त्याने कळविल्याप्रमाणे व शक्य असेल तर तसा बदल केला जात असे. शनिवारी सकाळी मागच्या यार्डमध्ये बुफे ब्रेकफास्टची व्यवस्था केली जात असे. उन्हाळ्याचे दिवस होते. त्यामुळे थोड्या थोड्या वेळाने पिण्यासाठी आईस वॉटर आणून दिले जायचे. तसेच दुपारच्या तापलेल्या हवेत आईसक्रीम, आईसफ्रुट (चोखायचे गोळे), थंड योगर्ट (दही) रूमवर देत असत. एका हॉलमध्ये बरीचशी पुस्तके व मासिके ठेवलेली होती. पेशन्टना व त्यांच्याकडे येणाऱ्यांना ती बसून वाचायला छान व्यवस्था होती. एका हॉलमध्ये कार्डस्, बोर्ड गेमस् खेळायची सोय केलेली होती. इंटरनेटसाठी वाय्फाय् संपूर्ण परिसरात उपलब्ध होते. ज्याला शक्य असेल त्याला व पेशन्टच्या नातेवाइकास जर बाजार करायचा असेल तर सेंटरतर्फे बाजारात जाऊन येण्याची पंधरा दिवसातून एकदा सोय केली जात असे. या सगळ्या सोयी उपलब्ध केल्यामुळे पेशन्टचे ते एक घरच बनून जाते.

या सर्व सुखसोयींबरोबरच Physical Therapy शारिरीक उपचार व रोजचे व्यवहार करण्याचे सोपे पर्याय पण शिकविले जातात. तिथे येणारे पेशन्ट थोडेफार परावलंबी असतात. त्यांचे ते परावलंबित्व कसे कमी करून राहता येईल ते शिकविले जाते. त्याचबरोबर त्यांचा कमी झालेला आत्मविश्वास परत त्यांना

मिळवून दिला जातो. व्हीलचेअरवरून कसे हिंडायचे, न पडता उभे कसे राहायचे, वॉकरच्या साहाय्याने पावले कशी टाकायची, जिना कसा चढायचा, आपले कपडे स्वत: कसे घालायचे इ.इ. सगळे शिकविले जाते व प्रत्यक्ष करून घेतले जाते. तसेच कमजोर झालेल्या शरीराच्या भागात व्यायामामुळे – ज्याला जितका शक्य असेल तितका – शक्ती येण्यास मदत होते. यामुळे घरी गेल्यानंतर पेशन्टला खूप सुसह्यपणे जगता येते व ते आपला रोजचा व्यवहार सुरू करू शकतात. अशा प्रकारची सेंटर्स अमेरिकेत सगळीकडे आहेत. आपल्याकडे अशी सोय असल्याचे मला तरी ठाऊक नाही. वृध्दाश्रम आहेत पण त्याची उद्दिष्टे वेगळी आहेत.

मला घरी गेल्यावर फारशी मदत न घेता सगळे व्यवहार करता येतील अशी त्यांना खात्री झाल्यानंतर व मी शस्त्रक्रिया केलेल्या पायाची काळजी घेऊ शकेन असे वाटल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मला दि.१५ जून रोजी घरी सोडण्यात आले. दोन महिन्यांपेक्षा जास्त दिवस हॉस्पिटलमध्ये काढल्यानंतर घरी येताना परमानंद झाला. घरच्या वातावरणात साहजिकच पाय जास्त लवकर सुधारू लागला. पाय पूर्ण बरा होण्यासाठी डॉक्टरांनी दि.२३ जूनला कृत्रिम – सिंथेटिक कातडे जखमेवर लावले व जखमेला टाके घातले. अजून सहा आठवडे पाय पूर्ण बरा होऊन मला उभे राहण्यास वेळ लागेल हे पण बजावले. पण त्यानंतर का होईना मी दोन पायांवर उभा राहू शकेन या कल्पनेने आतापासूनच मी खूश आहे.

तर असा हा अमेरिकेतील वैद्यकीय उपचाराचा अनुभव मला घ्यावा लागला. पण त्यायोगे तिथली ही व्यवस्था पण प्रत्यक्ष अनुभवता आली. आणि त्यामध्ये असणाऱ्या त्यांच्या व आपल्या वैद्यकीय सेवेतील उपचार व वागणूक ह्यातील फरकाने मन अस्वस्थ झाले. असो.

आता आम्ही अमेरिकेतील कायमच्या वास्तव्याला शरीराने रुजलो आहोत व मनाने रुळू लागलो आहोत.

* * *

## प्रकरण चोविसावे

# दहा वर्षांनंतरची अमेरिका व मी

आतापर्यंतचे लिखाण मी बरेच पूर्वी म्हणजे साधारण दहा वर्षांपूर्वी केले होते. त्यानंतर बरेच काही घडून गेले. रोजच्या जीवनात अमेरिकेत फारसा फरक पडलेला नाही. अमेरिकेतील शिस्तपालन, रस्ते, पोलिसांचा दरारा व मदतीचा हात, एकूणच अमेरिकेतील व्यवस्थापन, नेमून दिलेले काम करण्याची सचोटी, मॉल्स, मार्केट यात काहीही फरक झालेला दिसत नाही; पण काही बाबतीत तो फरक नक्कीच जाणवू लागला आहे.

पूर्वीइतकी स्वच्छता आता दिसत नाही. सार्वजनिक ठिकाणी आता कचरा दिसू लागला आहे. रस्त्याच्या कडेला आता कागद व प्लास्टिक दिसू लागले आहे. अर्थात, हे पूर्वीच्या तुलनेत. एरवी नव्याने पाहणाऱ्याला अजूनही सर्व स्वच्छ व चकचकीतच दिसेल. त्यामानाने नवीन टोलेजंग इमारती नव्याने उभ्या राहिलेल्या माझ्या नजरेत आल्या नाहीत. अलीकडच्या काळात वर्णभेद जरा जास्त प्रमाणात दिसू लागला आहे. त्यातही मागासवर्गीय उपेक्षित वर्गाला सवलती व प्राधान्य दिले गेल्यामुळे तो वर्ग थोडासा निर्ढावल्यासारखा वागू लागलेला दिसतो. त्यांना त्यांच्या कर्तव्यापेक्षा हक्काची जास्त जाणीव झालेली दिसते. सर्व प्रकारच्या नोकऱ्यांमध्ये त्यांना प्राधान्य मिळाल्याने त्यांचा भरणा जास्त झालेला जाणवतो.

पूर्वीच्या एअरलाईन काउंटर तसेच विमानात बसल्यानंतरच्या मिळणाऱ्या सेवेमध्ये खूपच फरक जाणवू लागला आहे. सर्वच एअरलाईन्सच्या कर्मचाऱ्यात मार्दवता कमी असून उर्मटपणा व बेपर्वाई जास्त दिसून येते. एअरलाईन्सच्या पैसे जास्त आकारण्याच्या वेगवेगळ्या क्लृप्त्यांमुळे प्रवासी बराच नाराज झालेला आहे. पण आपल्याकडे जसे स्टेट ट्रान्सपोर्टला पर्याय नसतो तसेच इथे विमान प्रवासाचे आहे. तक्रार केली तरी त्याला इथे काहीच पर्याय नाही.

गेल्या पंधरा वर्षात खाद्य पदार्थांच्या किंमतीत मात्र फारसा फरक झालेला

दिसत नाही. दुध, ब्रेड, भाज्या, फळे यांच्या किमती जवळ जवळ स्थिर आहेत. पण त्या मानाने पेट्रोल ज्याला इथे गॅस म्हणतात त्याच्या किंमती मात्र जास्त झाल्या आहेत. पूर्वी १.५० डॉलरला एक गॅलन असणारे पेट्रोल आता साधारण ३.४० डॉलरला एक गॅलन झालेले आहे.

गेल्या पंधरा वर्षांत सर्वांत वाढलेल्या किमती म्हणजे रिअल इस्टेटच्या. जे घर पूर्वी ३००,००० डॉलरला मिळत होते तेच घर आता ६००,००० ते ७००,००० डॉलरला गेले आहे. नवीन घरे पण खूप बांधली जात आहेत. बाहेरून येणाऱ्या लोकांच्या लोंढ्यामुळे या किमती वाढल्या आहेत. ज्या ठिकाणी हे स्थलांतरित मोठ्या प्रमाणात येत आहेत, त्या विभागातील घरांच्या किंमती तर याहूनही वाढलेल्या आहेत. असे असूनही घरे रिकामी राहत नाहीत. यावरून किती लोक आपले नशिब अजमावयाला अमेरिकेत येतात याची कल्पना येऊ शकेल.

अमेरिकेत सुरक्षितता हा पूर्वी प्रश्न नव्हता; परंतु आजकाल मात्र चोऱ्या, घरफोड्या, मोटारीच्या चोऱ्या, लूटमार हे प्रकार घडू लागले आहेत. ठरावीक वर्गातील सुस्थिती व सुबत्ता हे याचे प्रमुख कारण आहे. ती सुस्थिती व सुबत्ता ही गरीब व खालच्या वर्गातील लोकांना सहन होत नाही. तसेच सधन वर्ग डोळ्यात खुपेल अशारितीने राहत, वागत व खरेदी करत असतो. ते नक्कीच इतरांच्या डोळ्यांत सलत असणार. चोऱ्या करणारे सुध्दा आधुनिक तंत्राचा वापर करतात. घर फोडून आत आल्यावर मेटल डिटेक्टर वापरून घरात सोनेनाणे कोठे ठेवले आहे त्याचा पत्ता शोधतात व थोड्या वेळात मोठे घबाड घेऊन पसार होतात. भारतीय लोकांना असणारी सोने घेण्याची हौस त्यांना पुरेपूर माहीत झाली आहे. त्यामुळे त्यांच्या घरात हमखास यासाठी चोऱ्या होत आहेत.

मुख्य फरक जाणवतो तो परदेशातून आलेल्या स्थलांतरितांच्या संख्येमध्ये झालेली प्रचंड वाढ. पूर्वी या स्थलांतरितांमध्ये चायनीज लोक सर्वांत जास्त होते. पण आता भारतीय लोक सुध्दा फार मोठ्या संख्येने आलेले जाणवते. विशेषत: आय.टी. व्यवसाय तर भारतीय लोकांनी व्यापून टाकला आहे. त्यामुळेच जिथे जिथे आय्.टी. व्यवसाय आहे तिथे तिथे चायना टाऊन सारखी भारतीय टाऊन निर्माण झाली आहेत. म्हणून कॅलिफोर्नियाला अमेरिकेतील कोकण म्हटले जाऊ

लागले आहे. त्या भागात तुम्ही गेलात तर तुम्ही अमेरिकेत आहात हे खरेच वाटणार नाही. आपण डोंबिवली, पुणे किंवा बंगलोरला असल्यासारखेच वाटेल. तशाच अपार्टमेंटस्च्या इमारतींचा पुंजका, तशीच माणसांची गर्दी. पूर्वी भारतीय खाण्याच्या वस्तू फक्त मोठ्या शहरात मिळत असत; पण आता छोट्या शहरातही पटेलचे एक तरी मोठे दुकान असतेच. तिथे भारतीय सगळ्या जाती जमातीला लागणाऱ्या सगळ्या गोष्टी मिळतात. अगदी चितळे बंधूंचे सगळे पदार्थ, हळदीराम, पापड, लोणची इ.इ. काहीही मिळत नाही असे होत नाही. त्यामुळे कोणत्याच भारतीय गोष्टींना चुकल्यासारखे वाटत नाही. गणपतीच्या दिवसात गणेश मूर्ती, पूजा साहित्य, दिवाळीत फराळाचे पदार्थ, आकाश कंदील मागाल ते मिळते.

अर्थात, हे भारतीय स्थलांतरितांच्या संख्येत झालेल्या लक्षणीय वाढीमुळे झाले आहे. मागणी आली की व्यापारी त्याचा पुरवठा करायला तयारच असतो. त्यामुळे पटेल स्टोअर्स हे प्रत्येक ठिकाणचे महत्त्वाचे खरेदीचे ठिकाण झाले आहे. गेल्या पंधरा वर्षांत स्थलांतरितांच्या कारणांमध्ये खूप फरक झालेला आहे. पूर्वी बहुतेक जण प्रथम उच्च शिक्षणासाठी येऊन नंतर नोकरीनिमित्त राहिलेले असत. आता भारतात शिक्षण पुरे करून एकदम नोकरीसाठी आलेले स्थलांतरित जास्त आढळतात. त्यामुळे भारतातच पुण्याहून कलकत्त्याला बदली व्हावी असेच ते आलेले असतात. त्यामुळेच भारतात परत जायचे की नाही हा गूढ प्रश्न त्यांना सतावित नसतो. त्यामुळेच ते व त्यांचे कुटुंब निर्धास्त मनाने इथले आयुष्य जगत असतात. पूर्ण आनंद घेत असतात. त्यांच्या मनात कोणताही संभ्रम नसतो.

या स्थलांतरितांमध्ये पूर्वी जास्त करून डॉक्टर्स, इंजिनिअर्स व विशेषत: आय.टी. मधील लोक अधिक असत किंवा माझी अशी समजूत होती की यात मुख्यत्वे चायनिज व भारतीय असावेत. पण तसे नाही. या दोन देशांखेरीज एशियातील सर्व देशातून इतकेच नाही तर आफ्रिका खंडातील अनेक भागातून अमेरिकेत माणसे आलेली आहेत. आणि तीही वेगवेगळ्या व्यवसायासाठी. विशेषत: आपल्या केरळमधून जशा नर्सेस गल्फमध्ये जातात तशा अमेरिकेत मोठ्या संख्येने फिलिपाईन देशातून आलेल्या आहेत. त्यांना मदतनीस म्हणून लागणारे थोडेसे नर्सिंगचे शिक्षण घेतलेले अनेकजण आफ्रिकेतून आलेले मला

भेटले. अगदी मागासलेल्या इथियोपियामधून सुध्दा आलेला एक मला भेटला. त्या अर्थाने 'अमेरिका लँड ऑफ ऑपॉर्च्युनिटि' हे पुरेपूर वाटते. इमानेइतबारे काम करणाऱ्या कोणालाही अमेरिकेत उदरनिर्वाहाची अडचण येत नाही.

जसजशी भारतीय स्थलांतरितांची संख्या वाढू लागली तसतशी अमेरिकेत भारतीय सांस्कृतिक वा कलाजीवन याचीही वाढ झाली आहे. मुलींचे अरंगेत्रम्, गणेश उत्सव, दिवाळी, गायनाचे व नाटकांचे कार्यक्रम तर दर शनिवार रविवार कोठे ना कोठे असतात. कित्येक शहरातून तर गणेश विसर्जनाची मिरवणूक ढोलताशे वाजतगाजत काढली जाते. साहित्य व नाट्यसंमेलने तर नियमितपणे दरवर्षी भरतात व त्याला फार चांगला प्रतिसाद मिळतो. त्यावेळी लोक पैसे खर्च करून मैलोन्‌मैल प्रवास करून जात असतात.

अमेरिकेत आलेल्या मुली बहुतेक करून स्वत:चा जोडीदार स्वत:च निवडतात. माझ्याजवळच्या व माहितीच्या सहा मुलींनी अशी निवड करून आपले संसार थाटले आहेत. शिवाय या निवडीसाठी त्या कोणतेही जात, पात, धर्म यांचे बंधन पाळत नाहीत. जोडीदाराबरोबर आपले जमेल का नाही हे पाहण्यासाठी त्यांना भरपूर वेळ असतो. माझ्या या सहा माहितीच्या मुलींनी स्वत:च्या जातीबाहेरच्याच मुलांना पसंती दिली आहे. याचप्रमाणे माझ्या माहितीच्या व नात्याच्या लोकांच्या मुलामुलींनी स्थानिक जोडीदार शोधून आपले घर मांडले आहे. मुख्य म्हणजे या दोन्ही प्रकारचे संसार अगदी आनंदाने व मजेने सुरू आहेत. त्यांच्या आईवडिलांनी पण हे आनंदाने मान्य करून त्यात समाधान मानले आहे. नाहीतरी त्यांचे वधूवर शोधण्याचे एक काम सोयीस्कररित्या झाले असेच त्यांना वाटत असणार. परत सगळी जबाबदारी मुलांची स्वत:चीच ना?

या सर्व बदलांमुळेच आता क्ष+१ अशी अवस्था होतच नाही. दुसऱ्या कोणत्या देशात ते आले आहेत असे त्यांना मुळीच वाटत नाही. तसेच पैसे भरपूर मिळत असल्यामुळे त्यांना केव्हाही भारतभेटीसाठी येता येते. घरच्या सर्व व्यापातून मुक्ती झाल्यामुळे घरातील स्त्रीवर्गही खूश असतो. मुलांना शाळेत अनेक संधी उपलब्ध झाल्यामुळे ती पण आनंदी असतात. एकूण काय मजेत जगताना भारताचा त्यांना विसर पडला तर त्यात नवल नसते. जे जगणे भारतात वाढत्यावयात अपेक्षित

असते ते त्यांना पहिल्या महिन्यापासून मिळायला लागलेले असते. त्यामुळे परतीचा विचार डोक्यात येण्याऐवजी इथला मुक्काम कसा वाढेल याचाच विचार त्यांच्या डोक्यात येतो.

ही व अशी काही स्थित्यंतरे गेल्या पंधरा वर्षांत जरी झाली असली तरी नव्याने येणाऱ्या कोणालाही अमेरिका ही पृथ्वीतलावरचा स्वर्गच वाटतो. झालेले बदल रोजच्या व्यवहारात व अमेरिकेच्या एकूण प्रतिमेत काहीही फरक पडू देत नाही. अमेरिका ही सर्व स्तरातील, वयातील, व्यवसायातील लोकांना भुरळ घालणारी अशीच आहे व ती तशीच राहील यात शंका नाही. लँड ऑफ ऑपॉर्च्युनिटि मेल्टींग स्पॉट अशी अमेरिकेची बिरुदावली तशीच राहणार. जगभरातून अमेरिकेत येणारे लोंढे असेच येत राहणार व अमेरिका त्या सर्वांना सामावून घेऊन त्यांचा उत्कर्ष करणार हे निर्विवाद सत्य आहे.

* * *